म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

# माझा - व्यासंग.

लेखक

श्री. ब. टिळक.

REFBK-0003563

किंमत



मा.

# माझा व्यासंग.

( १९१८ ते १९२७ )

" Rose-leaves smell when roses thrive
Here's my work while I'm alive;
Rose-leves smell when shrunk and shed,
Here's my work when I am dead."—

*T. Hardy.*

लेखक

श्रीधर बळवंत टिळक.

पुणें.

कि. १ रु.

प्रकाशक—श्रीधर बळवंत टिळक,
गायकवाडवाडा; घरे नंबर ५६८ नारायण पेठ; पुणें.

मुद्रक—बी. जी. गंडभीर, 'न्यू आर्ट ॲन्ड लिथो वर्क्स;'
सूर्यमहाल ठाकुरद्वार नाका, मुंबई नंबर ४.

पुस्तकाचे सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें स्वतःकडे राखून ठेविले आहेत.

# अर्पण-पत्रिका.

## आई !

परमपूज्य लोकमान्यांचे अखेरचे तुरुंगवासांत

तुझा छळ करणारी

**सोनेरी टोळी**

आतां आमचेवर उलटली असल्यामुळें तुझें

विस्मरण कसें बरें होईल ?

आणि हा छोटा ‘ लेख-संग्रह ’ तुजवांचून

**मी**

अन्य कोणास अर्पण करणार ?

तुझा लाडका—

बापू.

ग्रं. क्र. 3463

REFBK-0003563

# प्रस्तावना.

"This if anything of mine, is worth your memory."

RUSKIN.

गेल्या आठ-दहा वर्षांतील अत्यंत चमत्कारिक व भानगडीच्या परिस्थितींत माझे हातून वाङ्मयक्षेत्रांत जी अल्प स्वल्प कामगिरी घडून आली तिचें हें संकलित स्वरूप महाराष्ट्रीय बंधुभगिनींचे हातीं देण्यांत आज मला संतोष वाटत आहे. मी माझ्या लेखनव्यवसायास कॉलेजमध्यें शिक्षण घेत असताच उपक्रम केला; व प्रस्तुत लेखसंग्रहांतील पहिले दोन इंग्रजी लेख हे माझे परमपूज्य तीर्थरूप कै. लोकमान्य टिळक यांचे हयातींतच कॉलेजच्या त्रैमासिकाचे अंकांतून अनुक्रमें १९१८ व १९१९ सालीं प्रथम प्रसिद्ध झाले. लो. टिळकांचे निधनानंतर पुढें वेळोवेळीं मी जे लेख प्रसिद्ध केले त्यांपैकीं विनोदी, उद्बोधी, विवेचनात्मक आणि सुविचारपरिप्लुत अशा योग्य लेखांची निवड करून तेवढेच या पुस्तकांत ग्रथित केले आहेत. या खेरीज सद्यःस्थितीवर, प्रचलित राजकारणावर व नाताळांतील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाची अगर टिळकांच्या वार्षिक पुण्यतिथीची पर्वणी साधून मी आतांपर्यंत पुष्कळच राजकीय लेख लिहिले. परंतु ते तात्कालिक महत्त्वाचे असल्यामुळें त्यांचा समावेश या पुस्तकांत केलेला नाहीं. ते सर्वच छापींत बसल्यास शेकडों पृष्ठेंहि अपुरीं पडतील. सबब सरडयाप्रमाणें ज्याचा रागरंग हरघडी पालटतो असें वर्तमानपत्री राजकारण यांतून वगळलें आहे. वादविवादाचे भरीस पडून पुष्कळ वेळां मी जी टीका करतों ती कडक व प्रतिपक्षास झोंबणारी अशी असते. परंतु हा दोष आनुवंशिक असल्यामुळें त्यास माझा नाइलाज आहे. केवळ करमणुकीखातर मी आठ-दहा कविताही केल्या, त्या या लेखसंग्रहाचे शेवटीं जोडल्या आहेत. खऱ्या काव्यस्फूर्तीच्या अभावामुळें वाचकांस त्या निरस किंवा रूक्ष वाटतील. तेव्हा त्या संबंधीं माझा खुलासा येवढाच कीं, मी

जात्या कवि नाहीं. शिवाय प्रतिभासंपन्न काव्यप्रसूति होण्यास जें चित्तस्वास्थ्य, मानसिक प्रसन्नता, व आल्हादकारक परिस्थिति असावी लागते तीहि माझे दुर्दैवानें नव्हती व नाहीं. ती. लोकमान्य टिळकांचे पश्चात् साहित्यसेवेचे कामीं खऱ्या कळकळीनें उत्तेजन देणारें असें वडील बंधूखेरीज मला कोणी उरलेले नाहीं. माझ्या परिश्रमाचें चीज व्हावें या सद्धेतूनें त्यांनीं खटपट केली नसती तर या ग्रंथप्रकाशनाचा योगच येताना. कोर्टाच्या भावनाशून्य वातावरणांत नाइलाजास्तव गुरफटलों गेल्यामुळें यापुढें माझे हातून कांहीं विशेष वाङ्मयसेवा होईल अशी अपेक्षा करण्यांत आतां फारसें हंशील नाहीं. किंबहुना या कज्जेदलालींतच उरलेल्या आयुष्याचें मातेरें व्हावयाचें जाणून प्रस्तुत लेख-संग्रहास अनुलक्षून प्रारंभीं उद्धृत केलेल्या रस्किनच्या शब्दांत मला आतां समाधान मानून घेणें भाग आहे.

इतःपर माझें आयुष्य कोर्टाचे उंबरठे झिजविण्यांत खर्ची पडणार असें मी प्रतिपादन केल्याबरोबर पुष्कळ लोक सदिच्छापूर्वक असा उलट प्रश्न टाकतील कीं, गायकवाड-वाड्यांत सध्या उपस्थित झालेले भांडणतंटे आपआपसांत सलोख्यानें मिटवितां येणें शक्य नाहीं काय ? या प्रश्नाचें उत्तर येवढेंच कीं आतां ही गोष्ट शक्य राहिलेली नाहीं. मालक गैरसावध असतां एखाद्या उचल्यानें घरांतून चीजवस्त लांबविली तर त्याच्याशीं तडजोड ती काय करावयाची ? व तशी ती करणें नैतिकदृष्ट्या न्याय्य ठरेल काय ? यावर कोणी ह्मणेल कीं 'चोराचे हातची लंगोटी' ह्मणून जें कांहीं परत मिळेल तेवढें घेऊन उगें रहावें. परंतु तसला निव्वळ व्यावहारिक अल्पसंतोषीपणा आमचे आईबापांनीं आह्मांस शिकविला नाहीं. कै. लोकमान्य टिळकांच्या कोलंबो मृत्युपत्राची अंमलबजावणी अत्यंत एकतर्फी व लबाडीची झालेली आहे. सदर मृत्युपत्रान्वयें 'केसरी व मराठा' ही एक सार्वजनिक संस्था होत होती खरी, तथापि त्यांत त्यांनीं ट्रस्टींची नेमणूक केलेली नाहीं व 'माझ्या मुलांना या संस्थेंतून वगळावें' असें तर त्यांत कोठें नाहींच नाहीं. कोलंबो मृत्युपत्रान्वयें नरसोपंत केळकरांना त्रिवर्ग पंचांपैकीं एक पंच ( ह्मणजे न्यायधीश ) आणि धोंडोपंत विद्वांसांना केसरी ऑफिसचे मॅनेजर व मृत्युपत्राचे एक एक्झिक्यूटर

येवढाच अधिकार प्राप्त होतो. सदर मृत्युपत्रांतील कलमवार व्यवस्था व विशेषतः छापखान्यासंबंधीं लिहून ठेविलेल्या एकंदर कलमांचा अर्थनिर्णय निःपक्षपातबुद्धीनें केल्यास येवढी गोष्ट कोणासही स्पष्ट दिसून येण्याजोगी आहे कीं, केळकर–विद्वांसाऐवजीं केसरी–मराठा संस्थेची ट्रस्टीशिप टिळक–बंधूंकडेच सरळरीत्या यावयास पाहिजे. वस्तुस्थिति अशी असल्यामुळें मृत्युपत्राअन्वयें आपणांस ट्रस्टी होतां येणार नाहीं हे वेळींच ओळखून " सार्वजनिक संस्था करावयाची आहे, सबब यापुढें तुमचा कांहीं एक हितसंबंध यांत रहावयाचा नाहीं "— असा मृत्युपत्रांतील भाषेंतून स्वार्थैकपरायण निष्कर्ष काढून व आमच्या अननुभवीपणाचा पूर्ण फायदा घेऊन लोकमान्य टिळकांचे पश्चात 'ट्रस्ट–डीड, रिलीज–डीड, भाडे–पट्टे' वगैरे बरेच Blank Charters ट्रस्टीद्वयानें आमचेपासुन उपटले आहेत. शिवाय लो. टिळकांची बरीच स्थावर-जंगम मिळकत त्यांचे इच्छेविरुद्ध हवीतशी ट्रस्टमध्यें समाविष्ट करून घेऊन कोलंबो मृत्युपत्रान्वयें वास्तविक जेवढ्या मिळकतीचा ट्रस्ट व्हावयाचा त्याच्या कितीतरी पटीनें अधिक मिळकत ट्रस्टीनीं बळकावली आहे. गोड लागतो ह्मणून ऊंस मुळासकट खाण्याचा मोह ट्रस्टींनां आंवरला नाहीं. प्रत्यक्ष आपल्या अन्नदात्या गुरूच्या पुत्रांना ज्यांनीं चकविलें ते लोक हिंदुस्थानाला स्वराज्य मिळवून देण्याच्या लायकीचे खरोखर आहेत काय ? अशी शंका मनांत येण्याचें कारण Charity begins at home हें परोपकाराविषयींचें अचुक लक्षण सत्य, सचोटी, न्यायबुद्धि इत्यादि सद्गुणांचे बाबतींतहि तितकेंच खरें आहे. असो.

आपल्या कायदेपटुत्वाचा उपयोग आमचे हितसंरक्षणाचे कामीं करणें हें ज्यांचें पहिलें कर्तव्य होतें असें आमचेच एक प्रतिष्ठित नातेवाईक या ट्रस्टीद्वयांच्या कारस्थानांत प्रथमपासून सामील होते. या त्यांच्या उपकाराचें ओझ्यांतून स्वतःस मुक्त करून घेण्यासाठीं ट्रस्टींनीं अलीकडे त्यांच्या थोरल्या चिरंजिवांस केसरीचे मुख्य संपादक केल्याचें सर्वास विदितच आहे. आमचेच नातेवाईक आम्हांस उडाणटप्पू ठरवून लौकिकदृष्ट्या शक्य तितक्या खोल गाडून टाकण्यास उद्युक्त होतील ही त्या वेळीं

कल्पनाही नसल्यामुळें आम्ही त्यांच्या शब्दावर विसंबून ते तयार करून आण-तील त्याप्रमाणें सर्व कागदपत्र, त्रयस्थ वकिलाची सल्ला-मसलत वगैरे न घेतां, बिनतक्रार होऊं दिले. आमची फसवणूक करून उलट आमचेवरच कुरघोडी करण्याचा जो अश्लाघ्य उपद्व्याप, हे कागदपत्र कायद्याच्या मुदतीबाहेर गेल्या-बरोबर, गेल्या ऑगस्टपासून ट्रस्टींनी सुरू केला त्यामुळें फार उशिरा कां होईना पण जागे होऊन आतां आम्ही त्यांस तोंड देण्यास सिद्ध झालों आहों. आम्ही आमच्या हातानें सह्या देऊन गमावलेले हक्क पुनः परत मिळविणें दुःसाध्य असलें तरी महाराष्ट्रीय जनतेपुढें दुखणें वेशीवर टांगणें हें या प्रसंगीं क्रमप्राप्त आहे. चालू फिर्यादींचे निकाल सरकारी कोर्टांतून कांहींही होवोत, अखिल हिंदी जनतेस वंदनीय अशा एका थोर विभूतीच्या प्रत्यक्ष मुलांना नागविणारीं अशीं और दानतीचीं नररत्नें या महाराष्ट्रांत निपजलीं येवढें निर्भेळ सत्य महा-राष्ट्राच्या भावी इतिहासांत खोदलें गेलें म्हणजे आम्हांस न्याय मिळाल्या-सारखेंच आहे. जनतेची येवढी खात्री झाली कीं, आमचा कार्यभाग आटोपला. शत्रुपक्षानें बुद्धिचातुर्यानें रचलेल्या चक्रव्यूहाचे गराड्यांत गवसलेल्या एकाकी अभिमन्यूप्रमाणें सध्यां गायकवाड वाड्यांत टिळक—बंधूंची असहाय्य स्थिति आहे.

टिळक-बंधूंच्या जीवनक्रमाचे प्रसन्न प्रवाहांत माती कालवून अगर त्यांच्या ऐहिक आकांक्षारूपी दुग्धांत मिठाचे खडे टाकून ट्रस्टींनीं काय मिळविलें? सर्व अब्रू व लौकिक गमावून त्यांनीं लोकमान्यांची नुसती जिंदगी जवळ केली असेल तर लोक म्हणतील गांवांतील वारांगना कांहीं कमी श्रीमंत नाहींत ! एवंच काय कीं जगांत एकाच उदात्त ध्येयास खरी किंमत व मान आहे. ते म्हणजे:—

**न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः।**
**विशुद्धस्यहि मे मृत्युः पुत्रजन्मोत्सवः किल ॥ १ ॥**

परंतु मोठ्या शरमेची गोष्ट कीं, याच्या अगदीं उलट प्रवृत्ति ‘ टिळक-बंधु आमचे खून करणार ’ असा निखालस खोटा अर्ज कोणाच्याही ध्यानीं मनीं नसतां एका बड्या युरोपियन पोलीस ऑफिसरपुढें गुदरून ट्रस्टींनीं दाखविलेली

-आहे. या शठनीतीचा अवलंब अखेर त्यांना करावा लागला यांत नवल नाहीं. कारण मयताच्या इस्टेटीवर बिनधोकपणें चरावयाचें झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसांना माथेफिरू व मूर्ख ठरविण्याखेरीज दुसरें गत्यंतरच नसतें.

कै. लोकमान्य टिळकांच्या कोलंबो मृत्युपत्रांतील कलमवार व्यवस्थेवरून नजर टाकून स्थिर-चित्तानें व निःपक्षपात बुद्धीनें विचार करणाऱ्या कोणाही त्रयस्थ इसमास मृत्युपत्र करणाराचें सामान्य धोरण सहज लक्षांत येण्याजोगें आहे. 'केसरी व मराठा' या आपल्या राष्ट्रीय पत्रांचें बाणेदार राजकीय स्वरूप कायम राहून तीं आपले पश्चात् अबाधित पुढें कशीं चालतील येवढ्या पुरतीच व्यवस्था करून ठेवण्याचा त्यांत लोकमान्यांचा मुख्य हेतु दिसून येतो. संस्थेकडे भाड्यानें रहावयाच्या छापखाना, इमारती वगैरे स्थावर-जंगम मिळकतींवर आपल्या मुलांनीं उदक सोडावें ( स्वत्वनिवृत्ति करावी ) ही कल्पना फक्त ट्रस्टींचे डोक्यांतील आहे; त्याला सदर मृत्युपत्रांत कोठेही थारा नाहीं. आणि लोकमान्यांचे पश्चात् ज्या ज्या कागदपत्रांवर आमच्या सह्या घेण्यांत आल्या त्यांत ट्रस्टींनी हाच आपला मुख्य कावा साधून घेतला असून प्रस्तुतचे फिर्यादींतून तो वज्रलेप करून टाकण्याचा त्यांचा इरादा आहे. ट्रस्टींचे व आमचे दरम्यान सुरू झालेल्या भांडणांस आतां सार्वजनिक स्वरूप प्राप्त झाल्यामुळें टिळक बंधूंविषयीं कोणाचा कांहीं गैरसमज राहूं नये येवढ्याच सार्टी वादाचें हें खरें स्वरूप या ठिकाणीं इतकें विशद करून मांडावें लागलें.

'Live and let live' या उदार धोरणापासून च्युत होऊन केसरी ट्रस्टींनीं गायकवाड वाड्यांत टिळक-बंधूंचा जेणें करून पदोपदीं पाणउतारा व कोंडमारा होईल अशी अस्मानी सुलतानी गाजवण्यास सुरवात केली त्या घटकेपासून उभयतांचें एकत्र वास्तव्य 'एका म्यानांत दोन तरवारीं' प्रमाणें अशक्य किंबहुना परस्परांस असह्य झाल्याचा तमाशा जगास पहावयास मिळाला. लो. टिळकांचीं पत्रें व छापखाना 'सार्वजनिक-संस्था' म्हणून आम्ही चालवितों. असा वरपांगी बहाणा करून सालोसालचे हिशेब टिळक-बंधूंपासूनच नव्हे तर बहुजनसमाजापासूनही गुप्त राखावयाचे आणि बहुतेक सर्व नफा टिळक-बंधूंचा उच्छेद अर्थात् गायकवाड वाड्यांतून त्यांचें उच्चाटन कसें होईल यावर

खर्च करावयाचा हें प्रस्तुतच्या केसरी-ट्रस्टींचें धोरण आहे. तरी '**खरा टिळकांचा केसरी टिळकांचे बरोबर संपला**' हें वेळींच ओळखून टिळकांचें अवतारकार्य आम्ही पुढें चालवीत आहों या ढोंगाखालीं टिळक-बंधूंना सर्वस्वी मारक अशी जी कारवाई लोकमान्यांची सार्वजनिक गादी बळकाविलेल्या प्रस्तुतच्या कायदेबाज केसरी-कंपूनें गायकवाड-वाड्यांत सध्या सुरू केली आहे त्या कामीं त्यांना कितपत पाठिंबा द्यावयाचा आणि त्यांच्या धंदेवाईक स्वरूपाच्या पोटार्थी व थिल्लर राजकारणांतील कोल्हाटी उड्यांवर कितपत विश्वास ठेवावयाचा याचा महाराष्ट्रांतील सुशिक्षित तरुणांनीं स्वतःशीं एकवार जरूर विचार करावा.

सरते शेवटीं या ग्रंथप्रकाशनाचे कामीं येथील "न्यू आर्ट ॲन्ड् लिथो वर्क्स"चे मालक मि. वी. जी. गंडभीर यांनीं स्नेहादरपूर्वक जे परिश्रम घेतले व त्रास सोसला त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून वाचकांची रजा घेतों.

सिमला हौस; चौपाटी,<br>गिरगांव, मुंबई नं. ४.<br>ता. १ फेब्रुवारी १९२८.

श्री. ब. टिळक.

---

# अनुक्रमणिका.

——:०:——


| लेखांक | नांव | | पृष्ठ संख्या. |
|---|---|---|---|
| १ | Which first–Politics or Social Reform? | | १ ते ७ |
| २ | A Midsummer Night's dream ! | ... | ८ ते १७ |
| ३ | बादरायण संबंध. | ... | १८ |
| ४ | एक चुटका. | ... | १९ |
| ५ | ऐन उन्हाळयांतील एक स्वप्नदृश्य ! | ... | २० ते २८ |
| ६ | लोकमान्यांचें निधन. | .. | २९ ते ३२ |
| ७ | सामुदायिक आरोग्य व नागरिकांचीं कर्तव्यें ! | ... | ३३ ते ३५ |
| ८ | नवरात्रांतील फेरफटका. | ... | ३६ ते ४६ |
| ९ | स्वराज्य-विषयक पात्रापात्रतेची मीमांसा. | ... | ४७ ते ५८ |
| १० | माझी निराशा. ( कविता ) | ... | ५८ |
| ११ | एका असामान्य चित्रकाराचा गुणगौरव. | ... | ५९ ते ६८ |
| १२ | कलमबहादुरीचें शेलापागोटें ! | ... | ६९ ते ८४ |
| १३ | मराठी शाकुंतलाचे परीक्षण. | ... | ८५ ते १०९ |
| १४ | कोंडाणा म्युनिसिपालिटीचा कारभार. | ... | ११० ते १४० |
| १५ | ही कोण? ( कविता ) | ... | १४० |
| १६ | टिळकांचा एक स्वभाव-लेख. | ... | १४१ ते १४६ |
| १७ | शुकसंवाद ( कविता ) | ... | १४६ |
| १८ | हिंदूंच्या धर्मक्रांतीचा उषःकाल. | ... | १४७ ते १६५ |

१९ ' स्वराज्याष्टक ' ( कविता ) ... १६६ ते १६८
२० दारिद्र्याच्या भरीस दुर्दैव ! ( कविता) ... १६८ ते १६९
२१ असहकार-युगांस अनुलक्षून ( कविता ) ... १७०
२२ चातुर्वर्ण्य ! ( कविता ) ... १७१ व १७२
२३ लोकमान्यांच्या समाधी पुढें. ( कविता ) ... १७२ व १७३

---

## परिशिष्टें.

परिशिष्ट ' अ '
परिशिष्ट ' ब ' } ... ... ... ... ... १७४ ते १७८
परिशिष्ट ' क '

---



श्रीधर बळवंत टिळक.

PHOTOGARPHER.
S. G NAIK & CO. POONA.

3423

# *"Which first,-Politics or Social-Reform?"

*(F. C. Magazine Vol. IX No. 3. Dec. 1918.)*

BY

S. B. TILAK, ( Junior B. A.)

—o—

THIS is a problem apparently easy, but essentially a stiff and a bewildering one, to him who, with all earnestness, seeks at least for a plausible solution. In these stirring times not a few students, with their fervent hearts all ablaze with patriotism, pant for a life devoted to the service of their motherland. This their burning enthusiasm often leads to lively but fruitless discussions in many a solemn session of the Debating Union. Which first ? and from which end to begin ? is always the point at issue. And this short essay is the outcome of an attempt to throw some light upon this problem, by a comparison of politics with social reform, from the standpoint of their relative importance in promoting the national interest. It is therefore needless to say that those who expect in the following lines any defence of female education or of self-government will be sorely disappointed. For, as said above, the primary motive of this essay is to find out a satisfactory reply to a question of vital importance, namely, whether it is politics or social reform that demands immediate attention from the younger generation; and

* परिशिष्ट ' अ ' पहा.

whether it is the one or the other that would expedite our course towards the cherished goal of national regeneration.

First of all, let us try to discover the most salient traits of character that distinguish the recognized leaders of politics as well as of social reform, leaders that are known to have dedicated their lives to the cause of their country in the midst of most frowning calamities and disheartening surroundings. It is evidently the manliness and moral courage, coupled with the spirit of self-sacrifice and love of liberty, that forms the nucleus of the character of an intrepid political leader, struggling against the despotic rule of a mighty Government. But then, nearly the same peculiarities of character are also essential for a true and practical social reformer, whose work is to liberate the masses from their abstruse traditions, barbarous customs and superstitious beliefs, in defiance of the opposition of dogmatic reactionaries. Now, if one and the same set of characteristic peculiarities is common to the leaders of politics, and of social reform, then it is quite obvious that he, who is gifted with these outstanding traits can, with equal efficiency, guide the multifarious activities and propagandist works in both the spheres of national life. This is, in truth, the whole meaning of the life of the late Principal Agarkar, a prophet of free-thinking. One of his biographers says that 'political and economic bondage was to him as hateful as social and religious bondage'. This remark is fully corroborated by the articles, that appeared in the columns of the *Sudharak,* on political topics in

those days. All this goes to prove that he who is a radical social reformer, can be, if he means to be, a radical politician ; and conversely, he who is a radical politician, can be, if he means to be, a radical social reformer. But, as a matter of fact, when we look around us, we are grieved to find that the foremost preachers of social reform become lukewarm moderates in politics ; while on the other hand the fiery advocates of politics turn out scrupulous conservatives in social reform.

There are some who vociferously proclaim that to agitate for political rights before any considerable progress in social reform, is imprudent and absurd ; while there are others who pretend to hold that to associate social reform with politics before the political emancipation of India, is premature and therefore fatal. The line of argument adopted by the latter to defend their own attitude is in brief as follows : They say, let us concentrate all our energy and our resources to regain the rights of self-Government, by partly conniving at and partly putting up with the ever accumulating grievances in social matters. For, they fear, that unless and until the country's administration is subjected to popular control, no effectual redress of any public grievances is possible. They honestly believe that any nation, committed to the care of an unsympathetic and alien bureaucracy, is sure to degenerate slowly and imperceptibly till it sinks into total oblivion in course of time. Well; let us take for granted, for a while, that it is altogether impossible to encourge indigenous industries or to sow broadcast free and

compulsory education in this country under the present conditions. But then, is it possible or otherwise to facilitate and to promote female education in India at present? If it is possible, what good do we derive by regarding educational, industrial, economic and social problems, as falling under one and the same category? Again, has Government, ever up till now, directly or indirectly, attempted to counteract social reform? No; never! The Queen's Proclamation, on the other hand, strictly forbids Government from interfering with the social institutions and religious beliefs of the people of India. Then why should we put off social reform, until the concession of political rights; and indefinitely defer a matter which is entirely in our own hands, and which is entirely for our own benefit? Thus we see that the argument of those that regard social reform as secondary to politics is highly fallacious and hence untenable.

In politics we have to observe strict loyalty to H s Majesty's Government. The late Hon. Mr. Gokhale, in one of his lectures, defined the term thus: He said, "When any one speaks of loyalty in India to the British Raj, he speaks of a feeling of attachment to the British Rule, and of a desire for its stability based on enlightened self-interest." Now, can we not conceive of a similar sentiment of attachment to our society, in the case of social reform? Are we to allow any fellow-citizen to turn out disloyal to our society and to pass scot-free? If in politics it is for our own interest, if not for anything else, that we have to maintain our connection with the liberty-loving British, and to care for

the stability of their rule; then, from the same point of view, in social reform too, it is our duty to maintain the ties of relation that bind us to our society, and care for its stability. But indeed, it is a matter of regret, that many high-souled patriots, who never in their heart of hearts desired to sever their connection with the society or with the Government, nay, rather who were incapable of cherishing any feeling of disaffection towards either, have had to suffer, absolutely without rhyme or reason, from ruthless persecutions at the hands of both.

In politics, to err on the safe side, a leader has to carry on his propagandist work by strictly constitutional means, and fairly within the limits of the law. Now, are there any such prescribed limits in the social code, within which to judge the legality or otherwise of the activities of a social reform? Again, it is in politics alone that we hear of gradual and slow progress, by graded instalments of constitution reforms. But in social reform nobody cares to split up the national ideal into similar instalments.

Again, in Politics, we have one central national organization, viz, 'the Indian National Congress,' holding together the Moderates as well as the Extremists, like a magnet attracting a mass of iron-filings. Now what harm is there if the orthodox and the advanced sections of the country join hands and collaborate in setting up a similar national institution, representative in character, to popularize the cause of social reform? A couple of years ago, the Hon. Mr. Jinnah, as President of a

Political Conference, is reported to have said, "There are neither Moderates nor Extremists in the country, for all are Nationalists." By this nationalism, of course, he meant the spirit of union and co operation. If so, can we not, by compromising our differences, introduce this spirit of nationalism into social reform, and render a united action possible?

As in politics, so in social reform too, the struggle is often very hard. For, it is as difficult to persuade the ignorant masses, as to persuade a mighty Government. Social persecution is not a whit less trying than political repression. No wonder then, that a social reformer should naturally expect, if not actual support, at least heartfelt sympathy from a political leader, and vice versa.

Social status, professional tact, eloquent oratory, or inordinate ambition, may occassionally serve to bring a man to the forefront; yet no one is ever known to have accomplished a lasting success in life without a dogged determination, disinterested service, unflinching courage and untold sacrifices. No doubt, that at times even a steady worker has to suffer considerable hardships and misery throughout his life. But as a rule, he who labours for his country's welfare with patience, perseverance, industry and application is sure to be crowned with laurels, sooner or later. In no other way can we explain the revival of the anniversary of the death of Mr. Agarkar after an interval of more than two decades.

We must bear in mind that politics and social reform must go hand in hand. For they are like

the two wheels of the chariot of Mother Ind, hastening to approach, along the path of stern Duty to the sublime ideal of national regeneration. To applaud the one and to disparage the other is detrimental to real advancement. Those that do it are sure to incur censure from posterity for retarding the speed of this chariot And I think rightly or wrongly, that the universal esteem that Prof. Karve commands, is due, to the sincerity of his heart, his untiring energy, and above all to his steady and strenuous exertions in the field of social reform with a view to keep pace with the political progress of the country.

Indeed, it is the bounden duty of every social reformer in India to supplant all racial and religious distinctions that stunt the growth of the spirit of nationality; so that no future historian of the British Empire will hereafter dare to declare that 'India' must still remain a mere geographical expression, since it has no political existence of a national character. The times are fast changing; and, by discarding our prejudices, we must accommodate ourselves to the altered circumstances without the least hesitation. For, as a rule, exceptional times always necessitate exceptional readjustments in each walk of life. Like the Phœnix of ancient Arabia, the ghost of Socialism has come out of the tomb of Prussian Militarism; and a rapid evolution is inevitable. This is just the time for India to awake and to unite. Let us hope that India will not forgo this unique opportunity,— an opportunity such as, in the history of a nation, Providence but rarely offers.

माझा व्यासंग.

# 'A Midsummer Night's Dream!'

(*N. P. C. Magazine Vol. IV, No. 1, Sept. 1919.*)

BY

S. B. TILAK, (J. B. A. CLASS).

---

IT was a day in the middle of March. The election season was in its full swing. That day Lady 'Sleep' and Sir 'Study' were the two candidates competing with each other. 'Indolence' and 'Inertia', the two parasites of Lord 'Sloth' prevented him from standing as a third candidate for the election. But although he had lost all his former power and position from the very beginning of that year, in his own days he had handled many such election campaigns with wonderful skill and ability. Sister 'Gossip' too had lately retired, owing to her old age, from a long and prosperous career of public service. She was so immensely popular that until the year previous she used to be elected, if not unanimously, by at least an overwhelming majority of votes. But of late she had ceased to take any active part and interest in all such local affairs.

That day voting had commenced earlier than was expected, even before 1 A. M. overnight. There were 24 votes in all. It was peremptorily announced beforehand that the Poll would be prolonged till 12 P. M. at midnight. That was the exact time fixed to put an end to the whole business. Imme-

diately afterwards the Poll was to be drawn out by the 'Arbitrator,' who was authorized by the 'County-Council' to supervise the elections of the town, and whose decision in all matters connected with them was to be regarded as final. It was also notified for the information of the public that the result of the election would not be formally declared until the next morning. Voting by ballot was not in vogue then although female-suffrage was very common. I was much interested in the day's election. Nay, my own rank and fortune depended upon it. I had therefore been present on the spot from the very beginning especially to witness the whole procedure of the election. I soon learnt that Lady 'Sleep' had managed to secure the first eight consecutive votes, and that the next four were polled by Sir 'tSudy'.

The election was suspended for a quarter of an hour during the interval of mid-day meals. But even then lady 'Sleep' was not idle ; she did turn even those few minutes of recess to her own advantage by securing a couple of votes again Upon this Sir 'Study' rallied Messrs. 'Patience,' 'Perseverance', 'Diligence' and 'Application' around him. For all of them were his staunch adherents and zealous workers. When Sir Study' appealed to their fidelity and admonished them, they bestirred themselves, and dragged four more voters to his window. It was now 6 P. M., and in all 18 voters had voted up to that hour—10 for Lady 'Sleep,' and only 8 for Sir 'Study'. The next voter, whom all expected to arrive in time, surprised the spectators by his own utter indifferentism. He told his friends

that he did not care for the election that was going on, snatched his walking stick, and preferred rather an evening walk to escape the bother of voting. Of course none of the candidates of the day approved of his conduct, and his manners. The crowd laughed heartily at his idiosyncratic eccentricity.

There was hardly any chance of the election being suspended for supper. The spectators were so interested in that burning question of the day that, with the progress of the election, the quadrangle of the market-place could not accommodate them all; so that, when it was packed to its utmost capacity, many of the throng that were a little late had to perch themselves on the branches of the adjoining trees to snatch a direct glimpse of the whole business. I stood all day long in the thick of the crowd, superless, and all flushed with the heat of the day, as well as of the election that was fast drawing to a close. My fate was indissolubly linked with the fate of Sir 'Study'; and hence it was that my sympathies leaned towards him. Sir 'Study' soon found out that he was lagging behind Lady 'Sleep' by a couple of votes. So to save the situation, and to maintain his ground Sir 'Study' had to forewarn his friend Dr. 'Conscience' who was his right-hand man to make his level best in 'canvassing.' This venerable doctor was quite conversant with the ins and outs of active political life. At his instance three more voters, evading the alert eye of Lady 'Sleep', voted in succession for Sir 'Study.' Thus, now, Sir 'Study' got the better of Lady 'Sleep' by scoring one vote more on his side, after making up the slight deficiency. His name was

now at the top of the list and the whole town was everywhere ringing with his praises. It was plain enough to the circle of by-standers around that Sir 'Study' had at last made up his mind to baffle his rival in the long run. 'Slow and steady wins the race'—was his motto. Moreover, Messrs. 'Patience', 'Perseverance', 'Diligence' and 'Application', working under the direct command of the veteran lieutenant Dr. 'Conscience' had already girt up their loins to vanquish the machinations, and to frustrate the tactics of Lady 'Sleep'. The partisans of Sir 'Study' were one and all full of enthusiasm and rapture, as was well evident from the tall talk and clamorous applause that issued forth from their camp. I too was jubilant. For I was practically sailing in the same boat with Sir 'Study', and his triumph over lady 'Sleep' was sure to effect vitally my own status in life, and if at all to change it for the better.

The clock on the top of the Market tower all of a sudden tolled 10 o'clock, and involuntarily attracted the eyes of the townsmen crowded in the quadrangle below. I too could not but look up to it overhead. A couple of maiden votes yet remained; and it was an open secret that Prof. 'Heart' had them under his own thumb. This Prof. 'Heart' was a notorious dissembler and a swindler, advanced in life, and a suitor to one Miss 'Mind', who was in her turn a bosom friend of Lady 'Sleep'. Miss 'Mind', with her two faithful maids '*Gaiety*' and '*Vivacity*',—had canvassed quite assiduously and devotedly during the whole of the day for her dear friend Lady 'Sleep'. It was fast

growing dark. The whole structure from top to bottom viz:—The Market place, the Town-Hall above it, and the Clock-tower with its spiral turret surmounting the edifice, was twinkling all over with tiny electric lights. Now only two hours remained, and there was practically very little time for canvassing left. The friends and admirers of Lady 'Sleep' felt at heart that it would be prudent on her part to withdraw. She herself was not very hopeful. She was only trying to keep up appearances, although as a matter of fact, she was at her wit's end, when she found it a very hard job to outvote Sir 'Study'.

With all her charms, Lady 'Sleep' fell short of one vote. She had only 10 votes, while her rival Sir 'Study' was lucky enough to secure one more to add to his own decade. Still as she learnt that only two voters had to vote before the close of the day's election, and that both of them were under the thumb of Prof. 'Heart', she summoned Miss 'Mind' together with her two merry-maids 'Gaiety' and 'Vivacity' and the rest of the workers and sympathizers that had canvassed for her, into her own chamber to hold a consultation for a final struggle. In that meeting Miss 'Mind' expatiated on the advantages and the necessity of paying a visit to Prof. 'Heart' in person to sound his inclinations and thereby to discover his intention. With great zeal and energy did she express her grim determination to move heaven and earth to accomplish her friend's purpose. Accordingly she prepared to go forthwith to Prof. Heart's bungalow to advise him to cast in his lot with

Lady 'Sleep'. She said, she would press him hard to accede to her request by offering him a good round sum in advance for his valuable services. With these words she hastened to Prof. Heart's house although she had always disliked him. But as a rule one has to set aside all likes and dislikes when one's own object is to be gained. She knew from her former experience that Prof. 'Heart' was open to all sorts of bribery and corruption, and that his two votes would assuredly go to the highest bidder. But she also knew that this time his services were quite indispensible. For, otherwise it would be altogether impossible for Lady 'Sleep' eventually to outvote Sir 'Study' and win the contest.

Dr. 'Conscience' however had an inkling in time of what was going on at Prof. Heart's house, although Miss 'Mind' had taken sufficient care to keep him in the dark about her future projects. Instantly he called aloud for a vehicle, and wheeled to Prof. Heart's residence. Dr. 'Conscience' too was well aware that the pseudo-professor was a man without any scruples whatsoever. But anyhow he wanted to please him. So he invited Prof. 'Heart' to a tea-party arranged on behalf of Sir 'Study'. But the worthy doctor ought to have known beforehand that an old bird like Prof. 'Heart' is never to be caught with chaff. Thus at about 10 P.M. Dr. 'Conscience' and Miss 'Mind', the two respective emissaries of Sir 'Study' and Lady 'Sleep', were vying with each other to curry the favour of Prof 'Heart' and to secure his solid voting.

In the Market-place however the mob showed signs of great impatience with the lapse of time. Although the election was fast drawing to a close, the result was, none the less, very uncertain. The expectant crowd soon dispersed from the quadrangle and besieged Prof. Heart's bungalow when they discovered that he was the master of the situation. '*Ardour*' and '*Fervour*' the two peons of Prof. 'Heart', were in the meanwhile loitering outside his bungalow; and every inquisitive person from amidst the crowd was inquiring of them as to whose entreaties their master was likely to yield to. Indeed, much depended on what course he would be induced to adopt; and the advocates of each party were speculating and wrangling in vain in that promiscuous multitude, as to how Prof.' Heart' would extricate himself from the horns of the dilemma. But those, who had at least some experience of his nature before, had little doubt that although Dr. 'Conscience' had made up his mind to strike a bargain, it was destined to be a very sorry one. And those that foretold this consequence, were not at all wrong in their conjectures; for all of a sudden there was a loud outburst of lusty cheering, and an equally tumultuous excitement. The cause of it was soon obvious. Prof. 'Heart' emerged from out of his parlour down into the porch, with Miss 'Mind' at his side, and jostled through the crowd in the direction of the Market-place. The deafening bustle and clamour roused me abruptly from my reveries.

Lo! What a strange dream, thought I, as I slowly opened my eyes at daybreak, to behold the

level rays of the rising sun that stole through the panes of the eastern window into my room. I was surprised to find myself lying on my easy chair, my shirt half-buttoned, my handy volume of 'Shakespeare' flung aside in disorder, my 'Ditmar' still burning on my desk, and my 'Primus' whistling into a corner of my room. I stood up, pulled a towel, wiped off the few drops of perspiration clustered over my brow owing to the morbid dreams, and then surveyed all things around me. My stove must have been burning the whole night and my lamp too. For, as I hastened to extinguish them, I soon discovered that the stock of Kerosene-Oil from both was almost exhausted. On the stove was a tea-pot all red hot and empty. I now remembered that at about 10 P. M. the previous night I had lighted my stove and placed the tea-pot over it to boil me a cup of water for tea. As the old maxim goes 'A watched kettle never boils', so I must have been purposely watching otherwhere; and during the interval of those few minutes, must have been overcome by that very drowsiness, which I had intended to dissipate with the help of that 'warm' friend of students—I mean 'tea'. Thus I fell fast asleep, and all the night long the water must have boiled, boiled and boiled only to roll out of my room for hours and hours together, in coils and columns of steam, until the very last drop had to vacate the can.

Then I opened my drawer, and caught hold of my diary to look over the pages of my yesterday's jottings. I could not but laugh to find how Lady

'Sleep' carried the day at the eleventh hour, by turning the tables on Sir 'Study', how Miss 'Mind' threw dust into the eyes of Dr. 'Conscience', how Prof. 'Heart' played into her hands, how she prevented him from attending the tea-party proposed by Dr. 'Conscience', and how Lady 'Sleep' ultimately appropriated the two remaining votes solely to herself through the successful intercession of Miss 'Mind'. Thus it was how at last Lady 'Sleep' polled the two final votes, of which Prof. 'Heart' had the proxy in his pocket, notwithstanding the opposition of Sir 'Study' and was ultimately declared to have been duly elected. Sir 'Study' of course came off the second best that day, having had the honour of holding eleven votes in all.

Although I am neither a born poet nor an habitual dreamer like Coleridge or De Quincey, I too have my own dreams often of a didactic and allegorical nature. This is one of them narrated at full length after having recollected it in details the next morning. Now it only remains to be seen what moral is imparted by this wonderful dream. We all know that time when lost is lost forever. It is never to be found again. So we must be very careful not to waste our time in idleness. We must be on our guard at all times to ensure success in life. Almost the same idea is expressed and illustrated with an admirable conciseness and force in the following lines, which every student ought necessarily to know by heart :—

"The lapse of time and rivers is the same,
Both speed their journey with a restless stream;

The silent pace with which they steal away,
No wealth can bribe, no prayers persuade
to stay;
Alike irrevocable both when past,
And a wide ocean swallows both at last,
Though each resemble each in every part,
A difference strikes at length the musing heart;
Streams never flow in vain; where streams
abound,
How laughs the land with various plenty
crowned!
But time that should enrich the nobler mind,
Neglected leaves a dreary waste behind."

---

## मित्रवियोग.

१९१८

हा ! हा ! गेला तनय अमुच्या आंग्लभाषा गुरूंचा
मोरू नामें प्रिय बहु अम्हां, लाडका जो पित्याचा ।
तत्वज्ञानीं प्रविण बहु जो बोलका सुस्वभावें
कैसा त्याचा विसर पडणें शक्य आह्मांस व्हावें ? ॥ १ ॥

( F. C. MAGAZINE. )

---

( *F. C. Magazine; Vol VI No. 4 Feb. 1916* )

# बादरायण संबंध.

---

**प्रो. तर्कटेः**—कायहो, प्रो. पोकळडोके, तुम्ही 'Comparative philology' ची ज्या अर्थी येवढी उरस्फोड केली आहे, त्या अर्थी तुह्मी जर माझ्या एका शंकेचें निरसन करूं शकाल तरच मी तुमच्या ज्ञानार्जन-परिश्रमाची तारीफ करीन, व त्या प्रीत्यर्थ खर्च झालेल्या तुमच्या वडिलांच्या द्रव्यसंचयाचें चीज झालें असें समजेन.

**प्रो. पोकळडोकेः**—अलबत् ! बोला, आपणांस जी काय शंका असेल ती ताबडतोब बोला. आमच्या ज्ञानाचा लोकांस यत्किंचित् जरी फायदा झाला तरी त्यांत आह्मांस आनंदच आहे.

**प्रो. तर्कटेः**—"Agony" ह्या इंग्रजी शब्दाची Etymology कृपा करून सांगाल काय ?

**प्रो. पोकळडोकेः**—ह्यः,ह्यः, ह्यः, हीच का ती आपली जबरदस्त शंका ? अहो हें पहा, ह्या परकी लोकांना गंगा हा शब्द नीट उच्चारितां येईना ह्मणून त्या नदीला ते Ganges म्हणूं लागले. मग संस्कृत भाषेंतील 'अग्नि' चें इंग्रजी भाषेंत Agony झालें ह्यांत नवल तें काय ? परंतु Agony हा शब्द वरील उदाहरणांप्रमाणें अग्निवाचक नसून, अग्निस्पर्शापासून आपल्या अंतःकरणांत जो एक प्रकारचा उद्वेगजनक मनोविकार उत्पन्न होतो तद्दर्शक तो इंग्रजी भाषेंत प्रचारांत आलेला दिसतो. आणि माझें असें ठाम मत आहे कीं, इंग्रजी भाषा बहुतेक अशीच भिन्न भिन्न भाषांतून चोरलेल्या शब्दांची बनलेली असावी.

**प्रो. तर्कटेः**—बरें; पण मला ह्या दोन शब्दांतील Link of relationship,' सांगतां का ?

**प्रो. पोकळडोकेः**—छे, छे, छे, सांगण्याची जरूरच नाहीं. अहो सर्व कांहीं अगदीं उघड आहे. हें पहा, पूर्ण विचारांतीः—

'न कळतां पद अग्निवरी पडे। न करि दाह असें न कधीं घडे॥' हें तत्त्व आपणांस मान्य करणें भाग पडेल; तेव्हां:—

I hope you will excuse me if I further remind you of the fact that 'a burnt child always dreads the fire,' simply by reason of the empirical inference; viz:—'Scorching gives rise to agony.

S. B. T.

---

# एक चुटका.

'विस्तव' या मराठी शब्दांतील आद्याक्षराचा लोप होऊन त्या पुढील 'स्तव' पासुन इंग्रजी Stove (स्टव्ह) हा शब्द बहुधा तयार झाला असावा. या 'स्टो' ला घरोघर अनेक तऱ्हेनें संबोधण्यांत येतें. **उदाहरणार्थ**:—

**तो**—अग ए, आपले वसंतराव आले आहेत म्हणून म्हणतों तेवढा 'पिनाकिन्' प्रज्वलित कर पाहूं.

**वसंतराव**—हें 'पिनाकिन्' म्हणजे काय लचांड आहे बुवा?

**ती**—हात्तिच्या, आमच्या इथला 'स्टो' पिना जवळ बाळगल्या खेरीज किनई धड पेटतच नाहीं. तेव्हांपासून इकडून थट्टेनें त्याला 'पिनाकिन' नांव पडलं आहे झालं.

**वसंतराव**—असें काय? तर मग शंकरानें मदनाला कोणाच्या सहाय्यानें जाळला याचा आतां बरोबर उलगडा झाला.

* * * * * *

# * ऐन उन्हाळ्यांतील एक स्वप्नदृश्य !

---:०:---

मार्च महिना अर्धा अधिक लोटला होता. निवडणुकींच्या धामधुमीचा मोसम जोरांत सुरू होता. त्या दिवशीं लेडी स्लीप ( झोंप ) व सर स्टडी ( अभ्यास ) या दोन उमेदवारांमध्यें चढाओढ चालू होती. या निवडणुकीला लॉर्ड स्लॉथ ( आळस ) हे तिसरे उमेदवार उभे रहावयाचे, परतु त्यांचे दोन आश्रित ' इंडोलन्स '( निरुद्योग ) व ' इनर्शिआ ' ( सुस्तपणा ) या जोडीनें त्यांना ऐनवेळीं पराङ्मुख केलें. सालमजकुराचे सुरवातीपासूनच यंदा त्यांचा दर्जा व वजन यांना उतरती कळा लागली होती, तथापि ते सर्वसत्ताधीश होते त्यावेळीं त्यांनीं आपल्या अमदानींत असल्या कित्येक निवडणुकी मोठ्या कुशलतेनें व कार्यक्षमतेनें सुरळीत पार पाडल्या होत्या. सिस्टर गॉसिप ( गप्पा ) यांनींहि वृद्धापकाळामुळें अलीकडे अशा तऱ्हेच्या सार्वजनिक समाज-सेवेंतून आपलें अंग काढून घेऊन आपली विस्तृत व यशस्वी कारकीर्द संपवून एकांतवास पत्करला होता. एके काळीं या बाई इतक्या लोकप्रिय होत्या कीं सालगुदस्तापर्यंत एकमतानें नव्हे तरीपण प्रचंड बहुनताचे जोरावर त्या हटकून निवडून यावयाच्याच. परंतु अलीकडे अशा स्थानिक चळवळींत लक्ष्य घालून त्यांत सक्रिय भाग घेण्याचें त्यांनीं जवळ जवळ सोडून दिल्यासारखें होतें.

मध्यरात्र उलटून गेल्याबरोबर पहाटे एक वाजल्यापासून त्या दिवशीं निवडणुकीस सुरुवात झाली होती. एकंदर २४ मतदार मतें देऊन जाणार होते, व निवडणुकीचें काम सबंध दिवसभर चालून पुढें रात्रीं बारा वाजेपर्यंत लांबविण्यांत येणार असें अगाऊ जाहीर करण्यांत आलें होतें. रात्रीं बरोबर बाराचे ठोक्याला सर्व ग्रंथ गुंडाळला जाणार होता; व पुढें मतें मोजणीचे कामास सरपंचाकडून सुरुवात व्हावयाची होती. शहरांतील निवडणुकीवर देखरेख ठेऊन

---

* प्रस्तुत , लेखसंग्रहांतील " A Midsummer Nights Dream ! " या दुसऱ्या इंग्रजी लेखाचें हें शब्दशः भाषांतर आहे.

वेळोवेळीं उपस्थित होणाऱ्या सर्व वादग्रस्त प्रश्नांचा निकाल करण्याचें काम स्थानिक-मंडळानें यांचेकडे सोपविलें होतें व त्यांच्या निर्णयावर अपील नसल्यामुळें निवडणुकीच्या हरएक बाबतींत ते सांगतील तें प्रमाण मानणें भाग होतें. शहरवासियांचे माहितीसाठीं नोटिशीचे द्वारें असें प्रसिद्ध करण्यांत आलें होतें कीं या निवडणुकीचा निकाल उदयिक सकाळीं जाहीर करण्यांत येईल. गुप्त-मतदान-पद्धति अद्याप प्रचारांत आलेली नव्हती, तरी पण निवडणुकीमध्यें मतें नोंदविण्याचा व उमेदवार ह्मणून उभे राहण्याचा स्त्रीवर्गाचा जन्मसिद्ध हक्क सर्वमान्य झाला होता. त्या दिवशींच्या निवडणुकीविषयीं मला विशेष उत्कंठा लागून राहिली होती. किंबहुना माझी सुस्थिति व भवितव्य सर्वैथैव निवडणुकीच्या निकालावरच अवलंबून होतें म्हटलें तरी चालेल. त्यामुळें अगदीं सुरवातीपासूनच समक्ष हजर राहून निवडणुकींतील घडामोडींवर मी नजर ठेविली होती. पहिलीं आठ मतें क्रमशः लेडी स्लीपनें मिळविलीं व त्यापुढील चार सर स्टडी साहेबांनीं काबीज केल्याची बातमी लवकरच माझे कानीं आली.

मध्यान्हींचे भोजनानिमित्त निवडणूक फक्त पंधरा मिनिटेंच तहकूब ठेविली होती. परंतु तेवढ्या अवधींतहि लेडी स्लीप या स्वस्थ बसून राहिल्या नव्हत्या. त्यांनीं आपल्याकडून शक्य ती खटपट करून पुढील दोन मतें आपणांस पडतील अशी तजवीज केली व अशा रीतीनें मधल्या सुटीचा फायदा घेतला. ही गोष्ट निदर्शनास येतां क्षणींच सर स्टडी यांनीं आपल्या मित्रमंडळीपैकीं पेशन्स ( धिम्मेपणा ), परसिव्हियरन्स ( चिकाटी ), डिलिजन्स ( व्यासंग ) व ॲप्लिकेशन ( एकाग्रता ) या चौकडीस आपल्या भोवतीं गोळा केलें. कारण हे सर्वजण त्यांचे कट्टे अनुयायी व उत्साही स्वयंसेवक होते. सर स्टडी यांनीं त्यांच्या कार्यनिष्ठेची व्याजस्तुति करून कानउघाडणी केल्याबरोबर ते जागे झाले व आपल्या उद्योगास लागले. त्यांच्या प्रयत्नाचा परिणाम असा झाला कीं पुढील चार मतदारांनीं येऊन आपआपलें मत अचुक सर स्टडी यांचे पेटींत टाकलें. या सुमारास सायंकाळचे ६ वाजले होते, व हा वेळपर्यंत मतें नोंदवून गेलेल्या एकंदर १८ मतदारांपैकीं १० जणांनीं

आपलीं मतें लेडी स्लीपला व फक्त ८ जणांनीं सर स्टडी साहेबांना टाकलीं होतीं. या पुढील मतदार इतरांप्रमाणें वेळेवर येऊन आपलें मत टाकून जाईल अशी प्रेक्षकांची अपेक्षा होती; परंतु त्यानें आपल्या बेफिकीर वृत्तीनें सर्वांस चकित करून सोडलें. "कोणी कां निवडून येईना? मला त्याची पर्वा नाहीं!" असें आपल्या स्नेही मंडळीजवळ बोलून निवडणुकीचा त्रास टाळण्यासाठीं काठी टेकीत टेकीत व तोंडानें शीळ घालीत स्वारी सहल करण्यास गांवाबाहेर निघून गेली. अर्थातूच ही त्याची वर्तणूक कोणाहि उमेदवारास पसंत पडणें शक्य नव्हतें. रिकामटेकडया प्रेक्षकांना तर तो एक करमणुकीला विषयच मिळाला. सर्वजण त्याच्या एकक्ली विक्षिप्तपणाची टवाळी करून हसूं लागले.

सायंकाळचे फराळासाठीं निवडणूक पुनः तहकूब राहण्याचा संभव नव्हता निवडणुकीला अंतिम अनिश्चितपणामुळें जसजसा रंग चढूं लागला तसतशी प्रेक्षकांची गर्दी अधिकाधिक लोटूं लागली. इतकी कीं मार्केटचें भव्य पटांगण गच्च भरून गेल्यामुळें उशिरा आलेल्या गांवकऱ्यांना आजूबाजूचे झाडांवर चढून आपली जिज्ञासा तृप्त करून घेणें भाग पडलें. त्या चिकार गर्दीत धक्काबुक्कीला न जुमानतां मीहि पण सर्व दिवसभर उपाशी उभा होतों. निवडणुकीचें पर्यवसान काय होतें या विषयीं चिंताक्रांत, सारा दिवसभर ऊन लागल्यामुळें आरक्त, व निवडणुकीचे अखेरी अखेरीस वाढत्या कुतूहलामुळें किंचित् संभ्रांत अशा मनःस्थितींत मी तसाच तेथें उभा होतों. सर स्टडी यांचे अदृष्टांत जें यश किंवा अपयश लिहिलेलें होतें तेंच माझेही प्राक्तनीं असल्यामुळें ललाट–लिखिताचे बाबतींत ब्रह्मदेवानें आम्हांस कायमचे निगडित केलें असावें. वस्तुस्थिति अशी असल्यामुळें निवडणुकीचे दिवशीं माझ्या सहानुभूतीचा कल स्वाभाविकपणें सर स्टडींचे पक्षाकडे होता. आपणांस लेडी स्लीपपेक्षां दोन मतें कमी मिळाल्याचें आढळून येतांक्षणींच सर स्टडी यांनी आपला सहाध्यायी किंबहुना उजवा हात डॉ. कॉन्शन्स ( सदसद्विवेक ) यांस पाचारण करून बजावलें कीं या पुढें मतदारांच्या मनधरणीची पराकाष्ठा न केल्यास निभाव लागणार नाहीं; इतकेंच नव्हे तर फजितीची वेळ येऊन ठेपेल. या संभावित डॉक्टर मजकुरांना सार्वजनिक उलाढालींतील सर्व युक्त्या-प्रयुक्त्यांची चांगली माहिती होती. त्यांच्या भिडे-

खातर तीन मतदारांनीं लेडी स्लीपचा डोळा चुकवून लागोपाठ आपलीं मतें सर स्टडी यांचें नांवें नोंदविलीं. याचा परिणाम असा झाला कीं, मागील सर्व तूट भरून येऊन सर स्टडी यांचे बाजूस लेडी स्लीप पेक्षां आतां एक मत अधिक झालें. या तात्पुरत्या मताधिक्यामुळें सर स्टडी यांचा नंबर वर आला, व सर्व गांव-भर त्यांच्या नांवाचा बोलबाला सुरू झाला. सभोवारच्या प्रेक्षकवर्गालाहि स्पष्ट कळून चुकलें कीं, लेडी स्लीप यांना हार खावयास लावण्याचा सर स्टडी यांनीं संकल्प केला असावा. ' चिम्मेपणाचे व दृढनिश्चयाचे बळावर शर्यत जिंकावयाची ' हेंच त्यांचें ब्रीदवाक्य होतें. शिवाय डॉ. कॉन्शन्स यांचे हुकुमती खालीं लेडी स्लीपचे सर्व डावपेंच हाणून पाडून तिला भग्नमनोरथ करून सोडण्याचा ' पेशन्स, परसिव्हियरन्स, डिलिजन्स, व ॲप्लिकेशन ' या चौकडीनें विडाच उचलला होता. सर स्टडींच्या पक्षपाती कंपूमधून ज्या बढा-ईखोर गप्पा व गोंगाट ऐकूं येत होता त्यावरून येवढी गोष्ट स्पष्ट होत होती कीं तूर्त तरी त्यांची मित्रमंडळी हर्षातिरेकाच्या उन्मादानें अगदीं बेहोष झाली होती. माझीहि वृत्ति उल्हसित होणें स्वाभाविक होतें. कारण प्राक्तन-संयोगामुळें सर स्टडींच्या तेजीमंदीबरोबर मीहि हेलकावे खात होतों आणि त्यांचे गळयांत विजयश्रीची माळ पडण्यापासून माझें नशीब उघडणार होतें; इतकेंच नव्हे तर मला चांगले दिवस येणार याबद्दल अंतर्यामीं पूर्ण खात्री वाटत होती.

मार्केटवरील घड्याळयाच्या टॉवरमधून १० वाजल्याचे ठोके एकाएकीं कानांवर पडतांच खालीं चौकांत जमलेल्या सर्व रहिवाश्यांचें लक्ष्य तिकडे वेधलें. इतरांप्रमाणें मीहि पण वर मान करून घडयाळाकडे नजर फेकली. आतां फक्त दोनच मतें पडावयाचीं राहिलीं होतीं आणि तीं प्रो. हार्ट ( हृदय ) यांचे कब्यांत असल्याची गुप्त बातमी केव्हांच षट्कर्णी झाली होती. हे प्रोफेसर मजकूर वयानें पोक्त आणि व्यवहारांत दांभिक व बेइमान म्हणून प्रसिद्ध असुन लेडी स्लीप यांच्या मिस् माइन्ड ( मन ) नांवाच्या एका जिवलग मैत्रिणीवर फिदा होते. त्या दिवशींच्या धामधुमींत मिस् माइन्डनें गेइटी ( मौज ) व व्हिव्हॅसिटी ( उल्हास ) या आपल्या दोन सख्यांसमवेत लेडी स्लीपच्या निव-डणुकीसाठीं आस्थापूर्वक व तत्परतेनें मतयाचना केली होती. आतां काळोख

पडूं लागला होता. मार्केटचे गाळे, त्यावरील नगरभवन, त्यावरील घड्याळाचा टॉवर आणि त्याचे शिखरावरील गगनचुंबित मनोरा अशी सर्व इमारत पायापासून शिखरापर्यंत चिमुकल्या रंगीबेरंगी विजेच्या दिव्यांनीं सुप्रकाशित व चित्ताकर्षक भासत होती. निवडणुकीचा शेवट होण्यास आता फक्त दोन तासांचा अवधि राहिला होता त्यामुळें मतयाचना करीत फिरण्यास फुरसतच नव्हती. लेडी स्लीपनें दूरदर्शीपणा दाखवून आतां निवडणुकींतून माघार घ्यावी असा तिच्या सोबतिणींचा व दोस्तांचा सल्ला पडला. तिला स्वतःलाही यशाची फारशी आशा राहिली नव्हती. परंतु तसें उघडपणें बोलून दाखविण्याची सोय नसल्यामुळें सर स्टडी यांजवर मात करण्याचे बाबतींत जरी तिची मति कुंठित झाली होती तरी सुद्धां वरकरणी तिनें आपली निर्भय व बेफिकीर वृत्ति कायम राखली होती.

लेडी स्लीपला एक मत कमी पडत होतें याचा दोष तिच्या रमणीयपणाकडे नव्हता. सर स्टडी यांचें नशीबच तसें शिकंदर असल्यामुळें लेडी स्लीपला १० तर त्यांना ११ मतें पडलीं होतीं. निवडणुकीचा शेवट होण्यापूर्वी फक्त दोनच मतदारांचीं मतें पडावयाचीं राहिलीं असल्याचें व तीं प्रो. हार्ट यांचे हुकमती खालीं असल्याचें निदर्शनास येतांच लेडी स्लीपनें आपल्या तंबूंत मिस् माइन्ड्, तिच्या दोन रंगेल सख्या गेइटी व व्हिव्हॅसिटी, तसेंच इतर कार्यकारी मैत्रिणींची आणि आस्थापूर्वक कामें करणाऱ्या सर्व स्वपक्षीय स्वयंसेवकांची गुप्त बैठक अखेरच्या निर्णायक प्रयत्नांची दिशा ठरविण्यासाठीं बोलाविली. या सभेंत मिस् माइन्डनें मनमोकळेपणानें चर्चा करून प्रो. हार्ट यांचा कल व विचार काय आहे याचा थांग लावण्यासाठीं त्यांची समक्ष गांठ घेणें कसें इष्ट व अगत्याचें आहे याविषयीं खुलासा केला. लेडी स्लीपला विजय मिळवून देण्याचे कामीं मोठा भगीरथ प्रयत्न करून पाहण्याचा आपला संकल्प व कृतनिश्चय निर्वाणीच्या उत्साहपूर्ण शब्दांत साद्यंत वर्णन करून प्रो. हार्ट यांना बंगल्यावर भेटून त्यांचें मन वळविण्यास स्वतः जाण्याची मिस् माइन्डनें तयारी केली. ‘ भली भरभक्कम लांच भरून लेडी स्लीपला मतें टाकण्याबद्दल धरणें धरून बसतें ’ असें बोलून प्रो. हार्टविषयीं जरी तिला मनांतून विशेष आदर वाटत नव्हता, तरी मिस् माइन्डनें त्यांचे बंगल्याकडे आपला मोर्चा वळवला.

कित्येक प्रश्न असे नाजुक असतात कीं, स्वतःचा मतलब साधण्यासाठीं वेळप्रसंगीं आपल्या आवडीनिवडी घटकाभर बाजूस ठेवाव्या लागतात. प्रो. हार्ट विषयीं तिला जी माहिती मिळाली होती त्यावरून तो लांचलुचपतीला वश होणाऱ्यांपैकीं एक असल्यामुळें वास्तविकरीत्या त्याचे मुठींतील मतें जिकडून जास्तींत जास्त फायदा पदरीं पडण्यासारखा असेल त्या बाजूकडे जाणार हीं गोष्ट मिस् माइन्ड जाणून होती. परंतु करणार काय? ‘ अडला नारायण गाढवाचे पाय धरी ! ’ प्रो. हार्टची मनधरणी केल्याशिवाय या खेपेस गत्यंतर नव्हतें. एरव्हीं लेडी स्लीपला सर स्टर्डीवर मात करून निवडणुक जिंकणें जवळ जवळ अशक्यप्राय होतें.

मिस् माइन्ड्नें आपला इरादा शक्य तेवढा गुप्त ठेवण्याची काळजी घेतली असतांही प्रो. हार्ट यांचे बंगल्यावर काय काय खलबतें चालू आहेत याची बित्तंबातमी ऐनवेळीं डॉ. कान्शन्स यांना समजली. तात्काळ त्यांनी गाडी बोलाविली व गाडी करून ते प्रो० हार्ट यांचे बंगल्यावर जावयास निघाले. हे नामधारी प्रोफेसरसाहेब कसे निःशंक ढोंगी आहेत याची डॉ. कान्शन्स यांना चांगली माहिती होती. परंतु यावेळीं त्यांना खूष ठेवल्यानेंच कार्यसिद्धि होणार होती. म्हणून सर स्टर्डीचे वतीनें त्यांनीं प्रो. हार्ट यांना चहापार्टीचें आमंत्रण दिलें. परंतु दाण्या ऐवजीं कोंडा पुढें करून जाणता पक्षी कधींहि जाळयांत गवसत नाहीं ही गोष्ट डॉक्टर मजकुरांना कशी कळली नाहीं कोण जाणे ! असो; अशा रीतीनें रात्रीं १० वाजण्याचे सुमारांस प्रो. हार्ट यांची मनधरणी करण्याचे कामीं सर स्टर्डीचे वतीनें डॉ. कान्शन्स व लेडी स्लीपच्या वतीनें मिस् माइन्ड या दोन व्यक्ति अहमहमिकेनें आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत होत्या.

मार्केट भोवतीं गोळा झालेला जनसंमर्द निवडणुकीचा सोक्षमोक्ष होण्यास जसजसा विलंब होऊं लागला तसतसा अधीर व अस्वस्थ होत चालल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. निवडणुकीचा शेवट अगदीं जवळ आला असतांही निकाल काय लागेल या प्रश्नावर लोकमत अद्याप अनिश्चितच होतें. प्रो. हार्टची मनोदेवता सांगेल तो निवडणुकीचा निर्णय होणार ही बातमी समजतांच मार्केट

पुढील चौकांतील गर्दी मोडून कुतूहलपूर्ण प्रेक्षकांनीं प्रो. हार्टचे बंगल्यास गराडा दिला. दरम्यान प्रो. हार्टचे दोन पट्टेवाले आर्डर (हौस) आणि फन्सीर (उमेद) बंगल्याबाहेर उनाडक्या करीत फिरत होते त्यांचेपाशीं बंगल्यांत काय चाललें आहे याविषयीं प्रत्येक जिज्ञासु इसम विचारपूस करूं लागला. प्रो. हार्टचे मनांत जें जें कांहीं भरविलें जाईल त्याबरहुकुम त्यांचें वर्तन होणार हें निश्चित असल्यामुळें निवडणुकीचा निकाल त्याच्याच मनःसंकल्पावर सर्वांशीं अवलंबून होता. यामुळें त्या खवळलेल्या जनसंमर्दात प्रोफेसर मजकुरांचे विकल्पविमोचनावर प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या अनुयायांमध्यें भवति न भवति चालू होती, व क्वचित् ठिकाणीं या चर्चेस वाग्युद्धाचेंही स्वरूप येऊं पहात होतें. परंतु प्रो. हार्ट यांचे स्वभावाची ज्यांना खरी पारख होती त्यांना डॉ. कान्शन्स्नें योजिलेला डाव फसणार याबद्दल तिळमात्र शंका वाटत नव्हती. हें भाकित वर्तविणाऱ्यांचें अनुमान बरोबर होतें याचा प्रत्यय लवकरच आला. एकाएकीं टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटानें दशदिशा निनादित झाल्या व तेथें लोटलेल्या गर्दीमध्यें विलक्षण खळबळ उडालेली दिसली. याचें कारण तात्काळ समजून आलें. मिस् माइन्डसमवेत प्रोफेसर हार्ट आपल्या बंगल्याचे दिवाणखान्यांतून बाहेर पडले व गर्दीतून वाट काढीत काढीत त्यांनीं मार्केटचा रस्ता सुधारला. त्या धामधुमींतील गोंगाटामुळें मी माझे तंद्रींतून एकदम भानावर आलों.

'ओहो ! केवढें विस्मयकारक स्वप्न हें'—असें पुटपुटत डोळे उघडून पाहतों तों प्रभातकाळचीं रंगीबेरंगी बालकिरणें पूर्वेकडील खिडकीचे झडपांतून चोरून प्रवेश करून माझे खोलीमध्यें विहार करीत होतीं. मी माझे आरामखुर्चीवर लवंडलेलों, अंगांतील शर्टचीं बटणें अर्धवट मोकळीं सुटलेलीं, हातांतील 'शेक्स्पियर' गळून एका बाजूस अस्ताव्यस्त पडलेला, टेबलावरील 'डिटमार लॅम्प' रात्रभर तसाच जळत राहिलेला, आणि 'प्रायमस् स्टव्ह' खोलीचे कोपऱ्यांतून अद्याप आवाज करीत असलेला अशी विलक्षण वस्तुस्थिति माझे नजरेस पडली. मी ताडकन् उठलों, टॉवेल घेऊन कपाळावरील घर्मबिंदु पुसून काढले आणि विकृत स्वप्नसृष्टींतून सत्यसृष्टींत प्रवेश करून आजूबाजूच्या परिस्थितीचें शांत चित्तानें पर्यालोचन केलें. माझा दिवा व स्टव्ह सबंध रात्रभर जळत राहिले

असले पाहिजेत ! मी ते विझवून टाकण्यास गेलों तों दोन्हींतीलहि घासलेट तेल बहुतेक संपून गेल्याचें आढळून आलें ! स्टोवरील रिकामें चहाचें भांडें तापून तापून लाल झालें होतें. तिकडे लक्ष्य गेल्याबरोबर मला सर्व कांहीं आठवलें. रात्रीं १० वाजण्याचे सुमारास एक कपभर चहाचें आधण स्टो पेटवून मी त्यावर ठेवल्याचें आठवलें. ‘ जितक्या अधीरतेनें तुह्मी आधणाकडे पहात रहाल तितका उकळी फुटण्यास अधिक विलंब लागतो ’ असा अनुभव आलेला असल्यामुळें मी बुद्धिपुरःसर दुसरीकडे लक्ष्य गुंतविलें असावें. आणि विद्यार्थ्यांचा जिवलग दोस्त जो चहा त्याच्या प्राशनानें जी डोळ्यावरील झोंप दूर सारण्याचा माझा इरादा होता त्याच झोंपेनें तेवढी संधि साधून अखेर मला गुंगविलें असलें पाहिजे. एरव्हीं माझा दिवा व स्टो सकाळपर्यंत खोलींत पेटलेला रहाताना ! लवंडलेल्या स्थितींत जागचे जागीं मला झोंप लागल्यामुळें सबंध रात्रभर स्टोवरील चहाचें पाणी उकळून उकळून वाफेच्या लोटांचे रूपानें भांडें ठणठणीत कोरडें होईपर्यंत खोलींतून बाहेर पडत राहिलें असावें. उठण्यास आणखी घटका अर्धघटका विलंब लागला असता तर भांडेंही वितळून जाण्याची पाळी आली असती !

मी माझ्या टेबलाचा कप्पा उघडून डायरींतील आदल्या दिवशीं लिहिलेल्या टिपणावरून नजर फिरवितांक्षणींच माझे डोक्यांत लख्ख प्रकाश पडला, आणि माझें मलाच हसूं आलें. निवडणुकींत सर स्टडीचा पराभव कां व कसा झाला, लेडी स्लीपनें ऐनवेळीं यश कसें मिळविलें, मिस् माइन्डनें डॉ. कान्शन्सचे डोळ्यांत धूळ टाकून प्रो. हार्टला कसें झुलविलें, डॉ. कान्शन्सचे चहापार्टीपासून तिनें त्याला कसें परावृत्त केलें, आणि तिच्या हिकमतीचे बळावर अखेर लेडी स्लीपला शेवटचीं दोन मतें पडून विजयश्रीची माळ तिचे गळ्यांत कशी पडली या सर्व गोष्टींचा आतां मला उलगडा झाला. सर स्टडींच्या विरोधास न जुमानतां प्रो. हार्टचे मुटींतील दोन्हीं मतें स्वतःकडे वळवून घेऊन अखेर लेडी स्लीपनें त्या दिवशींची निवडणूक जिंकली या बद्दल मला शंका राहिली नाहीं. सर स्टडींना एकंदर ११ मतें पडून त्यांचा नंबर दुसरा लागला. एक मतानें कां होईना पण अखेर त्यांचा पराभव झाला खराच.

कोलेरिज् अगर डी क्किन्सी प्रमाणें मी अभिजात कवि किंवा कल्पना-

सृष्टींत विहार करणारा अभिष्ट लहरी अवलिया नसलों तरी मलाही कधींकाळीं अशा तऱ्हेचीं उद्बोधक व अन्योक्तिपर स्वप्नें पडतात. त्यांपैकींच एक आठवणीनें जुळणी करून वर विस्तारशः दिलें आहे. या विलक्षण स्वप्नापासून बोध काय घ्यावयाचा येवढेंच आतां पहावयाचे राहिलें. आपणां सर्वांना माहीतच असेल कीं वेळ एकदां निघून गेली कीं ती गेलीच. ती कांहीं झालें तरी पुनः म्हणून माघारी यावयाची नाहीं. म्हणून आळशीपणांत काळाचा अपव्यय न करण्या-विषयीं आपण खबरदारी घेतली पाहिजे. आपलें जीवितकार्य यशस्वीरीत्या कसें पार पडेल याविषयीं सदा सर्वकाळ आपण जागरूक राहिलें पाहिजे. पुढील इंग्रजी कवितेंत हीच कल्पना मोजक्या पण जोरदार शब्दांत उत्कृष्ट रीतीनें समर्पक दृष्टांत देऊन कवीनें मांडली असल्यामुळें या ओळी प्रत्येक विद्यार्थ्यानें मुखोद्गत करणें अगत्याचें आहे: —

( मूळ इंग्रजी कवितेचें मराठी रूपांतर )

वाहे निर्झरिणी प्रवाह भुवनीं वेगें तसा कालही
मार्गा आक्रमिती त्वरें रथपथीं कल्लोलत्रस्ता मही ।
निःशब्दा चपला प्रशांत समयीं गेली कुठें नाकळे
वेला आणि सरित् स्तुतीस न भुले द्रव्यें न मागें वळे ॥ १ ॥
जातां गती गमतसे अति दुर्निवार
घेतो महार्णव तयां उदरीं विशाल ।
आहे जगीं समसमान कृती अपार
भासे विरोध परि जे करिती विचार ॥ २ ॥
नदी वाहे जेथें कधिं न घडला संगम मुधा
समृद्धी धान्याची फलभर सुहास्याहि वसुधा ।
परी गेला वाया क्षण सहज उद्बोधक खरा
विकासा बुद्धीच्या मुकुनि बनवी वानर नरा ॥ ३ ॥

# लोकमान्यांचें निधन.

(" उषःकाल माला " टिळक-अंक सप्टेंबर १९२०)

——:०:——

लेखकः—रा. रा. श्रीधर बळवंत टिळक.

*" Nature might stand up*
*And say to all the world, ' this was a man '!"*
Shakespeare.

*" What a pity is it–*
*That we can die but once to serve our country!"*
Addison.

रविवार ता. १ आगस्ट १९२० रोजीं लोकमान्य टिळकांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली ! स्वराज्यप्राप्त्यर्थ हिंदुस्थानचा साम्राज्य सरकारशीं गेलीं ४० वर्षे सतत जो झगडा चालू आहे त्यांत आजपर्यंत लहान सहान कित्येक प्यादीं हरपलीं परंतु येवढा मोठा मोहरा मात्र पूर्वी कधींही इरेस पडला नव्हता. स्वराज्य अद्याप दूरच आहे; इतकेंच नव्हे तर तें लवकर हस्तगत होण्याचीं तूर्त तरी कांहींएक चिन्हें दिसत नाहींत. आणि स्वराज्य मिळेपर्यंत नेहमींच वेळ आणिबाणीची राहणार ही गोष्ट निर्विवाद आहे. अर्थात् अशा ऐन अडचणीच्या वेळीं लोकमान्यांच्या सल्लामसलतीस आपण आंचवलों हें राष्ट्राचें केवढें दुर्भाग्य! परंतु गोष्ट होवून चुकली, आतां धीर सोडून काय उपयोग ? हा झगडा असाच दृढनिश्चयानें, नेटानें व एकजुटीनें पुढें चालू ठेविणें हें देशांतील तरुण पिढीचें कर्तव्य होय. एरव्हीं देशाच्या अभ्युदयाची गोष्टच बोलावयास नको. लोकमान्यांच्या चळवळीचें लोण शेवटच्या पाटीपर्यंत शक्य तितक्या लवकर पोंचविल्याखेरीज आपला तरणोपाय नाहीं. लोकमान्यांचे डोळे त्यांच्या पश्चात् आपण काय करतों इकडे अद्यापही लागून राहिलेले आहेत.

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥**

हे लोकमान्यांच्या तोंडचे अखेरचे उद्गार होत. यांचा सरळ अर्थ असा कीं, आपण आपलें कर्त्तव्य बजावण्यास चुकलों तर लोकमान्य, हातीं घेतलेलें अवतारकृत्य शेवटास नेण्याकरितां या आपल्या हतभागी हिंदुस्थानांत पुनः जन्मास येणार.

स्वराज्य मिळविणें—आणि तेंही शक्य तितकें लवकर मिळविणें हें एकच अढळ ध्येय लोकमान्यांनीं स्वतःचे आयुष्यांत एकनिष्ठपणानें डोळ्यापुढें ठेविलें होते. त्यांनीं जो मंत्र कंठरवानें लोकांस शिकविला तो हा कीं, स्वराज्यप्राप्त्यर्थ देशांत व देशाबाहेर 'चळवळ करा ! चळवळ करा !' अर्थात् त्यांचे शिकवणीप्रमाणें आपण वागलें पाहिजे. १९०८ सालीं त्यांना शिक्षा झाली त्या प्रसंगानिमित्त येथील 'सन्मित्र-समाज' मेळ्यानें कांहीं पद्यें छापून प्रसिद्ध केलीं होतीं. त्यांतील लोकमान्यांच्या अखेरच्या निरोपाचें पद्य अद्याप माझे कर्णरन्ध्रांत घुमत आहे. तें मी खालीं देण्याची परवानगी घेतों:—

**बहिष्कारयुत स्वराज्य सेवा । करा, तयास्तव मृत्युहि सेवा ।**
**निरोप माझा आहे सर्वां । वागाल अशा मार्गानें ॥ १ ॥**
**निरोप माझा आहे सकलां । वृद्ध असा मीं समजा मुकला ।**
**गाडा वेगें पुढता ढकला । रुतलेला परवशतेनें ॥ २ ॥**

लोकमान्यांच्या गुणवर्णनाचा हास्यास्पद प्रयत्न मी करूं इच्छित नाहीं. याचें कारण एकतर माझी पढतमूर्खांत गणना होईल अशी भीति वाटते, व दुसरें असें कीं देवी सरस्वती जरी दौतलेखणी घेऊन बसली आणि या विस्तृत वसुंधरेच्या पृष्ठभागावर एका टोकापासुन दुसऱ्या टोकापर्यंत लोकमान्यांचें प्रशंसापत्रक समग्र लिहून काढण्याचा तिनें चंग बांधला तरी देखील तिला आपला पराभव स्वमुखानेंच कबूल करावा लागेल. अशा रीतीनें प्रत्यक्ष सरस्वतीलाही जेथें हात टेकावे लागण्याचा संभव तेथें माझी काय कथा ? हे विचार मनांत आले म्हणजे असें वाटतें, वाहवा ! खरोखर एकट्या लोकमान्यांनीच आपल्या जीविताचें सार्थक केलें ! एक सुभाषितकार म्हणतो:—

**स जीवति यशो यस्य कीर्तिर्यस्य स जीवति ।**
**अयशोऽकीर्तिसंयुक्तो जीवन्नपि मृतोपमः ॥ १ ॥**

अर्थात्च लोकमान्यांसारख्या कांहीं थोडया अद्वितीय थोर विभूति वगळल्या कीं बाकी आपण सर्व केवळ मृतप्राय आहोंत हें सिद्ध होतें.

महात्म्यांच्या व सत्पुरुषांच्या चरित्रापासुन काय बोध घ्यावा या विषयीं जगांत पाश्चिमात्य व पौर्वात्य कवींचें ऐकमत्य आहे. मी दोन्हीं वाङ्मयांतून येथें एकएकच उतारा उद्धृत करतों:—

*"Lives of Great men all remind us,*
*We can make our lives sublime,*
*And departing leave behindus*
*Footprints on the sands of time."*

Longfellow;

**तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी।**
**मना सज्जना हेचि क्रीया करावी॥**
**मना चंदनाचे परी त्वां झिजावें।**
**परी अंतरीं सज्जना नीववावें॥ १॥**

श्रीसमर्थ रामदास.

लोकमान्यांचें देहावसान झाल्याला सारा एक महिना लोटला. लोकमान्यांच्या अस्थि भगवती भागीरथीच्या पावन प्रवाहांत विलीन झाल्या! या अस्थींचा निरोप घेतांना लाखो लोकांचीं अंतःकरणें भरून येवून 'कण्ठस्तम्भितवाष्पवृत्तिकलुषं चिन्ताजडं दर्शनम्' अशी स्थिति झाली. किंबहुना तसें न झालें तरच आश्चर्य! वर्डस्वर्थ कवि म्हणतो कीं, हा मनुष्यस्वभाव आहे:—

*"Men are we, and must grieve when even the shade,*
*Of that which once was great is passed away."*

लोकमान्यांचे निधनानें राष्ट्राचें अपरिमित नुकसान झालें ही गोष्ट सुर्यप्रकाशा इतकी स्पष्ट आहे. परंतु ही राष्ट्रीय दृष्टि घटकाभर बाजूला सारून माझे परमपूज्य तीर्थरूप मला सोडून गेले हा विचार मनांत आला कीं, प्रभु

रामचंद्राप्रमाणें गतकालीन स्मृतिचित्र अंतश्चक्षूंपुढें उभें राहून 'ते हि नो दिवसा गताः' असें ह्मणण्याचा कठीण प्रसंग मजवर ओढवतो. 'या जगांत आतां मी पोरका झालों' या एकाच हृदयविदारक विचारानें मन विषण्ण होतें, संसार असार भासूं लागतो, व आपणही त्यांच्या चितेंत उडी घ्यावयास पाहिजे होती असें वाटूं लागतें हाय! हाय! केवढा हा दुःखाचा डोंगर मजवर कोसळला. लोकमान्य! आपण मंडालेच्या खडतर तुरुंगवासांतून बंधमुक्त होवून परत आल्यावर आज सहा वर्षें आपल्या चरणांची मी हातून घडेल तशी बरी वाईट सेवाचाकरी केली. आपल्या सहवासांत जेवढे तास गेले तेवढे वजा केले ह्मणजे बाकीचें आयुष्य भुविभारभूतच समजलें पाहिजे. अभिमानास्पद गोष्ट काय ती तेवढीच. आपलें अंतःकरण मोठें म्हणून माझ्या चुक्या आपण सांभाळून घेतल्यात. आपले पश्चात् आतां मी करूं तरी काय? अथवा दुसरें तिसरें काय करणार:

सतां केनापि कार्येण लोकस्याराधनं व्रतम् ।
यत्पूरितं हि तातेन मां च प्राणांश्च मुञ्चता ॥

आतां पर्यंत शेकडो लोकांकडून दुखवटयाचीं पत्रें व तारा आल्या. आमच्या दुःखाबद्दल अशा तऱ्हेची सार्वत्रिक सहानुभूति दशांदिशनीं प्रकट व्हावी हा केवळ लोकमान्यांच्या थोरवीचाच महिमा होय. अशा तऱ्हेच्या सहानुभूतीस पात्र होण्यासारखे सद्गुण आमचे अंगीं यावे येवढीच त्या जगन्निय-न्त्याचे चरणीं माझी अखेरची नम्र विनवणी आहे.

---

## लो० टिळक-चरित्रांस शुभाशिर्वाद.

(ता. १८ जुलै सन १९२३)

होते सान्निध लोकमान्य अमुच्या, प्रत्यक्ष ज्यांची स्मृति ।
लोकीं जीवनकार्य व्यक्त, म्हणुनी वाटो वृथा ही कृति ॥
स्फूर्तीनें लढणार या पुढति जे स्वातंत्र्य–लिप्सा–सरित् ।
तृष्णापीडित मार्गदर्शक तयां, होवो चिरायू चरित् ॥ १ ॥

(इंदुप्रकाश)

---

( ज्ञानप्रकाश पुरवणी ता. १ सप्टेंबर १९२३ )

# सामुदायिक आरोग्य व नागरिकांचीं कर्तव्यें !

——:०:——

[ ' आमचे एक सन्मान्य मित्र यंदां त्रैवार्षिक निवडणुकींत यशस्वी होऊन स्थानिक म्युनिसिपालिटीचे प्रथमच सभासद झाल्यामुळें म्युनिसिपल कारभाराची माहिती करून घेण्यासाठीं म्यु० कचेरींत जुनें रेकॉर्ड चाळीत बसले असतां अचानक खालील अर्ज दप्तरीं दाखल केलेला त्यांचे नजरेस पडला. '—लेखक. ]

( अस्सल बरहुकूम नक्कल )

॥ श्री ॥

मेहेरबान प्रेसिडेन्ट्साहेब × × शहर म्युनिसिपालिटी—

यांचे हुजुरासः—

अर्जदार खालीं सही करणार राहणार पेठ गुरुवार घर नं.१००१ कारणें विनंति-अर्ज सादर करतो ऐसाजे—

महाराज—

आपला नम्र अर्जदार या शहर म्युनिसिपालिटीचे हद्दींतील एक घरंदाज सुशिक्षित हिंदु रहिवाशी असून पेशवाईचे अखेरपासून आज तागायत अर्जदाराचे घराणें याच शहरीं स्थायिक होऊन सतत चार पिढ्या नागरिकत्वाचे सर्व हक्क उपभोगीत आलें आहे. स्वतः अर्जदार म्युनिसिपालिटीचे सर्व कर दरसाल वेळचे वेळीं भरणा करीत आल्यामुळें त्याचें नांव मतदारांचे यादीवर चालू शतकाचे प्रारंभापासून अबाधित कायम आहे. सुखवस्तु, विद्याव्यासंगी, प्रागतिक परंतु केवळ मितभाषणी व एकलकोंडेपणाच्या स्वभावदोषामुळें अर्जदारानें उभ्या आयुष्यांत कोणत्याहि सार्वजनिक चळवळींत भाग घेऊन लोकप्रियता जवळ केली नाहीं. उलटपक्षीं आचारविचार, धर्मकल्पना, तत्त्वज्ञान वगैरे बाबतींत कोणाशीच न पटल्यामुळें गतानुगतिक, धोपटमार्गी बहुजन समाजरूपी शेळ्या-मेंढयांचे कळपापासून सर्वस्वी अलिप्त राहून, म्हणजे लोकछंदानुवर्तित्वाचा

मोह आजन्म टाळून, आणि स्वतःचे लहरी विक्षिप्तपणाबद्दल कमी अधिक जनापवादहि सोसून अर्जदारानें आतांपर्यंत '**साधी राहणी व उच्च विचार-सरणी**' या निर्लेप वचनानुरूप निर्भेळ निरुपद्रवी वृत्तीने कालक्रमण केलें. सालगुदस्तांचे इन्फ्लुएन्झाचे प्रखर सांथीत अर्जदाराचें प्रेमळ कुटुंब दोन अल्प-वयी अपत्यें मागें ठेऊन एकाएकीं निवर्तलें ! आकस्मिक रीत्या ओढवलेल्या या दुर्धर आपत्तीचे आघातामुळें काळजास धक्का पोहोंचून अर्जदारास यापुढें आयुष्याचा भरंवसा वाटत नाहं. वयामानपरत्वें हा काळ-जाचा विकार बळावत जाऊन मध्येंच कांहीं बरंवाईट झाल्यास अखेरपर्यंतची सर्व निरवानिरव केलेली असावी या सद्धेतूनें प्रस्तुत अर्ज करीत आहें.

ज्याअर्थी म्युनिसिपालिटीचें प्रधान कर्तव्य शहराचे हद्दींत साफसफाई व आरोग्य राखण्याचे कामीं हरतऱ्हेची दक्षता बाळगणें हें होय व ज्याअर्थी अर्जदारास इष्ट-मित्र, स्नेही-सोबती वगैरे कोणी नसल्यामुळें त्याचे पश्चात् त्याचे शवास अग्नि देण्यास विलंब लागल्यास आसपासची हवा दूषित होऊन आपल्या या सुंदर शहराचें आरोग्य अंशतः बिघडण्याचा संभव आहे, त्याअर्थी या अर्ज-द्वारें अर्जदार आपले और्ध्वदेहिकाची सर्व जबाबदारी म्युनिसिपालिटीवर टाकून पुढीलप्रमाणें तजवीज करून ठेवीत आहे आणि त्याबरहुकूम म्युनिसिपालिटीकडून योग्य वेळीं अम्मलबजावणी होईल अशी त्यास आशा आहे.

अर्जासोबत 'प्रेसिडेन्ट × × शहर म्युनिसिपालिटी' यांचे नांवें रक्कम रु. २१–८–० ( फक्त ) ची बँक ऑफ इंडियावर दिलेली दर्शनी हुंडी जोडली असून तिचे तपशिलाची फोड येणेप्रमाणेः—

| | **रक्कम रु.** | **तपशिलाची नोंद.** |
|---|---|---|
| | १२॥ | लाकडें मण दहा १० ( उत्तम गुलाबी बाभळ-फोड ) |
| | ३॥ | घांसलेट तेलाचा ड्रम ( प्रभात छाप ) |
| | १। | वाहतुकी, हमाली वगैरे |
| | १॥ | प्रेतगाडीचें भाडें ( छकडा चालेल ) |
| | २॥ | सदर कामीं देखरेखीखातर— म्यु. कामदारांस पारितोषिक |
| | ——— | |
| एकंदर | २१॥ रु. | |

उपरिनिर्दिष्ट हुंडीचा वटवडा करून रक्कम वरील विनियोगाप्रीत्यर्थ अर्जदाराचे हयातीपर्यंत आरोग्यखात्याचे हिशेबीं अनामत जमा लिहावी. या खेरीज स्थानिक "स्मशान फंडाचे" चिटणीस देशभक्त; × × × यांचे कडे चालू सालची वर्गणी रुपये २५ ( अक्षरीं रुपये पंचवीस ) नुकतीच भरणा केली आहे. त्याबावत त्यांना आज अलाहिदा पत्र लिहून कळवीत आहे कीं, सदर धर्मादाय रकमेचा विनियोग एखाद्या अनाथ व निराश्रित हिंदु नागरिकाच्या उत्तरकार्याकडे ( प्रेतदहनाकडे ): करण्याचा असल्यामुळें सदर रक्कम परस्पर म्युनिसिपालिटीकडे वळती करून घेऊन 'म्युनिसिपल कौन्सिलर' या नात्यानें उभय प्रसंगीं आपल्याच देशबांधवाचे अग्निसंस्कारास आपण जातीनें हजर राहण्याचें करावें. तसदीची माफी असावी, ही विनंति. येणेप्रमाणें अर्ज आज ता. मा. ६. सन १९१९ रोजीं लिहून दिला असे.

( सही ) ×.....×.....×

दस्तुर खुद्द.

मी ×.........×.........× सत्यप्रतिज्ञापूर्वक लिहून देतों कीं, वरील सर्व मजकूर माझेच भावी और्ध्वदेहिकाच्या तजविजीसंबंधीं :असून तो सर्व माझे अल्प समजुतीप्रमाणें व माहितीप्रमाणें मी पूर्ण शुद्धीवर असतांना लिहून टपालांत टाकला आहे.

( सही ) ×.........×.........×

दस्तुर खुद्द

[ **टीपः**—"कॉन्फिडेन्शल्-रेकॉर्ड बाहेर फोडल्याचा भयंकर गुन्हा टाळण्यासाठीं मूळ अर्जांतील व्यक्तिनिर्देशवाचक व इतर कांहीं थोडे शब्द नाइलाजास्तव वगळावे लागले. ":—**लेखक.** ]

# नवरात्रांतील फेरफटका.

—:०:—

( ज्ञानप्रकाश पुरवणी ता. ५ जुलै १९२४ )

पुण्या–मुंबईचे दरम्यानच्या आगगाडीचे फाट्यांपासून सुमारें पंचवीस कोस आंत 'तस्करवाडी' नांवाचा एक लहानसा गांव आहे. पायमार्गानें सरळ नाकासमोर चालत गेल्यास प्रत्यक्ष पुण्यापासुन हा गांव—खेडेगांव म्हटलें तरी चालेल—सरासरी ३६ मैल दूर येईल इतकेंच. यापेक्षां अधिक नाहीं. या गांवांतील प्रमुख प्रमुख संभावित मंडळींत श्री. रामराव महिपतराव नांवाच्या एका सुखवस्तु पाटलांचे बरेंच वर्चस्व होतें. घरची शेतीवाडी बरीच मोठी असल्यामुळें साहजीकच गांवच्या पुढारीपणाचा मान यांचेकडे असे. गेल्या चार पांच वर्षांत महाराष्ट्रांत 'सक्तीचें शिक्षण,' 'अस्पृश्यतानिवारण,' 'ब्राह्मण–ब्राह्मणेतर' वगैरे महत्त्वाच्या प्रश्नांवर रणें माजून खेड्यापाड्यांतूनहि लोकजागृतीची जी प्रचंड लाट उसळली ती अर्थातच 'तस्करवाडी' पर्यंत पोहोंचून कांहींतरी देशकार्य साधावें अशी प्रबळ इच्छा रामराव पाटलांचे अंतःकरणांत प्रादुर्भूत झाली, व त्या दिशेनें त्यांनीं तावडतोब उपक्रमहि सुरू केला. प्रथम त्यांनीं आपले गांवीं घरोघर हिंडून वर्गणी गोळा करून एक छोटेंसें सार्वजनिक मोफत वाचनालय स्थापन केलें; व पुढें लवकरच आपल्या खर्चानें एक छापखाना घालून स्वतःचे देखरेखीखालीं "भारत–भाग्योदय" नांवाचें एक साप्ताहिक वर्तमानपत्र सुरू केलें. पाटलांचें शिक्षण तें कितीसें झालेलें असणार? पण मेहेनतीपणा हा एक मोठा गुण त्याचे अंगीं उपजत असल्यामुळें मोफत वाचनालयांत येणारीं देशी भाषेंतील सर्व लहान मोठीं वर्तमानपत्रें वाचून वर्तमानपत्र कसें चालवावें हें त्यांनांहि हळू हळू समजूं लागलें होतें; व पुण्यामुंबईकडील ताजी खबरबात आपल्या वर्तमानपत्रांत दर आठवड्यास आली पाहिजे असें त्यांचे मनानें घेतलें. याच सुमारांस पुण्यांत 'औद्योगिक प्रदर्शन,' 'खादी प्रदर्शन' वगैरे देशी कारागिरीस उत्तेजन देणाऱ्या चळवळी सुरू झाल्याकारणानें कोणीतरी विश्वासू इसम 'बातमीदार' म्हणून पुण्यास पाठविण्याचें पाटलांनीं ठर-

विलें. पाटलांचे घरीं अप्पाजी व्यंकाजी नांवाचा कारकून पेशाचा एक गरीब ब्राह्मण वही लिहिण्याचे कामावर प्रथम नेमणूक होऊन गेलीं वीस-बावीस वर्षे इमानें इतबारें सेवाचाकरी बजावीत होता. अलीकडे फुरसुतीच्या वेळीं पाटलांच्या मुलामुलींच्या प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष्य पुरविण्याचें कामहि त्याचेचकडे आलें होतें. चालचलाऊ अंकगणीत व मराठी लेखनवाचन यांत वाकबगार असलेल्या अप्पाजी इतका दुसरा कोणीच हुषार व लायक मनुष्य नजरेपुढें नसल्यामुळें पाटलांनीं घरची थोडी गैरसोय सोसूनहि त्यांसच ‘ बातमीदार ’ म्हणून पुण्यास रवाना करण्याचें योजलें. अप्पाजी हा अंमळ भोळवट पण एक-मार्गी मनुष्य असल्यामुळें घाण्याच्या बैलाप्रमाणें पाटलांच्या घरचें रोजचें काम उरकण्यात नेहेमीं चूर असलेल्या बिचाऱ्यावर उभ्या बारा वर्षांत ‘ तस्करवाडी ’ सोडून पलीकडे ढुंकून पाहण्याचा कधीं प्रसंग आला नव्हता. मग पुणें तर दूरच राहो. तथापि मनुष्य कितीहि खेडवळ झाला तरी एकवार पुण्यामुंबईकडे फिरून डोळ्यांचें पारणें फेडून घेऊन जन्माचें सार्थक करावें ही आकांक्षा त्याचे अंतःकरणांत सदैव जागृत असते. अर्थात् पाटलांनीं गोष्ट काढण्याचाच फक्त अवकाश, अप्पाजीची पुण्यास जाण्याची एका पायावर तयारी होती. खरें बोलावयाचें म्हणजे इतकीं वर्षे नोकरी करून रोज तेंच तेंच काम करीत बसण्यास अप्पाजी कंटाळला होता. मनुष्यस्वभावच असा आहे कीं, भोवतालच्या परिस्थितींत रोज कांहींतरी अलटापालट झाल्याखेरीज त्याला चैन पडत नाहीं. ‘ भारत-भाग्योदया ’चे अंक दर गुरुवारीं नियमित निघूं लागले होते. चालू आठवड्याचा ताजा अंक बाहेर पडल्याबरोबर त्याच दिवशीं रामरावांनीं अप्पाजीवर त्याजकडे सोपवावयाच्या नव्या कामगिरीची ओळख करून देऊन पुण्यांतील अलीकडील बहुविध चळवळींची सामान्य माहिती समजावून सांगितली व पुढील अंकासाठीं वेळेवर पोहोंचेल अशा बेतानें ‘ पुण्याचें बातमीपत्र ’ कोणा येणाऱ्या जाणाऱ्या गांवकऱ्याचे हस्तें रवाना करण्याविषयीं बजावून ठेवलें. पाटलांचे आज्ञेबरहुकुम अप्पाजीनें आपले लेखनसाहित्य व पाथेय गुंडाळून बंदोबस्तानें पडशी तयार केली व दुसऱ्या दिवशीं मोठ्या पहाटेस उठून पडशी खांद्यावर व चंची अंगरख्याचे खिशांत टाकून तस्करवाडीहून कूच केलें. या

पुढील म्हणजे गुरुवार ता. १८ आक्टोबर १९२३ चा ' भारत-भाग्योदया ' चा अंकच आमचे हातीं आला असल्यामुळें त्यांत प्रसिद्ध झालेलें अप्पाजीनें पुण्याहून लिहून पाठविलेलें बातमीपत्र खालीं अक्षरशः छापलें आहे:—

---

# जत्रा कीं प्रदर्शन ? *

——:०:——

( ज्ञानप्रकाश पुरवणी ता. १२ जुलै १९२४ )

( ले. श्री. ब. टिळक. )

२

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

## पुण्याचें बातमीपत्र.

[ आमच्या खास बातमीदाराकडून ]

मे० पाटील साहेब, संपादक महाशय ' भारत–भाग्योदय ' यांसी:–

सप्रेम रामराम वि. वि. आपली परवानगी घेऊन तस्करवाडीहून निघालों तो मजल दर मजल करीत आजरोजों तिसरे प्रहरीं पुण्यास येऊन थडकलों. कालची रात्र रायगांवचे चावडीवर झोंपून काढली, व पुढील सोळा मैलांची मजल अवघ्या पांच तासांत रेटून थेट गव्हर्नर साहेबबहादुरांचे बंगल्यानजीक दशम्या सोडल्या. पोलीस चौकीवरील शिपाई दादास रामराम करून विचारपूस केली तों त्यानें रस्त्याचें नांव " गणेशखिंड रोड " असें सांगितलें. खिंडींतून पुढें सरकलों व विचार केला कीं, जवळपास गणपतीचें मोठें देऊळ असल्या खेरीज रस्त्यास हें नांव पडलें नसावें. पुण्यास गणपति उत्सव फारच बहारीचा

---

* टीपः—या बातमीपत्रांतील सर्व वर्णन पुण्यात दरसाल नवरात्रांत भरणाऱ्या चतुःश्रृंगीच्या जत्रेचें आहे. "—लेखक

व प्रेक्षणीय होतो हा लौकिक बरेच दिवसांपासून ऐकत असल्यामुळें, 'स्वदेशी बाजार व औद्योगिक प्रदर्शन' वगैरे समारंभ झाले तरी ते गांवाबाहेर गणपतीच्या देवळाचे आवारांतूनच भरत असावेत, असा कयास बांधून वाट चालूं लागलों, तों माझा तर्क तंतोतंत खरा ठरला.

काय सांगूं महाराज, उजव्या हाताचे एका वाटेवर लोकांची कल्पनातीत गर्दी लोटली होती! त्यांतच मोटारी, फैटणी, टांगे, पायगाड्या इ. वाहनांच्या चुरशीच्या शर्यतीनें बिचाऱ्या वाटसरूंची कोण त्रेधा व दुर्दशा! प्रवासाचे दगदगीनें थकला भागलेला मी कसा तरी वाट काढून जरा पुढें झालों तो तेथील देखावा काय वर्णन करावा! रस्त्यालगतचे टेकडीचे पोटांत मध्यावर गणपतीच्या देवालयाचें उंच शिखर झळकत होतें; व पायथ्यापासुन थेट देवालयापर्यंत सरासरी पन्नास-पाऊणशें रुंद दगडी पायऱ्यांचा एक राजरस्ता वर चढत होता. या रस्त्याचे दुतर्फा लहानमोठे सुशोभित मंडप उभारलेले पाहून, "हाच तो पुणेकरांचा स्वदेशी बाजार" अशी मनाशीं खुणगांठ बांधली; व सविस्तर विचारपूस करून अधिक खात्री करून घेण्यासाठी समोंवार नजर फेंकली. निवडुंगापलीकडील एका शेताचे वळचणींवरील एका मोठ्या शिळेवर कोणी एकजण बाजारासाठीं व देवदर्शनासाठीं लोटलेल्या गर्दीची गंमत पहात एकटाच बसला होता. अंगांत काळा कोट, डोक्यावर काळी टोपी, पायांत पुणेरी जोडा, खाकेंत पुस्तक, हातांत वेताची बारीकशी छडी, व डोळ्यांवर चष्मा पाहून हा कोणीतरी मिसरूड न फुटलेला सुशिक्षित तरुण विद्यार्थी असावा असा विचार करून, दुरूनच टेकडीकडे बोट दाखवून त्यास "हें प्रदर्शनच ना?" असा मोठ्या आदबीनें सवाल विचारला. आपल्याच विचारांत गर्क असलेला तो इसम माझ्या प्रश्नानें दचकून भानावर आला, व एकवार पायतणापासुन मुंडाशापर्यंत मजकडे नीट न्याहाळून पाहून, "पाहून तर या राव काय मौज आहे ती"—असे कांहींसें स्वतःशींच गुणगुणला. मीहि पुढें जास्त चौकशी करण्यांत वेळ न गमावतां, पडशी सांवरून एकदम त्या गर्दीत मिसळलों, व सायंकाळच्या आल्हाददायक संधिप्रकाशांत टेकडीचे पायथ्यालगतच्या रमणीय देखाव्याचें मोठ्या कुतूहलानें निरीक्षण करूं लागलों. पुणेकरांच्या कार्यबाहुल्य व कार्यक्षमतेबद्दल अतोनात आदर; देशी

उद्योग-धंद्यांना यथाशक्ति उत्तेजन देण्याची आवश्यकता व 'भारत-भाग्योदयाचा' खास बातमीदार या नात्यानें शिरावर घेतलेल्या जबाबदारीची पूर्ण जाणीव अशा तिहेरी जागृत मनोवृत्तींनीं ग्रस्त, चिंतातुर व भांबावलेला असा मी पडशींतून कागदपेन्सिल काढून सभोंवारच्या प्रेक्षणीय बाजाराचें स्थूल मानानें अगदीं जरूरीपुरतें टांचण करूं लागलों.

प्रथम दर्शनींच एक गोष्ट माझे स्पष्टपणें लक्षांत आली ती अशी कीं, उत्साही व स्वार्थत्यागी पुणेकरांनीं भरविलेलें स्थानिक देशी मेवामिठाईचें व इतर किरकोळ लज्जतदार व खुमारीदार पदार्थांचें हें एक जंगी जाहीर प्रदर्शन असावें. 'गणेशखिंड-रोड' पासुन टेकडीचे पायथ्यापर्यंतच्या पायरस्त्याचे व त्यापुढील फरसबंदीचे दुतर्फा सुरुवातीला रेवड्या, गुडदाणी, काबली, चिवडा, चणे, फुटाणे वगैरे माल पुढें मांडुन, त्या त्या मालाचे उत्पादक, संशोधक, प्रचारक व कारखानदार खड्या तालसुरांवर आपआपल्या पवित्र जिनसांच्या गुणवैशिष्ट्याचें रसभरित वर्णन करून, प्रेक्षकवर्गाकडुन सहानुभूतिपर अनुग्रह संपादन करण्याची पराकाष्ठा करीत होते. कांहीं सहृदय व गुणग्राही लोक त्यांना तात्काळ उदार आश्रय देत होते, तर कांहीं प्रथम देवदर्शन करून मग यथावकाश बाजाराचें अवलोकन करण्याचें मनांत योजून इकडे तिकडे न पहातां तडक पुढें घुसत होते. येथें एक गोष्ट नमूद केल्याखेरीज राहवत नाहीं ती अशी कीं, मुंबईतील श्रीमंत लोक आपलीं मुलेंबाळें हवा खाण्याखातीं ह्मणून गडीमाणसांबरोबर ज्या चारचाकी हात-गाड्यांतून मोकळ्या मैदानावर पाठवितात असें आपण ऐकितों, तशा तऱ्हेच्या गाड्या पुणेंकर चिवडेवाले गरम मसालेदार चिवडा विकण्यासाठीं वापरतात. मग चिवडा गाडींतून ढकलत नेतां नेतां रस्त्याची शुद्ध व मोकळी हवा लागून तो अधिक स्वादिष्ट, पवित्र व पौष्टिक बनतो असा पुणेकरांचा अनुभव असल्यास न कळे! जातां जातां डावीकडे दूरवर नजर फेकली, तों त्या बाजूस मोकळ्या मैदानावर शेंकडों पुणेंकर नागरिक बावडीवजा लहान मोठे पतंग मोठ्या अहमहमिकेनें वाऱ्याच्या झोतावर सोडुन काटाकाटीची चुरशीची लढाई खेळण्यांत दंग होते. या बाबतींत माझा तर्क असा आहे कीं, जर्मन महायुद्धांतील वैमानिकविद्येच्या डावपेचांचें सूक्ष्म अध्ययन

करून व त्यांत पारंगत होण्याची महत्वाकांक्षा बाळगून त्या दिशेनें लुटीपुटीचीं आकाशयुद्धें खेळण्यासाठीं, किंबहुना भावी स्वराज्याच्या लढ्याची पूर्वतयारी म्हणून एखाददुसरी रंगी तालीमही करून पाहण्यासाठीं पुण्यांतील सर्व अड्यांचे व आखाड्यांचे निवडक जवान तेथें जमले असावे. चार पायऱ्या चढून आणखी थोडा पुढें घुसलों तो प्रत्येक पायरीचे दुतर्फा उत्कृष्ट पुणेरी मेवामिठाईचीं दालनेंच्या दालनें एकसारखीं रांगेनें लागून गेल्याचें दृष्टीस पडलें. पेढे, बर्फी, बत्तासे, साखरफुटाणे, काजू, साबण्या वगैरे हरतऱ्हेची रुचकर मेवामिठाई तयार करण्यांत पुणेकर हलवाई चांगलेच वाकबगार आहेत असें म्हणणें प्राप्त आहे. पेशवाई-पासून पूर्वापार चालत आलेल्या या जुन्या पुराण्या अस्सल देशी कलेची योग्य जोपासना होऊन पुणेकरांकडून वेळोवेळीं प्रोत्साहन मिळत गेलें नसतें, तर जेथें आमचे सर्वच उद्योगधंदे ठार बुडाले, त्या या परकी राज्यछत्राखालीं आज हा एवढा मोठा ‘ स्वदेशी बाजार ’ कसा दृष्टीस पडला असता ? पण धन्य त्या पुणेकरांची कीं, ज्यांनीं आपल्या पुरातन आर्यसंस्कृतीचा व कलाकौशल्याचा न्याय्य अभिमान बाळगून व त्यांचें शक्य त्याप्रकारें संगोपन व संवर्धन करून हे सोन्यासारखे दिवस आणले.

मेवामिठाईच्या प्रत्येक स्टॉलपुढें थोडा वेळ थांबून, सभोंवार जमलेल्या प्रत्येक वर्गाजवळ तेथील मालासंबंधानें चार दोन औपचारिक प्रशंसापर उद्गार काढून गिऱ्हाइकांना जिन्नस विकत घेण्याची आग्रहपूर्वक शिफारस करून व मिठाईचे चांगुलपणाबद्दल स्वतःची खात्री करून घेऊन पुढें हलवायांच्या नयन-मनोहर व चित्ताकर्षक दालनांचे दरम्यान मधून मधून भडभुंज्यांच्या व उपाहार-गृहांच्या प्रयोगशाळा, आणि पानपट्टी व सोडालिंबूच्या कारखानदारांचे स्टॉल्स, अशा रीतीनें एकंदर प्रदर्शनाची अत्यंत कल्पक, रेखीव व सुव्यवस्थित मांडणी केलेली पाहून मला फार अचंबा वाटला. पण थोड्याच वेळांत हें हि कोडें उलगडलें व माझे डोक्यांत वस्तुस्थितीचा एकदम लख्ख प्रकाश पडला. कारण, प्रस्तुत प्रदर्शनाची सर्वच व्यवस्था चांगल्या सुशिक्षित, घरंदाज व प्रतिष्ठित स्वयंसेविकांच्या हातीं असल्याचें लवकरच माझे नजरेस आलें. चालू शतकाचे प्रारंभापासून पुण्यांत स्त्री-शिक्षणाचा प्रसार इतका बोकाळला आहे कीं, त्याची

मजल स्त्री-दास्य-विमोचन व समान-हक्क प्रतिपादनापर्यंत पोहोंचून, अलीकडे कित्येक वाचनालयें, नियतकालिकें, संस्था, सभा, समारंभ इत्यादि गोष्टी पुरुषांच्या मदतीवांचून चालविण्याची स्त्री-समाजांत तयारी व लायकी दृष्टोत्पत्तीस येऊं लागली आहे. केवळ स्त्रियांचे हातीं ज्याची व्यवस्था रहाते अशा प्रदर्शनास इंग्रजी भाषेत 'फॅन्सी-फेअर' किंवा 'लहरी जत्रा' असें ह्मणतात. आणखी दहा पांच पायऱ्या चढून वर जातों तोंच त्यांपैकीं कांहीं स्वयंसेविकांनीं मला हटकलें. एक जात शुभ्र पातळें परिधान केलेल्या, सौभाग्यालंकारांनीं विभूषित व हातांत ओवाळणीचें व प्रसादाचें तबक घेऊन निमंत्रित संभावित शहरवासियांचें आदरातिथ्य करण्यास तत्पर अशा त्या स्वयंसेविकांनीं मला गराडा देऊन माझें स्वागत केलें. मग "भारत-भाग्योदयाचा' मी खास बातमीदार आहें हें त्यांनी कसें ओळखलें कोण जाणे !

एक गोष्ट मात्र मला जरा चमत्कारिक वाटली. ती अशी कीं, त्यांचे सर्वांचे आंगाखांद्यांवरील दागिने कवडीमोल किंबहुना प्रत्यक्ष कवड्यांचेच होते. पुण्या मुंबईकडे विलायती नकली दागदागिन्यांचें बंड फार माजल्याचें ऐकलें होतें. पण त्या अनिष्ट व अराष्ट्रीय 'फॅशन्' विरुद्ध एकदम अशा स्वरूपाचा सार्वत्रिक सामुदायिक सत्याग्रह सुरू होईल याची मात्र मला यत्किंचितहि कल्पना नव्हती खरोखर. महात्मा गांधीजींच्या असामान्य ओजस्वी चळवळीचे कोठें काय अद्भुत् परिणाम होतील, याचा नेमानेम कोणी सांगावा ! त्या स्वयंसेविकांपैकीं एकजण माझेपुढें तालसुरावर नाचूं लागली, दुसरीनें गळयांत हात टाकला व तिसरी मला ओवाळूं लागल्यामुळें, मी किंचित् विरमलों व गोंधळून गेलों. हें पाहून सभोंवार मोठा हंशा पिकला. अशा प्रकारच्या मानखंडनेच्या प्रसंगांतूनही प्रसंगावधान व समयसूचकतेच्या जोरावर मी सहीनिशीं निसटलों. औद्योगिक प्रदर्शनासारखीं जबाबदारीचीं संघटित कार्यें सार्वजनिक वर्गणी वांचून थाटानें व सुरळित पार पडणें अत्यंत मुष्किलीचें आहे ही गोष्ट माझे तात्काळ लक्षांत आल्यामुळें चंचींतून चटकन् चार आणे काढून मी त्यांचे तबकांत टाकले, व स्वतःची सुटका करून घेतली. मला पावती मिळाली नाहीं, तथापि हे पैसे "भारत-भाग्योदयाचा" खास बातमीदार या नात्यानेंच मी खर्च केले हें येथें वेगळें सांगण्याचें फारसें प्रयोजन नाहीं.

पुढील दहा बारा पायऱ्या चढून वर गेल्याबरोबर मला अगदीं गळून गेल्यासारखें झालें. तों तेथें जवळच परस्परसहकारितेच्या सर्वमान्य तत्त्वावर नमुनेदार रीतीनें चालविलेलें " सुखनिवास उपाहारगृह " नांवाचें एक टुमदार फराळाचें व चहाकाफीचें दुकान आढळले. दुकानासाठीं उभारलेली तट्ट्याची झोंपडी लतापल्लवांच्या तोरणांनीं उत्तम प्रकारें शृंगारलेली दिसत होती, व बाहेर दाराजवळ एका काळ्या फळ्यावर खडूनें सर्व जिनसांचे माफक दर लिहिलेले होते. त्यावर प्रथमतः " चहाचा कप दोन पैसे " व जरा पुढें " आश्रय-दात्यांसाठीं खास सवलतीचा दरः—' तीन पैशांस दोन कप चहा " असा मजकूर पाहून मी बुचकळ्यांत पडलों. कारण त्या घटकेला मला स्वतःला जरी आंत शिरून गरम चहा पिण्याची इच्छा अनावर झाली होती, तरी ती फक्त एका कपा पुरतीच होय. आजपर्यंत सहसा एका बैठकीला दोन कप चहा मी कधींच प्यालों नव्हतों. तरी पण सवलतीच्या दराचा मोह सुटेना. उपाहारगृहाच्या दाराजवळ अशा अनिश्चित मनःस्थितींत घुटमळत असतां, मागून अचानक येऊन एका नितांत सुंदर स्वयंसेविकेनें माझे डोळे झांकले. अहाहा ! तिच्या त्या जिव्हाळ्याच्या सत्काराचें वर्णन कोणत्या शब्दांत करावें ! स्वार्थनिरपेक्ष बुद्धीनें अहोरात्र जिवापाड दगदग करणाऱ्या त्या निष्पाप, सरलहृदयी, अव्याजमनोहर स्वयंसेविकांच्या कार्यतत्परतेचा मला सकौतुक अभिमान वाटला, व आमच्याभोंवतीं सुरू झालेली कांहीं टवाळ लोकांची कुचेष्टा चुकविण्यासाठीं तिचा हात धरून मी तिला एकदम आंत ओढून उपाहारगृहांतील मुख्य बाकांवर बसविलें. तेथील सर्व व्यवस्था आपल्या आर्य-संस्कृतीस साजेशीच होती. शेव, चिवडा, उसळ, भजीं, भाजी वगैरे निवडक पदार्थ म्हणजे पुरातन परंपरागत सदभिरुचीचे मसालेदार मासलेच होते, व सर्व सनातन धर्माभिमानी आश्रयदाते आंतील बाकांवर बसुन त्यांचा यथास्थित समाचार घेण्यांत गुंतले होते. मी तीन दिडक्या छोकऱ्याचे हातावर टाकून दोन कप मागवले, व आम्ही उभयतांनीं हांसत खेळत चहापान केलें. दरम्यान त्या स्वयंसेविकेनें दुसऱ्या एका छोकऱ्यापासून एक पैशाच्या कडक कंट्री विड्या विकत घेतल्या, व परतभेटीदाखल मला देऊं केल्या, पण मी त्या घेण्याचें नम्रपणें नाकारलें. हें पाहून त्यांपैकीं एक विडी पेटवून तिनें गंभीर मुद्रेनें त्याच-

स्थळीं धूम्रपानास सुरवात केली. मला तिच्या त्या अघोर कृत्याचें मुळींच आश्चर्य वाटलें नाहीं. कारण पाश्चात्य संस्कृतीनें धूम्रपानाचा हक्क स्त्री-वर्गास यापूर्वीच देऊन टाकल्याचें माझे कानीं आलें होतें.

अशा रीतीनें श्रमपरिहार होऊन अंगांत तकवा आल्याबरोबर, त्या अवसानांत उरलेल्या सर्व पायऱ्या एका दमांत चढून जाऊन, देवालयाचे मुख्य कमानींत आमची स्वारी जाऊन उभी राहिली. कमानी वरील नगारखान्यांत चौघडा झडत होता; व त्या योगानें सर्वांचे अंतःकरणांत देवदर्शनाचीउत्कंठा उद्दीपित होत होती, परंतु येथून पुढें इतकी चिकार गर्दी व खेंचाखेंच सुरू झाली कीं, आंतून बाहेर पडणाऱ्या व बाहेरून आंत घुसणाऱ्या भाविक जनसमूहाचे प्रवाहामध्यें धक्काबुक्की करूनहि, माझा पडशीसह आंत शिरकाव होणें दुरापास्त झालें. मग सभामंडपाचे अंतर्भागांत प्रवेश करून श्रीगजाननाची मूर्ति डोळे भरून पाहणें तर दूरच राहो. देवदर्शन दुर्लभ व टेकडीचे कडेपठारावरील प्रदक्षिणेची खडकाळ वाट त्याहूनहि बिकट, हें पाहून उतारवयांत जिवाचे हाल करून घेण्यास मन धजावेना. कारण एकदां कां त्या गर्दीत सांपडलों असतों कीं, सर्व हाडें चांगलींच घुसळून निघून तिकडे तुम्हांस माझ्या बातमीपत्राची नुसती वाटच पहात कालक्रमण करावें लागलें असतें. एकंदर सर्व गोष्टींचा असा दूरवर विचार करून अखेर तेथूनच नमस्कार केला, स्वतःभोवतींच एक प्रदक्षिणा घातली, व त्याच पावलीं तडक परत फिरलों. पन्नास साठ पायऱ्या उतरून खालीं येतों न येतों इतक्यांत अकस्मात् पावसाची जोराची सर आली, व मला बाजूच्या एका छोटया देवळाचा आश्रय करावा लागला. या देवालयांत शेंदूर फासलेली श्रीसिद्धिविनायकाची स्वयंभू मूर्ति पाहून मुख्य उपास्य देवतेचें दर्शन न झाल्यामुळ खट्टू झालेल्या मनाचें बरेंच समाधान झालें; व ‘ मंगलमूर्ति मोरया ’ म्हणून तिच्या पुढें मी साष्टांग नमस्कार घातला. पावसाची सर सारी पांचच मिनिटें टिकली, पण तेवढयानें चोहोंकडे पाणीच पाणी होऊन साऱ्या प्रदर्शनाचा बेरंग झाला. इतकेंच नव्हे तर, प्रेक्षकांचाहि—आणि यांत स्त्रीसमुदाय कांहीं कमी नव्हता—थोडाफार विरस झाल्यावांचून राहिला नाहीं. टेकडीच्या पायथ्याचे सपाटीवरील मोकळया मैदानांत वैमानिक-कलेचे

डावपेंच शिकणाऱ्या पुणेकरांचे सर्व पतंग मारहून खालीं कोसळले; व त्यांच्या झुंडीच्या झुंडी "अली बंधू की जय" अशा आरोळ्या ठोकीत आश्रयार्थ प्रदर्शनाचे आवारांत घुसल्या.

मोरयाचे देवालयांत बसून पाऊस उघडण्याची वाट पहात असतां, पान खाण्याची इच्छा होऊन अंगरख्याचे खिशांत हात घातला, तों केवढें आश्चर्य! हात आरपार पलीकडे निघाला; व कळून चुकलें की, कोणातरी बिलंदर पुणेरी भामट्यानें गर्दीत संधि साधून माझे आंगरख्याचा लोंबता खिसा चंचीसह बेमालुम शाबूत कापून नेला! चंचींत किरकोळ खुर्द्यापलीकडे फारसें कांहीं नव्हतें ही गोष्ट अलाहिदा. तस्करवाडीहून निघतांनाच मी आपलें सर्व महत्वाचें सामान पडशींत व वाटखर्चीसाठीं आपण दिलेली रक्कम पागोट्याचे आंतील पदरांत बंदोबस्तानें बांधून घेतलेली होती. पुणेकर खिसेकापूंच्या शिताफीचें सखेदाश्चर्य वाटलें! अखेर नाइलाजास्तव शेजारच्या तांबोळयाच्या दुकानांतून दोन तयार मसालेदार पट्या विकत घेणें भाग पडलें; व त्या सोडून पाहणार इतक्यांत दोन बाजूनें दोन पोरें धांवत आलीं. व प्रत्येकानें आपले हातांतील सुपारीचें पाकीट मोठ्या उत्सुकतेनें मजपुढें धरलें. डोळयास चाळिशी लावून व दोघांचीं पाकिटें हातांत घेऊन नीट न्याहाळून पहातों, तों एकावर "लोकमान्य सुपारी" व दुसऱ्यावर "महात्मा सुपारी" असे शेरे छापल्याचें आढळून आलें, आणि खालीं उभयतांची किंमत प्रत्येकीं एक पैसा लावली होती. या दोन थोर विभूतींच्या पवित्र नांवावर विकल्या जाणाऱ्या दोन क्षुल्लक चिजा व त्यांचे दोन प्रतिस्पर्धी प्रचारक यांचे दरम्यान माझी मात्र बरीच तिरपीट उडाली. माझ्यासारख्या क्षुद्र त्रयस्थानें त्यांत सरस-निरस ठरवून अगर खऱ्या खोट्याची शहानिशा करून पारखून तें काय घ्यावयाचें? दोघेहि असामान्य पुढारी! दोघांनींहि लोकोत्तर देशसेवा केली, दोघेहि मला सारखेच वंद्य, असें कांहींतरी तोंडानें पुटपुटत उभयतांचे हातावर एक एक दिडकी ठेवून त्यांचीं पाकिटें विकत घेतलीं, व पुनः त्या स्वयंभू मोरयाचे मंदिरांत प्रवेश केला. पाकिटें फोडून त्यांतील एक एक चिमूट तोंडांत टाकीत असतां मनांत विचार आला कीं, अशा या स्वदेशी बाजार व औद्योदिक प्रदर्शनांचे द्वारें ज्यांनीं स्वार्थ, परमार्थ, पुरुषार्थ

व देशार्थांची उत्कृष्ट सांगड घालून एकसमयावच्छेदेंकरून धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष साधला त्या पुणेकरांची कर्तबगारी किंवा हातोटी अजब खरीच ! प्रसंग-विशेषीं ते प्रतिसृष्टिहि निर्माण करू शकतील. नाहीं कोणी म्हणावें !

या सुमारास सूर्य अस्तास जाऊन अंधार पडूं लागल्यामुळें, "वाहवा पुणेकर ! शाबास पुणेकर ! जीते रहो फत्ते रहो !" असा मोठमोठ्यानें धन्य-वादयुक्त जयघोष करीत टेकडी उतरून मी झपाट्यानें पुनश्च 'गणेश–खिंड–रोड' गांठला. उदईक सकाळीं गांवांत जाण्याचा विचार आहे. तेथें याहून वेगळ्या प्रकारचे असें दुसरे कांहीं उत्सव–समारंभ व प्रदर्शनें पहावयास सांपडल्यास पुढील अंकासाठीं आणखी एखादें सविस्तर बातमीपत्र लिहून पाठवीन. या घटकेपर्यंत खुशाल आहें. काळजी नसावी, कळावें हें विनंति.

आपला

विश्वासु नम्र सेवक—

**अप्पाजी व्यंकाजी**, ( दस्तुर खुद्द )

पुणें मि. आश्विन शु. ५

शके १८४५

[ **ता. क.**:—हें बातमीपत्र एका जकात नाक्यांवरील मिणमिण कर-णाऱ्या कंदिलाचे अंधुक उजेडांत मूळ टांचणावरून गर्दीगर्दीनें लिहून काढावें लागल्यामुळें, नजरचुकीनें कांहीं हस्तदोष राहून गेले असल्यास, त्याबद्दल 'भारत भाग्योदया' चे सुज्ञ वाचक क्षमा करतीलच, पण मुख्य भीति वाटते ती ही कीं, कवठीचे अड्ड्यावरील गाडीतळावरून माघारा फिरलेल्या ग्यानबाचे हस्तें आपले हातीं हा मजकूर वेळेवर न पडल्यास, आपणांस मात्र पुनः तोंड दाखविण्याची सोय राहणार नाहीं. ]

—o—

# स्वराज्यविषयक पात्रापात्रतेची मीमांसा

---:c:---

( लेखकः—श्री. श्रीधर बळवंत टिळक )

( 'महाराष्ट्र—साहित्य' पुस्तक ५ वें, अंक ४; आक्टोबर १९२३ )

उद्धरेदात्मनाऽत्मानं नात्मानमवसादयेत ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ( गीता ६;५ )

'या घटकेला आम्ही स्वराज्याला पात्र आहों' असें खड्या सुरांत शेकडों जाहीर सभांतून आमचेकडील मैदानी वक्त्यांनीं वेळोवेळीं पुकारलें असलें तरी या प्रश्नाचा सूक्ष्म व चिकित्सक बुद्धीनें सांगोपांग विचार करणारांस स्वतःची दृष्टि जरा अंतर्मुख करून इकडील समाज-स्थितीचें बारकाईनें निरीक्षण केल्यावर असें निश्चयात्मक म्हणतां येईल कीं, अद्याप आपला समाज शारीरिक, नैतिक आणि आरोग्यदृष्ट्या फार अप्रागतिक अतएव कमकुवत आहे. शारिरिक ऱ्हास, नैतिक अधःपात, गलिच्छ व अव्यवस्थित राहणी वगैरे दुर्गुणांनीं आंतून हळूहळू पोखरल्या जाणाऱ्या अशा एखाद्या जुनाट राजवाड्याप्रमाणें हिंदी—समाजरूपी टोलेजंग इमारतीची अशी कांहीं दुर्दशा झाली आहे कीं, जीवनकलहाच्या वाढत्या प्रक्षोभांत ती हां हां म्हणतां केव्हां खालीं येईल याचा भरंवसा नाहीं. अशा निराशाजनक परिस्थितींत समाज-सेवेचें दुर्धर व्रत एकनिष्ठपणें अंगिकारून लोकप्रियतेची फारशी अपेक्षा न ठेवतां राष्ट्रसंवर्धनदृष्ट्या दिसण्यांत किरकोळ परंतु परिणामीं हितावह अशी कांहीं तरी टिकाऊ कामगिरी करून दाखविण्याची ज्यांची उमेद असेल त्यांनीं पुढील गोष्टींचा अवश्य विचार करावा. वर 'दिसण्यांत किरकोळ' असे शब्द वापरले आहेत याचें कारण स्त्री-दास्यविमोचन, पतितपरावर्तन, अस्पृश्यतानिवारण इ. इ. वरिष्ठ दर्जाचे प्रश्न गेलीं २० २५ वर्षें राष्ट्रापुढें आहेतच; आणि त्यांचें महत्व व आवश्यकता निर्विवाद सिद्ध आहे. परंतु त्याखेरीज असें कांहीं दुय्यम दर्जाचे प्रश्न शिल्लक राहतात कीं, जिकडे

अद्याप आपल्या राष्ट्रीय पुढाऱ्यांचें दुर्लक्ष होत असून त्या त्या बाबतींतील सुधारणांचे अभावीं निःपक्षपातबुद्धीनें पाहणाऱ्या त्रयस्थास आमचा समाज स्वराज्यास सर्वथैव नालायक दिसतो.

'आपला तेवढा बाब्या आणि दुसऱ्याचा कारटा' ही एकांगी दृष्टि पत्करून, म्हणजे आपल्या समाजांतील दोषांकडे डोळेझांक करून, आमची आर्य-संस्कृति तेवढी पायाशुद्ध आणि पाश्चात्यांची शास्त्रीय-प्रगति केवळ दिखाऊ व बेगडी स्वरूपाची, असें प्रतिपादन करणारे पुष्कळ. परंतु आपल्यांतील वाढत्या दुहीचें, निरुत्साहाचें, आळशी दैववादाचें, सार्वत्रिक परावलंबीपणाचें व तदंगभूत एकंदर समाजाच्या निष्क्रिय दुबळेपणाचें खरें कारण निराग्रह बुद्धीनें शोधूं लागल्यास आपल्याला आपल्या गुणावगुणांची एक भली जंगी याद तयार करावी लागेल. माझे मतें आपला हा सर्व बाजूंनीं मागसलेला हीन दीन समाज सुधारलेल्या जगांतील आधिभौतिक उत्कर्षाच्या शिखरावर विराजमान झालेल्या राष्ट्रांच्या पंगतीला आणून बसवावयाचा असेल आणि चालू शतकांतील तीव्रतर जीवनकलहांत परदेशीय व परधर्मीय समाजबांधवांशीं बरोबरीच्या नात्यानें टक्कर देण्याचें सामर्थ्य त्याचे अंगीं उत्पन्न करावयाचें असेल तर त्याला सु-शिक्षणाशिवाय दुसरा उपाय नाहीं. आज नाहीं उद्यां, समाज सचेतन किंवा जागृत होणार तर तो फक्त सु-शिक्षणानेंच होणार. 'सुशिक्षण' म्हणजे नुसती साक्षरता नव्हे. ज्या योगानें मनुष्य प्राण्याच्या विचारशक्तीला एकाएकीं चालना मिळून रुढिग्रस्त कोत्या कल्पनांचीं बंधनें झुगारून देऊन स्वतःच्या सर्वांगिक उन्नतीसाठीं त्याचे डोक्यांत प्रगतिपर विचारांचें काहूर उठतें, इतकेंच नव्हे तर ज्या योगानें त्याचें मन सुसंस्कृत, बुद्धि प्रगल्भ, दृष्टि व्यापक व मतें उदार बनून कोणत्याहि विषयाचें सर्व-संप्रदाय-स्वतंत्र व चौकस बुद्धीनें अध्ययन करण्यास तो समर्थ होतो तेंच खरेंखुरें 'सु-शिक्षण' होय.

या विसाव्या शतकांत एकंदर मानवजातीचें ऐहिक कल्याण किंवा सुखमय सुस्थिति अर्वाचीन विद्याभिवृद्धीवर व शास्त्रीय प्रगतीवरच अखेर अवलंबून असल्यामुळें आपल्या समाजाला सुद्धां पाश्चिमात्य संस्कृतीच अभ्युदयकर व निःश्रेयस्कर होय ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. अर्थात् आपल्या राज्य-

कर्त्यांचे अंगांतील कोणते गुण आपले ठिकाणीं नाहींत त्याची योग्य शहानिशा करून त्यांपैकीं ठळक ठळक गुणांचें महत्त्व आपल्या देशबांधवांचे मनांवर बिंबवून आपणहि ते हरघडी कृतींत उतरविण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. एरव्हीं आपली स्वराज्य-विषयक पात्रता सिद्ध होणार नाहीं. अशा ज्या कांहीं विशिष्ट गुणांचा अभाव गेलीं शें-दीडशें वर्षे एकछत्री इंग्रजी राज्यसत्ते-खालीं घालवून देखील अद्याप आपल्या सभोंवार दृष्टोत्पत्तीस येतो ते म्हटले म्हणजे:—( १ ) स्वच्छता, ( २ ) सचोटी, ( ३ ) शील, ( ४ ) शिस्त, ( ५ ) शिष्टाचार, ( ६ ) शिक्षण वगैरे, वगैरे.

वरील यादींत ‘ उद्योग ’ हा गुण मुद्दाम होऊनच वगळला आहे. कारण पारतंत्र्याखालील वाढत्या दारिद्र्यामुळें आळशासारखें घरीं स्वस्थ बसून पोट भरणें आतां जवळ जवळ दुरापास्त झाल्यामुळें वहुतेकांचे पाठीमागें स्वतःचा व कुटुंबांतील एकंदर मंडळींचा चरितार्थ चालविण्यासाठीं कांहींना कांहीं तरी अपरिहार्य उद्योग हा लागलेलाच असतो. परंतु औद्योगिक उत्कर्षाला प्राणभूत असलेले धाडस, चिकाटी, स्वच्छता, टापटीप, सचोटी या सारखे व याच मालिकेंतल्या इतर सद्गुणाचें योग्य संगोपन किंवा संवर्धन झाल्याखेरीज आप-ल्या राष्ट्राच्या भाग्योदयास बराच कालावधि लागेल. स्वतःचे घरांत काय, दुका-नांत काय किंवा शहरांत काय आपण जर अत्यंत गलिच्छ व घाणेरडेपणानें वागत जाऊं तर इन्फ्लुएन्झा, न्युमोनिआ, डेंग्यु, प्लेग, कॉलरा वगैरे सारख्या भयंकर साथींचा दरसाल आलटून पालटून प्रादुर्भाव होऊन आपल्याच सामा-जिक संघशक्तीस ओहोटी लागेल; व आपली भावी प्रजा कालांतरानें क्षीणतर होत जाईल हें वेगळें सांगावयास नको. घरांतील केरकचरा गोळा करून तो माडीवरून भर रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्याचे नेमका डोक्यांत पडेल अशा रीतीनें फेकूं नये, पान-तंबाखूचा बार भरून स्टेशन्–प्लॅटफॉर्मवर किंवा आग-गाडीचे डब्यांत पिचक्या टाकून घाण करूं नये वगैरे साध्या गोष्टीहि आमचे लोकांस अद्याप पाट्या लावून शिकवाव्या लागतात हें आश्चर्य नव्हे काय? तात्पर्य, सुप्रजाजननशास्त्र, शिशुसंगोपनशास्त्र व आरोग्यशास्त्रदृष्ट्या जे जे नियम किंवा निर्बन्ध मानव जातीनें पाळणें आवश्यक आहे त्यांचें महत्त्व इकडील

अशिक्षित समाजाला समजावून देऊन प्रसंगविशेषीं आपल्या परंपरागत जुन्या चालीरीतींच्या व आचारविचारांच्या थोडेफार आड येत असले तरी ते जेणेंकरून शक्य तेवढे आचरणांत आणले जातील अशा यशस्वी रीतीनें त्यांचा बहुजनसमाजांत प्रसार करण्यासाठीं ठिकठिकाणीं 'समाज-सेवा-संघ' स्थापन होऊन त्यांचे मार्फत खेडयापाडयांत फिरत्या प्रचारकांची योजना झाली पाहिजे. हिंदुस्थान देशांत आज हे काम 'सर्वभूतहिते रत' असे कांहीं विश्वकुटुंबी, कनवाळू मिशनरी लोक करीत आहेत. या मिशनरी संस्थांमार्फत रोगराईचे दिवसांत गोरगरिबांसाठीं औषधोपचाराचीहि सोय केली जाते. दिवसभर घराबाहेर काबाडकष्ट करून पोट भरणाऱ्या आपल्या दीन-दुबळया देशबांधवांना अज्ञानाच्या खोल गर्तेतून वर काढून मनुष्यत्वाचे कोटींत आणण्यासाठीं परकी व परधर्मी लोकांनीं भगीरथ प्रयत्न करावे; व आपण शहरांतील लोकांनीं त्याबद्दल उदासीन, बेफिकीर व तटस्थ रहावें ही केवढी शरमेची गोष्ट !

'सचोटी' हा गुण असा आहे कीं, यावरच व्यक्तीची किंवा व्यक्तिसमूहाची पत म्हणजे खरी किंमत अवलंबून असते. व्यवहारांत प्रामाणिकपणा किंवा शहाजोगपणा या सारखा दुसरा स्पृहणीय लौकिक नाहीं. किंबहुना यांतच भावी चिरस्थायी राष्ट्रोन्नतीचें बीज आहे. प्राचीनकाळीं सचोटीबद्दल आपल्या हिंदुस्थान देशाची ख्याति होती अशी साक्ष इतिहास देतो. अद्यापिहि खेडेगावांतील कुणबी, शेतकरी वगैरे अडाणी लोकांत लबाडीचा व्यवहार फार विरळा. लबाडी फक्त शहरांतील सुशिक्षितांचा व अर्धशिक्षितांचा आश्रय करून आहे; व तिचा प्रसार होण्यास लांचलुचपतीचें माहेरघर अशी इंग्रजी शासनपद्धतिच प्रायः कारणीभूत झाली असें म्हणणें भाग पडतें. पूर्वी केव्हांहि कोर्टांत पाय न ठेविलेल्या शुद्ध व सात्त्विक वृत्तीच्या कोणाहि पापभीरु अनुदारे-सद्गृहस्थानें आपलेकडील मामलेदार किंवा मुन्सफ-कचेरींत सहजगत्या दोन तास घालवावेत म्हणजे वरील विधानाची सत्यता त्याचे तावडतोब प्रत्ययास येईल. शहरांतील बहुजनसमाज अ-प्रामाणिक किंवा लबाड बनण्यास पांढर-पेशा वकीलवर्ग कारणीभूत झाला किंवा काय न कळे ! तें कांहींहि असो पण प्रत्यक्ष महात्मागांधींसारख्या फकिरी बाण्याच्या असामान्य सत्पुरु-

ग्राने आपल्या तेजस्वी वाणीनें वकिली-पेशास बेधडक वेश्यावृत्तीची उपमा दिली येवढें मात्र खरें ! राजा हरिश्चन्द्रासारखे सत्यनिष्ठ व सत्त्वशील पुरुष अलिकडील कालांत विरळा, पण रामशास्त्री प्रभुण्यांसारखे निःस्पृह व बाणेदार न्यायाधीश तर त्याहूनहि फार विरळा. गवळी रतिबाचे दुधांत नागझरीचें पाणी मिसळतो, वाणी सरकीच्या तेलाची किंवा अशुद्ध चरबीची भेसळ करून मग तें वाशेळें तूप गिऱ्हाइकाचे गळ्यांत बांधतो किंवा छापखानेवाला प्रकाशकानें विश्वासानें सोपविलेल्या पुस्तकाच्या बिन बोलतां एक हजाराचे ऐवजीं दीडहजार प्रति छापून विकतो. या किरकोळ लबाड्या ( विश्वासघात म्हटल्यास उगाच कोणास राग यावयाचा ) व्यवहारांत राजरोसपणें हरघडी होतच असतात. परंतु जेथें जेथें पैसा-अडका, धन-दौलत, घर-दार, मालमत्ता वगैरे स्थावर-जंगम मिळकती संबंधाचे, म्हणजे प्रापंचिक स्वार्थ साधण्यासारखे, भानगडींचे प्रश्न उपस्थित होतात तेथें तेथें तर बेइमानपणाची व लबाड्यांची पराकाष्ठा होत असते. कुटुंबांतील कर्ता पुरुष आटोपला व वारस कायदेशीर दृष्ट्या अज्ञान ठरत असला कीं लागलीच मुनीम किंवा कोठावळा शेषाधिकारी बनतो व वारस सज्ञान ठरेपर्यंत मयताच्या बहुतेक इस्टेटीचें खोबरें होतें. बरें, वारसानें कोर्टाची पायरी चढून न्याय मिळविण्याची धडपड करावी तर तेथेंहि मृत्युपत्र, दत्तविधान, इस्टेटीचें वांटण वगैरे प्रकरणांतून वादी, प्रतिवादींचे दोघांचेही बाजूनें प्रतिज्ञेवर देवाशपथ खरें सांगणारे साक्षीदार पैशा पांसरी सांपडतात; व अखेर दरखास्त, कैफीयत वगैरे शब्द-जालमय कर्मकटकटींत सांपडून केस पांढरे होण्याची वेळ येते. प्रामाणिकपणाच्या कसोटीचा प्रसंग आयुष्यांत प्रत्येकावर केव्हांना केव्हां तरी येतोच येतो. त्यांतहि वर्गवारी करून श्रेष्ठ दर्जाचा प्रामाणिकपणा कोणता, कनिष्ठ दर्जाचा कोणता हें सहजगत्या ठरवितां येतें. समजा कीं, ‘ अ ’ व ‘ ब ’ हे दोन असामी एका मोठ्या उद्योग-धंद्यांत समाईक भागीदार आहेत. पैकीं ‘ अ ’ ला ‘ क ’ ‘ ख ’ ‘ ग ’ वगैरे कांहीं मुलें आहेत. व्यवस्था-पत्र वगैरे कांहींएक मागें न टेवतां ‘ अ ’ हा एकाएकीं मयत झाला तर ‘ ब ’ नें त्याचे पश्चात् कसें वागावें ? ‘ अ ’ ची पोरें काळीं असोत वा गोरीं असोत, अज्ञान असोत वा सज्ञान असोत, काटकसरी असोत वा

उधळपट्टी करणारीं असोत, हुषार असोत वा भोळसर असोत, तींच त्याची कायदेशीर वारस असल्यामुळें आपल्या सदसद्विवेक–बुद्धीला जागून 'ब' नें तावडतोब 'अ' च्या हिश्शाचे पैसे त्यांना सारखे वांटून देणें हें त्याचें पहिलें अपरिहार्य कर्तव्य होय ही गोष्ट निर्विवाद आहे. तसें त्यानें न केलें तर त्याला नीतिशास्त्रदृष्ट्या सच्चा किंवा नेकीनें वागणारा असें कदापिहि म्हणतां यावयाचें नाहीं. उलटपक्षीं जर 'ब' हा कावेबाजपणानें 'दाणे टाकून कोंबडे झुंजविण्याची' मुत्सद्दिगिरी लढवून 'अ' च्या मुलांमध्यें निष्कारण तंटे लावून देईल तर त्याच्या धूर्तपणाबद्दल जग त्याची व्यवहारदक्ष म्हणून कितीहि तारीफ करो, पण परमेश्वरी न्यायासनासमोर तो लुच्चाच ठरणार. अशा स्थितींत 'अ' चीं मुलें जाणतीं होऊन शोध काढीत काढीत पैसे मागावयास येण्यापूर्वींच 'ब' नें आपण होऊन 'अ' मयत झाल्याबरोबर त्याचे घरीं समाचारास जाऊन उभयतांचे दरम्यान पूर्वीं झालेल्या व्यवहाराची सार्वंत हकिगत त्याचे मुलामाणसांना नीट समजावून सांगून योग्य मुदतींत बिनतक्रार 'अ' चा हिस्सा 'अ' च्या घरीं पोहोंचता केला तर पुढें जरी आपआपसांत भांडणें होऊन 'अ' चीं मुलें कोर्टांत गेलीं तरी 'ब' चा प्रामाणिकपणा कोणत्याहि न्यायकोर्टासमोर अव्वलपासून अखेरपर्यंत पहिल्या दर्जाचाच ठरणार. असो.

आज आपल्या देशांत अशी स्थिति आहे कीं, जो उठतो तो नेमका स्वराज्यावर व्याख्यानें देत सुटतो. कारण तोंडाची वाफ दवडणें ही गोष्ट फार सोपी आहे. वास्तविक पहातां स्वराज्याचा प्रश्न हा सामुदायिक दुःखपरिमार्जनाचा म्हणजे समस्त हिंदी देशबांधवांच्या तक्रारींची दाद लावून घेण्यासंबंधींचा असल्यामुळें माझे मतें, प्रत्येक व्यक्तीनें देशोद्धाराचें महत्कार्य शिरावर घेण्यापूर्वीं आत्मोद्धाराची परीक्षा पास झाल्याचें सर्टिफिकेट प्रथम मिळविलें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जो व्यक्तिशः स्वःतचे बाबतींत होणाऱ्या सामाजिक किंवा कौटुंबिक जुलमाचा प्रतिकार करण्यास किंवा अन्यायाची दाद लावून घेण्यास असमर्थ त्यानें स्वराज्याच्या वायफळ गप्पा कशाला माराव्या ? कारण तो सार्वजनिक कार्यांतहि तितकाच नालायक ठरणार! घरचा कारभार नीट पाहतां येईना मग लष्कराच्या भाकरी भाजण्याची उठाठेव पाहिजे कशाला ?

तात्पर्य, आपल्या पायाखालीं काय जळतें हें प्रत्येकानें अगोदर पाहिलें पाहिजे. दाखलाच द्यावयाचा म्हटल्यास कलियुगांतील जीवन-कलह हा आगगाडीच्या प्रवासांतील कोलाहला सारखा आहे. आगगाडीनें प्रवास करतांना जर तुम्ही आपले डब्यांतील एकून एक सर्व उतारूंच्या सामानसुमानाची व सुखसोईची काळजी अगोदर वहाल तर तुमचें स्वतःचें सामानसुमान केव्हां चोरीस जाईल याचा तर नेम नाहींच नाहीं; पण तुम्हाला स्वतःला त्या डब्यांत धडपणें बसावयासहि जागा मिळण्याची मारामार पडेल ! यापेक्षां प्रत्येकानें स्वतःची ट्रंक व वळकटी संभाळली म्हणजे कोणाचीच चोजवस्त चोरीस जावयाची भीति नाहीं. याच न्यायानें समाजांतील प्रत्येय घटकावयवानें स्वतःचें हिताहित कशांत आहे इकडे दृष्टि देऊन आत्मोन्नतीप्रीत्यर्थ पराकाष्ठेची धडपड सुरू केली कीं, आपोआपच हां हां म्हणतां सर्व समाज स्वराज्यास लायक होईल. या दृष्टीनें मुंबईतील पारशी समाजाची ज्ञातिविषयक कामगिरी खरोखरच नमुनेदार व प्रशंसनीय होय.

'शील' हा शब्द या लेखांत सद्वर्तन किंवा निर्व्यसनीपणा या अर्थानें वापरला आहे. चहापान, धूम्रपान या सारखीं किरकोळ अपायकारक व्यसनें बाजूस ठेविलीं तरी दारूबाजी, वेश्यागमन, जुगार, शर्यती या सारखीं शारीरिक, आर्थिक, मानसिक व नैतिक अधःपातास एकसमयावच्छेदेंकरून कारणीभूत होणारीं अत्यंत घातुक व्यसनें समाजांत राजरोसपणें वावरत आहेत इतकेंच नव्हे तर परकीय राज्यकर्त्यांकडून तिकडे जाणून बुजून कानाडोळाहि होत आहे. नुकताच प्रसिद्ध झालेला मुंबईच्या वेश्याव्यापारप्रतिबंधक कमिटीचा रिपोर्ट वाचून पाहिला कीं, अंगावर कांटा उभा राहतो. दारुबाजीनें तर आपल्या समाजांतील अस्पृश्य व मागासलेल्या लोकांना, तसेंच गिरण्यांतील मजूर, हमाल वगैरे रोजंदारीवर चरितार्थ चालविणाऱ्या लोकांना, आतां पक्कें निगरगट्ट व लाचार बनविलें आहे. उत्पन्नाची बाब म्हणून सरकारची फूस व पोलिस खात्याचा पूर्ण पाठिंबा; तेथें पुढाऱ्यांचें किंवा ग्रामपंचायतीचें काय चालणार ! अशा या असह्य स्थितींत परमेश्वराची करुणा भाकण्याखेरीज दुसरा इलाज नाहीं. व्यसनातिरेकानें समाजांत ज बारीक सारीक गुन्हे घडून येतात ते बाजूस ठेवले तरी अठराविश्वे दारिद्र्यामुळें किंवा कनक-कांतादि मोहपाशांत गुरफटून चोऱ्या, मारा-

माऱ्या, खून, दरोडे वगैरे जे ठळक फौजदारी गुन्हे प्रत्यहीं घडून येतात त्यांचेंहि प्रमाण हिंदुस्थानांत फार मोठें आहे. हिंदुस्थानांतील गुन्हेगार जातींची मोजदाद करून त्यांनां निढळच्या घामानें पैसा मिळवून चरितार्थ चालविण्यास शिकवून सन्मार्गाकडे प्रवृत्त करणारा असा एखादा लोकोत्तर सामर्थ्यवान् महात्मा आपल्या मातृभूमींत निपजेल काय ? कारण बदफैली मनुष्यांपासून उपदंशासारखे, तर निर्ढावलेल्या बदमाषांपासून गुन्हेगारीसारखे, भयंकर संसर्गजन्य रोग समाजांत चोहींकडे फैलावतात. एका बाजूनें या गुन्हेगार जाति व दुसऱ्या बाजूनें धष्टपुष्ट निरुद्योगी भिक्षेकरी यांचे कात्रींत सांपडून समाजास खरोखरच ' त्राहि भगवान् ' म्हणण्याची पाळी आली आहे. धर्माचे नांवाखालों हिंदुस्थानांत चांगले दीडदोन कोट भिक्षेकरी क्षेत्रांतील अन्नछत्रांतुन फुकट खाऊन धर्मशाळांतून पडून आहेत. श्रीमंत लोकाचा धर्मादाय पैसा अशा रीतीनें अनाठायीं खर्चीं पडतो आणि त्यामुळें मध्यम स्थितींतील गृहस्थाश्रमी लोकांना घरकामालाहि गडी–मनुष्य मिळावयाची पंचाइत पडते. ' काशीसे आया हुं, और रामेश्वरकू जाता हूं ' येवढें म्हटलें कीं मग तो गोसावी केवढा कां गलेलठ्ठ असेना त्याला कोठें ना कोठें तरी मूठभर चावल व चार दोन आणे सहजगत्या मिळतात. भूतदयेस व दानधर्मास खरोखर पात्र असलेल्या आपद्ग्रस्त आंधळ्यापांगळ्यांचें व एकंदर समाजाचें या रामदासी, तेलंगी, गोसावी बैरागी, वगैरे तोतया भिक्षेकऱ्यांपासुन संरक्षण करावयाचें असेल तर इंग्लंडांत सोळाव्या शतकाचे उत्तरार्धांत म्हणजे इलिजाबेथ राणीचे कारकीर्दींत, गोर-गरिबांच्या पोटा-पाण्याचे कायदे ( Poor Laws ) या नांवानें पुढें इतिहासप्रसिद्ध झालेले, जे चार पांच ठळक कायदे पास करून घेण्यांत आले त्यांची अम्मलबजावणी हिंदुस्थानांतहि सुरू करून तिकडील इ. स. १८३४ च्या कायद्याबरहुकूम इकडेहि जिल्हा–निहाय ' अनाथ-पंगु गृहें ' व बेरोजगारी लोकांसाठों ' उद्योग-भवनें ' सरकारी खर्चानें स्थापन झालीं पाहिजेत. हिंदुस्थान-सरकारनें हें परोपकाराचें महत्कार्य शिरावर घेत-ल्यास मोठमोठ्या व्यापारी शहरांतील दानशूर धनिक लोक या कार्यास आप-खुषीनें यथाशक्ति द्रव्यसाहाय्य करण्यास केव्हांहि मागें पुढें पाहणार नाहींत अशी आमची मनोदेवता आम्हांस ग्वाही देते. कारण आजपर्यंत हरएक भूत-

दयेच्या प्रसंगीं हिंदुस्थाननें मोठ्या हौसेनें, मनोभावानें व अहमहमिकेनें मदत केलीं आहे याची साक्ष आजचा ' जपान-रिलीफ-फंड ' हि देऊं शकेल.

हातीं घेतलेलें कोणतेहि कार्य यशस्वी रीतीनें पार पाडण्यास जो सुव्यवस्थितपणा, पद्धतशीरपणा व वक्तशीरपणा लागतो त्यास ' शिस्त ' असें म्हणतात. हरएक बाबतींतील आमच्या लोकांचा कारभार कल्पनातीत ढिला व दिरंगाईचा असतो. उदाहरणार्थ भोजनास आमंत्रण असावयाचें अकराचें आणि पंगत बसावयाची दोन वाजून गेल्यावर ! जणूं इतरांच्या वेळेला मोलच नाहीं म्हणून त्यांना तिष्ठत ठेवावयाचें ! टापटीप किंवा शिस्त अंगीं येण्यास लष्करी शिक्षणाची फार आवश्यकता असते. आज हें लष्करी-शिक्षण आम्हास दुर्मिळ असलें तरी प्रत्येकानें फक्त स्वतःपुरतें मनावर घेतल्यास कित्येक पिढ्यांच्या भरमसाट व बेताल वागणुकीनें हिंदी समाजाचे माथीं कायमचा मारला गेलेला हा गैरशिस्तपणा ( Indian Regularity ) चा लांछनास्पद डाग बराचसा धुवून निघेल. निदान तसा प्रयत्न करून पाहणें तरी आपले हातचें आहे यांत शंका नाहीं.

' शिष्टाचार ' म्हणजे घरांत अगर घराबाहेर खाजगी किंवा सार्वजनिक ठिकाणीं, दुसऱ्यास उपसर्ग न पोहोंचेल अशी सभ्यपणाची वागणूक होय. शिस्त व शिष्टाचार हे दोन गुण असे आहेत कीं, नुसत्या शिक्षणानें ते अंगीं बाणत नाहींत. शाळा कॉलेजांतील वसतिगृहांतून विद्यार्थ्यांवर ते महत्प्रयासानें लादावे लागतात. उदाहरणार्थ पुणें हें महाराष्ट्रांतील शिक्षणाचें केन्द्र मानलें जातें, व तें रास्तहि आहे. पण प्रत्यक्ष या पुण्यांत जाहीर सभांतून व इतरत्र विद्यार्थ्यांची वागणूक किती चटोर व उच्छृंखलपणाची असते बरें ? सायंकाळीं क्वचित सहल करण्यास बाहेर पडावें तो कॉलेजिएट् प्रौढ विद्यार्थ्यांच्या टोळ्या बेफाम अस्ताव्यस्तपणानें, हंसत खिदळत, शक्य तेवढा गोंगाट करीत, चकाट्या पिटीत व सार्वजनिक विषयांचा मोठमोठ्यानें काथ्याकूट करीत रस्त्यानें बेदरकार बेपर्वाईनें स्वैर-विहार करतांना दृष्टीस पडतात. जणूं सार्वजनिक रस्ता म्हणजे कॉलेजचा डिबेटिंग-हॉलच होय. हें वर्णन पुष्कळांना आवडणार नाहीं; परंतु वस्तु-

स्थितीचें यथार्थ दिग्दर्शन करणें क्रमप्राप्त झाल्यामुळें आमचा नाइलाज' आहे. पाश्चिमात्य देशांतून लक्षावधि लोकांच्या सभा व संमेलनें सुव्यवस्थित रीतीनें पार पडतात; व सभा बरखास्त झाल्याचें जाहीर होतांक्षणींच पांच मिनिटांचे आंत मुंग्यांचे रांगेप्रमाणें यत्किंचित्‌हि गर्दी किंवा गोंगाट न करतां येवढा मोठा प्रचंड समाज बिनबोभाट सभागृह खालीं करतो. नुसत्या शिक्षणानें किंवा सुधारणेनें ही गोष्ट घडून येणें शक्य नाहीं. तर हे सद्‌गुण कित्येक पिढ्यांच्या पुण्याईचें, परिश्रमाचें, निदिध्यासाचें व जोपासनेचें फळ होय. आमचेकडे पहावें तों, सभेस चार दोन हजारांपेक्षां समाज अधिक नसतांही वक्त्याचें भाषण शांत चित्तानें ऐकून घेण्यापेक्षां शक्य तर त्याची टवाळी करून सभा उधळून लावण्याकडेच जमलेल्या लोकांची प्रवृत्ति अधिक. याला म्हणावें तरी काय हेंच समजत नाहीं. हें काय आमच्या स्वराज्याच्या लायकीचें लक्षण ? असो.

कोळसा उगाळावा तितका तो काळाच निघावयाचा म्हणून अधिक दोषाविष्करण करून कालाचा अपव्यय करण्यांत फारसें हंशील नाहीं. वरील सर्व विवेचनावरून लोकांच्या पुढाऱ्यांनी नुसत्या स्वराज्याची हाकाटी करण्याचे अगोदर सार्वत्रिक समाज-सुधारणेचे प्रयत्न हिंदुस्थानांत केवढ्या मोठ्या प्रमाणावर सुरू करावयास पाहिजेत हें वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. समाज-सुधारणा हें राजकीय चळवळीचें एक प्रधान अंग, व राष्ट्रोन्नतीचा केवळ पायाच होय. ही समाज-सुधारणा सु—शिक्षणाच्या प्रसारावांचून होणें दुरापास्त आहे. 'सु—शिक्षण' म्हणजे काय याची व्याख्या वर एके ठिकाणीं दिलीच आहे. सु–शिक्षण म्हणजे नुसती साक्षरताहि नव्हे वा सोवळें बौद्धिक शिक्षणहि नव्हे. त्यापेक्षां अधिक व्यापक दृष्टीनें शिक्षणाचा प्रसार समाजांत झाला पाहिजे. आज आपल्यापैकीं ज्यांना ज्यांना आपण सुशिक्षित म्हणतों ते खरे सुशिक्षित नव्हत. ते फक्त बौद्धिक कसरत करून वितंडवाद करण्यांत पटाईत झालेले वेदाभ्यासजड असे निर्भेळ तर्कटी लोक होत. त्यांचे सर्व कार्यक्रम लोकहितदृष्ट्या अखेर अव्यवहार्य अतएव टाकाऊच ठरणार. कौन्सिलांत जाऊं इच्छिणारे काय किंवा कौन्सिलाबाहेर राहूं इच्छिणारे काय जोंपर्यंत 'स्वराज्य' 'स्वराज्य' अशा कोरड्या कंठशोषापलीकडे दोघांचीहि मजल जात नाहीं तोंपर्यंत बहुजन-

समाजानें तिकडे फारसें लक्ष देण्याचें कारण नाहीं. आजमितीला समाजाला जर कशाची अत्यंत निकड असेल तर ती शिक्षणविषयक विधायक कामगिरीचीच होय. आणि जोंपर्यंत देशांतील एकहि पक्ष आपल्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून मुलामुलींच्या सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणास अनुलक्षून बहुजनसमाजास तात्काळ पटेल अशी एखादी कामचलाऊ, सुटसुटित व निर्दोष योजना पुढें मांडीत नाहीं तोंपर्यंत स्वराज्य व सद्यःस्थितीवर व्याख्यानें ऐकून ऐकून कान किटलेल्या लोकांचा 'सर्व-पक्ष स्वतंत्र—पक्ष' किंवा 'तटस्थ-पक्ष' ह्राच देशांत बहुसंख्याक पक्ष राहणार ही गोष्ट निर्विवाद आहे.

सध्याचें युग हें मनुष्याच्या सर्वगुणसंपन्नतेवरून किंवा कार्यक्षमतेवरून त्याची योग्यता ठरविणारें आहे. जो न्याय व्यक्तीस लागू तोच राष्ट्रालाहि लागू पडत असल्यामुळें जें राष्ट्र स्वतःच्या दीर्घोद्योगानें आत्मोद्धार करून घेऊन जगांत आपली जगण्याची लायकी सिद्ध करून दाखविणार नाहीं ते लवकरच रसातळास पोहोंचेल म्हणून खास समजावें. इंग्रजींत ज्याला 'survival of the fittest' चा न्याय म्हणतात त्याची कसोटी स्वतःस लावून जपान, टर्की, इजिप्त, आयर्लेन्ड वगैरे जिवंत राष्ट्रांचे अत्यंत स्फूर्तिदायक इतिहास सतत डोळ्यांपुढें ठेवून आणि 'उद्धरेदात्मनाऽत्मानम्' या प्रत्यक्ष भगवंतांनीं सांगून ठेविलेल्या रामबाण उपायाचा अवलंब करून समाज-सुधारणेच्या शाश्वत पायावर उभारलेली हिंदवी स्वराज्याची लायकी जगाचे नजरेस आपली आपणच हरप्रयत्नानें भरवून दिली पाहिजे. ही सर्व पूर्वतयारी अर्थातच झपाट्यानें पण निकोप अशीच झाली पाहिजे आणि त्याप्रीत्यर्थ देशांत 'न भूतो न भविष्यति' अशी चळवळहि झाली पाहिजे. परंतु स्वराज्य-विषयक लायकीच्या रोखानें चालू केलेली ही आमची प्रगतिपर पूर्वतयारी परिणामोन्मुख किंवा परिपक्व होण्याचे अगोदरच उतावळे-पणानें 'स्वराज्य' 'स्वराज्य' म्हणून निरर्थक कंठशोष केल्यानें लोक-कल्याण कांहीचेंही न साधतां हकनाहक आत्मवंचना मात्र पदरांत पडून जगांत हंसें करून घेतल्यासारखें होईल. आणि यदा कदाचित् स्वराज्याचे संपूर्ण हक्क मागतां-क्षणींच मिळाले ( ते मिळणार नाहींत ही गोष्ट अलाहिदा आहे ) तरी ते उपभोगण्याची खरी पात्रता अद्याप अंगीं यावयाची असल्यामुळें तत्पूर्वी बळेंच

ओढवलेली ही जबाबदारी परिणामीं सुखावह होणार नाहीं. पूर्वींचे काळीं मुलीला लवकर ऋतुप्राप्ति व्हावी या हेतूनें कित्येक आयाबाया त्यांना रुचकर परंतु प्रकृतीस ऊष्ण असे पदार्थ बुद्धिपुरःसर खाऊं घालीत असें सांगतात. स्वराज्याचे बाबतींतहि कांहींसे तशाच प्रकारचे प्रयत्न आमचे कडील उतावळा पक्ष समाजावर करीत असतो. परंतु अवेळीं प्रौढपणा आलेल्या मुलीचा संसार पुढें लवकरच बाळंतरोग लागून जसा क्षणिक होतो तद्वतच आमची खरी पात्रता नसतां केवळ यदृच्छेनें चालून आलेलें 'स्वराज्य' म्हणजे पुनश्च पारतंत्र्य-प्रवेशाला आमंत्रणच होय.

---

# माझी निराशा.

—:o:—

(ज्ञा. प्र. पुरवणी ता. १३-१०-१९२३)

[ महात्मा गांधींसारख्या असामान्य विभूतींनाहि 'आशा आणि निराशा' यांमधील मानसिक आंदोलनाचें आत्मवृत्तपर शब्दचित्र रेखाटण्याचा मोह प्रसंगविशेषीं आवरत नाहीं, मग इतरे जनांची काय कथा ? ]

गेला सर्व हुरूप, ओसरुनि ये वृद्धीवरी झांपडें ।
आतां मी जगलों कशास न कळे, हृद्रोग चित्ता जडे,
व्यावें अल्प समाज-कार्य स्वशिरीं, राहे मनीषा दुरी,
आहे एकुलती दयाघन प्रभो ! ती पूर्ण हो सत्वरी ॥

श्री. ब. टिळक.

---

# एका असामान्य चित्रकाराचा गुणगौरव.

———:o:———

( मासिक मनोरंजन वर्ष ३१ वें, अंक ५ वा नव्हेंबर १९१५ )

लेखक—श्रीयुत **श्रीधर बळवंत टिळक**, पुणें.

"No true painter ever speaks, or ever has spoken much of his art. The greatest speaks nothing"

*John Ruskin.*

"To have produced works of genius, and to find them neglected or treated with scorn, is one of the heaviest trials of human patience."

*William Hazlitt.*

स्वच्छ व शीतल धाराजल हेंच ज्याचें जीवन असा छायाप्रधान वृक्ष अवर्षणकाळीं वठत जावा तद्वत् स्वातंत्र्य नष्ट झालें कीं देशांतील उद्योगधंदे हळूहळू खालावत जाऊन कोळी, कोष्टी, रंगारी वगैरे कामगारवर्ग भिकेस लागतो, इतकेंच नव्हे तर ललितकलाहि लुप्तप्राय होऊन कवि, चितारी, शिल्पकार वगैरे कल्पक कारागीर दिवसेंदिवस दुर्मिळ होतात. अशा या अवनत काळीं जीवनकलहाच्या धकाबुकीनें गांजलेल्या, सर्वस्वी परावलंबी व क्वचित् व्यसनाधीन देशबांधवांतून एखाद्यानें एका विशिष्ट मार्गानें कालक्रमण करतां करतां कांहीं तडफ किंवा चमक दाखविली तर त्याचें गुणवर्णन व कार्यविवेचन योग्य शब्दांत विशद करून आपली गुणग्राहकता कृतज्ञतापूर्वक व्यक्त करणें हें केवळ कर्तव्यच नव्हे तर त्याच्या ऋणांतून अंशतः मुक्त होण्याचें उत्कृष्ट साधन होय. 'कला ही प्रतिभेवर अवलंबून आहे आणि प्रतिभा ही अभ्याससाध्य नसून जन्मसिद्ध देणगी असल्यामुळें तिचा उत्कर्ष मानवी प्रयत्नांच्या आधीन नाहीं,' असा एका नामांकित अमेरिकन चित्रकाराचा अभिप्राय आहे. हें मत ग्राह्य मानल्यास,

देश स्वतंत्र असो वा परतंत्र असो, जोपर्यंत आपल्या देशांत बुद्धिमान, कर्तबगार व कल्पक नररत्नें निपजत आहेत तोपर्यंत तरी आपणांस निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. फार काय या प्रश्नाचा स्थल, काल, इत्यादि तात्कालिक परिस्थितीपासून अलिप्त ह्मणजे केवळ शास्त्रीय दृष्ट्याच विचार करावयाचा म्हटलें तरी देखील कला ही संस्कृतीशीं इतकी निगडित आहे कीं, 'जेथें जेथें कलेचा ऱ्हास तेथें तेथें सामाजिक अधःपात व जेथें जेथें कलेचा उत्कर्ष तेथें तेथें सामाजिक सुस्थिति' या ऐतिहासिक सत्याकडे डोळेझांक करून चालावयाचें नाहीं. किंबहुना आपल्या देशांत खरे कुशल व कल्पक कारागीर किती आणि निव्वळ बडबडे किंवा बढाईखोर लोक किती या सरळ सवालाचे रोखठोक जबाबावरच कांहीं अंशीं राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न अवलंबून आहे. 'खरा प्रतिभासंपन्न व गुणी चित्रकार हा प्रायः मितभाषणी असतो. त्याचें प्रत्यक्ष कार्य हाच त्याचा गुणगौरव; तेंच त्याच्या गुणोत्कर्षाचें खरें माहेरघर. नुसत्या तर्कटीपणानें किंवा बोलघेवडेपणानें कार्यसिद्धी होत नसते,' असें मोठें मार्मिक वर्णन रसिकवर्य रस्किननें एके ठिकाणीं दिलें आहे. आपल्याकडेहि जवळ जवळ याच अर्थाची एक म्हण आहे कीं, केवळ दुसऱ्याची कुचेष्टा केल्यानें स्वतःची प्रतिष्ठा वाढत नसते. तात्पर्य, ज्याच्या त्याच्या अंतःस्थ योग्यतेवरच त्याचा नांवलौकिक अवलंबून असतो.

आज वरील प्रकारच्या विचारांचें काहूर डोक्यांत उसळून येण्याचें कारण आपल्या महाराष्ट्रासच नव्हे तर अखिल भारतवर्षास ललामभूत, चित्रकलाभिज्ञ लोकांस पूज्य व परिचित, आणि आर्टस्कूलमधील विद्यार्थ्यांस केवळ आदर्शवत् अशा एका नामांकित चित्रकाराचा अकाली मृत्यु होय. श्रीयुत शांताराम पुरुषोत्तम आगासकर यांना शुक्रवार ता. १८ सप्टेंबर १९२५ रोजीं दुपारीं मुंबईतील त्यांच्या रहाते घरीं वयाचे त्रेपन्नावे वर्षी एकाएकीं देवाज्ञा झाली ! श्रीयुत आगास्कर यांची चित्रकला मासिक मनोरंजनच्या जुन्या वाचकवर्गास अपरिचित असण्याचे कारण नाहीं. केवळ मनोरंजनांतच नव्हे तर मुंबईतील नवयुग, उद्यान वगैरे मासिकांतून व इतरत्रहि त्यांचीं अनेक सुंदर चित्रें वेळोवेळीं प्रसिद्ध झालेलीं आहेत. उषास्वप्न, प्रियपत्रिका, पायघडी, अग्निशुद्धि, सीताराम, भस्मा-

सुरमोहिनी, भारतीय युद्ध इत्यादि त्यांच्या शेकडों चित्रांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी नयनमनोहर चित्रावर क्षणभर नजर खिळून चित्रकाराच्या अत्यंत सफाईदार व निर्दोष कामगिरीबद्दल धन्योद्गार अनेकांचे मुखांतून केव्हांना केव्हांतरी नकळत निघून गेलेच असतील अशी आमची खात्री आहे.

श्रीयुत आगास्कर यांचा जन्म मे १८७३ सालीं झाला. त्यांचे वडील भावनगर संस्थानांत हेड ड्राफ्टस्मन होते. वडिलांचे मृत्यूनंतर दोन वर्षांनीं ह्मणजे १८९० सालीं श्री. आगास्कर यांनीं मुंबईस येऊन आर्टस्कूलमध्यें आपलें नांव दाखल केलें. लहानपणापासुनच मनाचा कल चित्रें रेखाटण्याकडे विशेष असल्यामुळें पुढें लवकरच त्यांनीं चित्रकलेंत चांगलें प्रावीण्य मिळविलें, व १८९७ पासून बॉम्बे 'स्कूल ऑफ आर्टस्' मध्यें मास्तरची नोकरी पत्करली. तेव्हांपासून जवळजवळ तीस वर्षें हीच सरकारी नोकरी, अर्थात आपल्या अत्यंत आवडीचा विषय विद्यार्थीवर्गास मनोभावानें शिकविण्याची हौसेची कामगिरी, त्यांनीं अगदीं अखेरपर्यंत अव्याहत चालू ठेविली होती. एवढ्या अवधींत त्यांचे हाताखालीं शिकून आर्टस्कूलमधून यशस्वी होऊन बाहेर पडलेले व योगक्षेम चालण्यासाठीं ड्रॉइंगमास्तरचा पेशा पत्करल्यामुळें अखिल महाराष्ट्रभर जिल्हानिहाय पसरलेले शेकडो नवे जुने विद्यार्थी आगास्कर मास्तरांचे ठायीं वसत असलेली आदरबुद्धि सध्यां एकमुखानें व्यक्त करीत असुन आपल्या गुरूच्या चित्रकलानैपुण्याची मार्मिकपणें चिकित्सा व तारीफ करीत आहेत. यावरून एवढी गोष्ट सिद्ध होते कीं, त्यांची जागा भरून काढील असा त्यांच्याच तोडीचा दुसरा अनुभवी लायक व निष्णात मास्तर आर्ट–स्कूलला त्यांचे पश्चात् आतां एकदम मिळणें दुरापास्त होय. तथापि श्रीयुत आगास्कर यांच्या मृत्यूमुळें केवळ बॉम्बे आर्टस्कूलचा एक हुषार मास्तर गमावला येवढेंच नव्हे तर हिंदी चित्रकलेचा एक कट्टा पुरस्कर्ता व मुंबई इलाख्यांतील एक नामांकित चित्रकार नाहींसा झाल्यामुळें महाराष्ट्राचें आज अपरिमित नुकसान झालेलें आहे. गेल्या २०–२५ वर्षांत प्रांतानिहाय मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली, सिमला, लखनौ वगैरे ठिकाणीं भरविण्यांत आलेल्या बहुतेक सर्व मोठमोठ्या चित्रकला-प्रदर्शनांतून जेव्हां जेव्हां श्री. आगास्कर यांनीं आपलें काम पाठविलें

तेव्हां तेव्हां त्यांना पहिल्या प्रतीचीं सुवर्णपदकें, प्रशंसापत्रकें व कित्येक ठिकाणीं रोख बक्षिसेंहि मिळत गेलीं आहेत. तसेंच हिंदुस्थानांत कोठेंहि राजेरजवाड्यांकडून अगर सरकारी खात्याकडून कांहीं "फाईन–आर्ट" बाबत काम निघालें कीं त्या कामगिरीवर पाठविल्या जाणाऱ्या मंडळींत श्रीयुत आगास्कर यांची नेमणूक हटकून व्हावयाचीच. बॉम्बे आर्टस्कूलवर वेळोवेळीं प्रिन्सिपॉल होऊन आलेले सर्व युरोपियन चित्रकार श्री. आगास्कर यांना फार चहात असत व विलायतेस परत जातेवेळीं त्यांचेकडून आग्रहपूर्वक करवून घेतलेलीं कित्येक कामें मोठ्या हौशीनें बरोबर घेऊन जात. असें सांगतात कीं, 'मोटेचें पाणी' नांवाचें श्रीयुत आगास्कर यांचें एक तैलचित्र युरोपियन लोकांस इतकें आवडलें कीं, त्यांनीं तावडतोब त्या चित्राबरहुकूम तीन नकला त्यांचे कडून मुद्दाम तयार करवून घेऊन विलायतेस नेल्या. अशा या गुणी चित्रकाराच्या चित्रकलेचें चीज या विसाव्या शतकाचे प्रारंभीं हिंदुस्थानांत काय झालें हा विचार मनात आला कीं मन उद्विग्न होतें. विलायतेंत एखाद्या अमीर-उमरावाचे मालकीची खासगी 'आर्ट–गॅलरी' प्रसंगविशेषीं लिलावास निघाली तर त्यांतील जुन्या नामांकित चित्रकारांच्या दुर्मिळ चित्रांस लक्षावधि पौंडांनीं किंमत येते. आज आमचेकडे श्री० आगास्कर यांचे हातचीं रफ स्केचेस् व डिझाइन्स् कित्येकांचे घरीं धूळ खात पडलीं असतील. कारण आमच्या समाजांत ललितकलेची अभिरुचि अद्याप जागृत व्हावयाची आहे. परंतु आमचा असा पूर्ण भरंवसा आहे कीं, श्रीयुत आगास्कर यांच्या चित्रकलाचातुर्याची खरी पारख व प्रशंसा ज्या घटकेस सुरू होईल त्या घटकेपासून त्यांच्या चित्रांच्या संशोधनास, संग्रहास व वर्गीकरणास जारीनें सुरुवात होऊन रसिकजनांच्या त्यावर उड्या पडतील.

पुरुषासारखा पुरुष, स्त्रीसारखी स्त्री, घोड्यासारखा घोडा किंवा डोंगरासारखा डोंगर काढणें हें तर चित्रकाराचें-कर्तव्यच होय. तेहि धडपणे येत नसेल तर तो चित्रकार कसला? निसर्गाच्या नियमांचें उल्लंघन न करतां सृष्टिसौंदर्याचें प्रामाणिक दृश्य आपल्या चित्रकलेंत प्रतिबिंबित करण्याची जबाबदारी सर्व चित्रकारांवर सारखीच आहे. परंतु जे याहीपेक्षां श्रेष्ठ दर्जाचे चित्रकार त्यांनां स्थल, काल, प्रसंग, रिवाज, संस्कृति एति-

न्हासिक परंपरा वगैरे वस्तुस्थितीशीं आपलीं चित्रें विसंगत न दिसावीं ह्मणूनहि बरेच प्रयास पडतात. या कामीं त्यांच्या हस्तकौशल्यास अंतर्यामींच्या चंचल मनोविकारांची व सहजस्फूर्तींची पूर्ण मदत असते. तात्पर्य, कवीप्रमाणें चित्रकारहि सहृदय, प्रतिभासंपन्न व भावनाप्रधान असावा लागतो. उदाहरणार्थ, देवादिकांचीं पौराणिक चित्रें काढतांना त्यांच्या चर्येवर दैवी ऐश्वर्य दाखविलें पाहिजे, रंगेल विलासीपणाची झांक उपयोगी नाहीं. देवतांच्या स्वर्गीय पातिव्रत्याची छटा पाहिजे, नटवा नखरेबाजपणा उपयोगी नाहीं. रामायणकालीन आयोध्या नगरीच्या देखाव्यांत ' हॉर्नबी रोड'च्या दुतर्फा दिसणाऱ्या इमारती काढून चालणार नाहीं; आणि कण्वमुनीच्या तपोवनांत आश्रममृगांच्या सहवासांत वाढलेल्या अव्याज मनोहर शकुंतलेच्या भोंवती बकुल, कदम्बादि वनवृक्ष आणि नवमालिका, वनज्योत्स्नादि फुलवेलींच्या ऐवजीं झिनिया, कॉसमॉस, अस्टर वगैरे फुलांचे ताटवे किंवा फ्रेन्सच्या अगर जिरेनियमच्या कुंडया काढून भागणार नाहीं. सारांश, कोणताहि कृत्रिम नाटकी अभिनिवेश कीं ज्या योगानें आर्यसंस्कृतीशीं निगडित अशा आमच्या मूलभूत धार्मिक मनोभावनांस जबरदस्त धक्का बसेल, ती चित्रकला मायावी होय. कित्येकांच्या मतें प्रस्तुतच्या पौराणिक चलत चित्रपटांच्या प्रत्यहीं बदलणाऱ्या भपकेदार देखाव्या पुढें खऱ्या चिरस्थायी चित्रकलेची अभिरुचि समाजांत कमी होत जाऊन कालांतरानें तिची प्रगति खुंटली जाण्याची भीति आहे. परंतु या प्रश्नाचें उत्तर ' आर्टस्कूल ' मध्ये कोणत्या दर्जाच्या विद्यार्थ्यांचा भरणा अधिक होतो यावर अवलंबून आहे. नाटकाचे पडदे रंगविण्यापलीकडे ज्यांचा कांहीं उपयोग नाहीं असे केवळ पोटार्थी, धंदेच्छु विद्यार्थी किती, स्वयंस्फूर्तीनें आलेले हौशी विद्यार्थी किती, स्वतःस एक कला जास्त अवगत व्हावी या महत्वाकांक्षेनें चित्रकलेचा अभ्यास करणारे किती आणि सच्छील, सुसंस्कृत, स्वावलंबी, व स्वतंत्र बाण्याचे विद्यार्थी किती याची प्रथम छाननी झाली पाहिजे. आर्टस्कूलच्या अभ्यासक्रमांतच संस्कृत काव्य व नाट्यवाङ्मयाचें, तसेंच रामायण, महाभारतादि पुराण ग्रंथांतील सुरस आख्यानांचें चित्रकलेच्या दृष्टीनें फार मार्मिक परिशीलन, विद्वान व रसिक पंडितांच्या हाताखालीं झालें पाहिजे. विक्रमोर्वशीय, शाकुंतल, माल-

तीमाधव, उत्तरराम वगैरे नाटकांतून जागोजाग असे कित्येक हृदयंगम व रमणीय प्रसंग आढळतात कीं, ज्यांचीं कविकल्पनेशीं हुबेहुब जुळणारीं व पूर्ण समाधानकारक अशीं चित्रे अद्याप अस्तित्वांत यावयाचीं आहेत. वस्तुस्थितीशीं तंतोतंत साम्य ज्यांत दृष्टोत्पत्तीस येतें तीच चित्रकला शाश्वत टिकणारी होय. श्रीयुत आगास्कर यांच्या चित्रकलेंत हा गुण विशेष वाखाणण्यासारखा होता असें तज्ज्ञांचें मत आहे.

कोणत्याहि एका अत्युच्च शिखरास पोहोंचलेला मनुष्य प्रायः एकाकी बनतो. आणि या स्वभावदोषाचा अतिरेक झाला कीं अघोर परिणामी व्यसनत्रयीपैकीं एखाद्या व्यसनांत तो सहजगत्या गुरफटला जाऊन नैतिक अधःपातास सुरवात होते. अत्यंत कर्तबगार व कुशाग्र बुद्धीची माणसें क्वचित् प्रसंगीं व्यसनाधीन आढळतात त्याचें कारण हेंच होय. महाराष्ट्राचे दुर्दैवानें श्री. आगास्कर यांनां आपल्या जीवनचरित्राच्या उत्तरार्धांत 'एकच प्याला 'चें व्यसन जडलें; व त्यामुळें त्यांची मुळची निकोप व सुदृढ शरीरप्रकृति हळू हळू ढासळत जाऊन त्यांतच त्यांचा अंत झाला. तथापि 'गुणाः पूजास्थानम्' या न्यायानें गुणी जनांच्या चरित्रांचें विहंगमावलोकन करतांना अनुदार अशा दोषैकदृष्टीस दिसणाऱ्या त्यांच्या वैगुण्याकडे व कमकुवतपणाकडे डोळे झांक करून फक्त त्यांच्या कार्यवैशिष्ट्याचें स्वारस्य यथामति विशद करून मांडणें हाच मार्ग जगांत सर्वत्र शिष्टसंमत असल्यामुळें श्री. आगास्कर याचा आवडीचा विषय जो 'चित्रकला' त्यांत त्यांनीं कोणतें ध्येय स्वतःचें डोळ्यापुढें ठेविलें, एका विवक्षित दिशेनें प्रयत्नांची पराकाष्ठा करून केवढी प्रगति केली व त्यांच्या यशस्वी चित्रकलेच्या अंतर्यामींचें खरें मर्म किंवा इंगित काय याचें त्रोटक विवेचन करणें हेंच आपलें आजचें कर्तव्य होय. श्री. आगास्कर हे प्लॅस्टरवर रिलीफचीं व मॉडेलिंगचीं कामेंहि उठावदार करीत. कारण "पोर्ट्रेटपेन्टिंग" मध्यें त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. आणि ज्याला एकदां व्यक्तिमात्रांच्या भिन्न भिन्न तोंडवळ्यांची किंवा मुद्राभिनयाची यथार्थ ओळख पटली त्याला त्या त्या चेहऱ्याची प्रतिकृति कॅन्व्हसवर काय किंवा प्लॅस्टरवर काय, हुबेहूब साधलीच पाहिजे असा चित्रकलेचा सामान्य नियम आहे. श्री. आगास्कर यांनीं आतां--

पर्यंत शेंकडों लोकांचीं पेन्टिंग्स् तयार करून दिलीं असून त्यांच्या प्रत्येक पेन्टिंगमधील व्यक्तीच्या चर्येवर एक प्रकारचा जिवंतपणाचा तजेला दृष्टोत्पत्तीस येतो. मुंबईतील कित्येक होतकरू स्कल्प्टर्सना त्यांचे कामांत वेळोवेळीं मदत करून श्री. आगास्कर हे उत्तेजन देण्यास नेहमीं तयार असत व श्री. आगास्कर यांचे पसंतीस येईपर्यंत आपलें काम कोठेंतरी सदोष व अपुरें राहिलें असावें अशी उलटपक्षीं त्यांच्याहि मनाची खात्री असे. श्रीयुत आगास्कर यांच्या एकंदर कामगिरीचा विचार करतां त्यांनीं रेखाटलेल्या चित्रांतील स्त्री-पुरुषांचे आकृतींतून जो एक प्रकारचा सतेज मोहकपणा व प्रमाणबद्ध भरदार बांधेसूदपणा दिसून येतो तोच त्यांच्या चित्रकलेंतील विशेष होय. त्यांनीं रंगविलेल्या सृष्टिविषयक देखाव्यांतून सर्वत्र नैसर्गिक सौंदर्य रेखाटलेलें दिसुन येतें; कोठें कृत्रिमपणाचा लवलेशहि सांपडत नाहीं. याचें कारण प्रत्येक ऋतूंत क्षणोक्षणीं पालटत जाणाऱ्या सृष्टींतील नितांत रम्य घडामोडींकडे त्यांचें बारकाईनें लक्ष असून सृष्टिनिरीक्षणावरच त्यांनीं आपल्या चित्रकलेची सर्व उभारणी केली होती. पुण्यांत भारतीय युद्धप्रसंगाचें चित्र रंगविण्यास आले असतां एके दिवशीं ते सहज म्हणाले, " रस्त्यानें जातांना हल्लीं माझें सर्व लक्ष्य जाणाऱ्या येणाऱ्या घोड्यांनीं वेधलेलें असतें. त्याखेरीज अर्जुनाचा वेगवान रथ मला कसा साधेल ? " या एकाच गोष्टीवरून हातीं घेतलेलें काम पुरें होईपर्यंत ध्यानीं, मनीं, स्वप्नीं एकसारखा त्याचाच निदिध्यास लागून त्या कामाशीं त्यांचें किती तादात्म्य होत असे हें सिद्ध होतें.

श्रीयुत आगास्कर यांचा व आमचा संबंध अगदीं अलीकडे म्हणजे मे १९२३ मध्यें आला. कै. लोकमान्य टिळकांच्या सुप्रसिद्ध 'गीतारहस्य' ग्रंथाचे नवीन आवृत्तींत भारतीय युद्धप्रसंगाचें जें एक अत्यंत स्फूर्तिदायक व उठावदार रंगित चित्र घातलें आहे, तें श्री. आगास्कर यांच्याच चित्रकलेचें दृश्य फल होय. संगीत मानापमान नाटकांतील रणभीरु लक्ष्मीधराप्रमाणें हातांतील सर्व शस्त्रास्त्रें फेकून देऊन स्वकर्तव्यापासून पराङ्मुख होत्सात्या दुर्बलहृदयी अर्जुनाचें चित्र भगवद्गीतेंत घालण्याचा आजपर्यंतचा प्रघात असे. तशा प्रकारचीं सर्व चित्रें अर्थातच ' युद्ध करावें कीं न करावें ? ' या आपत्तींत सांपडलेल्या अर्जुनाची

पहिल्या अध्यायाचे अखेरीस जी विषण्ण मनःस्थिति वर्णिलेली आहे तिची उत्कृष्ट द्योतक होत. परंतु गीतेच्या उपक्रमोपसंहारावरून जो तात्पर्यनिर्णय लो. टिळकांनी गीतारहस्यांत सोपपत्तिक सिद्ध केला आहे, त्यावरून पाहतां गीता-धर्माचें सांगोपांग विवेचन करून अखेर भगवंतांनीं आपल्या प्रोत्साहनपर उप-देशानें अर्जुनास युद्धास प्रवृत्त केलें ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट दिसते. लोक-मान्यांच्या मनांतून गीतारहस्यांत भक्त–भगवंतांचें जें एक चित्र घालावयाचें होतें तें याचेंच द्योतक म्हणजे प्रवृत्तिपर किंवा उठावणीचें होय. हेतु हा कीं, भगवंतांनीं सांगितलेल्या गीताधर्माचा अखेर अर्जुनाचे मनावर प्रत्यक्ष परिणाम काय झाला हें नुसत्या चित्राकडे पाहूनच वाचकांच्या चटकन लक्षांत यावें. या अनुरोधानें लो. टिळकांनीं अनेकांपाशीं वेळोवेळीं बोलून दाखविलेल्या त्यांच्या उपरिनिर्दिष्ट कल्पनेस साजेसें असें योग्य चित्र त्यांचे पश्चात् आतां कोणाकडून तयार करवून घ्यावें अशा विवंचनेंत आमचे वडील बंधु असतां कित्येक तज्ज्ञ लोकांकडून श्री. आगासकर यांचें नांव सुचविण्यांत आलें. त्या बरोबर मुंबईत श्री. आगासकर यांची गांठ घेऊन, उन्हाळ्याचे सुट्टीनिमित्त महिनाभर आर्टस्कूल बंद असतें त्या अवधींत म्हणजे मे १९२३ मध्यें, त्यांना पुण्यास आणवून कुरुक्षेत्रावरील श्रीकृष्णार्जुन–रथाचें हें प्रेक्षणीय चित्र त्यांचेकडून त्यांनीं मोठ्या परिश्रमपूर्वक तयार करवून घेतलें. एका दुचाकी रथांत धनुष्य सज्ज करून उभा ठाकलेला भव्य, तेजःपुंज व पिळदार बांध्याचा उत्कंठित अर्जुन, त्याच्याच पुढें बसून एकाग्र चित्तानें सारथ्य करणारे रश्मिसंयमन कुशल भगवान् श्रीकृष्ण, व शत्रुसैन्याचे रोखानें अनिरुद्ध गतीनें दौडत जाणारे चार शुभ्र, पवनचपल, बेभान घोडे असा हा कुरुक्षेत्रावरील श्रीकृष्णार्जुन–रथाचा मनो-वेधक देखावा पाहून कोणाच्या मनोवृत्ति क्षणभर उचंबळणार नाहींत ? चित्रा-कडे नुसती नजर फेकण्याचा अवकाश कीं ग्रंथाचा सारांश प्रत्यक्ष चित्र बोलूं लागतें. यांतच चित्रकाराचें खरें कौशल्य आहे. अशा चित्रांच्या खालीं खुलाशा-साठीं शब्दांत स्पष्टीकरण घालण्याचा किंवा त्यावर भाष्य लिहीत बसण्याचा खटाटोप हवा कशाला ? उत्तम चित्रकाराची कामगिरी ही एक मूर्तिमंत दृक्-प्रत्ययाची बाब होय. तिला वेगडी शिफारसीची मुळींच अपेक्षा नसते.

श्रीयुत आगास्कर यांचे हातचें शेवटचें काम म्हणजे त्यांनीं आमच्या घरासाठीं तयार करून दिलेलें कै० लोकमान्य टिळकांचें लाईफ्-साईज ऑईल-पेन्टिंग होय. जून १९२३ चे प्रारंभीं पुण्याहून मुंबईस परत गेल्यानंतर एक वर्षाचे आंतच त्यांची प्रिय पत्नी स्वर्गवासी झाली. कौटुंबिक आपत्तीच्या घाल्यामुळें आर्ट-स्कूलची नोकरी नियमित होईना म्हणून रिटायर होऊन पेन्शन घ्यावी कीं काय अशा विचारांत ते असतां त्यांच्यावरहि अनपेक्षित काळाची झडप पडली. तथापि कै० लो० टिळकांच्या तैल-चित्राची ऑर्डर चालू सालच्या प्रारंभीं आम्ही नक्की केल्यामुळें वेळांत वेळ काढून हें काम करून देण्याचें श्रीयुत आगास्कर यांनीं मोठ्या आनंदानें पत्करलें व मृत्यूपूर्वी अवघा एकच महिना त्यांनीं तें पुरेंहि करून दिलें. हें तैल-चित्र घरीं घेऊन येण्यासाठीं गेल्या गणेश-चतुर्थीचे सुमारास आमचे वडील बंधु मुंबईस त्यांच्या घरीं गेले असतां ते म्हणाले, " माझें हें बहुधा शेवटचेंच काम. तथापि माझ्या हातून अखेरची सेवा लोकमान्यांची व्हावी हें माझें केवढें भाग्य ! गीतारहस्यांतील चित्रामुळें त्या ग्रंथाबरोबर माझें नांव अमर राहील." पेन्शन मिळाली कीं, उरलेलें आयुष्य केडगांवीं नारायणमहाराजांचे सेवेंत घालवावयाचें असा विचार मनात चालू असतां त्यांना पोटदुखीचा व अतिसाराचा विकार जडला व अखेर त्यांतच त्यांचा अंत झाला. त्यांचे हातचें शेवटचें काम, कै० लोकमान्य टिळकांचें तैलचित्र, सध्यां आमच्या घरीं असून हें इतकें अप्रतिम साधलें आहे कीं, त्याचें वर्णन शब्दांत काय सांगावें ? प्रत्यक्ष पाहिल्यानेंच कोणाचीहि खात्री पटेल. विशेषतः ज्या चित्रकारानें सरकारी नोकरीच्या भगभगींत लो. टिळकांना प्रत्यक्ष असें ओझरतेंहि कधीं पाहिलें नव्हतें, त्यानें त्यांचें इतकें हुबेहुब चित्र रेखाटावें हें जेवढें भूषणावह तेवढेंच विस्मयकारक होय यांत संशय नाहीं. राजा रविवर्म्यानंतर नांव घेण्या-सारखे फारच थोडे हिंदी चित्रकार महाराष्ट्रांत उदयास आले. त्यांपैकीं श्रीयुत धुरंधर व श्रीयुत आगास्कर ही जोडी सुप्रसिद्ध आहे. श्री. आगास्कर यांच्या चित्रकलेस आतां यापुढें आपण कायमचे मुकलों आहोंत. त्यांचे अकाली निधनामुळें महाराष्ट्रीय चित्रकलेच्या नक्षत्र-मंडळांतील एक तेजस्वी तारा तुटून पडला !

अलीकडे रंगी–बेरंगी कॅलेंडर्स, पिक्चर पोस्टकार्डें, सिनेमा पोस्टर्स वगैरे रूपानें छापून येणाऱ्या परकीय किंवा विदेशी चित्रकलेस कसा तरी झटपट हिंदी पेहराव:चढवून तसल्या निमगोऱ्या, संमिश्र व नकली निष्पत्तीवर उसनी प्रसिद्धि मिळविण्याची बऱ्याच अनुकरणशील चित्रकारांची प्रवृत्ति दिसुन येते. हिंदी चित्रकलेच्या प्रगतीचे व जोपासनेचे दृष्टीनें ही संवय अत्यंत घातुक होय. या बाबतींत श्रीयुत आगास्कर यांच्यासारख्या श्रेष्ठ व कल्पक चित्रकाराचें उदाहरण होतकरु विद्यार्थ्यांनीं आपल्या डोळ्यापुढें ठेविलें पाहिजे. नुकतेच नैनिताल आर्ट सोसायटीचे विद्यमानें कॅप्टन् ग्लॅडस्टन् सालोमन यांचें " मुंबईकडील ललितकलेचा] कल, " या विषयावर जें एक सुश्राव्य व्याख्यान झालें त्यांत त्यांनीं असा स्पष्ट इशारा दिला आहे कीं:—

" I have no shadow of doubt that so long as Indian Artists refuse to copy the West but resolutely continue to copy Nature, they are on the right lines."

या अत्यंत निर्भीड, अधिकारयुक्त व मार्गदर्शक उपदेशाची वाचकांस आठवण करून देऊन व हिंदी चित्रकलेचा उत्तरोत्तर अभ्युदय होवो अशी त्या दयाघन प्रभूची करुणा भाकून हा लेख संपवितों.

---

श्री. आगास्कर यांचेकडून तयार करवून घेतलेलीं व या लेखांत वर उल्लेख केलेलीं दोन अप्रतिम चित्रें—' कुरुक्षेत्राची रणभूमि व लोकमान्य टिळकांचें पेन्टिंग् ' हीं आतां तीन रंगांत छापवून घेतलीं असून टिळक–बंधूंकडे विक्रीस तयार आहेत. दोन साईजः–८ इं. × १२ इं. आणि १४ इं. × २० इं. प्रतीची किंमत प्रत्येकीं अनुक्रमें ८४ व ८८ आणे.

———o———

# *कलमबहादुरीचें शेलापागोटें !

———:०:———

( ' रत्नाकर ' वर्ष १ले. अंक १० वा; आक्टोबर १९२६ )

## एक बोधप्रद विनोदी गोष्ट

[ लेखक—श्रीयुत **श्रीधर बळवंत टिळक**, पुणें. ]

शेठ कस्तुरचंद गुलाबराय हे पुण्यांतील एक सधन व्यापारी होते.। रविवारांत त्यांचा सुगंधी सामानाचा मोठा कारखाना होता. त्यांचे दुकानीं जी नोकरमंडळी कामावर होती त्यांत चिंतू नांवाचा एक ब्राह्मणाचा अनाथ व पोरका मुलगा होता. या पोराला दारोदार भिक्षा मागत फिरतांना पाहून एके दिवशीं शेठजीनां त्याची दया आली व मोठ्या कळवळीनें विचारपूस करून त्याला त्यांनीं दुकानावर लावून घेतलें. मनांत विचार असा कीं, 'ब्राह्मणाचा पोर आहे, चार घांस खाईल, पण विद्याभ्यास करून नांव काढील.' ' अज्ञातकुलशीलस्य वासो देयो न कस्यचित् '—या हितोपदेशांतील वचनाच्या सत्यतेची परीक्षा पाहण्याचाच जणुं शेठजींचा मानस असावा. शेठजींच्या उदार अंतःकरणामुळें चिंतूचें नशीव तत्काळ उघडलें. दोन वेळां त्यांचे घरीं जेवावें, सकाळीं कारखान्यांतून दुकानावर चिठ्ठीचपाटीची ने-आण करावी, दुपारीं शाळेंत जावें, संध्याकाळीं कारखान्यास सुट्टी झाल्यावर झाडलोट करून दुकानास कुलूप घालावें व रात्रीं आपला विद्याभ्यास करावा अशी चिंतूची दिनचर्या होती. चिंतूला कपडेलत्ते व शाळेची फी शेठजीच देत असत व आश्रिताप्रमाणें स्वतःचे घरींच त्याची जेवणाची व राहण्याची सोय लावून दिल्यामुळें इतर नोकरलोकांप्रमाणें वेगळा पगार असा अर्थातच चिंतूस मिळत नव्हता. ते दिवस महायुद्धाचे व तज्जन्य महर्गतेचे होते. कोणी

---

* अश्लील वाङ्मयाचा बीमोड करण्याचे हेतूनें रचलेली ही एक केवळ काल्पनिक गोष्ट आहे.—**लेखक.**

आपल्या नातेवाईकांची देखील विचारपूस करण्यास धजत नव्हता; मग गोर-गरिबांना व अनाथांना कोण विचारतो ? अशा परिस्थितींत शेठजींच्या घरीं चिंतूला आश्रय मिळावा ह्यांत त्याचें सर्वतोपरी हितच होतें. फार काय, इन्फ्लुएन्झाचे साथींत चिंतूनें बिछाना धरला त्या वेळींदेखील औषधपाण्याचा सर्व खर्च व डॉक्टरचीं बिलें शेठजींनींच भरलीं. हे उपकारांचें ओझें समरून वास्तविक पाहतां चिंतूनें नम्र व कृतज्ञपणानें पडेल तें काम करण्याची तत्परता दाखवावयास पाहिजे होती. पण जगाचा असा उलटा न्याय आहे कीं, मऊ सांपडलें म्हणजे कोपरानें खणावेंसें वाटतें. ऐतखाऊपणाची संवय जडल्यामुळें चिंतू हळुहळू उनाड व मगरूर बनत चालला. कारखान्यांतील व दुकानावरील इतर नोकरलोकांना पगार मिळतो, त्यांच्याइतकें आपणही काम करीत असून आपणाला मात्र पगार मिळत नाहीं; असें त्याच्या डोक्यानें घेतलें व एकदां पगाराचे दिवशीं चार-चौघांसमक्ष तसें त्यानें शेठजींस स्पष्ट शब्दांत बोलून दाखविण्यासही कमी केलें नाहीं. शेठजींना साहजिकच तें त्याचें बोलणें चमत्कारिक लागलें, पण त्यांनीं " तूं मॅट्रिक पास झालास म्हणजे मग तुला कारकुनाचा पगार सुरू करूं " असें आश्वासन देऊन त्याची तात्पुरती समजूत घालण्याचा यत्न केला. चिंतू त्यावेळीं सारा इंग्रजी चौथ्या इयत्तेमध्यें होता. तथापि त्याला पंख फुटूं लागले होते आणि आळशीपणाची व उनाडकीची संवय जडल्यामुळें अभ्यासावरील त्याचें चित्त उडत चाललें होतें. ' मी दुकानावर अहोरात्र बसतों म्हणूनच दुकानचा कारभार सुरळीत चालतो. मी सोडून गेलों म्हणजे शेठजींचे डोळे उघडतील. तोंपर्यंत माझी किंमत कवडीमोलच राहणार '—अशी घमेंड त्याला वाटूं लागली. पुढें हळुहळू दुकानच्या रोजच्या किरकोळ विक्रींत चार-आठ आण्यांची कसर निघूं लागली. प्रथम कांहीं दिवस कस्तुरचंद शेठजींच्या लक्षांत ही गोष्ट आली नाहीं. परंतु हिशेबांतील वाढत्या घोटाळ्यामुळें त्यांना चिंतूचा संशय येऊं लागला. त्या वर्षी चिंतू परीक्षेतही नापास झाला व त्याबद्दल शेठजींकडून त्याची चांगलीच कानउघाडणी झाली. लवकरच पुढें अशी गोष्ट घडून आली कीं, इतःपर चिंतूस सांभाळून घेणें शेठजींस अशक्य झालें. दिपवाळीच्या ऐन

विक्रीच्या दिवसांत दुकानचे फळीवर विस्मरणानें राहून गेलेले शें-दीडशें रुपयांचें नोटांचें पुडकें तेथून अचूक नाहींसें झाल्याचें शेठजींस आढळून आलें व त्यांचा चिंतुबद्दलचा संशय दृढमूल झाला. त्यामुळें रागाचे भरांत त्यांनीं त्या दिवशीं चिंतूस पोलीसचे स्वाधीन करण्याची तंबी भरली. चिंतोबा या प्रसंगाची वाटच पहात होते. त्यांनीं उलट निष्कारण चोरीचा आळ घेतल्याबद्दल शेठजींना भल-भलतें बोलून शक्य तेवढें अकांडतांडव केलें व नेसत्या धोतरानिशीं दुकानास रामराम ठोकला. कस्तुरचंदशेठजींना शेंदीडशेंची बाब म्हणजे कांहीं विशेष नव्हती. चिंतोबाची ब्याद आपण होऊनच तणतणत निघून गेल्यामुळें शेठजी पुढें पोलिसाबिलिसाचे फारसे भानगडींत पडले नाहींत. असो. स्वतःच्या कुशाग्र बुद्धिमत्तेवर, व्यावहारिकपणावर व अक्कलहुषारीवर चिंतोबांची विशेष भिस्त असल्यामुळें इतरांचे मदतीशिवाय आपण आपल्या पायावर हां हां म्हणतां उभे राहूं असा त्यांना एक प्रकारचा आत्मविश्वास होता. म्हणून आपगांस शेठजींचें दुकान आतां कायमचें पारखें झाल्याची बातमी बाजारपेठेंत फुटण्याचे आंतच एका मारवाड्याकडून झटपट तीनशें रुपये उसने काढून मिळेल तेवढ्या भांडवला-वर शेठजींशीं व्यापारांत स्पर्धा करण्याचें मनांत योजून त्याच दिवशीं चिंतो-बांनीं तुळशीबागेचे नाक्यावर एक लहानसें दुकान पंधरा-वीस रुपयांपर्यंत भाड्यानें ठरविलें व त्यावर—

## “ निशिगंध स्टोअर्स ”

[ लिमिटेड ॲन्ड रजिस्टर्ड ]

‘ येथें गुलकंद, मोरावळा, उदबत्ती, जर्दा, कातवडी, कापूर, आंवळेल तेल इ० सुगंधी सामान व अस्सल कनोजी अत्तरें विकत मिळतील’ अशी भली जंगी पाटी लटकावून दिली चिंतोबांचा हा सर्व खटाटोप कस्तुरचंद शेठजींशीं चढा-ओढ करून त्यांचा चांगला नक्षा उतरविण्यासाठीं होता हें निराळें सांगावयास नको. फक्त फरक काय तो येवढाच कीं, शेठजींचे दुकानचा बहुतेक सर्व माल त्यांच्या स्वतःच्या कारखान्यांत अत्यंत कसोशीनें तयार होत होता तर चिंतो-

यांचें व्यापारी ज्ञान घाऊक माल खरेदी करून फुटकळ विकण्यापलीकडे फारसें गेलें नव्हतें.

येणेंप्रमाणें सावकारापासून कर्जाऊ घेतलेलें बहुतेक सर्व भांडवल थोड्याच दिवसांत ' निशिगंध :स्टोअर्स ' साठीं कन्नोजहून मागविलेल्या अत्तरांच्या बुधल्यांतून गुंतून पडलें. दुकानीं चकाट्या पिटण्यास बरेच लोक जमत व अत्तराचे बोळे कानांत घालून घरीं जात. पण कोणी चार आणे चिंतोबांचे हातावर ठेवून त्यापैकीं एक मासाभर विकत घेईल तर शपथ! विक्री कांहींच होत नसल्यामुळें चिंतोबांचा सर्व वेळ दुकानांतले दुकानांत उदबत्त्यांचे पुडे पुनःपुन्हा झाडून पुसून रांगेनें डाळून ठेवण्यांत, अत्तरांच्या मोठ्या बुधल्यांतून थेंब थेंब अत्तर लहान कुप्यांतून ओतून भरून ठेवण्यांत, गुलकंदाच्या पौंड–अर्धा पौंडाच्या जस्ती डब्यांवर ' चंद्रकांत गुलकंद ' अशीं लेबलें डकविण्यांत आणि चित्ताकर्षक व चटकदार भाषेत जाहिरातींचे नाना तऱ्हेचे मसुदे लिहून काढण्यांत जात असे. शेठ कस्तुरचंद गुलाबराय यांचे दुकानची दरसाल दीपोत्सवाचे व लक्ष्मीपूजनाचे सुमारांस " **आठ आण्यांत दिवाळी** " अशी ठराविक मसुद्याची जाहिरात वर्तमानपत्रांतून गेलीं कित्येक वर्षें लागोपाठ येत असे व त्यामुळें त्यांचें गांवोगांव कायमचें गिऱ्हाईक सर्वत्र पसरलेलें होतें. चिंतोबांनीं विचार केला कीं, येत्या दिवाळींत प्रत्येक वर्तमानपत्रांत शेठजींचे जाहिरातीचे शेजारीं ' निशिगंध स्टोअर्स 'ची " पावणे आठ आण्यांत दिवाळी ! " अशी जाहिरात फडकलीच पाहिजे. म्हणून त्यांनीं दोन तीन महिने आगाऊच पुण्या-मुंबईतील झाडून सर्व वर्तमानपत्रांकडे आपली जाहिरात पाठवून देऊन शेठजींना आश्चर्यचकित करून टाकण्याचा व त्यांचेकडील पैशाचा ओघ आपलेकडे वळता करून घेण्याचा पुरा बंदोबस्त करून ठेविला होता. परंतु चिंतोबांचे कुंडलींतील ग्रहमालिका प्रतिकूल झाल्यामुळें कीं काय ऐन दिवाळींत ग्राहकांकडून ऑर्डरीच्या पत्रांचा पाऊस पडण्याऐवजीं दर डाकेला पुण्या-मुंबईपासून थेट नागपूर-वऱ्हाडापर्यंतच्या सर्व दैनिक व साप्ताहिक वृत्तपत्रांचे म्यानेजरांच्या सहीचीं जाहिरातीचीं लठ्ठ लठ्ठ बिलें मात्र ' निशिगंध स्टोअर्स'चे पत्त्यावर येऊन पडूं लागलीं आणि चिंतोबांचे डोळे पांढरे झाले. शेठजींचे

दुकानाशीं संबंध तोडल्याला आतां एक वर्ष लोटलें होतें. तरीही चिंतोबांजवळ स्वतःच्या मालकीचें असें अभिमानानें दाखविण्याजोगें कांहींएक नव्हतें. दोन वेळ पुण्यांतील मुंबई फॅशनच्या ‘दुर्वास क्षुधाशांतिगृहां’त जेवावें; रात्रीं दुकान बंद करून बाहेरच्या फळीवरच झोंपावें व पुनः पहाटे लवकर उठून प्रातर्विधि उरकून दगड हालवायाच्या सार्वजनिक हौदावर दोनचार बादल्या घाईघाईनें डोक्यावर ओतून दुकानावर येऊन बसावें; असा आमच्या चिंतोबांचा दैनिक कार्यक्रम होता. वर्तमानपत्रांतून जाहिराती देऊनही मालाची विक्री होईना त्यामुळें जाहिरातींचीच काय पण खाणावळीचीं व दुकानाचे भाडयांची बिलेंही वेळेवर चुकतीं करण्याइतके पैसे महिना अखेर शिल्लक पडेनात. आणि पडणार तरी कोठून? कारण दुकानांत बसल्या बसल्या चिंतोबांचे चार-सहा आणे पानपट्टी, बिडी मॅचेस्‌मध्यें खर्च होत व सायंकाळीं हॉटेल, सिनेमादि बाहेरख्यालीपणास सहज आठ-बारा आणे लागत. रोजचा हा असा रुपया–दीड रुपया उडविण्याची संवय लागल्यावर शिल्लक काय राहणार व बिलें थकल्याशिवाय कशीं राहतील? अशा बिकट परिस्थितींत चिंतोबांना कित्येक वेळां खाणावळींतील एकवेळच्या जेवणावरच भागवून घेणें भाग पडे. आपल्या मिळकतींत कांहीं भर पडावी असा स्तुत्य विचार करून त्यांनीं मुख्य धंद्याचे जोडीला अलीकडे कांहीं किरकोळ व्यवसाय सुरू केले होते. त्यांतील मुख्य मुख्य म्हटले म्हणजे कलकत्त्याकडील एका संशयास्पद अशा लॉईफ इन्शुअरन्स कंपनीची एजन्सी, गोव्याकडील एका लॉटरीच्या तिकिटविक्रीचें ब्रँच ऑफिस, मुंबईतील एका वेलगामी व उच्छृंखल दैनिकाचे अंक पुण्यांत विकण्याची व वांटण्याची एजन्सी तसेंच सदर दैनिकाच्या स्थानिक वातमीदाराचे जागीं बिनपगारी नेमणूक, लग्नसराईचे मोसमांत आचारी, पाणके, वाढपी, वाजंत्री, बोलावणेकरी वगैरे संच यजमानास किफायतशीर गांठून देण्याची ग्यारंटी आणि कसल्याही बऱ्यावाईट पेटंट औषधांच्या जाहिराती तुळशीबागेचे कोपऱ्यावर स्वतःचे दुकानासमोर बायका-पुरुषांत अल्प मोबदल्यावर वांटून टाकण्यांची कामगिरी इ० इ०. आणखीही एका धंद्याची किफायतशीर कल्पना चिंतोबांचे कल्पक डोक्यांत होती पण विश्वासु व लायक मदतनिसांच्या अभावीं त्यांना तो एकदम सुरू करतां येईना. परंतु पुढे लवकरच तुळशीबा-

गेचे आवारांत घुटमळणाऱ्या दोन चलाख पुणेरी उचल्यांची व चिंतोबांची गट्टी जमली व परस्परांत भागीदारीच्या अटी वगैरे ठरून दुसरे दिवसापासून—

**' येथें जुन्या छत्र्या व जोडेही विकत मिळतील '**

अशी एक पाटी इतर अनेक पाट्यांत ' निशिगंध स्टोअर्स ' चे फळीवर लागली.

चिंतोबांचे दुकानीं सकाळ–संध्याकाळ चकाट्या पिटण्यास बरीच गर्दी जमत असे ही गोष्ट वर सांगितलीच आहे. या मंडळींत वर्तमानपत्रें विकणारीं पोरें, शाळामास्तर, म्युनिसिपालिटीकडील कारकून, गुप्त पोलीस, सरकारी पेन्शनर वगैरे सर्व दर्जाच्या व सर्व पेशाच्या लोकांचा समावेश होत असल्यामुळें गांवांतील झाडून सर्व बातमी दुकानीं बसल्याबसल्याच चिंतोबांचे कानांवर येत असे. अनायासें घरबसल्या चालत आलेल्या या सर्व बाजारबातमीचे भांडवला-वर सायंकाळीं दुकान बंद केल्यावर चिंतोबा आपल्या पुण्याच्या बातमीपत्राची उभारणी करीत व स्वतःच्या पदरचें यथास्थित तिखटमिठ लावून चटकदार बनविलेलें हें बातमीपत्र रोजचे रोज डाकेनें मुंबईच्या दैनिकाचे पत्त्यावर पाठ-वून देत. मुंबईचें हें दैनिक म्हणजे टवाळी व टारगटपणाचें निव्वळ थैमान होतें. किंबहुना संपादकमहाशयांचे हातीं चिंतोबाचें बातमीपत्र म्हणजे वानराचे हातीं कोलीतच होय. चारदोन अपशब्दात्मक कुचेष्टांची अधिक भर टाकून चिंतोबाचे बातमीपत्रास संपादकीय शिव्यागाळीचे उजव्या बाजूस अचुक स्थळ मिळे. चिंतोबांना त्यांतच धन्यता वाटे व दुकानीं जम-णाऱ्या मंडळींत प्रतिपक्षास चीत करणाऱ्या आपल्या बिनतोड कलमबहादुरीचें रसभरित वर्णन करून स्वतःची पाठ स्वतःच थोपटून घेण्यांत त्यांचे तासचे तास जात. चिंतोबांचे सुगंधलोलुप आश्रयदातेही त्यांना हरभऱ्याचे झाडावर चढवि-ण्यास आपआपल्यापरी यथाशक्ति हातभार लावीत असत. अशा प्रसंगीं कोणी त्यांचें नुसत्या टाळ्या वाजवून अभिनंदन करीत तर दुसरे कोणी गौरवपर शब्दांनीं हळूच असें सुचवीत कीं, यंदाच्या साहित्य-संमेलनाचें अध्यक्षस्थान मंडित करण्यास स्वागत–मंडळास चिंतोबांपेक्षां अधिक लायक वाङ्मयसेवक कोठून मिळणार ? चिंतोबांना हेंही खरेंच वाटे, व आपल्या कलमबहादुरीचे

पराक्रमावर आपली योग्यता व लोकप्रियता अधिक वाढविण्यासाठीं आपण एक संगीत नाटक लिहिलें पाहिजे असें त्यांच्या मनानें घेतलें. हें नाटक प्रचलित राजकारणावर लिहिल्याखेरीज आपण लवकर देशभक्त होणार नाहीं असा विचार करून त्यांनीं नाटक-मंडळ्यांच्या जाहिरातीबरहुकूम भडक तीन रंगांत भल्या मोठ्या जाहिराती छापून घेऊन गांवांतील सर्व पेठांतून भिंतीवर चिकटविण्याची व्यवस्था केली. जाहिरातींतील मजकूर येणेंप्रमाणें:—

*　　*　　*　　*

येणार !　　लवकरच रंगभूमीवर　　येणार !

# संगीत नोकरशाही

लेखकः—दे. भ. **चिंतोपंत सुगंधी, पुणें.**

" अद्याप कोणत्याच कंपनीस हक्क देऊन टाकण्याचें कबूल केलें नस" त्यामुळें नाटक-मंडळयांनीं त्वरा करावी व लेखकास 'निशिगंध—स्टोअर्स'; तुळशीबागेचा नाका, पुणें या पत्त्यावर ताबडतोब भेटावें."

*　　*　　*　　*

यापूर्वी चिंतोबांनीं नाटकगृहांत स्वतःच्या पदरचे पैसे खर्च करून अनेक वेळां प्रवेश केला असला तरी दर्शनी पडद्याचे आंत शिरून स्टेजवर पाय टाकण्याची संधि अद्यापपर्यंत त्यांना मिळालेली नव्हती. आपल्या जाहिराती वाचून गांवांतील नाटक-कंपन्या आपणांस 'सन्मान-पत्रिका' पाठवून प्रत्येक खेळास आग्रहपूर्वक आमंत्रण देतील इतकेंच नव्हे तर पडद्याआड चहापाणी व फराळही उडविण्यास सांपडेल या विचारांत चिंतोबा आपल्या दुकानीं मिटक्या मारीत मार्गप्रतीक्षा करीत बसले होते. परंतु आंपली नाटक रचण्याची अपूर्व कल्पना जाहीर झाल्याला महिना दोन महिने उलटून गेले तरीदेखील नाटक-कंपन्यांतील कोणी चिटपांखरूही आपणांकडे ढुंकून पाहीना याचा चिंतोबांना मनस्वी राग आला व स्वतःचे मालकीची एक नाटक-मंडळी स्थापन करण्याचा त्यांनीं निश्चय केला. 'निशिगंध स्टोअर्स' मधील दरवळणाऱ्या सुगंधी मालावर लुब्ध होऊन अहोरात्र तेथेंच

पडून राहणाऱ्या चिंतोबांच्या रिकामटेकड्या मित्रमंडळीपैकीं प्रत्येकानें या बाबतींत त्यांना वेगवेगळी सल्ला द्यावी. कोणी म्हणे–" तुम्ही स्वतःच पुण्यांत एखादें दैनिक सुरू कां करीत नाहीं ? आपल्यासारख्या लेखनव्यवसायी लोकांस नाटकें लिहिण्यापेक्षां रोजचा वर्तमानपत्राचा धंदा केव्हांही अधिक किफायतशीर रीतीनें करतां येईल. " दुसरा सांगे–" पुण्यांतील भांग्या मारुती, उंबऱ्या गणपति, सोट्या म्हसोबा, खुन्या मुरलीधर वगैरे प्रत्येक जागृत देवस्थानाचे नाक्या नाक्यावर ' निशिगंध स्टोअर्स ' ची एक एक ब्रँच स्थापन होणें अगत्याचें आहे." तिसऱ्यानें सुचवावें–" अहो चिंतोपंत, तुम्ही निवडणुकीला उभे राहण्याचाच काय तो अवकाश, म्युनिसिपालिटींत निवडून गेलांच म्हणून समजा. तुमचेकरितां खटपट करण्यास आम्ही सर्वजण एका पायावर तयार आहोंत. मात्र एक गोष्ट लक्षांत असूं द्या, कीं जोड्यापासून रुमालापर्यंत नखशिखांत खादीचा पेहराव करावा लागेल." सर्व बाजूंनीं अशा विविध सूचनांचा वर्षाव होऊं लागला म्हणजे चिंतोपंतांना आतां मी काय करूं आणि काय नाहीं, असें होऊन जाई. थोरामोठ्यांचे भोंवती कामकाजानिमित्त किंवा एरव्हींच भेटण्यास येणाऱ्याजाणाऱ्या मंडळींचा गराडा पडतो तद्वत् चिंतोबांचे दुकानीं कांहीं मतलबी लोकांची सदासर्वकाळ रहदारी असे, आणि हें आपलें वाढतें वैभव पाहून आतां आपण खास मोठ्यांत मोडूं लागलों असा भास होऊन चिंतोबांना आकाश ठेंगणें वाटूं लागे. शेक्सपिअरनें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, " कांहीं लोकांचा मोठेपणा जन्मसिद्ध असतो, कांहीं लोक स्वतःचे कर्तबगारीवर मोठेपणा मिळवितात व कांहीं लोकांवर तत्कालीन परिस्थिति निष्कारण मोठेपणा लादीत असते. " चिंतोबांना अलीकडे असें वाटूं लागलें होतें कीं, जगांत कांहींतरी अलौकिक कार्य करून दाखविण्यासाठींच परमेश्वरानें आपणांस जन्मास घातलें असलें पाहिजे. एरव्हीं येवढी **तैलबुद्धि** व बहुश्रुतपणा आपल्याच वांट्यास येताना ! चिंतोबा असे विचारमग्न दिसूं लागले, कीं त्यांच्या मित्र-मंडळींनीं त्यांना आणखी कांहीं नव्या नव्या कल्पना सुचवाव्या. परंतु कोणत्याही कल्पक योजनेस मूर्त स्वरूप देण्याचे कामीं मुख्य अडचण कशाची असेल तर ती भांडवलाची होय हें निष्ठुर सत्य

सर्व काथ्याकूट झाल्यावर त्यांतून अखेर निष्पन्न होई व त्यामुळें चिंतोबांचे चेहऱ्यावर खिन्नतेची छाया पसरे. गेल्या वर्ष-दीड वर्षांत चिंतोबांना विनहिशेबी व्यापाराचे पायीं अनेकांचें देणें झालें होतें. विशेषतः ज्या मारवाड्याकडून मूळ भांडवल मिळालें होतें त्यानें आतां परतफेडीसाठीं फारच निकड लाविली होती. देण्यापायीं दिवसेंदिवस गांवांत उजळ माथ्यानें वावरण्याचीही चिंतोबांना चोरी वाटूं लागली. अशा विकट परिस्थितींत पुण्याहून पोबारा करण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. अखेर एके दिवशीं कोणालाही सुगावा लागूं न देतां 'निशिगंध स्टोअर्स' चा कबजा आपल्या एका भोळसट नातेवाइकाचे गळयांत टाकून स्वारीनें मुंबईचा सुप्रसिद्ध 'माधवबाग आश्रम' गांठला.

मुंबईच्या बकाली वस्तींत 'येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत्' हें चिंतोबांना माहीत असल्यामुळें तेथें आपल्या कलमबहादुरीच्या पराक्रमाची पुरी परीक्षा पाहण्याचें त्यांनीं ठरविलें आणि ज्या चटोर व शिवराळ दैनिकाचे ते पुण्याचे बातमीदार होते त्या वर्तमानपत्राचे कचेरींत जाऊन त्यांनीं संपादकाची गांठ घेतली. त्यांचेपुढें आदबीनें हात जोडून चिंतोबा म्हणाले:—"महाराज आपणांला मी गुरुस्थानीं मानीत आलों. आपणच मला वर्तमानपत्राचे धंद्यांतील श्रीगणेशा शिकविलात. मीही पण आपली इतके दिवस यथामति बिनमोबदला सेवाचाकरी केली आहे. आतां मी या धंद्यांत स्वतःची आणखी प्रगति करून घेऊं इच्छितों; व हाच हेतु मनांत बाळगून आज रोजीं मुंबईत येऊन दाखल झालों आहें. करितां या गरीब दासावर आपली मेहेरनजर असावी व शक्य तेवढी सक्रिय सहानुभूति दाखवून मला हा देशसेवेचा खडतर मार्ग सुगम करून द्यावा." स्वतःची स्तुति कोणास प्रिय वाटत नाहीं ? चिंतोबांच्या या प्रास्ताविक भाषणानें संपादकमहाशय तात्काळ खूष झाले व स्वतःची तपकिरीची डबी पुढें करून त्यांनीं चिंतोबांचें स्वागत केलें. ते म्हणाले—"मिस्टर चिंतोपंत, वर्तमानपत्राच्या धंद्यांत शिरण्याचा निश्चय व्यक्त करून आपण जी साहसप्रियता दाखविलीत त्याबद्दल मी आपलें प्रथम अभिनंदन करतों. माझे हातून होण्यासारखी सर्व मदत आपणांस मी मोठ्या आनंदानें देईन.

" शिष्यादिच्छेत् पराजयम् ' ह्यांतच भूषण मानणारांपैकीं मी एक आहें. आपल्याकरितां तूर्त मी काय करूं बोला ? " चिंतोबांनीं उत्तर दिलं, " मुंबईत छापखान्यांची सुबत्ता आहे असें ऐकतों. करितां एखाद्या सुसंपन्न छापखानेवाल्याची गांठ घालून देऊन माझे वतीनें शिफारसवजा चार शब्द टाकल्यास उपकार होतील. " हे शब्द कानीं पडतांच स्मित करून एडिटरसाहेबांनीं टांक उचलून शेजारच्या ' श्रीमहालक्ष्मी मुद्रण-मंदिरा ' चे मालकांस चिठी खरडली व चिंतोबांचे पुढें टाकली. चिठी उचलून घेऊन तिजकडे किंचित् साशंक वृत्तीनें पहात चिंतोबा तेथल्या तेथेंच आंतबाहेर घुटमळूं लागले. त्यांच्या वागणुकींतील अनिश्चितपणा लक्षांत येतांच त्यांना धीर देण्याचे हेतूनें संपादकमहाशय आपल्या अधिकारयुक्त वाणीनें म्हणाले, " बेटा चिंतोपंत, असा भिऊं नकोस. सर्व लाजलज्जा वेशीवर टांगून मगच लेखणी हातीं धरावी लागते. आपलें वर्तमानपत्र कसें काय चालेल याबद्दल तुला काळजी वाटत असल्यास येवढी एक गोष्ट नीट लक्षांत ठेव. कोणत्याही विषयासंबंधी—मग तो सामाजिक असो, धार्मिक असो, वा राजकीय असो—वादग्रस्त प्रश्न उपस्थित होऊन देशांत मतभेद माजला, कीं माझे पत्रांत मी जी बाजू मांडीन त्याच्या अगदीं उलट बाजूनें तूं लिहीत जा. असें केल्यानें एकमेकांवर खंडन-मंडनपर हल्ले-फेरहल्ले चढविण्याची संधि सांपडून जनतेची करमणूक होईल, आपल्या दोघांच्याही वर्तमानपत्रांचा खप वाढेल आणि मूळ वादाचा विषय चांगला चार सहा महिने पुरून नवीन कांहीं चर्चा करण्याजोगी गोष्ट घडून येईपर्यंत वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने अनायासें भरून काढतां येतील. मधून मधून महिना-पंधरा दिवसांनीं एखादा जादा किंवा खास अंक काढून दुप्पट किंमतीस विकीत जा म्हणजे जाहिराती भरपूर मिळून खर्चवेंच भागेल. "

हा उपदेश हृत्पटलावर कोरून हस्तांदोलनपूर्वक निरोप घेऊन आमचे चिंतोबा ' श्रीमहालक्ष्मी मुद्रण-मंदिरा ' कडे वळले व मिळालेली चिठी थेट मालकाचे हातीं नेऊन दिली. मालकानें चिठी फोडून वाचली व चिंतोबांना विचारलें, " आपणच येथील प्रसिद्ध ' संकेत ' दैनिकाचे पुण्याचे बातमीदार वाटतें ? चिठींत सर्व लिहिलेंच आहे म्हणा. आपला विचार कांहीं वाईट नाहीं.

प्रथम लहानसें सचित्र साप्ताहिक सुरू करून लोकप्रिय झाल्यास पुढें दैनिक करतां येईल. तूर्त कांहीं आठवडे आम्ही अंक मोफत छापून देऊन विक्रीसाठीं पाठवूं व कागदाचा वगैरे खर्चवेंच भागूं लागल्यावर छपाईचीं बिलें करूं. परंतु आमची खात्री आहे कीं, आपल्या सारख्या लेखनपटु संपादकाचे नेतृत्वाखालीं नुकसान येणार नाहीं. झाला तर उलट फायदाच होईल." अशा रीतीनें बराच वेळ बोलणेंचालणें होऊन धंद्याचे दृष्टीन अखेर सौदा ठरला तो असा कीं, निव्वळ नफ्यापैकीं निम्मा संपादकानें घ्यावा व निम्मा प्रकाशकानें घ्यावा. पहिल्याच मुलाखतींत कल्पनेपलीकडे जम बसल्यामुळें आमचे चिंतोबा उल्हसित अंतःकरणानें 'माधवबाग--आश्रमा' कडे परतले. परत येतां येतां त्यांचे डोक्यांत आपल्या नव्या साप्ताहिकास काय नांव द्यावें याबद्दल विचार चालू होते. अखेर त्यांनीं 'मस्करी' हें नांव मुकर केलें व माधवबाग-आश्रमांत खोली भाड्यानें घेऊन चार-आठ दिवसांत ऑफिस थाटलें. "'मस्करी'च्या जाहिराती 'संकेत'चे मुखपृष्ठावर व इतरत्र फडकूं लागल्या व माधवबाग-आश्रमाचे एका खोलीवर 'मस्करी कचेरी' अशी काळी कुळकुळीत पाटी लागली. 'मस्करी' च्या पहिल्याच अंकांतील मजकुराची मांडणी चिंतोबांच्या लेखनपटुत्वाची साक्ष देत होती. 'निशाचरांचें रहस्य', 'रंगभूमीवरील नाच-रंग', 'नखरा निरीक्षण', 'वसंतविहार', 'आघुक-माघुकांचें हितगुज', 'चांदण्यांतील थट्टा-मस्करी' इ० इ० मनोवेधक मथळ्यांखालीं सदर अंकांत निरंकुश व बेभान लेखनशैलीची नुसती कमाल करण्यांत आली होती.

'संकेत' च्या संपादकाचा गुरूपदेश तावडतोब अमलांत आणून पहिल्याच अंकापासुन चिंतोबांनीं 'संकेतकारांस जाहीर आव्हान' दिलें आणि जगाच्या अंतापर्यंत अक्षय्य टिकणाऱ्या वादविवादास 'सूत उवाच' पासुन प्रारंभ केला. ठरल्याप्रमाणें संकेतकारांनींही आव्हान स्वीकारून—

प्रहर नमय चापं प्राक्प्रहारप्रियोऽहम्

मयि तु कृतनिघातें किं विदध्याः परेण ।

अशा चढेल बेपर्वाईनें 'मस्करीची'ची टर उडविण्यास कमी केलें नाहीं. चिंतोबांनीं

खवळून जाऊन आपल्या पुढील अंकांत ' संकेत ' कारांस सतरा कॉलम उत्तर दिलें व त्यांचे वर कांहीं विनोदी हास्यचित्रेंही छापलीं. हें उत्तर म्हणजे मराठी भाषेंतील निवडक शिव्यांचा एक लहानसा कोशच होय. याप्रमाणें ' संकेत ' व ' मस्करी ' च्या लाथाळीस रंग चढूं लागल्याबरोबर मुंबईच्या मवाली लोकांत मोठी खळबळ उडून गेली व संपादकद्वयांच्या अपेक्षेप्रमाणें दोन्हीही पत्रांचा खप अमर्याद वाढला. विशेषतः ' मस्करी ' चे अंक एकदम भपकेदार रंगी-बेरंगी कागदावर सचित्र निघूं लागल्यामुळें मुंबईतील हमाल, व्हिक्टोरियावाले, हॉटेलवाले, सलूनवाले, पानपट्टीवाले, गंडेरीवाले वगैरे सर्व अल्पशिक्षित लोकांत त्याचा प्रसार झपाट्यानें होऊं लागला; व कित्येक वेश्यांनींही ' मस्करी ' ची एजन्सी पत्करली. अशा रीतीनें चिंतोबांचे वजन व दरारा मुंबईतील बकाली वस्तींत वाढूं लागल्याबरोबर त्यांनीं मवाली लोकांची अरेतुरेची अगदीं सलगीची भाषा उचलली व दर अंकांत कांहीं रकाने अत्यंत अश्लील, गलिच्छ व बीभत्स भाषेंत लिहिण्यास सुरवात केली. एकाद्या अंकांत लिहिण्यासारखें कांहीं नसलें म्हणजे कोणा-तरी अब्रूदार व संभावित सद्गृहस्थावर चिंतोबांच्या बेफाम लेखणीनें गरळ ओकावें व त्यामुळें पावसाचे दिवसांत शेजारून भरकन् गेलेल्या मोटारनें उडविलेल्या गटार-गंगेच्या पाण्याचा वर्षाव कपड्यावर झाल्याबरोबर जी चमत्कारिक मनःस्थिति होते तद्वत् खजील झाल्यासारखें होऊन त्या गृहस्थास आठवडाभर समाजांत वावरण्यास संकोच वाटावा. दुसऱ्या एखाद्या अंकांत कोणा तरी कुलीन व घरंदाज स्त्रीवर काल्पनिक प्रहसन रचून चिंतोबांनीं चटोरपणानें तिच्या निष्कलंक चारित्र्यावर शिंतोडे उडवावे. त्यापुढील अंकांत कोणा तरी दोन सुशिक्षित तरुण स्त्री-पुरुषांचीं नांवें छापून लवकरच त्यांचेसंबंधानें खळबळ उडवून देणारा ' गौप्य-स्फोट ' मस्करींत प्रसिद्ध होणार असें जाहीर करावें व ऑफिसमध्यें बसल्या बसल्या बनावट प्रेम-पत्रिका रचून तयार ठेवाव्यांत. मतलब येवढाच कीं, स्वतःची निष्कारण नाचक्की होऊं नये म्हणून ज्यांचीं ज्यांचीं नांवें जाहीर झालीं असतील त्यांनीं वेगवेगळ्या वेळीं येऊन माधवबाग आश्रमांत चिंतोबांची गांठ घ्यावी, व ' लेखणी आंवरण्यास काय घेशील ? ' असा रोकडा सवाल टाकून चिंतोबांचे तोंडावर पांचपंन्नास रुपये

फेकाव्यात. परस्पर कलागती लावून उपव्यापी लोकांसही आपले खोडसाळ हेतु तडीस नेण्यास सचित्र 'मस्करी' हें एक उत्तम साधन झालें होतें. सदू व गोंदू हे दोन खाणावळवाले शेजारीं शेजारीं असल्यास गोंदूनें आपल्या प्रतिस्पर्ध्याचीं म्हणजे सदूचीं बिंगें चिंतोबांकडे जाऊन ओकावीं, व जेणेंकरून सदूचा धंदा साफ बसेल असा मजकूर छापून प्रसिद्ध करण्यासाठीं पैसे भरून यावें. चिंतोबांनीं 'मस्करी' मध्यें सदूच्या खाणावळींतील भातभाजीवर सटीक ओवीबद्ध 'वांगीपुराण' सुरू करावें व दरम्यान कोणातरी गिऱ्हाइकाचे तोंडून सदूचे कानांवर घालावावें कीं, पुढील रविवारीं 'मस्करी'चे संपादकांस थाटाची मेजवानी दिल्यास टीका तात्काळ थंड पडेल. याप्रमाणें वादी-प्रतिवादी, फिर्यादी-आरोपी, नट व नाटककार, कवि व टीकाकार, विद्यार्थी व परीक्षक, डायरेक्टर्स व शेअरहोल्डर्स, गिरणीवाले व मजूर अशा परस्परावलम्बी लोकांकडून दोन्ही बाजूनें दक्षिणा मिळूं लागल्याबरोबर चिंतोबा वर्ष दोन वर्षांत चांगलेच गबर बनले. दरम्यान एक दोन अब्रूनुकसानीच्या फिर्यादी व अश्लील जाहिराती छापल्याबद्दलही एक खटला 'मस्करी' वर भरण्यांत आला होता. परंतु पहिल्यांत सपशेल माफी व नुकसानभरपाई आणि दुसऱ्यांत दंडासह दिलगिरी प्रदर्शित करून चिंतोबांनीं या सर्व गंडांतरांमधून युक्तीयुक्तीनें आपली सुटका करून घेतली.

इतःपर माधवबाग-आश्रमांत राहण्याची गरज नसल्यामुळें चिंतोबांनीं गिरगांव रस्त्यावर एक सबंध तीन मजली इमारत भाड्यानें घेऊन तळमजल्यावर म्यानेजरचें 'ऑफिस', पहिल्या माळयावर संपादकीय कचेरी व गच्चीवरील हवाशीर बंगल्यांत स्वतःची राहण्याची स्वतंत्र सोय लावली; व 'मस्करी' चे अंकांत आपण लवकरच 'संक्रांत' नांवाचें दैनिक सुरू करणार असल्याचें जाहीर केलें. ही समाजस्वास्थ्यावर चालून आलेली 'संक्रांत' आणखी काय काय प्रताप गाजवते याबद्दल सर्व सभ्य व सुज्ञ लोक हवालदील झाले असतां जणुं चिंतोबांच्या पापाचा घडा एकाएकीं भरत आल्यामुळेंच कीं काय त्यांना मुंबईसरकारच्या कार्यकारी कौन्सिलच्या एका नामदार सभासदावर 'मस्करी' मध्यें खरपूस तोंडसुख घेण्याची बुद्धि आठवली. चिंतोबांची ही टीका म्हणजे उकिरड्यावरील कचऱ्याचे ढिगावर चढून पौर्णिमेच्या उगवत्या

चंद्रबिंबावर हल्ला चढविण्याचें अवसान आणणाऱ्या कुत्र्याच्या भुंकण्याप्रमाणें सरसकट तुच्छ व गर्हणीय होती. ‘ मस्करी ’ चा तो अंक सरसाहेबांचे हातीं पडतांच त्यांनीं अश्लील, बीभत्स व बदनामीकारक वाङ्मयास तात्काळ आळा घालण्याचें हेतूनें एक बिलाचा मसुदा तयार केला व सरकारचे संमतीनें कायदे-कौन्सिलपुढें मांडून झटपट पास करून घेतला. त्यास अनुसरून हिंदुस्थान-सरकारनेंही मॅजिस्ट्रेट कोर्टांना या बावतींत जादा अधिकार देण्याचा स्पेशल अॅक्ट मंजूर करून गॅझेटांत प्रसिद्ध केला. या अॅक्टाखालीं मुंबईत प्रथम चिंतोबांना चतुर्भुज करण्यांत आलें व त्यांच्या ऑफिसची झडती होऊन ‘ मस्करी ’ च्या सर्व फायली जप्त करण्यांत आल्या. खटला सुरू होतांच चिंतोबांस पाहण्यास कोर्टांत बरीच गर्दी जमे. सरकारी वकिलानें ‘ मस्करी ’ च्या साडेतीन वर्षांचे फायलींतून प्रथम वीस पंचवीस निवडक उतारे कोर्टाचे नजरेस आणले. वास्तविक पाहतां निवड करण्याची कांहीं गरजच नव्हती. कारण, एखाद्या तुंबलेल्या मैलमोरीची दुर्गंधि सभोंवार पसरावी तद्वत ‘ मस्करी ’ च्या प्रत्येक अंकांतील मजकुरावरून नजर टाकून मॅजिस्ट्रेटनें नाक मुरडावें. चिंतोबांचा स्वतःचा डिफेन्स अगदीं थोडक्यांत होता. तो म्हणजे—‘ घालीन लोटांगण वंदीन चरण ’ पासून थेट ‘ रक्ष रक्ष परमेश्वर ’ पर्यंत दयेच्या याचनेचे सर्व प्रकार होत. उलट सरकारी वकिलानें जनतेच्या नैतिक इभ्रतीचे संरक्षणार्थ आरोपीस जरब बसेल अशी जास्तींत जास्त शिक्षा ठोठावण्यांत यावी अशी कोर्टास विनंति केली.

मॅजिस्ट्रेटनें निकाल सांगतांना चिंतोबांस उद्देशून पुढील उद्गार काढले—“ तूं ‘ मस्करी ’ नांवाचें एक सचित्र साप्ताहिक चालवून सुमारें साडेतीन वर्षें मुंबईत धुमाकूळ घातलास. तुझ्यासारखे बेजबाबदार लेखक म्हणजे समाजाच्या नीतिमत्तेस लागलेली कीड होय. किंबहुना समाजरूपी विराट पुरुषाच्या प्रायः निकोप देहयष्टीवर एकाएकीं उमटणारे नायटे होत. तूं आपल्या वर्तमानपत्रांत जी भाषा वापरतोस ती वाचून पाहतां कुजलेल्या कर्दमांत वळवळणाऱ्या कृमि-कीटकांहून तुझी अधिक काय किंमत आहे ? तूं जितकीं वर्षें हें भिकार वर्तमानपत्र चालविलेंस तेवढी शिक्षा तुला देणें न्यायाचें होईल. म्हणून मी तुला साडेतीन वर्षें

सक्त-मजुरी व एक हजार रुपये दंड येवढी शिक्षा सांगतों व तुरुंगावरील अधिकाऱ्यांस असें विशेष फर्मावितों कीं, या अवधींत तुरुंगांमधील........साफसुफीचें रोजचें काम तुजकडून करवून घेण्यांत यावें. तुझ्या जीवनक्रमांतील या शोकपर्यवसायी अध:पातापासुन तुजसारखे इतर पोटभरू व भाडोत्री लेखक योग्य तो धडा घेतील अशी मी आशा करतों."

शिक्षा ऐकून चिंतोबांना एकदम घेरी आल्यासारखें झालें. परंतु मॅजिस्ट्रेटसाहेबांचीं पुढचीं वाक्यें कानांवर पडतांच अत्यंत काकुळतीच्या स्वरानें चिंतोबा भर कोर्टांत ओरडूं लागले—"अहो, माझें बालपण 'निशिगंध स्टोअर्स' चालविण्यांत गेलें हो! अत्तरांच्या घमघमाटांत वाढलेला मी आतां.......... दुर्गंधी कशी हो सहन करूं? देवाशपथ माझे गांवीं मी सुगंधी होतों. वाटेल तर मला काळेपाण्यावर पाठवा, पण असली भयंकर शिक्षा देऊं नका." चिंतोबांनीं आर्तस्वरानें टाहो फोडून करुणा भाकण्यास सुरुवात केल्याबरोबर मॅजिस्ट्रेटनें रागानें डोळे मोठे करून 'जादा बात मत् करो' म्हणून दरडावलें व कोर्ट उठलें.

हा सर्व प्रकार दुसरे दिवशीं वर्तमानपत्रांतून सविस्तर प्रसिद्ध झाला. चिंतोबांनीं गुरुस्थानीं मानलेले 'संकेत' चे संपादक या खटल्याचे निकालाकडे डोळे लावून होते. कारण चिंतोबा व आपण एकाच बोटींत आहोंत अशी त्यांची अंतर्यामीं बालंबाल खात्री होती. 'मस्करी' वरील खटल्याचा निकाल ऐकून त्यांचें धाबें दणाणलें. न्यायनिष्ठुर मॅजिस्ट्रेटांस त्यांनीं मनांतले मनांत शिव्यांची लाखोली वाहिली व मागचापुढचा विचार न करितां त्याच रात्रीं 'संकेत' छापखान्यास स्वहस्तानें काडी लावून दिली. दुसरे दिवशीं सकाळीं "आमचा छापखाना काल रात्रीं एकाएकीं आग लागून जळाला; सबब आम्ही तूर्त 'संकेत' बंद केला आहे याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी" अशा आशयाच्या संक्षिप्त जाहिराती सर्वत्र वांटून टाकून 'संकेत' कारांनीं नागपूर मेल गांठली व मुंबईतून मुकाट्यानें पाय काढला. विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयंछेत्तुमसांप्रतम्—हे सुभाषित लक्षांत घेऊन त्यानीं आपला छापखाना तावडतोब विक्रावयास काढला असता तरी देखील त्यांना त्यावेळीं चांगली कमाई झाली असती. परंतु संकटसमयीं येवढें प्रसंगा-

वधान व नीतिधैर्य रहावें कसें ? असो; चिंतोबांचें पुढें काय झालें आम्हांस नक्की माहित नाहीं. कोणी म्हणतात कीं, तुरुंगांत त्यांनी स्वतःचें ' आत्मवृत्त ' लिहून काढलें असून लवकरच तें जगापुढें येण्याचा संभव आहे. ही बातमी खरी असेल तर या आत्मवृत्ताचे द्वारें चिंतोबांच्या जीवन-चरित्रांतील घडामोडींचा त्यांचेच स्वतःचे चटकदार लेखणींतून उतरलेला साद्यंत इतिहास थोड्याच दिवसांत सर्वांस उपलब्ध होऊन मराठी वाङ्मयांत अश्रुतपूर्व व बहारीची भर पडणार यांत तिळमात्र संशय नाहीं. आम्हीं आगाऊ लिहून काढलेला हा ' अल्पपरिचय ' त्याची उणीव शतांशानेंही भरून काढूं शकणार नाहीं हें आम्ही जाणतों. तथापि सदर आत्मवृत्ताचे अभावीं तूर्त तरी दुधाची तहान ताकावर भागवून घेण्याखेरीज गत्यंतर नाहीं.

प्रिय वाचक, आमची गोष्ट संपली. गोष्टीचें तात्पर्य भर्तृहरीच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास येवढेंच कीं—

" दुर्जनः परिहर्तव्यो विद्यया भूषितोऽपि सन् ।
मणिनालंकृतः सर्पः किमसौ न भयंकरः " ॥

* * * *

बरसातीचे प्रारंभीं मोठीं वादळें होतात त्यावेळीं तुफान समुद्रांत होड्या उपड्या होऊन त्यांत क्वचित् एखादा दर्यावर्दी गवसल्याचें आपण ऐकतों. परंतु, पुढील श्लोकार्धांत वर्णन केलेली Tragedy खरोखर विस्मयकारक नव्हे काय ?:—

**हलक्या कढईमध्यें हलवायाचीं बसोनि दोन मुलें ।**
**हलवूनि हलकावे खातां उलथोनि तींत सांपडले ! ॥**

प्रो० लेलेकृत

# मराठी शाकुंतलाचें परीक्षण.

——:०:——

## ( लेखकः—श्री. श्रीधर बळवंत टिळक )

( विविधवृत्त वर्ष ३, अंक ८; ता. २०—२—२७ )

लेखांक १ ला.

कविकुलगुरु कालिदासाच्या शाकुंतल नाटकाचें ज्या ज्या रसिक पंडितांनीं आपल्या विद्यार्थीदशेंत प्रथम परिशीलन केलें त्यांना त्यांना त्या घटकेपासून या रमणीय नाटकाचा आस्वाद संस्कृत न जाणणाऱ्या आपल्या बहुसंख्याक देश-बांधवांसही सुलभ व्हावा या उदात्त हेतूनें तें मातृभाषेंतून रंगविण्याची उत्कंठा मरेपर्यंत लागून राहावी हें अगदीं स्वाभाविक होय. आणि अशांची ही मनीषा शेवटीं पुरी होवो वा न होवो त्यांचें शाकुंतलावरील अलोट प्रेम व व्यासंग अखेरपर्यंत ताजा राहतो ही गोष्ट प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या मराठी शाकुंतलावरून सिद्ध होते. कारण शाकुंतल हा ग्रंथच असा बहारीचा व प्रसादपूर्ण आहे कीं, कोणत्याही मनःस्थितींत त्याचें अवलोकन वाचकांचें मन प्रसन्न व प्रफुल्लित केल्याशिवाय राहात नाहीं. म्हणूनच कीं काय प्रो. लेले शास्त्र्यांनीं 'क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः' हें यथार्थ अवतरण आपल्या मराठी शाकुंतलाच्या मुखपृष्ठावर घेतलें असावें असें वाटतें. अखिल जगाच्या वाङ्मयांतून फक्त शंभर सर्वोत्कृष्ट ग्रन्थ निवडून वेगळे काढावयाचे म्हटल्यास त्यांत कालिदासाच्या शाकुंतलास वगळून चालावयाचें नाहीं असा आपला अभिप्राय १८९५ सालीं एका पाश्चात्य पंडितानें जाहीर केला. अशा या निर्दोष व उच्च दर्जाच्या कृतीचें भाषांतर—मग तें कोणत्याही भाषेंत असो—करण्याचें जबाबदारीचें काम अंगावर घेणें किती प्रयासाचें व जोखमीचें आहे हें प्रत्येक भाषांतरकाराच्या अनुभवास यापूर्वी वेळोवेळीं आलेलें आहे. त्याचें कारण असें कीं, भाषांतर कितीही सरस झालें तरी तें मूळ कृतीच्या योग्यते*

केव्हांही चढूं शकणार नाहीं याची पूर्ण जाणीव, व त्याबरोबरच मनांत भीति अशी कीं, यदाकदाचित् आपला प्रयत्न फसला तर जगांत हंसे होईल तें कालिदासाचें नव्हे तर स्वतः भाषांतरकाराच्या उत्सर्पिणी महत्त्वाकांक्षेचें व फाजील आत्मविश्वासाचें होईल. उत्कृष्ट काव्यवाङ्मयाचें भाषांतर किंवा रूपांतर करणें म्हणजे एखादा अल्पावकाशांत आसमंतांतील वातावरणाशीं एकजीव होणारा द्रव पदार्थ एका बाटलींतून दुसऱ्या बाटलींत ओतण्यासारखें अवघड काम आहे. कारण तसें करतांना दरम्यान त्याचा कांहीं अंश खालीं जमिनीवर सांडून वांया जातो व कांहीं आपल्या दरवळणाऱ्या परिमळानें हवेंत उडून जाऊन कमी होतो. तात्पर्य, भाषांतर हें मूळ कृतीहून सरसपणांत तेवढया प्रमाणांत कमीच पडणार असें मोठें मार्मिक विवेचन डॉ. मॉनर विल्यम् यांनीं आपल्या इंग्रजी शाकुंतलाच्या प्रस्तावनेंत केलेलें आढळतें. शाकुंतल नाटकाच्या सात अंकांत मिळून सुमारें दोनशें श्लोक आहेत. एवढया काव्याचें भाषांतर करतांना समवृत्त-समश्लोकादि कृत्रिम बंधन निष्कारण स्वतःवर लादून घेऊन तेवढ्या मर्यादित रंगणांत कसरत करण्याचें ठरविल्यास रसहानि फार होईल, इतकेंच नव्हे तर आपल्या सहजसुलभ काव्यस्फूर्तीसही जखडून टाकल्यासारखें वाटून मूळांतील निसर्गरमणीयत्व वठावें तसें वटणार नाहीं हें जणूं गोडबोल्यांच्या अनुभवावरून ओळखूनच कीं काय प्रो. लेलेशास्त्र्यांनीं "समश्लोकी व समवृत्त भाषांतराची आमची प्रतिज्ञा नाहीं तथापि होतां होईल तितका मुळांतील अर्थ आणण्याचा प्रयत्न केला आहे" असा स्पष्ट खुलासा प्रस्तावनेंतच घालून टाकला आहे. परंतु येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, त्यांचें भाषांतर सुमारें तेवीस वर्षांपूर्वींच हस्तलिखित स्वरूपांत संपूर्ण तयार असून गुदस्तसालीं तें छापण्याचा योग जमून आल्यामुळें त्याला नवी प्रस्तावना आक्टोबर १९२६ मध्यें लिहून जोडावी लागली. रा. गोडबोले यांचें महाराष्ट्र शाकुंतल एक वर्ष अगोदर प्रकाशित झालें असलें तरी लेलेशास्त्र्यांचें त्यापूर्वीं किती तरी वर्षें अगोदर लिहून पडून राहिल्यामुळें खरा वडीलपणाचा मान शास्त्रीबोवांच्याच भाषांतराकडे येतो. अर्थात् 'पुढच्यास ठेंच मागचा शहाणा' हा अनुभव लेल्यांनीं गोडबोल्यांच्या अपयशावरून उचललेला नाहीं. म्हणून त्यांच्या भाषांतराचें परीक्षण करणाऱ्या चिकित्सक

टीकाकारास गोडबोल्यांच्या महाराष्ट्र-शाकुंतलाशीं यांच्या कृतीची तुलना करून पाहून गुणदोषविवेचन करण्याचें प्रयोजन राहात नाहीं. किंबहुना लेल्यांच्या प्रयत्नाची दिशा व हेतु वेगळा आणि गोडबोल्यांच्या परिश्रमाचें व करामतीचं वैशिष्ट्य वेगळें अशी वस्तुस्थिति आहे.

आपल्या या अफाट हिंदुस्थान देशांतील सर्व विद्यमान भाषांतून प्रत्येक पिढीबरोबर शाकुंतल नाटकाचीं दहापांच तरी भाषांतरें निर्माण होत जाणार व क्रमशः जुनीं झालेलीं मागें पडून स्मृतिशेष होणार. रस्किननें आपल्या एका निबंधांत वाङ्मयाची विभागणी करतांना नश्वर किंवा क्षणभंगुर वाङ्मय ( Books of the hour ) आणि शाश्वत किंवा अजरामर वाङ्मय ( Book of all time ) हें जें वर्गीकरण केलें आहे त्यापैकीं पहिल्यांत शाकुंतलाचीं बहुतेक सर्व प्राकृत भाषांतरें व दुसऱ्यांत मूळ कालिदासकृत अभिज्ञान शाकुंतलास स्थान मिळणार ही गोष्ट निर्विवाद आहे. तथापि भाषांतराची लोकप्रियता ही स्वतः भाषांतरकार ज्या दर्जाचा विद्वान्, रसिक, मर्मज्ञ व प्रतिभाशाली लेखक असेल त्यावरच अखेर अवलंबून राहणारी असल्यामुळें ज्या मानानें भाषांतर सुबोध अगर दुर्बोध झालें असेल त्या मानानें कमी अधिक कालपर्यंत तें वाङ्मयांत टिकाव धरून राहील हें निश्चित समजावें. प्रो. लेले शास्त्री प्रस्तावनेंत लिहितात कीं, " प्रस्तुत भाषांतर गद्यास गद्य व पद्यास पद्य असें केलें आहे. " यावरून कदाचित् कोणास असें वाटेल कीं, संस्कृत गद्यमय संभाषणाचें सुबोध मराठी भाषांतर काय कोणीही करील इतकें तें काम सोपें आहे. त्याला असें विशेष कौशल्य तें काय लागणार ? परंतु या बाबतींत हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, शाकुंतलांतील गद्य अगदीं साधें व सोपें असलें तरी त्यावर एका प्रतिभासंपन्न महाकवीच्या विचारसरणीचा भाषाविशिष्ट ठसा उमटलेला असल्यामुळें ' गद्यं कवीनां निकषं वदन्ति ' या उक्तीची यथार्थता लक्षांत घेतां शाकुंतलांतील गद्य झालें तरी त्याचें गोड, सुरस व सहजसुंदर संवादात्मक भाषांतर करणें हें काम वाटतें तितकें सोपें नाहीं. " साध्या भाषेंत अत्यंत उदात्त विचार व्यक्त करण्याच्या कालिदासाच्या विलक्षण कौशल्यामुळें भाषांतर करण्यास त्याचे ग्रंथ फार कठीण आहेत. कालिदासाच्या ठिकाणीं क्लिष्टता

औषधालाही सांपडावयाची नाही. आणि यामुळेंच त्याचें काव्य मराठींत आणावयाचें काम अतिशय बिकट आहे, ” असें प्रो. रानड्यांचेंही मत आहे. म्हणून स्वतः भाषांतरकारास आपल्या शिरावरील जबाबदारीची पदोपदीं वाटणारी जाणीव व पद्या इतकेंच गद्याच्याही भाषांतराचे कामीं पडणारे महत्प्रयास याची पूर्णकल्पना मनांत आणूनच कीं काय फर्ग्यूसन् कॉलेजचे प्रो. तुळपुळे आपल्या अभिप्रायांत लिहितातः—“ प्रो. लेल्यांच्या मराठी शाकुंतलांत पद्याप्रमाणें गद्यही फार चांगलें साधलें आहे. त्यांत अस्वाभाविक रचना व बोजडपणा कोठेंही आलेला नाहीं. संभाषणें अगदीं आपल्या रोजच्या बोलण्यासारखीं मनोरंजक वाटतात. त्यांत मुळांतील रस पूर्णपणें उतरला आहे. एकंदर भाषांतर पाहिलें म्हणजे प्रो. लेलेशास्त्री यांचें भाषाप्रभुत्व चांगलें प्रत्ययास येतें. ” या अभिप्रायाबरहुकूम भाषांतर खरोखरच निर्दोष अतएव अभिनंदनीय झालें आहे किंवा कसें याची थोडी शहानिशा प्रस्तुत लेखांत करण्याचा आमचा विचार आहे.

“ प्राचीन संस्कृत कवींच्या कृतींचें मराठींत भाषांतर करावयाचें तें शब्दशः केल्यानें मूळाचा आटोपशीरपणा व भाषासौष्ठव लुप्त होण्याचा पुष्कळ संभव असतो. म्हणून भाषांतरकारानें मूळांतील हृदयंगम प्रसंग व कवीचा भावार्थ खुलवून दाखविणाऱ्या टीपा जागोजाग घालून भाषांतर करावें, ” असें आपलें मत डॉ. बेलवलकर यांनीं त्यांच्या मराठी ‘ उत्तररामचरिता ’ चे प्रस्तावनेंत नमूद केलें आहे. उपरिनिर्दिष्ट प्रो. तुळपुळ्यांच्या अभिप्रायाबरहुकूम शाकुंतलाचें मराठी गद्य–पद्यात्मक भाषांतर लेलेशास्त्र्यांच्या लेखणींतून वठलें असेल तर मग स्पष्टीकरण करणाऱ्या टीपांची गरज नाहीं. आणि जीं थोडीं ठिकाणें तरीही दुर्बोध होतील अशी त्यांना शंका वाटली त्या त्या ठिकाणीं–‘ मूळांतला अर्थ विशद करण्याकरितां भाषांतरांत न्यूनाधिक केलें आहे ’ ही गोष्ट लेलेशास्त्री स्वतःच प्रस्तावनेंत कबूल करतात. वास्तविक पाहतां टीपा द्याव्या लागतात त्या अर्थस्पष्टीकरणापेक्षां रहस्य-स्पष्टीकरणार्थच होय यांत वाद नाहीं. आतां ‘ भाषांतर कसें असावें ’ याविषयीं जो वाद चालतो त्यांत एका अत्यावश्यक गोष्टीकडे नेहमीं डोळेझाक होते. ती म्हणजे–‘ हा सूर्य व हा जयद्रथ ’ अशा छातीठोक प्रतिज्ञेवर भाषांतर असलें पाहिजे आणि त्यासाठीं भाषांतरकारानें वकील लोक

आपले कागद दुमडतात तसे कागदाचे ब्रीफ तयार करून म्हणजे दोन समसमान रकाने पाडून पाहिल्या अर्धावर मूळ संस्कृत गद्य किंवा पद्य व त्याचेच पुढें दुसऱ्या रकान्यावर आपलें स्वतःचें प्राकृत भाषांतर लिहून काढून तें तसेंच छापून प्रसिद्ध करावें. मग त्या योगानें पुस्तकाचा आकार आटोपशीर न होतां सरकारी रिपोर्टासारखा किंवा गॅझेटसारखा थोडा लांबरुंद झाला तरी चालेल. असें करण्यापासून फायदा हा कीं, एकाच पानावर डाव्या हाताला मूळ व उजव्या हाताला त्याचा तर्जुमा किंवा प्रतिकृति पाहाव-यास सांपडल्यामुळें वाचकांस तुलनात्मक विवेचन करून सरस-निरस ठरविण्यास सोईचें जाईल; व भाषांतरकारांसही आपला कांटेतोलपणा कोठें ढळला हे तात्काळ नजरेस येईल. संस्कृत वाङ्मयांतील बहुतेक ग्रंथांतून अनेक पाठभेद आढळ-तात. तेव्हां त्यांतील ग्रंथांच्या भाषांतराचे बाबतींत तरी हा नियम अवश्य पाळला गेला पाहिजे असें मला वाटतें. एरव्हीं भाषांतरकर्त्यानें कोणत्या मूळ पाठाचें काय भाषांतर केलें आहे हें समजणें दुरापास्त होईल. शिवाय दुसरें असें कीं, कोणता पाठभेद प्रमाण धरून किंवा पसंत करून भाषांतरकारानें भाषांतर केलें आहे हें एक, अनेक भाषांतरकारांपैकीं खरा रसिक कोण, व अरसिक कोण हें ओळखण्याचे कामीं वाचकवर्गाचे हातीं निर्णायक गमक होऊन बसेल. असो.

या लेखांत प्रो. लेलेशास्त्र्यांच्या मराठी शाकुंतलाचें विहंगमावलोकन करण्याचें योजिलें असल्यामुळें आतां आपण त्यांच्या प्रत्यक्ष कृतीकडे वळूं या. अभिज्ञान शाकुंतलाच्या **पहिल्या अंकांत** भरधांव पाठलाग करणाऱ्या दुष्यंताच्या रथापुढें गाळण उडून पळतां भुई थोडी झालेला आश्रममृग, माणसाळलेल्या व पाळींव पशुपक्ष्यांच्या वास्तव्यामुळें गजबजलेला तपोवनप्रदेश, आश्रमवृक्षांना पाणी घालतां घालतां घामाघुम झालेली शकुंतला आणि मृगयाविहारी दुष्यंताच्या चतुरंग सेनेला बुजून सैरावैरा पळत सुटलेला व हरिणांच्या कळपांची दाणादाण उडवून देणारा बेफाम वनगज असे जे चार वर्णनपर श्लोक आहेत त्यांपैकीं शेवटचा वगळून बाकीच्या श्लोकांचें पद्यमय भाषांतर विस्तृतरीत्या करितां यावें म्हणून शास्त्री-बोवांनीं प्रत्येकीं दोन दोन शार्दूलविक्रीडितें योजून एकंदरीनें भाषांतर बरें केलें

आहे. याच अंकांत ' सरसिजमनुविद्धं शैवलेनाऽपि रम्यं ' व ' चलापाङ्गां दृष्टिं स्पृशसि बहुशो वेपथुमतीं ' हे दोन बहारीचे श्लोक आहेत. त्यांचें भाषांतर लेल्यांच्या लेखणींतून फारच चांगलें उतरलें आहे. पैकीं नमुन्यादाखल पहिलें येथें देतों:—

**शैवलेंहीं वेढिलें कमल कांत,**
**अंकलांछितही रम्य रजनिकांत ।**
**वल्कलेंही रमणीय हेहि बाला**
**काय साजेना प्रकृतिसुंदराला ? ॥**

धर्मारण्यांत धुमाकूळ घालणाऱ्या वनगजाचें मंदाक्रांता वृत्तांतील मूळ वर्णन भाषांतरांत स्रग्धरा वृत्तांत बसविलें असूनही रसहानि बिलकूल झालेली नाहीं.

दुसऱ्या अंकांतील मृगयागुणवर्णनपर सुप्रसिद्ध श्लोकाचें भाषांतर समवृत्त-समश्लोक करूनही उत्तम साधलें आहे. तें येणेंप्रमाणें:—

**जाई मेद, तयें कृशत्व उदरा चापल्य देहासि ये,**
**प्राण्यांचेहि मनोविकार कळती, संक्षुब्ध कोपें भयें ।**
**वीरांना चललक्ष्यभेद करितां वाटे प्रतिष्ठा अती,**
**मिथ्या निंदि शिकारिला जन, अशी क्रीडा दुजी कोणती ? ॥**

तसेंच ' चित्रे निवेश्य परिकल्पितसत्त्वयोगा ' व ' दर्भाङ्कुरेण चरणःक्षत इत्यकाण्डे ' या दोन सुंदर श्लोकांचें भाषान्तर शार्दूल विक्रीडितांत हुबेहुब वठलें आहे तथापि लेलेशास्त्र्यांनीं आपल्या कवित्वास अगदीं स्वैरविहार करावयास कोठें वाव दिला असेल तर तो या अंकांतील 'क्व वयं क्व परोक्षमन्मथो' या शेवटच्या श्लोकाच्या भाषांतरांत होय. असल्या अनिरुद्ध काव्यस्फूर्तीस भाषांतर हें रूक्ष नांव कोण देईल ? राजा विदूषकास म्हणतो:—मित्रा ! या ऋषींच्या शब्दाला मान देण्यासाठींच केवल मी आश्रमांत जातों आहें; तापसकन्येच्या अभिलाषामुळें नव्हे बरें का ? कारण—

**कोठें आम्ही विलासी रसिकवर महाभाग्यसंपत्तिशाली ?**
**कोठें ती मुग्ध कन्या, अविदितमदना पाडसीं वाढलेली ?**
**मित्रा जें बोललों याविषयिं, समज तें सर्व कांहीं विनोदें,**
**त्यामाजी सत्य नाहीं लवहि, वचन हें मात्र चित्तीं असों दे ॥**

या भाषांतरावरून नजर टाकून कदाचित् कोणी अशी शंका काढील कीं, पहिल्या चरणांतील ' विलासी , रसिकवर आणि महाभाग्यसंपत्तिशाली ' या फाजील विस्तारास किंवा शब्दावडंबरास मुळांत काय आधार आहे ? मूळ संस्कृत श्लोकांत फक्त ' क्व वयं ' येवढेच उद्गार स्वतःस अनुलक्षून राजा काढतो. त्यामागें इतर कोणतीही विशेषणें लावलेलीं आढळत नाहींत. म्हणून गोडबोले यांचें " अम्हि कोठ ? कुठें अजाण ती ? " हेंच भाषांतर अव्यभिचारी ठरेल. सकृद्दर्शनी आक्षेप खरा भासतो. परंतु दुष्यन्त व शकुन्तला यांच्या आचारविचारांत, बोलण्याचालण्यांत किंवा रीतिरिवाजांत केवढें जमीनअस्मानाचें अंतर आहे याविषयीं विदूषकाच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पाडून एवढा मोठा कुलशीलवान ऐश्वर्यसंपन्न राजा तापसकन्येवर भाळणें शक्य नाहीं अशी त्याची अंतर्यामीं खात्री पटावी हाच या निरोप-वचनांतील गर्भित हेतु असल्यामुळें ' क्व वयं ' या उद्गारांत बादशाही बडेजावाचें सर्व वैभव ध्वनित होतें असेंच गृहीत धरून चालल पाहिजे. अर्थात् अशा या अगदीं अर्थपूर्ण शब्दद्वयाचें तेवढ्याच मोजक्या शब्दांत भाषांतर करणें हें अरसिकपणाचें लक्षण होय. प्रो. लेलेशास्त्रयांजवळ शब्दसंपत्तीची कांहीं टंचाई नसल्यामुळें जरूर तेवढ्या योग्य निवडक अशा अर्थपूरक विशेषणांची ओड देऊन त्यांनीं उभयतांमधील हा विरोध चांगला रंगविला आहे. भाषांतर करतेवेळीं त्यांची दृष्टि किती सूक्ष्म व विचक्षण असली पाहिजे हें सिद्ध करण्यास येवढें एकच उदाहरण पुरे आहे.

मृगयाविहारी दुष्यन्ताच व शकुन्तलेचें प्रथमदर्शनींच अन्योन्य प्रेम जडल्यामुळें शिकारीवरील मन उडून मालिनीतीरावरील तपोवन राजाला उपवनवत् भासूं लागतें व राक्षसांपासून यज्ञास पोहोंचणाऱ्या उपसर्गाची इष्टापत्ति

साधून कण्वमुनींच्या गैरहजेरींत आश्रमांतील धर्मकृत्यें निर्विघ्नपणें पुढें चालू राहावीं म्हणून तपस्व्यांच्या इच्छेनुरूप राजा कण्वाश्रमांतच तळ देऊन कालक्रमण करतो हें दुसऱ्या अंकाचें सार होय. हा सर्व कथाभाग संक्षेपतः तिसऱ्या अंकाच्या विष्कंभकांत ग्रथित करून घेऊन कालिदासास दुसऱ्या अंकास अजिबात फांटा देतां आला असता. नाहीं असें नाहीं. परंतु त्या योगानें राजा व विदूषक यांच्या संभाषणांतील विदूषकाच्या विनोदी कोटिक्रमामुळें उत्पन्न होणाऱ्या आल्हाददायक हास्यरसपरिपोषास मात्र आपण मुकलों असतो. **तिसऱ्या अंकांतील** ' शक्यमरविन्दसुरभि, ' ' स्तनन्यस्तोशीरम् ' ' गांधर्वेण विवाहेन ' या तीन संस्कृत श्लोकांचें प्राकृत भाषांतर दिंडी वृत्तांत इतकें हृदयंगम व कर्ण-मधुर झालें आहे कीं, रघुनाथ पंडिताच्या ' नल–दमयंति स्वयंवराख्याना ' ची वाचकांस आठवण होते. त्यापैकीं शेवटचें येथें देतों :—

**पूर्वकालीं राजर्षिकन्यकांनीं,**
**पती वरिले गांधर्वविवाहांनीं ।**
**पित्यानींही अभिनंदिलें तयांला,**
**असें ऐकुनियां ठाऊकें अम्हांला ॥**

सख्यांच्या सूचनेनुरूप नलिनीपत्रावर तीक्ष्ण नखाग्रांनीं कोरलेल्या शकुंतलेच्या पद्यमय मदनलेखाचें भाषांतर पुढीलप्रमाणें केलें आहे:—

**न कळे मजला तव, परि माझें बसलें तुझ्या वरीच मन ।**
**अदया ! रात्रंदिन मम अंगां अतिताप देतसे मदन ॥**

या अंकांतील प्रधानरस जो शृङ्गार त्याच्या शिखरावर विराजमान होणाऱ्या विसाव्या श्लोकाचें भाषांतर विषयाशीं समरस होऊन शास्त्रीबोवांनीं वसंत-तिलका वृत्तांत:—

**पंखा करीं धरुनियां नलिनीदलांचा**
**घालूं सुशीत पवन श्रमहारि साचा ?**

**अंकावरी मृदु करीं चुरुं काय सांग**
**बाले तुझे चरण हे नवपद्मरंग ? ॥**

येणेंप्रमाणें केलें आहे. हें भाषांतर समश्लोकसमवृत्तादि बंधनें पाळूनहि ज्या अर्थी इतकें बहारीचें झालें आहे त्या अर्थी प्रो० तुळपुळे यांनीं आपल्या अभिप्रायांत—'कवीला समश्लोकीचें बंधन अवजड झालें असतें असें म्हणतां येणार नाहीं,' हें जें आपलें मत प्रगट केलें आहे त्यालाच पुष्टि मिळून तें खरोखर किती यथार्थ आहे याची बरोबर कल्पना येते. दुष्यन्त--शकुन्तलेच्या या दुसऱ्या भेटीचा गोड प्रसंग अगदीं अनपेक्षितरीत्या एकाएकीं संपुष्टांत येतो. गांधर्वविवाहाच्या युक्तायुक्ततेसंबंधीं गोष्टी बोलतां बोलतां शकुंतलेच्या मनाविरुद्ध राजा तिचें बळेंच चुंबन घेऊं लागतो इतक्यांत अकस्मात् पडद्याआडून नायक–नायिकेची तारांबळ उडवून देणारी 'चक्रवाकवधूः आमन्त्रयस्व सहचरम्। उपस्थिता रजनी।' अशी व्यंग्यार्थसूचक व अन्योक्तिपर आरोळी कर्णपथावर येते. या चूलिकेचें मर्म विषद करण्यासाठीं टीपांची फार उणीव भासते. हें व यापुढें नाटकांत जीं दोन तीन वेगळ्या तऱ्हेचीं पताकास्थानकें आहेत त्याखालीं खुलासेवार टीपा प्रो० लेलेशास्त्र्यांनीं दिल्या असत्या तर नवीन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची अधिक सोय झाली असती असें मला वाटतें.

( विविधवृत्त—वर्ष ३ रें, अंक ९ वा )

## लेखांक २ रा.

आतां आपण शाकुंतल नाटकांतील नितांतरमणीय अशा **चवथ्या अंकाचें** भाषांतर कसें काय झालें आहे तें पाहूं या. भाषान्तरकाराची खरी कसोटी तर तेथेंच आहे. कारण

**" काव्येषु नाटकं रम्यं तत्रापि च शकुंतला**
**तत्रापि च चतुर्थोऽङ्कः तत्र श्लोकचतुष्टयम् ॥ "**

हे कोणा एका तत्रापिमहर्षीनीं रचिलेलें परंपरागत सुभाषित, त्यांतील अतिशयोक्तीची लोकांनीं केवळ कालिदासाकडे पाहून गय केल्यामुळें, आजपर्यंत संस्कृत ललितवाङ्मयास अनुलक्षून सर्वश्रुत व रूढ होऊन बसले आहे.

अभिज्ञान शाकुंतलाच्या पहिल्या अंकांत दुष्यन्त राजा शकुंतलेच्या मन-मोहक रूपावर भुलून जाऊन—

**सतां हि संदेहपदेषु वस्तुषु**

**प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ।**

या कृतयुगांतील निर्णायक दंडकावर विसंबून आपल्या सदसद्विवेकबुद्धीचें समा-धान करूं पाहतो, त्यावेळीं कोणालाही वर्डस्वर्थ कवीच्या—

" Serene will be our days and bright,
And happy will our nature be,
When love is an unerring light
And Joy it's own security. "

या आशावादी ओळींची आठवण होते, आणि वाटूं लागतें कीं, उभयतांचा समागम खचित आनंदपर्यवसायी होणार. दुसऱ्या व तिसऱ्या अंकांतील त्यांचें एकमेकांवरील असाधारण प्रेम पाहूनही वाटूं लागतें कीं, प्रेम असावें तर असें आदर्शभूत व एकनिष्ठ असावें ! चंचल प्रेमाची त्यापुढें काय मातब्बरी ? किंबहुना

" Love is not love
Which alters when it alteration finds; "

असें शेक्स्पीअरही सांगतो. तिसऱ्या व चवथ्या अंकाचे दरम्यान केव्हांतरी गांधर्व विधीनें नायक-नायिका प्रेमरज्जूनें जखडलीं जाऊन दुष्यंताच्या कामवासनेची तृप्ति होते, व ऋषींची परवानगी घेऊन तो हस्तिनापुरास परत जातो. त्यावेळीं त्यानें घेतलेला शकुंतलेचा निरोप हा

" Adieu for evermore, My Love !
And adieu for evermore "

अशा स्वरूपाचा असेल ही कल्पनाही वाचकांच्या मनाला शिवत नाहीं.

परंतु चवथ्या अंकाच्या प्रारंभीं शीघ्रकोपी दुर्वासमुनींच्या रूपानें साक्षात दुर्दैवच शकुंतलेपुढें मूर्तिमंत उभे राहातें, व त्यानें दिलेल्या शापामुळें येथपर्यंत सुरळीत असलेल्या कथानकांत अनपेक्षित विघ्न येऊन, जें नाटक एरव्हीं चवथ्या अंकाच्या शेवटीं समाप्त व्हावयाचें त्याला आणखी तीन अंकांची पुरवणी जोडावी लागते. व 'ज्याचा शेवट गोड तें सारेंच गोड' येवढ्यावरच गरीब बिचाऱ्या शकुंतलेबद्दल कळवळा वाटणाऱ्या प्रेक्षकवर्गाच्या दुःखीकष्टी मनोवृत्तीचें कसेंबसें सांत्वन करणें कवीस भाग पडतें. " शाकुंतल नाटकाचा चवथा अंक अत्यंत काव्यमय असून त्यांत कविराजानें आपलें बुद्धिसर्वस्व खर्ची घातलें आहे. चवथ्या अंकांतील शकुंतलेची सासरी पाठवण म्हणजे करुणरसाचें हृदयंगम विहारस्थल होय—" असें प्रो० लेलेशास्त्री आपल्या उपोद्घातांत लिहितात. तें कसें काय याचा आतां थोडा विचार करूं. या अंकांत कालिदासानें निष्कलंक मनुष्यस्वभावाचें निसर्गसुंदर सृष्टीशीं शक्य तेवढें तादात्म्य दाखवून शकुंतला ही कोणी सुरयुवतिसंभव, अमानुष किंवा अतर्क्य स्त्रीरत्न नसून जिला व्यावहारिक सुखदुःखाची पूर्णपणें जाणीव आहे अशी कुटुंबवत्सल, प्रेमळ व संसारी मनोवृत्तीची सहृदय बालिका होती याचें परिणामकारक चित्र मोठ्या कुशलतेनें रेखाटलें आहे. प्रेक्षणीय इन्दुकला किंवा रमणीय रत्नांची केवळ अधिदेवताच अशी जिच्यासंबंधीं राजाची प्रथमदर्शनी कल्पना झाली तीच शकुंतला जसजसा परिचय वृद्धिंगत होत गेला तसतशी पुढें त्याला वश व स्पर्श-क्षम कां झाली या रहस्याचें आविष्करण चवथ्या अंकांत आहे. या अंकांतील खुबीदार स्वभावपरिपोषामुळें शकुंतलेसंबंधीचे सर्व भ्रामक व काल्पनिक गैरसमज लयास जाऊन तिच्या भावी करुणास्पद परिस्थितीबद्दल सर्वांना अगोदरपासूनच एक प्रकारची सहानुभूति उत्पन्न होते. वर्डस्वर्थ कवीचें आपल्या पत्नीसंबंधीं असेंच भ्रमनिरसन होऊन त्यानें तिचें यथातथ्य स्वरूपाविष्करण आपल्या एका कवितेत दिलें आहे. तें वर्णन चवथ्या अंकांतील शकुंतलेशींही बरोबर जमतें:—

" A creature not too bright or good
For human nature's daily food,

For transient sorrows, simple wiles,
Praise, blame, love, kisses, tears and smiles."

प्रो. लेलेशास्त्री आपल्या उपोद्घातांत पुढें म्हणतातः— "अद्भुत गोष्टी करुणरसास विघातक असतात. तथापि त्या अनेकवार घडलेल्या दर्शविल्यानें त्यांचें अद्भुतत्व नाहीसें होतें. आकाशवाणी, वनस्पतींनीं शकुंतलेला वस्त्राभरणें देणें इ. गोष्टी चवथ्यांतील करुणरसास वरील कारणामुळें, अपकर्षक न होतां उपकारकच झाल्या आहेत." आमच्या मतें वनस्पतिसेवा, आकाशवाणी, कोकिळरव ही सर्व एका दृष्टीनें तपोवनाश्रित पशु-पक्ष्यांची आश्रमनिवासी जनाशी निकट साहचर्यामुळें उत्पन्न झालेली राजीखुषीची प्रतियोगी सहकारिताच होय. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं दैवी शक्ति कल्पणें, किंवा त्यांच्या जड देहांतील जडत्व घटकाभर विसरून त्यांच्यांत सृष्टि मधील इतर प्राणिमात्रांच्या व्यवहाराशीं अविसंवादि असे चैतन्य निर्माण करणें ही एक कवींची कला आहे. केवळ सहवाससान्निध्यामुळें आश्रमांतील मृग-खग-तरु-लतादिकांसही निरुपद्रवी व निष्पाप शकुंतलेबद्दल एवढा आपलेपणा वाटतो तर तिचें सदैव अभिष्ट-चिंतन करणाऱ्या आप्तेष्टांस तो किती वाटावा? सजीव-निर्जीव, सचेतन-अचेतन सृष्टींत अशा तऱ्हेची समरस एकतानता आपल्या जागृत प्रतिभेच्या जोरावर कल्पून निसर्गांत यदृच्छेनें घडून येणाऱ्या सर्व घडामोडींचा कथानकास पोषक असा उपयोग करून घेणें यांतच खरें कवित्व आहे. कवींच्या उच्च वातावरणांत शिरून निरीक्षण केल्यास यांत आद्भुतपणा वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. असो;

आतां आपण **चवथ्या अंकाच्या** प्राकृत भाषान्तराचें तुलनात्मकदृष्ट्या परीक्षण करूं या. सुप्तोत्थित शिष्याच्या तोंडीं कांहीं आवृत्तींतून 'कर्कन्धूनांउपरि तुहिनम्' व 'पादन्यासं क्षितिधरगुरोः" असे आणखी दोन श्लोक सांपडतात. पहिल्यांतील सूक्ष्म सृष्टिनिरीक्षण व दुसऱ्यांतील अर्थान्तरन्यासावरून हे दोन्ही श्लोक कालिदासकृत असण्याचा बराच संभव आहे. तेव्हां निदान टीपांत तरी त्यांचे पद्यमय भाषांतर देणें जरूर आहे. या अंकांतील श्लोकांच्या सुप्रसिद्ध चौकडीपैकीं पहिला म्हणजे 'यास्यत्यद्यशकुन्तलेति' या सर्वोत्कृष्ट

श्लोकाचें भाषांतर लेलेशास्त्र्यांनीं समश्लोक-समवृत्त केलें असुन तें अगदीं तोडीस तोड झालें आहे:—

**जाते आज शकुंतला म्हणुनियां मी खिन्न झालों मनीं;**
**चिंतेनें जड दृष्टि, कंठ भरला, बाष्पां बळें दाबुनी।**
**स्नेहें व्याकुल होई यापरि जरी राहीं अरण्यांत मी।**
**कन्येच्या विरहें नव्या मग किती व्हावा गृहस्थाश्रमी ?॥**

'हातच्या कांकणास आरसा नको' तद्वत् या भाषांतराची स्तुति करण्याचें कारण नाहीं. याचप्रमाणें 'पातुं न प्रथमं व्यवस्यति जलं' आणि 'शुश्रूषस्व गुरून्कुरु प्रियसखी' याही दोन्ही श्लोकांचीं भाषान्तरें शार्दूलविक्रीडितांत तंतोतंत जमलीं आहेत. गौतमीच्या तोंडच्या 'भगवान् वरः खल्वेषः न आशीः।' या उद्गारांचें नुसतें भाषांतर देऊन भागणार नाहीं. त्याखालीं 'वर' आणि 'आशीर्वाद' यांमध्यें जो सूक्ष्म भेद केला जातो त्याच्या स्पष्टीकरणार्थ टीप अवश्य पाहिजे. 'आशीर्वाद' म्हणजे केवळ सदिच्छापूर्वक केलेलें शुभचिंतन; त्याच्या उलट 'वर' ही स्वयंनिर्णयाची हक्काची मागणी मानली जाऊन त्याच्या आगामी पूर्ततेबद्दल किंवा फलप्राप्तीबद्दल उभयपक्षीं कधींच संदेह नसतो. चवथ्या अंकाच्या अखेरीस कण्वमुनींनीं शकुन्तलेला—'शिवास्ते पन्थानः सन्तु।' असा आशीर्वाद दिला आहे. पूर्वीं एके काळीं डेक्कन् कालेजच्या संस्कृत प्रोफेसरचे खुर्चीवर विराजमान झालेल्या एका बड्या साहेबमजकुरांनीं या वाक्याचा हास्यास्पद दुरुपयोग करून आपला विक्षिप्तपणा व संस्कृत वाक्प्रचारासंबंधीचें शोचनीय अज्ञान एके प्रसंगीं स्वयंस्फूर्तीनें कसें प्रगट केलें याविषयीं खुद्द कै. लो० टिळकांच्या तोंडून ऐकलेली एक मनोरंजक आख्यायिका प्रस्तुत लेखकानें यापूर्वी अन्यत्र प्रसिद्ध केली असून ती आतां सर्वांना परिचित आहे.*

**पांचव्या अंकांतील** हंसपदिकेच्या खोंचदार गाण्याचा भावार्थ काय या विषयीं चर्चा करितांना 'मराठी- शाकुंतलास' प्रस्तावनेदाखल जोडलेल्या आपल्या सुविचारपरिप्लुत निबंधांत प्रिन्सिपॉल राजवाडे लिहितात—

* परिशिष्ट 'ब' पहा.

" हंसपदिकेचें गाणें राजाची चंचल वृत्ति दाखविण्याकरितां नसून त्याला कसली तरी अनिर्वचनीय अशी हुरहुर लागली आहे असें दाखविण्याकरितां आहे. कोणाला तरी आपण विसरलों, पण तें कोण हें आठवत नाहीं ह्या मनोभावनेची तयारी करण्याकरितां तें गाणें घातलें आहे. " प्रि. राजवाड्यांच्या या म्हणण्यांत पुष्कळ तथ्य आहे. तथापि हंसपदिकेचें गाणें कर्णपथावर येतांच आधुनिक सुशिक्षितांस 'प्रेमाच्या चंचलते'ची करुणकहाणी विशद करणाऱ्या अशा:—

"When hearts have once mingled,
Love first leaves the well built nest
The weak one is singled
To endure what it once possesst."

या शेलेच्या काव्याची आठवण होते, त्याला राजवाड्यांचा इलाज काय? चवथ्या अंकांतील शकुतलेच्या तोंडचे—'हला पश्य नलिनीपत्रान्तरितमपि सहचरमपश्यन्त्यातुरा चक्रवाकी आरटति दुष्करं खल्वहं करोमि।' यांतील अशुभ शंकाजनक अपशकुन व पांचव्या अंकांतील प्रारंभींच्या हंसपदिकेच्या गाण्यांतील श्लेषगर्भ टोमणा यावरून दुर्वासाच्या शापाचा परिणाम होऊन विस्मृतीचा पगडा राजाच्या मनावर एव्हांपासून पूर्णपणें अम्मल कसा गाजवूं लागतो याचें खुलासेवार विवेचन ज्याथल्या तेथें खालीं टीपा घालून प्रो. लेलेशास्त्र्यांनीं केलें असतें तर तें अधिक सयुक्तिक दिसलें असतें. हंसपदिकेचें गाणें ऐकून राजाच्या मनास हुरहुर लागते; पण त्याचें खरें कारण शकुतलेसंबंधींच्या प्रणयवृत्तान्ताचा स्मृतिनाश हें असतांही गेल्या जन्मींच्या प्रेमसंबंधाशीं त्याचा दूरान्वय लावून राजा आपल्या मनाचें कसेंबसें समाधान करूं पाहातो. या सुंदर श्लोकाचें भाषांतर लेलेशास्त्र्यांनीं शार्दूलविक्रीडितात तितकेंच सुंदर केलें आहे:—

पाहोनी रमणीय वस्तु नयनीं, ऐकोनि रम्य ध्वनि,
एखाद्या समयीं सुखी मनुजही अस्वस्थ होतो मनीं।

याचें कारण अन्य जन्मि घडले संबंध जे सुंदर,
चित्ताला स्मरताति ते न कळतां, होवोनि भावस्थिर ॥

या अंकांतील इतर श्लोकांपैकीं ‘ महाभागः कामं नरपति ’ याचें शिखरिणी-वृत्तांतील, ‘ सतीमपि ज्ञातिकुलैकसंश्रयाम् ’ याचें वंशस्थवृत्तांतील, ‘ नापेक्षितो गुरुजनः ’ याचें मालिनीवृत्तांतील, आणि ‘ आजन्मनः शाठ्यं अशिक्षितो यः ’ याचें वसंततिलकावृत्तांतील अशीं हीं चार भाषांतरें सरस वठलीं आहेत. पैकीं पहिलीं दोन समश्लोक–समवृत्त केलीं आहेत. वैतालिकांच्या प्रसिद्ध श्लोकद्वया-पैकीं पहिल्याचें भाषांतर इतकें प्रासादिक व ओळीस ओळ कायम टेवून केलें आहे कीं, तें येथें समग्र उतरून घेणें भाग आहेः—

**स्वसौख्य न गणोनियां श्रमसि तूं प्रजारंजनीं ।**
**अशीच अथवा तुझी सतत वृत्ति रात्रंदिनीं ॥**
**शिरीं अनुभवोनियां सतत भानुचंडातप ।**
**प्रशांत करि, सांवली करुनि आश्रितां पादप ॥**

शकुंतलेला सासरीं पोहोंचविण्यासाठीं म्हणून बरोबर गेलेल्या कण्वशि-ष्यांपैकीं एकाला राजदरबारांतील रहदारी पाहून जणूं राजवाड्याला आग लावल्या-मुळेंच येवढा किलबिलाट चालला आहे कीं काय असा भास होतो. भावी अनर्थ-सूचक अपशकुनांची यादी देतांना प्रि. राजवाड्यांना हाही एक अपशकुनच वाटावा यांत नवल नाहीं. परंतु केवळ याच हेतूनें शार्ङ्गरवाचे तोंडीं कालिदासानें ही कल्पना घातली असावी असें नसून राजधानीपासुन दूर खेडेगावीं एकांतवासांत राहाणाऱ्या खेडवळ लोकांच्या एका चमत्कारिक अनुभवाचें हें यथार्थ वर्णन आहे. मालिनीतीरावरील कुलपतीच्या आश्रमापैकीं एखाद्या पर्णकुटीनें पेट घेतला तर नदीचें पाणी भराभर उपसून ती आग विझविण्यासाठीं आजूबाजूचे गोसावी कधीं काळीं गोळा होत तेवढीच काय ती जास्तींत जास्त मोठी गर्दी कण्वशिष्यांनीं पाहिलेली. राजधानींतील अठरापगड जातींच्या जीवनार्थकलहाचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना कोठून असणार ?

मावळांतील अगर तळकोंकणांतील एखादा लंगोट्या प्रथम बोरीबंदरवर उतरला म्हणजे तो जसा भांबावून जातो तशी दुष्यन्ताच्या राजवाड्यांत पाउल टाकतांक्षणींच कण्वशिष्यांची स्थिति होते. हें स्वभावचित्र कालिदासानें किती मार्मिक निरीक्षणानें रेखाटलें आहे बरें ? ज्यांना याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन प्रचीति पाहावयाची इच्छा असेल त्यांनीं मुंबई सोडून कोठेंतरी दूर आपल्या शेतीवाडीच्या गांवीं एक वर्ष घालवून पुनः एकदम मुंबईस परत आल्याबरोबर मनाला कसें काय वाटतें तें जरूर पहावें. असो, पांचव्या अंकांत राजा व कण्वशिष्य यांच्या मुलाखतीचें औपचारिक स्वरूप राजाच्या गाढ संमोहामुळें पुढें पुढें पालटत जाऊन त्यांचे दरम्यान बरींच उत्तरें प्रत्युत्तरें होतात. अखेर गौतमीच्या —'तपोवनसंवर्धितो अनभिज्ञोऽयं जनः कैतवस्य ।' या कळकळीच्या सांगण्याला उत्तरादाखल राजाचे तोंडून—

स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीषु
संदृश्यते किमुत याः प्रतिबोधवत्यः ।
प्रागन्तरीक्षगमनात् स्वमपत्यजातम्
अन्यैर्द्विजैः परभृताः खलु पोषयन्ति ॥

हे अहेतुकरीत्या निघालेले व्याजोक्तिपूर्ण व कोणाच्या ध्यानींमनीं नसतांही एकदम शकुंतलेचे आईबाप उद्धरणारे असे सर्वथैव अनुचित उद्गार कर्णी पडतांच सामोपचाराचें बोलणें तात्काळ खुंटतें. शकुंतला चिडून जाते, शार्ङ्गरव खवळतो, गौतमीची मति कुंठित होते, आणि राजा व शार्ङ्गरव यांच्या दरम्यान चांगलाच खटका उडून 'दे माय धरणी ठाय' झालेल्या शकुंतलेसह उद्विग्न मनानें कण्वशिष्य पाय आपटीत चालते होतात. हंसपदिकेच्या रागदारीच्या गाण्याच्या लकेरीनें ज्याची सुरवात, त्या पांचव्या अंकाचा शेवट असा हा धाय मोकलणारी शकुंतला, शिव्या-शाप देणारे कण्वशिष्य आणि काळीज पिळवटून निघालेला राजा अशा संक्षुब्ध व विमनस्क मनोविकारांच्या शोचनीय आविष्करणांत होतो. चवथा व पांचवा अंक मिळून खेचलेली ही करुण व रौद्र रसाची तार तशीच पुढें ताणून धरल्यास सहृदय प्रेक्षकांच्या भावनाप्रधान मनोवृत्तीस जाचक

होईल हें ओळखूनच कीं काय नाटककार सहाव्या अंकाच्या प्रारंभीं कोतवाल, शिपाई व चोरीच्या आरोपावरून पकडून आणलेला शक्रावतारनिवासी कोळी यांचें गंमतीचें प्रवेशक घालतो.

( विविधवृत्त वर्ष ३ अंक १०; ता. ६-३-२७ )

ग्रंथ संग्रहालय

## लेखांक ३ रा.

फर्ग्युसन् कॉलेजचे संस्कृत विषयाचे सुप्रसिद्ध माजी प्रोफेसर कै. दा. पां. दा. गुणे हे अभिज्ञान शाकुंतलांतील **सहाव्या अंकाच्या प्रारंभींचें प्रवेशक** मोठें खुलवून व अभिनयपूर्वक शिकवीत अशी त्यांची ख्याती होति. कारण संविधानकाच्या व नाट्यशास्त्राच्या दृष्टीनें या प्रवेशकाचें सदर नाटकांत तसेंच विशेष महत्त्व आहे. एक तर ज्या राजमुद्रिकेशीं शकुंतलेचें भवितव्य दुर्वासशापामुळें निगडित झालें होतें व ज्या अभिज्ञानाभरणदर्शनानें तिच्या प्रत्यादेशदुःखाचें पूर्ण परिमार्जन व्हावयाचें असा उःशाप महत्प्रयासांनीं तिच्या सख्यांनीं मिळविला होता त्या शचीतीर्थांत गळून पडलेल्या हतभागी मुद्रिकेचा त्यांत अचानक शोध लागतो. व दुसरें असें कीं, तत्कालीन समाजस्थिति व राज्यशासनपद्धति यांवरही या प्रवेशकानें बराच प्रकाश पडतो. शिवाय त्यांत जो संवाद चालतो त्यामध्यें कांहीं तरी खुनीदार असा अस्फुट विनोद ( suppressed humour ) व गर्भित उपरोध ( implied innuedo ) आहे. त्यांतील श्लेष व व्यंजना ठिकठिकाणीं टीपा देऊन व्यक्त केल्याखेरीज संस्कृत न जाणणाऱ्या वाचकांस मुळांतील खुमारीचा आस्वाद कसा मिळावा? या ठिकाणीं मात्र प्रो. लेलेशास्त्र्यांचें घोपटमार्गी सरळ भाषांतर वाचून रसिकांची तीव्र निराशा होईल. उदाहरणार्थ, सुरवातीला पोलीस शिपाई कोळ्याला मारहाण करीत ' आंगठी कोठें सांपडली बोल ?' असें हडसून खडसून विचारतात. त्याला तो गरीब बिचारा कोळी ' मी चोर नव्हे. जरा दमानें घ्याल तर सारी हकीगत सांगतों, ' म्हणून उत्तर देतो. त्याबरोबर पहिला शिपाई ' मग काय कोणी मोठा सत्पात्र ब्राह्मण समजून तुला ही आंगठी राजेसाहेबांनीं दान दिली

होय ?' असा खोंचक प्रश्न विचारतो. यांतील 'ब्राह्मण' शब्द व त्या काळीं ब्राह्मण्याचें माजविलें जाणारें अवास्तव स्तोम याचा वचपा संधि मिळतांच काढण्याचें कोळी मनांत योजतो. आणि तशी संधि मिळण्यास त्याला फारशी वाटही पाहावी लागत नाहीं. कारण या पुढील संवाद फारच मनोरंजक होतो. तो असा:—

**कोळी:**—जाळें, गळ वगैरे साधनांनीं मासे पकडून मी आपला चरितार्थ चालवितों.

**कोतवाल:**—(हंसून) वाः मोठा सोंवळाच धंदा पडला कीं रे तुझा!

**कोळी:**—

**सहजं किल यद्विनान्दितं**
**न खलु तत्कर्म विवर्जनीयम्।**
**पशुमारणकर्मदारुणोऽ-**
**नुकम्पामृदुरेव श्रोत्रियः॥**

या श्लोकाच्या वाच्यार्थाचें भाषांतर लेलेशास्त्र्यांच्या पुस्तकांत—

**जें सहज कर्म तें नचि टाकावें, निंद्यही, असें वदती।**
**श्रोत्रिय दयामृदुचि, जरि पशुहननकठोर अध्वरीं दिसती॥**

येवढेंच दिलें आहे. परंतु कोळ्याच्या प्रत्युत्तराचें खरें इंगित विशद करून दाखवावयाचें झाल्यास श्लोकाचा गर्भितार्थ विस्तारशः पुढील प्रमाणें आहे:—

"मी बोलून चालून एक शूद्रवर्णाचा कोळी. कोळ्याच्या कुळांत यदृच्छेनें जन्मास आलों. आमचा पिढीजाद धंदा मासे मारण्याचा व त्यावरच निढळाच्या घामानें बायकामुलांचें पोट भरतों. मग तसें धडधडीत बोलून दाखवायाला लाज हवी कशाला? माझें 'आंत एक बाहेर एक' असें थोडेंच आहे. तथें ज्यांचें अंमल त्यांनाच जातगोत सांगावयाला संकोच, मी माझा धंदा कशाला चोरून ठेऊं? मी मासे मारतों एवढ्यावरूनच जर मला चोर किंवा बदमाष ठरवावयाचें असेल तर चातुर्वर्ण्य–समाज–व्यवस्थेत सर्वश्रेष्ठ अशा ब्राह्मणांपैकीं जाडे जाडे विद्वान् लोक काय कमी निंद्य आहेत! इकडे यज्ञाच्या

निमित्तानें बोकडांना 'अजापुत्रं बलिं दद्यात्' या न्यायानें खुशाल बुकलून मारावें आणि वर आपल्या दयार्द्र अंतःकरणाचा टेंभा मिरवावा. वारे वा! काय पण दयेचा पाझर फुटतो यज्ञांत? जणूं दयेचे डोंगरच!" आतां आणखी एक उदाहरण घेऊं या. कोतवाल आंगठीसंबंधीं अधिक चौकशी करण्यासाठीं राजाच्या भेटीस आंत जातो व कोळ्यासह ते दोघे शिपाई कोतवाल परत येण्याची वाट पाहात गोपुराजवळ उभे राहातात. वाट पाहून कंटाळलेल्या शिपायांपैकीं एकजण दुसऱ्यास म्हणतो—'या चोराच्या गळ्यांत फुलांच्या माळा घालून त्याला सुळावर चढविण्याला माझे हात कसे फुरफुरत आहेत.' त्यावर कोळी आदबीनें उत्तर देतो कीं,—'उगाच एका निरपराध माणसाचे प्राण घेऊन तुम्ही काय मिळविणार?' परंतु ही फुलांसंबंधींची भाषा तो अंतर्यामी विसरत नाहीं. इतक्यांत त्याच्या मुक्ततेचा हुकूम घेऊन कोतवाल येतो व त्याला त्या रत्नभासुर आंगठीच्या किंमतीइतकें द्रव्यही राजाज्ञेवरून बक्षीस देतो. त्याबरोबर ते दोघे शिपाई त्याचा हेवा करूं लागतात. परंतु कोळी आपणांस मिळालेल्या बक्षिसांतून अर्धी रक्कम त्यांना देऊं करतो व म्हणतो—'भट्टारकाः इतोऽर्धं युष्माकं सुमनोमूल्यं भवतु।' याचा वाच्यार्थ लेलेशास्त्री असा देतात—'दादांनो! अर्धे पैसे उगाच फूल ना फुलाची पाकळी म्हणून तुम्हांस देतों.' हा झाला सरळ अर्थ. पण या वाक्यांतील 'शालजोडींतला' अर्थ शास्त्रीबोवांच्या ध्यानांत आलेला दिसत नाहीं. कोळ्याच्या उत्तरांतील खुबीदार टोमणा असा कीं,—"अरे! मला सुळीं देण्यासाठीं तुम्हाला फुलांच्या माळा आणावयाच्या आहेत ना? तर मग विलंब कां? हे घ्या पैसे विकत आणण्यासाठीं आणि त्या वध्यपुष्पांनीं सजवून या कीं मला फांशीं? नको कोण म्हणतो! उगाच तुमच्या हातांचें फुरफुरणें वांया जावयाला नको." त्याच्या सुटकेचा हुकूम राजानें कोतवालाजवळ लेखी दिलेला असल्यामुळें तो आतां काय म्हणून डरेल? कर नाहीं त्याला डर किंवा रड कशाला? उपरोधिक भाषेंत त्यानें पोलिसाची चांगलीच कानउघाडणी केली यांत शंका नाहीं. अशा आणखीही कित्येक गंमती या प्रवेशांत आढळून येतात. शेवटीं कोतवालासह सगळेच गुत्त्याकडे आपला मोर्चा वळवितात, व या

नव्या दोस्ताच्या पैशावर मजा मारतात ! पेशवाईतील घाशीरामीस कोणी हंसावयास नको.

प्रवेशकांतील शिपाई व कोतवाल यांच्या संभाषणांतून 'कोळयास सांपडलेली आंगठी दृष्टीस पडतांच कसल्या तरी प्रणयवृत्तान्ताची दुष्यन्ताला आठवण होऊन त्याचा कंठ दाटून आला' ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोतवालाच्या तोंडून बाहेर फुटते. अर्थात् प्रवेशकांतील हा मुख्य कार्यभाग उरकल्यामुळें दुर्वासऋषीच्या शापाचें निराकरण होऊन नायक-नायिकेच्या संयोगास अनुकूल असें वातावरेण पुन: निर्माण झाल्याचें सर्वांस कळून चुकतें. मग यापुढील सबंध सहाव्या अंकाची गरज काय ? याच प्रवेशकापुढें सातवा अंक जोडून घेऊन सहाव्या व सातव्या अंकांचें एकीकरण करून टाकण्यास हरकत कोणती ? प्रश्न बरोबर आहे; पण याला उत्तर असें कीं, आपल्या लौकिक व्यवहारांत आपण कादेशीर निःपक्षपातीपणास जें महत्त्व देतों तितकें किंबहुना त्याहूनही कांकणभर अधिक महत्त्व ललितवाङ्मयांत कवींच्या न्यायपरायण बुद्धीस (Poetical justice) देण्यांत येतें. नाट्य-शास्त्राचा असा एक नियम आहे कीं, नायकाचें विरहदुःख व अनुताप परमावधीस पोहोंचून स्वतः नायिकेची ( उत्तररामचरितांतील–'अहो उत्खातमिदानीं मे परित्यागलज्जाशल्यमार्यपुत्रेण'। या सीतेच्या उद्गाराप्रमाणें) अगर तिच्या सखीची त्याच्या निर्व्यलीक पश्चात्तापाबद्दल खात्री पटेपर्यंत अखेरचा संयोग हा शक्य तोंपर्यंत लांबणीवर टाकण्यांत येतो. नायकाच्या अनुकंपनीय स्थितीबद्दल व संगमोत्सुकतेबद्दल प्रत्यक्ष पुरावा पुढें येऊन जेव्हां सर्वांचें शंकानिरसन होतें तेव्हांच नायक-नायिकेचा पुनः समागम घडवून आणण्यास कवि सिद्ध होतो. केवळ येवढयाच साठीं कालिदासानें चित्रफलकाचें पताकास्थानक योजून चित्रार्पित शकुंतलेबाबत दुष्यन्ताचा भावानुशय अशा पराकाष्ठेप्रत पोहोंचविला आहे कीं, अखेर सानुमतीच्याही तोंडून सहजगत्या कबुली येते कीं:—

**'सर्वथा प्रमार्जितं त्वया प्रत्यादेशदुःखं शकुन्तलायाः'।**

हें सहाव्या अंकाचें खरें प्रयोजन होय. या अंकांतही कांहीं सांगण्या-

सारख्या गमती आहेत. त्यांपैकीं एक येथें देतों. राजाच्या डोळयांपुढें पांचव्या अंकांतील अखेरचें म्हणजे शकुंतलेच्या धिःकारयुक्त झिडकारणीचें चित्र उभें राहून तो तें विदूषकाला वर्णन करून सांगत असतां विदूषक असा तर्क लढवतो कीं, शकुन्तलेला कोणी तरी आकाशांत संचार करणाऱ्या भूतपिशाच्चानें उचलून नेली असावी. त्यावर राजा म्हमतोः—

'कः पतिदेवतामन्यः परामर्ष्टुमुत्सहेत।

याचा अर्थ प्रो. लेलेशास्त्र्यांनी—" त्या पतिव्रतेला स्पर्श करण्याला परक्याची छाती कशी होईल?" असा केला असुन तोच बरोबर आहे. कारण येथें—'पतिदेवताम्' ( पतिर्दैवता यस्याः ताम् ) हा बहुव्रीहि समास असल्यामुळें त्याचा अर्थ 'आपला पति हाच जिला देवासमान आहे अशा त्या पतिव्रतेस' असाच केला पाहिजे. परंतु डॉ. सर मॉनर विल्यम् साहेबांनीं हा समास षष्ठी तत्पुरुष कल्पून वरील मूळ संस्कृत वाक्याचें भाषान्तरः—

Who else would have dared to lay a finger on a wife, the idol of her husband?" असें केलें आहे. पाश्चात्य संस्कृतींत वाढलेल्या व 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमते तत्र देवताः' या वचनाशीं जुळणाऱ्या सामाजिक चालीरीतींचा पगडा ज्यांच्या आचारविचारांवर कायमचा बसलेला, अशा साहेबमजकुरांना शकुन्तला ही दुष्यन्ताचीं देवता वाटावी यांत नवल काय? परंतु त्यांच्याही वाङ्मयांतून आर्यसंस्कृतीशीं जमणाऱ्या कल्पना सांपडणार नाहींत असें मात्र नाहीं. उदाहरणार्थ मिल्टन कवीच्या 'पॅरेडाईज लॉस्ट' या काव्यांतः—

"For contemplation he and valour formed,
For softness she and sweet attractive grace.
He for God only, *she for god in him.*"

( Book IV. )

या ॲडस् व ईव्हला अनुलक्षून लिहिलेल्या ओळी उपरिनिर्दिष्ट 'पति-देवता' समासाच्या खऱ्या अर्थाशीं कशा अगदीं तंतोतंत जुळतात पहा.

आतां **सहाव्या अंकांतील** श्लोकांच्या भाषांतरासंबंधीं थोडा विचार करूं. दुष्यन्ताचा वसंतोत्सव-मनाईचा हुकूम सृष्टिदेवतेन सुद्धां कसा अक्षरशः पाळला याचें कंचुकीनें केलेलें रसभरित वर्णन समश्लोक-समवृत्त भाषांतरांत प्रो. लेलेशास्त्र्यांनीं ठाकठीक बसविलें आहे. तें असेंः—

**आम्राला फुटली कधींच कलिका, ना ती विकासे परी**
**देठांतूनि सुटे, तरी न फुलते अद्यापि चांफेकळी।**
**संपे शीतऋतू, तरी न खुलला, त्या कोकिलांचा स्वर**
**मागें घेइ जणों भयें मदनही, ओढीयलेला शर ! ॥**

'स्वप्नो नु मायानु मतिभ्रमो नु' या मूळ श्लोकाच्या चवथ्या चरणाला एकंदर तीन पाठभेद असुन वेगवेगळ्या दृष्टीनें तिन्हीही सारखेच अन्वर्थक अतएव विचारार्ह आहेत. त्यांचा परामर्ष स्वतंत्र टीप देऊन लेलेशास्त्र्यांनी घ्यावयास पाहिजे होता. परंतु शाकुंतल प्रथमच हातीं धरणाऱ्या अनभिज्ञ होतकरू विद्यार्थ्यांची शास्त्रीबोवांनीं कांहींच सोय पाहिली नाहीं हें त्यांचे पुस्तकांत एक मोठेंच न्यून आहे. तथापि पुढील आवृत्तींत तें सुधारून घेण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. राजमुद्रिकेच्या पूर्ववृत्तास अनुलक्षून एकापुढें एक जे तीन सुंदर संस्कृत श्लोक मुळांत आहेत त्यांचें भाषांतर फारच समाधानकारक झालें आहे. त्यापुढें चित्र-फलकावर रेखावयाच्या पार्श्वभूमिकेसंबंधी राजानें विदूषकास सांगितलेलें तपशी-लवार वर्णन ज्यांत आहे व जो श्लोक चित्रकलेच्या दृष्टीनें शाकुंतलांत अत्यंत बहारीचा मानला जातो त्या 'कार्या सैकतलीन हंसमिथुना' या श्लोकाचें समग्र भाषांतर लेलेशास्त्र्यांनीं अवघ्या तीन साकयांमध्यें मोठ्या कुशलतेनें बसविलें आहे.

**सातव्या अंकांतील** 'सिध्यन्ति कर्मसु महत्स्वपि' या श्लोकाचें भाषांतर मुळांतील जोरदारपणा कायम राखून केलें आहे तें असें:—

भृत्यांलागुनि लाभतें यश महाकार्यांतहि, कारण
याचे एकचि होय कीं, प्रभु तयां देताती मोठेपण।
सूर्यानें नसते जरी बसविले अग्रस्थलीं स्यंदनीं
होता कांय तरी समर्थ अरुण ध्वांताचिया ध्वंसनीं? ॥

या अंकांतील वेगानें वर फेकल्या जाणाऱ्या पृथ्वीचें विस्मयकारक दृश्य, मारीच मुनीच्या आश्रमांतील वारुळांत अर्धवट गाडला गेलेला हटयोगी, जितेन्द्रिय तपस्व्यांची अप्सरांच्या नंदनवनांतील उग्र ध्यान–धारणा व सर्वदमनाचें चित्ताकर्षक हांसणें–खिदळणें या चार वर्णनपर श्लोकांचीं भाषांतरें कोठें तीन तर कोठें चार साक्या घालून लेलेशास्त्र्यांनी फार गोड व सरस केलीं आहेत. येथें विस्तारभयास्तव त्यांपैकीं फक्त दोनच साक्या देतों:—

मुळींच कांहीं कारण नसतां मंद हास्य करितात।
त्या योगानें थोड्या थोड्या दंतकळ्या दिसतात॥
बोल बोबडे मधुर बोलुनी रमविति मानस फार।
अंकावरती बैसायाची उत्कंठा अनिवार॥

यांतील बोबडे बोल प्रो० लेलेशास्त्र्यांनीं सर्वदमनाच्या तोंडीं कायम ठेविले आहेत. परंतु स्थलकालादि प्रश्नांचें विवेचन देतांना उपोद्घातांत ते लिहितात:— "पहिल्या पांच अंकांत सुमारें पांच महिन्यांचा काल जातो. सहाव्या व सातव्या अंकांत सहा वर्षांचें अंतर पडतें." हें अनुमान बरोबर मानल्यास सातव्या अंकांतील सिंहाच्या छाव्याशीं झगडणाऱ्या सर्वदमनाचें वय किमानपक्षीं पांच वर्षांच्या वर असलें पाहिजे. तसें असल्यास त्याच्या तोंडीं बोबडी भाषा काय म्हणून घातली आहे? मुलें सामान्यतः तीन साडे तीन वर्षांपर्यंत अडखळत व बोबडीं बोलतात; पुढें आणखी कांहीं वर्षें बोलणें गोड व मंजुळ असतें खरें. परंतु भाषा बोबडी क्वचित्च असते. म्हणून केशवराव गोडबोले यांनीं आपल्या 'महाराष्ट्र–शाकुंतलांत' सर्वदमनाच्या तोंडीं बोबडी भाषा घातलेली नाहीं. सातव्या अंकांतील अखेरच्या दोन श्लोकांचें म्हणजे मारीच मुनींचा दुष्यन्तास आशीर्वाद व भरतवाक्याचें भाषांतरही चांगले झाले आहे. सारांश,

प्रो. लेलेशास्त्र्यांचें शाकुंतलाचें भाषांतर पूर्वीच्या सर्व भाषांतरांहून सरस झालें आहे यांत शंका नाहीं. क्वचित कोठें दोषस्थळें नजरेस येतात, परंतु तीं इतकीं थोडीं व क्षुल्लक आहेत कीं, त्यांचा वेगळा नामनिर्देश केल्यानेंच त्यांना निष्कारण महत्त्व दिल्यासारखें होईल. शिवाय प्रो. तुळपुळे यांनीं आपल्या अभिप्रायाच्या अखेरीस इषारा दिलाच आहे कीं, "मानवी कृति निर्दोष असूं शकत नाहीं या नियमानुसार अगदीं क्वचित् प्रसंगीं एक अर्धा दोष दिसून येतो; पण त्यांतही रुचिवैचित्र्य, मतवैचित्र्य यांना वाव आहे." तथापि दोषस्थळांपैकीं नमुन्यादाखल एक सांगतों. सातव्या अंकाच्या भाषांतरांत पृष्ठ १०० वर "महतस्तेजसो बीजं' या श्लोकाचें भाषांतर अनुष्टुप् वृत्तांत:—

**हा बाल मोठ्या तेजाचें बीज हें मानि मन्मन।**
**इंधनाची वाट पाहणारा कीं अग्निचा कण॥**

असें दिलें आहे. यांतील तिसऱ्या पादांत यतिभंग आहे हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. तो दूर करणें झाल्यास दुसरी ओळ—

**इंधनाची अपेक्षा ज्या, वर्धिष्णू अग्निचा कण।**

येणेंप्रमाणें सुधारून अगर केवळ शब्दांची फिरवाफिरव करून—

**इंधनाची पाहणारा वाट कीं अग्निचा कण।**

अशी वाचली म्हणजे झालें. असो;

प्रो. लेलेकृत 'मराठी शाकुंतल' परीक्षणाच्या निमित्तानें पुनः एकवार कालिदासाचें हें रमणीय नाटक समग्र वाचून पाहाण्याची संधि मला मिळाली याबद्दल शास्त्रीबोवांचे आभार मानावे तेवढे थोडेच होणार आहेत. नाट्यशास्त्रदृष्ट्या संविधानक-रचनाचातुर्याबद्दल कालिदासाची शेक्स्पियरशीं तुलना अनेकांनीं अनेकदा केल्याचें आपण वाचतों. परंतु एक असामान्य नाटककार ही त्याची रास्त कीर्ति घटकाभर दृष्टीआड केली, तरी देखील कालिदास हा भावनामय प्रणयी जीवांचें अव्याजमनोहर सृष्टिसौंदर्याशीं लीलेनें तादात्म्य बनवून त्यापासून सहज सुचणारीं सत्य व शाश्वत प्रमेयें आपल्या कल्पनासमृद्धीच्या जोरावर

वाचकांच्या अंतःकरणास बरोबर पटवून देणारा असा एक विश्वदेवताचा एक-निष्ठ उपासक ( *Pantheist* ); पण त्याबरोबरच लौकिक व्यवहाराचें मर्म यथार्थतेनें जाणून जड व असार पृथ्वीची अद्भुतरम्य स्वर्गाशीं बेमालूम सांगड घालून देऊन त्यायोगें सामान्य संसारी जगास उल्हसित करणारा असा एक अद्वितीय महाकवि होऊन गेला यांत संशय नाहीं. विशेषतः त्याचें ' अभिज्ञान शाकुंतल' हें नाटक रसोत्कर्षामुळें आमूलाग्र सौंदर्यमय, बहारीचें व आल्हाददायक असेंच आहे. प्राचीन बुद्धिप्रकर्षाची व प्रतिभासंपन्नतेची साक्ष देणाऱ्या अतएव भरतभूमीस भूषणावह व हिंदवासियास अभिमानास्पद अशा गोष्टी दोनच—पैकीं एक आग्र्याचा ताजमहाल व दुसरी कालिदासाचें अभिज्ञान शाकुंतल. ह्मणून प्रिन्सिपॉल राजवाडे आपल्या निबंधांत लिहितात त्याप्रमाणें अशा काव्यमय व निर्दोष सृष्टींत कोणीही आपल्या छिद्रान्वेषी दृष्टीनें दोष काढीत बसूं नये. एकदा अवलोकन करून मनाचें समाधान होत नसेल तर त्याचें खुशाल अनेक-वार निरूपण करावें. नको कोण ह्मणतो ? पण कवि किंवा कारागीर कोठें, कां, व कसा चुकला यावर उगाच फुकाचें पांडित्य करूं नये. कारण, एका विख्यात आंग्ल कवीनें ह्मटल्याप्रमाणें:—

"Beauty is truth, truth beauty—that is all ye know on earth, and all ye need to know."

सहकुटुंब सहपरिवार ताजमहाल पहावयास् जाणाऱ्या मंडळीपैकीं लहान मुलांचें लक्ष जसें त्या जोत्स्नाधवल भव्य समाधिमंदिराकडे वेधण्याऐवजीं वाटाड्याच्या चर्पटपंजरीकडे प्रथम लागतें, तद्वत् अलीकडील विद्यार्थ्यांचेंहि लक्ष मूळ ग्रंथाऐवजीं भाषान्तरकार-टीकाकारादिकांच्या पारिभाषिक निरूपणाकडे प्रथम जाऊन शक्य तर त्यावरच निर्वाह करण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति दिसून येते. हा आधुनिक शिक्षणपद्धतींतील किंवा परीक्षा-पद्धतींतील दोष वेळींच ओळखून विद्यार्थ्यांनीं अशा प्रकारचीं सर्व आनुषंगिक उपकरणें बाजूस सारून गोड व सुंदर अशा या कालिदासाच्या मूळ कृतीकडेच अधिक लक्ष पोहोंचवावें एवढें सुचवून ही लांबलेली लेखमाला पुरी करतों.

( N. P. C. Magazine Vol XII No 2, Oct. 1927 )

# "कोंडाणा म्युनिसिपालिटीचा कारभार."

——:०:——

( एक काल्पनिक अहवाल )

ले०—श्री० श्रीधर बळवंत टिळक, ( माजी विद्यार्थी. )

पुण्यापासुनी लांब सोळाच मैल ।
असे एक किल्ला अती उंच शैल ॥

त्याचे मूळ नांव कोंडाणा परंतु पुढें सिंहगड नांवानें प्रसिद्धीस आला. या इतिहासप्रसिद्ध प्राचीन दुर्गावर आतां वस्ती अशी कितीशी असणार ? अवघे दहा बारा बंगले; व तेहि उन्हाळयाच्या सीझनपुरतेच गजबजलेले. बाकी नऊ महिने शुकशुकाट. नाहीं म्हणावयास किल्ल्यावर दोन चार जुनीं पुराणीं देवालयें पंचमहाभूतांच्या कडव्या अंमलाखालीं अद्याप टिकाव धरून आहेत.परंतु त्यांपैकीं राजारामाच्या छत्रीलाच काय तें साताऱ्याच्या महाराजांचे इष्टेटींतून वार्षिक उत्पन्न आहे. त्यांतून जेमतेम रोजची पूजाअर्चा व पुण्यतिथीचें एक ब्राह्मण-भोजन कसेंबसें पार पडतें इतकेंच. बाकीच्या देवळांची व्यवस्था अखिल जगतांतील बेवारशी चराचर वस्तूंचा संभाळकर्ता किंवा ट्रस्टी जो परमेश्वर त्याकडे कायमची सोंपविलेली ! अशा रीतीनें परिस्थिति फारशी आशाजनक नसतांहि सालगुदस्तां आम्हीं तेथें म्युनिसिपालिटीचा प्रयोग करून पाहण्याचें ठरविलें. किल्ल्यावरील दहा बारा बंगल्यांपैकीं एक बंगला मूळ मालकापासून ट्रस्टींच्या ताब्यांत गेलेला, दोन बंगले मालकांचे निर्धनत्वामुळें अगदीं मोडकळीस आलेले व तीन बंगलेवजा कौलारू झोपडया, माळी, रखवालदार, पुजारी वगैरे स्थाईक रहिवाश्यांचे वहिवाटीस वंशपरंपरेनें लाभलेल्या. रोहतां राहिले सहा बंगले. त्यांचे मालक मात्र दरसाल नियमित किल्ल्यावर रहावयास येत असत.सर्वांत उत्तम बंगला

खानबहादुर वरजोरजी नसरवानजी लिलांववाला या पारशी गृहस्थांचा. हे मुंबईतील एक सधन सॉलिसिटर असुन त्यांच्या राजनिष्ठेबद्दल आपल्या दयाळु इंग्रज सरकारनें त्याना नुकताच 'खानबहादुर' हा किताब बहाल केला होता. अर्थातच ते हिंदुस्थानांतील स्वराज्यविषयक राजकीय उलाढालीचे वाऱ्यालाहि उभे राहणें शक्य नव्हतें. तथापि सहकारी पतपेढ्या, शिशुसप्ताह, अस्पृश्यतानिवारण वगैरे राजमान्य चळवळींना त्यांचा पूर्ण पाठिंबा असे. दुसरा बंगला सिस्टर ॲफिनिटी यांचा. या अमेरिकन बाई एका रेड्क्रॉस अमेरिकन मिशनरी सोसायटीच्या आजन्म-सेविका बनून समाजसेवेचे बळावर धर्मप्रसार करण्यासाठीं नुकत्याच हिंदुस्थानांत आल्या होत्या; व त्यांनीं किल्ल्यावर आपल्या बंगल्याशेजारीं कुणब्यामाळ्यांचे दुःखनिवारणार्थ अलीकडे एक मोफत दवाखानाहि सुरू केला होता. बाई मध्यम वयाच्या असुन दिसण्यांत मोठ्या कनवाळु, परोपकारी व महत्त्वाकांक्षी दिसत. त्यांचें पूर्ववृत्त इकडे कोणास फारसें माहीत असण्याचा संभव नव्हता. अर्थात् 'वृद्धा नारी पतिव्रता' या न्यायानें त्या सर्वांस सारख्याच पूज्य होत्या त्यांची चालचलणूक अदबीची व बोलणें नेहमीं उपदेशपर, कळकळीचे व ऐकणाराचे अंतःकरणावर ठसा उमटण्यासारखें असे. तिसरा बंगला मि. कादरभाई सुलेमानभाई यांचा. हे आगाखानी पंथाचे बोहोरी व्यापारी असून त्यांचे लष्करांत मेनस्ट्रीटवर लोखंडी सामानाचें मोठें दुकान होतें. सदा सर्वकाळ आपल्या व्यापारी व्यवसायांत मग्न असल्यामुळें किल्ल्यावरहि ते फारसे इतरांशीं मिळून मिसळून वागत नसत. त्यांना बाल्कन युद्धापासुन हस्तंबूलच्या राज्यक्रांतीचा इत्थंभूत इतिहास व मुसलमानी धर्मक्षेत्रांतील सर्व उलाढाली चांगल्या अवगत होत्या, इतकेंच नव्हे तर जर्मन महायुद्धानंतर ते हवेली तालुक्यापुरते खिलापत फंडाचे एक सन्मान्य खजिनदारहि होते. माझी आठवण खड असेल तर याच सुमारास त्यांच्या बंगल्याची डागडुजी, रंगसफेती व नवें कांटेरी तारेचें कंपौंड वगैरे दुरुस्ती झालेली होती. ते आपलीं मतें फारशीं कधीं कोणास बोलून दाखवीत नसत. परंतु माझें त्यांच्याशीं एकदां जें थोडें संभाषण झालें त्यावरून त्यांची ठाम समजूत अशी दिसली कीं, तरुण तुर्कांचे मदतीखेरीज आतां हिंदुस्थानाला दुसरा तरणोपाय नाहीं! चवथा बंगला डॉ. वेंकट सुब्बय्या यांचा. हे १९१२ सालीं मुंबई-

च्या ग्रॅन्ट मेडिकल कॉलेजांतील शेवटची परीक्षा उत्तीर्ण होऊन बाहेर पडल्याबरोबर सुदैवानें जर्मन महायुद्ध सुरू झालें, व त्यांना एकदम मिलिटरी कमिशन् मिळालें. महायुद्धाचीं पांच वर्षे हिंदुस्थानाबाहेर इराक,सुएझ गॅलिपोली, मोंबासा इ. वेगवेगळ्या रणक्षेत्रांवर घालवून अखेर युद्धसमाप्तीनंतर टेंपररी लेफ्टेनंटच्या लष्करी हुद्यावरून रिटायर होऊन त्यांनीं खडकीस प्रायव्हेट हॉस्पिटल उघडलें होतें. वरींच वर्षे हिंदुस्थानाबाहेरच्या जातिनिरपेक्ष वातावरणांत घालविल्यामुळें त्यांचीं मतें उदार,व स्वभाव दिलदार बनला होता. जन्मतः ते महाराष्ट्रीय असल्यामुळें त्यांना मराठी भाषा चांगली अवगत होती व सर्वांशीं ते मोकळ्या मनानें वागत असत. बाहेरच्या जगाशीं कांहीं काळ प्रत्यक्ष संबंध आल्यामुळें त्यांची हरएक प्रश्नावर विचार करण्याची पद्धत व्यापक स्वरूपाची होती. त्यांना शिकारीचाहि बराच नाद होता. पांचवा बंगला प्रो. लखोटे यांचा. हे गृहस्थ पुण्यांतील एक नामांकित इतिहाससंशोधक असल्यामुळें त्यांना लोक प्रोफेसर या नांवानें संबोधीत असत. स्वतःच्या लहरी व एकलकोंड्या स्वभावामुळें नवख्या इसमांस त्यांची वागणूक कांहींशी चमत्कारिक भासे. तथापि एकंदरीनें विचार करतां लोकांचा समज होता तेवढे ते कंजुष व तुसड्या स्वभावाचे खास नव्हते. ऐतिहासिक बखरी व जुन्या अस्सल दफ्तरी कागद–पत्रांसंबंधींचा त्यांचा व्यासंग भला दांडगा होता; व त्यामुळें ऐतिहासिक प्रसंगांच्या आधारावर अद्भुतरम्य काल्पनिक कथानकें खरडणाऱ्या नाटककारांना व कादंबरीकारांना ते नेहमीं शिव्यांची लाखोली वहात.आमचा खराखुरा इतिहास त्यांत हवें तें घुसडून देऊन जर कोणी भ्रष्ट केला असेल तर त्याचा दोष इंग्रज इतिहासकारांपेक्षां आमच्या इकडील निरंकुश लेखकांकडेच जास्त येतो असें त्यांचें ठाम मत होतें. सहावा बंगला अस्मादिकांचा. माझें मी स्वतःच वर्णन केलें तर माझी खास पढतमूर्खांत गणना व्हावयची. तथापि येवढें लिहिण्यास हरकत नाहीं कीं, वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने भरून काढण्याचा ज्यांचा पिढीजाद धंदा अशा इरसाल चित्पावन ब्राह्मण जातींपैकीं मीही एक छोटेखानी लेखणीबहाद्दर होतों. असो;

सालगुदस्ता एके दिवशीं यदृच्छेनें असा योगायोग जमून आला कीं, सायंकाळीं सहल करतां करतां, आम्ही सर्वजण सूर्यास्ताचें नितांत रम्य दृश्य

पहाण्यासाठीं बालेकिल्ल्याचे माथ्यावर जमलों. 'साहेब जी,' 'गुड ईव्हिनिंग' वगैरे औपचारिक सलामी झाल्यावर हेमाडपंती शिवालयाच्या पिछाडीचे टेकडीच्या माथ्यावर सर्वजण अंमळ विश्रांतीसाठीं बसलों. एकमेकांच्या प्रकृति-स्वास्थ्यासंबधीं व एकंदर हवापाण्यासंबंधीं हालहवाल व कुशल प्रश्न विचारणें झाल्यावर कादरभाई उद्गारले:--"किल्ल्यावरचे समदा माळी लोक खराब. बंगल्याचा बंदोबस्त अच्छा तऱ्हेसे नहीं रखते, हमेश तक्रार." त्यावर मी सुचविलें:--"शेट, या लोकांना वठणीवर आणण्यास येथें एक म्युनिसिपालिटी स्थापन करणें अत्यंत जरूर आहे." माझी सूचना ऐकून सर्वजण खो: खो: हसूं लागले. सिस्टर व्हॅनिटी ह्मणाल्या–'Really a nice idea.' या बाईंना थोडें-फार मराठी समजूं लागलें होतें व मोडकें तोडके बोलण्याचाही मधून मधून त्या प्रयत्न करीत. डॉ. वेंकटसुब्ब्या म्हणाले:–"म्युनिसिपालिटी आली कीं निवडणु-कींचा खटाटोपहि पाठोपाठ आलाच." खानबहादुर म्हणाले—'त्याची काळजी नको. कारभारासंबंधींच्या व निवडणुकीसंबंधींच्या नियमांची व पोटकलमांची घटना तयार करण्याचे काम मी पतकरतों. मुंबईच्या फर्ममध्यें आम्ही दोघे चौघे सॉलि-सिटर एकत्र बसलों कीं कसलाही भानगडीचा डॉक्युमेण्ट हां हां म्हणतां लिहून काढतों. म्युनिसिपल ॲक्ट, कंपनीज, ॲक्ट, ट्रस्ट ॲक्ट वगैरे कायद्याचीं बुकें आमच्या टेबलावर नेहेमीं धूळ खात पडून असतात. यावर प्रोफेसर लखोटे म्हणाले:—" निवडणुकी हव्या कशाला? बंगलानिहाय एक एक सीट निर्माण केली म्हणजे झालें." मी या गोष्टीस ताबडतोब रुकार दिला कारण प्रत्येक बंगल्याचा मालक वेगळ्या जातीचा असल्यामुळें या सूचनेच्या योगानें नुसती निवडणुकीची दगदग वांचत होती येवढेंच नव्हे तर जातवार प्रतिनिधित्वाच्या संकटांतूनहि कोंडाणा म्युनिसिपालिटीची आपोआपच सुटका होत होती. थोडा विचार करून खानबहादुर म्हणाले:—"मग काय आपण सर्वजण म्युनिसिपल कौन्सिलसच येथें जमलों म्हणायचें! बोला अध्यक्ष कोणाला निवडतां?" सर्व जण अंमळ बुचकळ्यांत पडले, पण डॉक्टर वेंकटसुब्ब्यांनीं सिस्टर व्हॅनिटीबाईंकडे बोट दाखवून आपलें स्त्रीदाक्षिण्य व्यक्त केलें. खान-बहादुरांची किंचित् निराशा झाल्यासारखी दिसली. त्यांना फार आशा

वाटत होती कीं, अध्यक्षपदाची माळ एकमतानें बहुधा आपल्या गळयांत पड-णार. परंतु सिस्टर व्हॅनिटी यांनीं आपल्या गोड स्वभावाचे व भूतदयेचे जोरा-वर मिळविलेला नांवलौकिक येवढा मोठा होता कीं,—

' गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं नच वयः ' ।

या न्यायानें सर्वांना डॉक्टरसाहेबांची सूचना शिरसा वंद्य वाटली.

अशा रीतीनें सिस्टर व्हॅनिटी या कोंडाणा म्युनिसिपालिटीच्या अध्यक्ष पदावर बिनहरकत बिनविरोध निवडून आल्या. त्या ह्मणाल्याः— " आपल्या सर्वांच्या इच्छेस मान देऊन मला ही नवीन जबाबदारी बिनबोभाट पार पाडली पाहिजे. दर शनिवारीं सायंकाळीं ६ वाजतां सर्वांनीं या मोकळ्या जागीं जमून म्युनिसिपालिटीचा कारभार पाहाण्याचे कामीं मला हातभार लावावा. खानबहादूर लिलांववाला यांना मी उपाध्यक्ष नेमतें; व भय्यासाहेब ( मला किल्ल्यावर सर्वजण याच नांवानें ओळखीत ) आपणाला मी सेक्रेटरी नेमतें. पुढील बैठकीसाठीं तुह्मी बजेटचा कच्चा खर्डा तयार ठेवा. खानबहादरांची नियमावली तयार होऊन मुंबईहून छापून येईपर्यंत प्रत्येक वादग्रस्त प्रश्नावर माझा निकाल प्रमाण मानावा लागेल. आपणांस यापुढें अनेक महत्त्वाचे प्रश्न वेळोवेळीं विचारपूर्वक निकालांत काढावे लागतील. तरी ज्याला जे योग्य वाटतील ते ठराव पुढील बैठकीचे आंत लेखी लिहून सहीनिशी म्युनि-सिपल सेक्रेटरीचे म्हणजे भय्यासाहेबांचे स्वाधीन करावे. आज सर्वांनीं मला अध्यक्षस्थानीं नेमून माझा हा जो बहुमान केला त्याबद्दल आपले सर्वांचे व्यक्तिशः मी आभार मानतें. "

कोंडाणा म्युनिसिपालिटीच्या प्राणप्रतिष्ठेच्या पहिल्या बैठकीचा समारोप वरील प्रकारें होऊन सभेचें काम आटोपलें व प्रत्येकानें बालेकिल्ल्यावरून आप-आपल्या बंगल्याचा रस्ता सुधारला. वाटेंत कादरभाई मला म्हणाले:—" या तुमच्या म्युनिसीपालिटीच्या कारभारांत आमच्यासारख्यांना काय कळणार ! खरें कीं नाहीं ? आम्हीं व्यापारी पेशाचीं माणसें. फार तर आमचा तुम्हांस येव-ढाच उपयोग होईल कीं, म्युनिसिपालिटीनें शाळा, मार्केट वगैरे इमारतींचे बांध-कामासाठीं टेंडरें मागविल्यास सवलतीचे दरानें एकादें टेंडर देऊं. कारण अली-

कडे वखारीचे धंद्यास जोडून कंत्राटें घेण्याचें कामही आम्हीं सुरू केलें आहे. बाईनीं तुम्हाला सेक्रेटरी नेमिलें आहे. तेव्हां म्हणतों आमचे दुकानचा यत्ना नेहेमीं लक्षांत असूं द्या." मीहि त्यांना 'वा: शेटजी तुमच्या मदतीवर तर आमची सर्व भिस्त' असें आश्वासन देऊन घरीं परतलों. बजेट तयार करण्याचें काम सेक्रेटरी या नात्यानें मजकडे आल्यामुळें दुसरे दिवशीं पूर्ण विचारांती मीं पुढीलप्रमाणें बजेटाचा कच्चा खर्डा लिहून काढला:—

## कोंडाणा म्युनिसिपालिटीचें बजेट.

### ( कच्चा खर्डा )

**जमा**

(१) घरपट्टी—प्रत्येक बंगल्याचे मालकाकडून दरसाल रु. १०० प्रमाणें अंदाजें वसूल रु. ७५०

(२) पाणीपट्टी—देवटाक्याचे पिण्याचे पाण्यावर दर गॅलनमागें १ पैसा प्रमाणें सालीना रु. १००

(३) तिकिट विक्री—किल्ला पहावयास येणाऱ्या प्रवासी प्रेक्षकांकडून खुर्ची करून येणाऱ्यास ४। आण्यांचें व पायीं चढून येणाऱ्यास १ आण्याचें तिकीट विकून येणारा वसूल अंदाजें. रु. ३००

(४) जकात नाकें—पुणें व कल्याण दरवाज्याचे बाजूनें किल्ल्यावर विक्रीसाठीं येणाऱ्या दूध, तूप, खवा, मिठाईवाल्यांकडून दर

**खर्च**

(१) वसुली खात्याकडे कारकून एक. पगार दरमहा रु. २० कायम नेमणुक, रु. २४०

(२) पुणें व कल्याण दरवाज्यावरील जकात नाक्यावर देखरेखीसाठीं हंगामी कारकून दोन, सीझनचा उक्ता पगार प्रत्येकीं रु. पन्नास प्रमाणें रु. १००

(३) व्हील–टॅक्स व पाणी–पट्टीचे वसुलीसाठीं गाडीतळावर व देव–टाक्यावर कायमचे दोन पटाण नेमणें झाल्यास अंदाजें खर्च, रु. २००

(४) किल्ल्यावर येणाऱ्या सडकेची व पायवाटांची दुरुस्ती, तसेंच देव–टाक्याचें पिण्याचे पाणी स्वच्छ

खेपेस ०१ आणा व करवंदें, कैऱ्या, आंबे, हिरडे, मध वगैरे विकणाऱ्यांकडून दरखेपेस एक पैसा प्रमाणें दरसाल अंदाजें वसूल, रु. ७५

(५) व्हील टॅक्स—किल्याचे पायथ्याशीं गाडीतळाचे आश्रयास येणाऱ्या सायकलीमागें ०१ आणा, मोटार सायकलीमागें ०४ आणे, खाजगी मोटारगाडीमागें ०८ आणे व पुणे ते सिंहगड खेपा करणाऱ्या मोठ्या सर्व्हिस लॉरीवर दर फेरीस रु. १ प्रमाणें अंदाजें वसूल रु. २५०

(६) किरकोळ बाबी रु. २५

| | |
|---|---|
| एकंदर जमा, | रु. १५०० |
| एकंदर खर्च, | रु. १००० |

शिल्लक रक्कम रु.५००(फक्त पांचशें)

राखण्याबाबत दरसाल अंदाजें खर्च, रु. १५०

(५) एक पट्टेवाला शिपाई ऑफिसचे कामासाठीं कायम नेमणूक, पगार दरमहा बारा रुपये व पोषाख, रु. १६०

(६) छपाई, स्टेशनरी वगैरे रु. १००

(७) डोणज्याचे पोष्टांतून रोजचे रोज म्यु. चें टपाल किल्ल्यावर आणून पोहोंचविणें, व ऑफिसचीं पत्रें नेऊन पोष्टांत टाकणें हें काम पत्करणाऱ्या पोस्टमन रनरला पारितोषिक, रु. २५

(८) किरकोळ ऑफिस खर्च, रु. २५

एकंदर खर्च, रु. १०००

येणेंप्रमाणें बजेटचा कच्चा खर्डा पद्धतशीर तयार करून मी तो सिस्टर व्हॅनिटी यांना त्यांचे बंगल्यावर भेटून समजाऊन दिला. तेव्हां त्या म्हणाल्या ‘ येत्या शनिवारचे बैठकीपुढें बजेट मांडू. तुंत याच्या नकला करून त्या प्रत्येक कौन्सिलरचे दोन दिवस अगोदर हातीं पडतील असें करा म्हणजे एकदरीनें रागरंग कळून येईल. ’ अध्यक्षांचे हुकुमावरून मीं बजेटची नकल ताबडतोब घरोघर रवाना केली.

पूर्वी ठरल्याप्रमाणें शनिवारीं सायंकाळीं बरोबर सहा वाजतां बालेकिल्ल्यावरील शिवालयाचे पिछाडीस चौफेर काळ्या कुळकुळीत उभ्या खडकांनीं वेष्टिलेले निसर्गनिर्मित नगरभुवन आहे त्या जागीं सर्व सभासद वक्तशीर हजर झाले. डॉ. वेंकटसुब्बय्या मात्र कोठें दिसेनात. अखेर चौकशी करतां ते सीताबाईचे दरीकडे शिकारीला गेल्याचें कळलें. सिस्टर व्हॅनिटी स्थानापन्न झाल्या व त्यांनीं बजेट वाचून दाखविण्यास मला फर्मावलें. उभे राहून बजेट मोठ्यानें वाचून दाखविल्यावर मी थोडा खुलासा करण्याविषयीं अध्यक्षांची परवानगी घेऊन पुढील भाषण केलें:— " हें बजेट मीं पूर्ण फडणिशी दृष्टीनें म्हणजे डोळ्यांत तेल घालून तयार केल आहे. सकृतदर्शनीं त्यांत आपणांस कदाचित कांहीं दोषस्थळें दिसतील. उदाहरणार्थ जमेच्या बाजूचा विचार करितां घरपट्टी फार जबर आहे व आयात मालावरील जकात फाजील सौम्य आहे असे कोणास वाटेल. परंतु येथें टुमदार बंगले बांधून रहावयास येणाऱ्या पुण्या–मुंबईच्या सधन व सुखवस्तु लोकांचे आणि घेरा सिंहगड टापूंतील कोळी मेटकरी, तेली वगैरे पोटार्थी लोकांचे सांपत्तिक स्थितींत केवढें जमीन अस्मानाचें अंतर आहे याचा विचार केल्यास गोर–गरिबांस डोईजड होईल अशी जकात बसविणें आपल्या हिताचें नाहीं. गोर–गरिबांना जाचक होतील असे कर बसविल्यास त्याचा परिणाम असहकारितेंत अगर सत्याग्रहांत होतो असा इतिहासाचा सिद्धांत आहे. या लोकांनीं आपणांशीं जर कां असहकारिता पुकारिली तर येथील बंगले येथेंच टाकून आपणांस पुण्यामुंबईची हवा खात स्वस्थ बसावें लागेल. मुंबई सरकारकडे अर्ज करून घेरा सिंहगड टापूंतील जंगल खात्याचें उत्पन्न जर आपले म्युनिसिपालिटीस तोडून मिळेल तर साग, हिरडा, सरपण, गवत वगैरेचे मोठे लिलांव करून म्युनिसिपालिटीच्या उत्पन्नांत आणखी हजार पंधराशें रुपयांची सालीना भर टाकतां येईल. परंतु तोंपर्यंत तरी घरपट्टी कमी करतां येणें जवळ जवळ अशक्य आहे. आतां खर्चाचे बाबींचा विचार करता त्यांत काटकसर करण्यास कोठेंच जागा नाहीं. नाहीं म्हणावयास जकातनाकीं लिलांवानें सोंपविल्यास त्यावर देखरेख ठेवणाऱ्या हंगामी कारकुनांच्या पगाराची म्हणजे शंभर रुपयांची बचत होईल. परंतु लिलांवाच्या रकमेची सरासरी

निश्चित होईपर्यंत पहिलीं पांच-सहा वर्षे म्युनिसिपालिटीची प्रत्यक्ष देखरेख दोन्ही जकात नाक्यांवर जरूर पाहिजे असें मला वाटतें. तरी अत्यंत काळजीपूर्वक तयार केलेलें हें बजेट आपण एकमतानें जसेंच्या तसेंच पास कराल अशी मला आशा आहे." भाषण संपवून मी खालीं बसलों. माझ्या पहिल्या बजेट-स्पीचला टाळया पडतील अशी माझी कल्पना होती. परंतु कोठें कांहींच हालचाल न झाल्यामुळें मी प्रत्येकाकडे निरखून पाहतों तों काय चमत्कार वर्णावा! सिस्टर व्हॅनिटी या खालीं मान घालून मुकाट्यानें वायबलचीं पानें चाळीत होत्या. कादरभाईचें लक्ष तोरण्याचे बाजूकडे लागलेल्या वणव्याकडे वेधलें होतें. प्रो. लखोटे हे तानाजीच्या समाधीकडे टक लावून कसल्या तरी गहन विचारांत गर्क होते आणि स्वतः खानबहादूर तर पुरंदर किल्ल्यावरून मधून मधून लकाकणारी चकमक नक्की कोणत्या बंगल्यांतील लोकांनीं लावलेली असावी याचा आपल्या दुर्बिणींतून बारकाईनें शोध काढीत अध्यक्षांचे मागील बाजूस पाठमोरे उभे होते. मी माझे हातांतील बजेटचा खर्डा सिस्टर व्हॅनिटी यांचेपुढें सहीसाठीं ठेवतांच त्यांनीं सावकाश आपलें बायबल मिटलें व बसल्या जागेवरून त्या म्हणाल्याः—" आपल्या कोंडाणा म्युनिसिपालिटीचे उत्साही सेक्रेटरी श्री. भय्यासाहेब यांनीं चालू सालचें बजेट तयार करून आपणांपुढें आतां मांडलेंच आहे. तें पास करण्यापूर्वी त्यासंबंधीं विधायक स्वरूपाच्या कोणास कांहीं उपसूचना आणणें असल्यास यावेळीं जरूर मांडाव्या. 'बजेट' ही अत्यंत महत्त्वाची बाब असल्यामुळें पूर्ण चर्चेअंतींच तें पास अगर नापास करावयाचें असा सार्वत्रिक रिवाज आहे; आणि सूर्यास्तास अद्याप एक तासभर अवकाशहि आहे. ठरावांचे लेखी मसुदे सेक्रेटरींचे हातीं अद्याप आलेले नसल्यामुळें आजचे मीटिंगचे ॲजेण्डावर 'बजेट' खेरीज अन्य विषय नाहीं. तेव्हां मोकळ्या मनानें बजेटवर मनमुराद चर्चा करण्यास कसलाहि प्रत्यवाय नाही." अध्यक्षांच्या या भाषणामुळें सभेतील निःस्तब्धपणा मोडला आणि बाईंच्या परवानगीनें प्रो. लखोटे हे बजेटचा खर्डा हातीं घेऊन भाषण करण्यास उभे राहिले. आपल्या तंद्रींतून नुकतेच खडबडून जागे झाल्यामुळें डोळे चोळीत चोळीत ते म्हणालेः—" श्री. भय्यासाहेब यांच्या बुद्धिमत्तेबद्दल किंवा त्यांनीं हें बजेट तयार कर-

ण्याचे कामीं जे परिश्रम घेतले आहेत त्याबद्दल कांहीं वाद नाहीं. तथापि मी हा खर्डा काळजीपूर्वक वाचून आलों आहे आणि मला आश्चर्य वाटतें तें हें कीं, या बजेटमध्यें पांचशें रुपये शिल्लक काय म्हणून दाखविले आहेत ? ज्या बजेटमध्यें जमेची व खर्चाची तोडमिळवणी अगदीं बेमालुम साधली असेल तेंच खरें बजेट; व तोच खरा हिशेबी फडणीस. एखाद्या वर्षी खर्च जास्त दाखविला तरी एक वेळ तें क्षम्य होईल; पण शिल्लक दाखविणें म्हणजे जाणून बुजून भांडणाचें मूळ निर्माण करण्यासारखें आहे. आपल्या या गरीब म्युनिसिपालिटीच्या तिजोरींत पहिल्याच वर्षी पांचशें रुपये शिल्लक पडणार असा सुगावा सरकारास लागल्यास आपले हातीं अर्ज करूनहि जंगलखात्याचें उत्पन्न पडण्याचा संभव आहे काय याचा आपण सर्वांनीं नीट विचार करावा. म्हणून मी म्हणतों कीं पहिलीं दहा पांच वर्षे तरी आपणांस कारभारांत सालोसाल तूट येते असेंच दाखविलें पाहिजे. तात्पर्य, आपलें बजेट हें 'डेफिसिट–बजेट' दिसलें पाहिजे." प्रो. लखोटे यांच्या भाषणाचा अस्खलित प्रवाद चालू असतां मी एका कागदाचे चिटोऱ्यावर 'तूर्त शिल्लक म्हणून जी रक्कम बजेटांत दाखविली आहे तिचा विनियोग या पुढील साप्ताहिक बैठकींतून शिक्षण, आरोग्य दिवाबत्ती वगैरेसंबंधीं जे जे ठराव वेळोवेळीं पसार होतील त्यामुळें निश्चित होईलच. शिल्लक म्हणजे कायमची गंगाजळी ठेव नव्हे' असा मजकूर खरडून त्यांचे हातीं दिला. परंतु तो न वाचतांच घडी करून त्यांनीं तो कागद मुकाट्यानें आपल्या विजारीच्या खिशांत कोंबला व यत्किंचितहि न डगमगतां ते पुढें म्हणाले:—'दुसरें असें कीं अमुक एक येवढी रक्कम शिल्लक टाकावयाचीच असें अगोदर मनांत योजून आपल्या सेक्रेटरींनीं हें बजेट तयार केलेलें दिसतें. एरव्हीं घरपट्टी येवढी बेसुमार लादली गेली नसती. पांचशें रुपये हे केवळ घरपट्टीचे जोरावर शिल्लक पडत आहेत असें या खर्ड्यावरून सिद्ध होत नाहीं काय ? तेवढे वजा करून बजेटांतील जमेच्या बाजूला पहिलाच आकडा रु. ७५० ऐवजीं रु. २५० केला तर बंगल्यामागें दरसाल अवघी ३०–३५ रुपये घरपट्टी बसते. आणि माझे मतें तेवढीच बसविणें रास्त होईल. आम्ही जे येथें बंगले बांधून रहावयास येतों ते कोणत्याहि आर्थिक प्राप्तीसाठीं नसून, केवळ आरोग्यप्राप्ती-

साठीं होय, हें सत्य डोळ्याआड करून कसें चालेल ? बंगल्याचे बंदोबस्तासाठीं कायमचा पगार देऊन एक रखवालदार येथें ठेवावा लागतो. शिवाय पावसाळ्यांत दरसाल गवती छपरांच्या झड्या बांधाव्या लागतात, पडझड दुरुस्ती, रंगसफेती करावी लागते. मिळून सालीना सहज शें— दोनशें रुपये नुसता बरदास्तीचा खर्च येतो. ही गोष्ट प्रत्येक बंगले वाल्यास स्वानुभवारून माहीत आहेच. अर्थात किल्ल्यावरील बंगले हें प्राप्तीचें साधन नसून एक मोठी खर्चाची बाब आहे. त्यांत आणखी १०० रुपये घर-पट्टीचा जबर बोजा म्युनिसिपालिटीनें लादल्यास मुकाट्यानें आपआपले बंगले मोडून आम्हांस पुण्या—मुंबईत कायमचें राहणें भाग पडेल. आतां आपले सेक्रे-टरीसाहेब कदाचित् असें म्हणतील कीं, म्युनिसिपालिटी दोन पठाण नोकरीस ठेव-णार असल्यामुळें वेगळ्या रखवालदारांची यापुढें जरूर नाहीं. पण मीं असें स्पष्ट बजावतों कीं, किल्ल्यावर पठाण आणून म्युनिसिपालिटीचे बजेटांत शिल्लक दाखविणें म्हणजे येथें आजपर्यंत कधींहि कोणास माहित नाहीं अशा प्रकारच्या चोऱ्या, मारामाऱ्यांचें बीजारोपण करून देणें होय. म्युनिसिपालिटीचें हें आत्म-घातकीपणाचें धोरण मला सर्वस्वीं नापसंत आहे. म्हणून आपल्या सर्वांच्या हितसंरक्षणार्थ मी अशी उपसूचना पुढें मांडतों कीं, बजेटांतील शिल्लक नाहींशी करण्यासाठीं घरपट्टीचा आंकडा सर्व बंगले मिळून फक्त रु. २५० करण्यांत यावा." प्रो. लखोटे यांच्या या आवेशयुक्त भाषणाचा कादरभाईचे मनावर येवढा परिणाम झाला कीं त्यांनीं पाठोपाठ उभें राहून "आपले प्रोफेसरसाहेब लई हुशार माणूस. झूट बात कशापायीं करेल. बजेट खराब. सेक्रेटरी बडा बद-माष !" वगैरे कांहीं तरी विपरीत उद्गार काढले. मी ताबडतोब अध्यक्षांकडे तक्रार केली व एकतर कादरभाईनीं मला अनुलक्षून वापरलेली निंदागर्भ व उपमर्दकारक भाषा सपशेल परत घेऊन दिलगिरी प्रदर्शित करावी अगर सेक्रेटरीशिपचा माझा राजीनामा जागचे जागीं मंजूर करण्यांत यावा असा खूप त्रागा केला. इकडे कादरभाईच्या कानांत मी हळूच बोललों—" अरे भाई ! बजेटवरील शिल्लक रकम उडवून टाकल्यावर आम्ही कामें तीं काय काढणार व तुम्हाला कंत्राटें तीं कशाचीं मिळवून देणार ? " माझा कानमंत्र तात्काळ लागू पडून कादरभाईनीं—

'परिहासविजल्पितं सखे परमार्थेन न गृह्यतां वचः'।

या युक्तीचा अवलंब करून एकदम टोपी फिरविली व सर्व वाद थट्टेवारी नेऊन स्वतःची हंसत हंसत सोडवणूक करून घेतली.

इतक्यांत गणेश–टाक्याचे बाजूस एक म्हैस टाक्यांत पडल्याचा बोभाटा कानांवर आला व बंगल्यांच्या माळ्यांची धांवपळ सुरू झाली. म्हशीसारख्या अवजड जनावराला खोल पाण्यांतून वर काढण्याचे कामीं जे श्रम पडतात व कौशल्य खर्च करावें लागतें तें एक प्रेक्षणीय दृश्य असल्यामुळें सर्वजण तिकडे जाण्यास मनांतून फार उत्सुक दिसले. बजे-टावर उत्तरादाखल शेवटचें भाषण करण्याचा माझा हक्क होता, परंतु या धांद-लींत प्रो. लखोटे यांना उत्तर देण्याची मला संधि देण्याचें भान न राहिल्या-मुळें सिस्टर व्हॅनिटी यांनीं त्यांच्या उपसूचेवर एकदम मतें मागवलीं; आणि खानबहादुर व कादरभाई यांनीं हात वर केलेले पाहून तीन विरुद्ध दोन मतांनीं उपसूचना पास झाली असा आपला अभिप्राय अध्यक्षांनीं जाहीर केला. परंतु मागाहून चौकशी करतां मला कळून चुकलें कीं, म्हैस खोल टाक्यांत पडल्याचें ऐकून अल्लाची करुणा भाकण्याकरितां कादरभाईंनीं हात वर केले होते व त्याच गर्दींत आपल्या बंगल्याचे माळ्यास तिकडे मदतीस धांवून जाण्यासाठीं खान बहादुर मार हातवारे कर करून खुणावण्यांत गर्क होते. बजेटमधील बाकीच्या तपशिलासंबंधीं मतभेद नसल्यामुळें अखेर प्रो. लखोटे यांच्या उपसूचनेसह सर्व बजेट गर्दीगर्दीनें पसार करून बैठक पुढील शनिवारपर्यंत तहकूब केल्याचें जाहीर होतांक्षणीच सर्वजण गणेश–टाक्याकडे धांवले. परंतु मध्यंतरीं हा जो किंचित विलंब लागला तेवढ्यांत पुणें दरवाज्यानें खांद्यावर रायफल टाकलेले डॉ. वेंकटसुब्य्या व रान वेढण्यासाठीं त्यांनीं बरोबर नेलेलीं वीस–पंचवीस मेटकरी पोरें पळत येऊन त्यांनीं पोटाखालून दोन वांबू घालून म्हैस टाक्यांतून वरहि काढली होती असो;

अशा अनपेक्षित रीतीनें कोंडाणा म्युनिसिपालिटीचे अत्यंत महत्वाचें बजेट—सेशन निकालांत निघाल्यामुळें प्रेसिडेंट व सेक्रेटरी यांचे शिरावरील ओझें पुष्कळच हलकें झालें. अद्याप सर्व कौन्सलर्सकडून लेखी ठराव यावयाचे होते. डॉ. वेंकटसुब्य्या यांनीं मात्र आपले ठराव शिकारीहून आल्याबरोबर

तावडतोब लिहून काढून मजकडे रवाना केल्यामुळें ते सर्व अजण्डावर टाकून पहिल्या प्रथम विचारासाठीं घेण्याचें ठरलें. त्यांचे तीन ठराव पुढीलप्रमाणें:—

**ठराव १**:—कोंडाणा म्युनिसिपालिटीचें हद्दींत जेवढा टापू पडतो त्यांत किल्ल्याचे तीन बाजूला अर्ध्या डोंगरांत वसलेलीं पूर्वींच्या गस्त घालणाऱ्या कोळी लोकांची तीन मेटी आहेत. या मागासलेल्या लोकांच्या तक्रारींची दाद लागावी यासाठीं प्रत्येक मेट्याचा एक एक प्रतिनिधि म्युनिसिपालिटीवर घेणें वाजवी आहे. म्हणून या ठरावान्वयें मी असें सुचवितों कीं, खामकराच्या मेटावरील चिमाजी नाईक, दौलतरावाच्या मेटावरील हैबत्या कोळी, व कळकीच्या मेटावरील सोपाना पंढर यांना चालू सालासाठीं कोऑप्ट करून म्युनिसिपालिटीवर घ्यावें.

**ठराव २**:—मेटकरी कोळी लोक हे गरीब व मागासलेले असल्यामुळें त्यांच्या मुलांमुलींना शिक्षण देण्यासाठीं कोंडाणा म्युनिसिपालिटीनें प्रत्येक मेटावर शाळा उघडून मोफत व सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू करण्याची तावडतोब व्यवस्था करावी.

**ठराव ३**:—देव-टाक्याचें पाणी वापरण्याची ब्राह्मणापासून महारामांगापर्यंत सर्व जातींना—इतकेंच नव्हे तर सर्व धर्मीय शाकाहारी व मांसाहारी लोकांना—पूर्ण मोकळीक असावी. तसेंच म्युनिसिपालिटीचें हद्दींतील देवस्थानांतून प्रार्थना व पूजाअर्चा करण्याचा जन्मसिद्ध हक्क अस्पृश्यांना पुनः मिळवून देणें हें म्युनिसिपालिटीचें कर्तव्य आहे.

कोंडाणा म्युनिसिपालिटीच्या दुसरे बैठकीचें प्रारंभीं कांहीं किरकोळ कामकाज अध्यक्षांनीं पांच मिनिटांत हातावेगळें केलें, यावरून त्यांना कामाचा उरक चांगलाच अवगत होता असें सिद्ध झालें. त्यांत सिस्टर व्हॅनिटी, खा. ब. बी. एन. लिलांववाला व डॉ. वेंकट सुबय्या या तिघांची स्टॅंडिंग कमिटी नेमली गेली, स्वतः मांडलेल्या ठरावास ज्याचें त्यानेंच अनुमोदन दिलें तरी चालेल असें रुलिंग मिळालें आणि राजाराम महाराजांच्या पुण्यतिथीचे उत्सवास सालीना रु. १००

म्युनिसिपल ग्रॅन्ट् मिळावी असा विनंतिअर्ज घेऊन दत्त पुजारी समक्ष हजर झाला होता, त्याचा तो अर्ज नामंजूर होऊन त्याऐवजीं किल्ल्यावरील देवस्थानांचे हक्कसंरक्षणार्थ स्वतः दत्त पुजाऱ्याचीच म्युनिसीपालिटीवर नेमणूक झाली. तसेंच ज्या एका बंगल्याचा ट्रस्ट झाला होता त्याचे ट्रस्टींकडून 'अमुक अमुक संस्थेचा हा बंगला आहे सबब त्यावरील घरपट्टी माफ व्हावी' असा दुसरा एक अर्ज आला होता. त्यावर बरीच भवति न भवति होऊन अखेर असें ठरलें कीं, ट्रस्टी हे सदर बंगल्यावर ज्या अर्थी सालीना सुमारें चार पांचशें रुपयेपर्यंत भाडें काढतात त्या अर्थी बंगलापट्टीची माफी मिळविण्याचा आपला हक्क त्याचा त्यांनीं होऊनच गमावला आहे ! याप्रमाणें सर्व किरकोळ कामकाजाची वासलात लागल्यावर डॉ. वेंकट सुबय्या यांनीं आपला पहिला ठराव वाचून दाखवून त्यास पाठिंबा देतांना ते म्हणाले:—"प्रस्तुतच्या सामाजिक समतेच्या युगांत माझा हा ठराव सर्वांना मान्य होईल अशी मला फार आशा आहे. जगाची प्रगति कल्पनातीत झपाट्यानें होत आहे. हिंदुस्थानलाहि स्वतःचा भाग्योदय करून घ्यावयाचा असेल तर त्या प्रमाणांत आपली गति वाढविली पाहिजे. मागें रेंगाळून चालणार नाहीं. आतां ही गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे कीं, शिक्षण व संस्कृति यांची सरासरी बरीच वाढविल्याखेरीज आपल्या समाजांतील जातिभेद नष्ट होणें शक्य नाहीं. आपण ज्या हक्कांसाठीं साम्राज्यसरकारशीं भांडतों ते हक्क आपल्या देशांतील अल्पसंख्याक निकृष्ट वर्गाला देण्यास आपण आज तयार आहों काय? बंधुभाव हा प्रेममूलक आहे. सवत्या सुभ्याचा आग्रह धरल्यास आपआपसांतील गैरविश्वास मात्र बळावेल. 'शिक्षण' हें फक्त पुढारलेल्या ब्राह्मणवर्गाचें राखीव कुरण ही कल्पना एकंदर समाजाच्या अभ्युदयास विघातक अतएव त्याज्य मानून टाकून दिली पाहिजे. माझे ठरावांतील सार एवढेंच आहे कीं, 'जें जें आपणांसि ठावें। तें तें सकलांसि शिकवावें।' या मार्गाचा अवलंब करून आपल्या पश्चात् म्युनिसिपालिटीचें काम सुरळीत पुढें चालविण्यास आपण आपल्या मेटकरी बांधवांना शिकवून तयार केलें पाहिजे." डॉक्टरसाहेबांनीं आपलें सुंदर व मुद्देसूद भाषण थोडक्यांत आटोपलें. नंतर मी उठून म्हणालों:—"डॉक्टरसाहेबांच्या पहिल्या

ठरावांतील तत्त्व मला मान्य आहे. तरी पण तपशिलासंबंधीं थोडा मतभेद आहे. मेटकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांनीं जी तीन नांवें सुचविलीं आहेत ते तिघेहि इसम त्यांना शिकारीचें कामीं मदत करणारे त्यांचे पगारी नोकर आहेत. या तिघांची नेमणूक एकसमयावच्छेदेंकरून म्युनिसिपालिटीवर करून घेण्यांत स्वपक्षाला तेवढीच बळकटी आणण्याचा डॉक्टरसाहेबांचा अंतःस्थ कावा नसेल कशावरून ? जगभर स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा सध्यां बोलबाला सुरू आहे. म्हणून मी म्हणतों की, मागासलेल्या मेटकऱ्यांतर्फे म्युनिसिपालिटीवर कोण कोण प्रतिनिधि असावेत हें त्यांचें त्यांसच ठरवूं द्या. आपणांस तसा अधिकार नाहीं." मी या एका मुद्यावर जोर धरून विरोध केल्यामुळें डॉक्टर मजकुरांच्या पहिल्या ठरावापैकीं फक्त पूर्वार्ध मंजूर होऊन उत्तरार्धाचे बाबतींत मेटकऱ्यांना स्वयंनिर्णयाचा हक्क मिळाला. नंतर मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासंबधींचा आपला दुसरा ठराव सभेपुढें मांडण्यासाठीं डॉ. वेंकटसुबय्या उभे राहिले. परंतु त्यांना बळेंच खालीं बसवून अध्यक्ष या नात्यानें सिस्टर व्हॅनिटी म्हणाल्या:—"डॉक्टरसाहेब, आपण गेल्या बैठकीस हजर नव्हतां. त्यांत जें बजेट प्रो० लखोटे यांच्या दुरुस्तीसह पास झालें आहे ते लक्षांत घेतां म्युनिसिपालिटीजवळ चालू सालीं शिल्लक पूज्य निघते आपल्या या ठरावांतील तत्त्व उदार आहे. परंतु तो पास होऊन कांहीं फायदा नाहीं कारण त्याची अम्मलबजावणी द्रव्याभावामुळें मला पुढील सालपर्यंत तहकूब ठेवावी लागेल. म्हणून मी म्हणते की माझी स्वतःची अशी एक खाजगी शिक्षणविषयक योजना लवकरच मी ठरावाचे रूपानें म्युनिसिपालिटीपुढें मांडणार आहे कीं, ज्या योगानें खर्चाचा बोजा आपल्या गरीब म्युनिसिपालिटीवर पडणार नाहीं. तेव्हां तूर्त आपण आपला ठराव मागें घ्यावा अशी मी आपणांस विनंति करते." बाईनीं आपल्या गोड वाणीनें केलेली ही प्रार्थना अमान्य करणें डॉक्टरसाहेबांस अवघड वाटलें. त्यांनीं ताबडतोब उठून आपला दुसरा ठराव आपण परत घेतों असें जाहीर करून उरलेला तिसरा ठराव सभेपुढें मांडला. या ठरावावर भाषण करण्यास कादरभाई उठतील अशी कोणास कल्पनाहि नव्हती. परंतु ते एकदम उभे

राहून म्हणाले:—" अस्पृश्यता निवारणाच्या कल्पनेनें हिंदुस्थानांतील वातावरण सध्यां दुमदुमून गेलें आहे. आमच्या इस्लामी धर्माला अस्पृश्यता ही चीज मुळींच माहीत नाहीं. अल्लाच्या घरीं सर्व सारखेच. आम्ही महारोग्यानांच फक्त अस्पृश्य मानतों, म्हणून हिंदुस्थानांत आज कोणी जर खरें अस्पृश्यतानिवारण करीत असेल तर ते आपले दयाळू व्हॉईसरायसाहेबच होत.त्यांनी मोठा'लेप्रसी-फंड' उभारून रक्तपिती झालेल्या सर्वांची अस्पृश्यतानिवारण करण्याचें मनावर घेतलें आहे. देव—टाक्याचें पाणी कोणीही प्यावें. त्याला हरकत असतां कामा नये. म्हणून मी अशी उपसूचना आणतों कीं या ठरावांत पशू, पक्षी, कीड, मुंगी वगैरे झाडून सर्व प्राण्यांचा नामनिर्देश करणें जरूर आहे. आतां अस्पृश्यांनीं सररहा देवळांत घुसावें कीं नाहीं या वादग्रस्त प्रश्नावर मात्र दत्तू पुजाऱ्याचा अभिप्राय विचारला पाहिजे. " इतकें बोलून कादरभाई खालीं बसले व आम्ही सर्व दत्तू पुजाऱ्याकडे वळलों. पहातों तों त्याचे डोळे रागानें नुसते लालबुंद झाले होते. त्यानें कादरभाईना दोन चार शेलक्या शिव्या हासडून तुम्हांला ही नसती उठाठेव कोणीं सांगितली असा सवाल केला. तो पुढें म्हणाला:—" देव—टाक्यावर दिवसा गाई पाणी पितात तर रात्रीं रानडुकरें येऊन पाणी पिऊन जातात. क्वचित् वाघाचींहि पावलें त्या बाजूला उमटलेलीं आढळतात. हा वहिवाटीचा हक्क आहे त्याला तुमची उपटसुंभ म्युनिसिपालिटी परवानगी देणार कोण किंवा प्रतिबंध तरी करणार कोण? देव--टाक्याचें पाणी कोणी विटाळलें तर त्यांचें बरेंवाईट तेथील बजरंगबलीची मूर्ति पाहून घेईल. परंतु माझ्या देवळाचा मी राजा आहें. जो कोणी माझे परवानगीवांचून त्यांत घुसेल त्याची तंगडी मोडली नाहीं तर नांव बदलून ठेवीन. म्हणून सांगतों याद राखा!" येवढें बडबडून दत्तू पुजारी तणतणत भर सभेंतून पाय आपटीत चालता झाला. त्याचे हातवारे पाहून आम्ही सर्व क्षणभर चकित झालों. कादरभाईना तर त्याचा येवढा राग आला कीं शेजारच्या खडकाला टेकून ठेवलेली डॉ. वेंकट सुबय्यांची 'स्पोर्ट—रायफल' उलटी उचलून घेऊन ती दांडपट्ट्याप्रमाणें फिरवीत ते दत्तू पुजाऱ्याचे अंगावर धांवून गेले; व किल्ल्यावर आतां हिंदु—मुसलमानांचा दंगा होऊन त्यास एकदम भीषण स्वरूप येतें कीं काय अशी चिंताजनक परिस्थिति अकल्पित रीत्या निर्माण झाली. त्यांत प्रो० लखोटे हेहि आजच्या सभेस हजर नव्हते. शिव-

जन्मतिथीच्या वादासंबंधीं स्वमतसमर्थनार्थ पुरावा गोळा करण्याचे हेतूनें त भिलारवाडीच्या पाटलाच्या घरचे कागदपत्र चाळण्यासाठीं किल्ला उतरून खालीं गेले होते. अशा रीतीनें एक कौन्सिलर पहिल्यापासून गैरहजर व दोन लागोपाठ उठून गेल्यामुळें साहजीकच 'कोरम' चा प्रश्न उपस्थित करणें सेक्रेटरी या नात्यानें मला भाग होतें. तशी पृच्छा करतांच काय निर्णय द्यावा याची बाईंना पंचाईत पडली. बराच वेळ विचार करून अखेर त्यांनीं रूलिंग दिलें कीं, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांपैकीं एक, स्टँडिंग कमिटीपैकीं एक, मेटकऱ्यांपैकीं एक व इतर कौन्सिलर्सपैकीं एक असे कमीत कमी चार सभासद हजर असल्याखेरीज 'कोरम' पूर्ण होत नाहीं असें समजावें. मेटकरी सभासदांसंबंधींचा ठराव आजच पास झाल्यामुळें त्यांचेपैकीं आजचे बैठकीस कोणीच हजर नव्हता. अर्थात 'कोरम' चे अभावीं मीटिंग 'अॅडजर्न' करणें भाग पडलें. म्हणून तहकुबीची सुचना घाईघाईनें पास करून आम्ही सर्वजण दत्त पुजारी व कादरभाई ज्या दिशेनें धांवत गेल तिकडे वळलों. परंतु आम्हांस फारसें दूर जावें लागलें नाहीं. अर्ध्या वाटेंतच घामानें थबथबले कादरभाई धांपा टाकीत रायफलवर टेकून विसावा घेत एका दगडावर बसलेले दृष्टीस पडले. त्यांचे जवळ जाऊन चौकशी करतां दत्तू पुजारी पाठलाग करणाराचे हातावर तुरी देऊन केव्हांच आपल्या देवळांत शिरून व आंतून बंदोबस्तानें दरवाज्याचे कडीकोयंडे लावून घेऊन म्युनिपालिटीच्या नांवानें खडे फोडीत बसला आहे असें समजलें. सभेंत घडलेल्या शोचनीय प्रकाराबद्दल मागाहून सर्वांनांच वाईट वाटलें. पण उपयोग काय? झाल्या गोष्टीस कोणाचाच कांहीं इलाज नव्हता. शिवाय किल्ल्यावर दत्तू पुजाऱ्याचा लौकिक यापूर्वीही बराच गाजला गेल्याचें समजल्यावरून सर्वांनीं त्याच्या असभ्यपणाच्या वागणुकीकडे या खेपेस कानाडोळा करण्याचें व म्युनिसिपालिटीचा कार्यक्रम नेहमीप्रमाणें सुरळीत चालू ठेविण्याचें ठरविलें.

पुढील आठवड्यांत बहुतेक सर्व सभासदांच्या ठरावांचे लेखी मसुदे एकामागून एक माझे हातीं आले व मला भला मोठा भारदस्त 'अॅजेन्डा' लिहून काढण्याची संधि मिळाली. अध्यक्षांचे ठराव, उपाध्यक्षांचे ठराव व पुढें अनुक्रमें

इतर सभासदांचे ठराव मिळून आणखी दहा बारा ठरावांचे टांचण पुढील बैठकीसाठीं मी तयार ठेविलें तें खालीं दिल्याप्रमाणें:—

प्रेसिडेन्ट सिस्टर व्हॅनिटी यांचेकडून: —

**ठराव १**—मागासलेल्या मेटकरी मुलामुलींचे प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी पत्करण्यास आमची 'रेडक्रॉस अमेरिकन मिशनरी सोसायटी' तयार असल्यामुळें म्युनिसिपालिटीनें ते काम पहिलीं दहा वर्षे तिचे हातीं द्यावें.

**ठराव २**—आम्ही धर्मार्थ चालविलेल्या मोफत दवाखान्यास जोडून क्षयरोग्यांसाठीं एक आरोग्यभुवन बांधणें आहे. त्यांसाठीं फंड जमविण्याचें ठरवून कोंडाणा म्युनिसिपालिटीनें तें काम सभासदांवर सोपवावें.

**ठराव ३**—आमच्या अमेरिकन मिशनचे हिंदुस्थानांतील मुख्याधिकारी रेव्हरंड फादर क्रेकर हे मे महिनाअखेर चार दिवस पाहुणे म्हणून मजकडे येणार आहेत. हिंदी महासागरापलीकडील सर्व सुधारलेल्या देशांत त्यांचा नांवलौकिक फार मोठा आहे. म्हणून त्याचे आगमनप्रसंगीं त्यांचे स्वागतार्थ सर्व सभासदांनीं पुणें दरवाज्यापाशीं हजर राहून त्यांना कोंडाणा म्युनिसिपालीटीतर्फे मानपत्र अर्पण करण्याचा अधिकार अध्यक्ष या नात्यानें मला देण्यांत यावा.

खानबहादुर बी. एन. लिलांववाला यांचेकडून:—

**ठराव १**—मुंबई ते सिंहगड विमानांचे दळणवळण सुरू करण्यासंबंधीची योजना लवकर अमलांत आणण्याबद्दल म्युनिसिपालिटीकडून हिंदुस्थानसरकारकडे एक अर्ज पाठविण्यांत यावा.

**ठराव २**—धारजईचें लवंडाने डोणज्यापासुन पुणेंदरवाज्यापर्यंत घोड्यावरून बसून येण्याची पूर्वीची एक वाट आहे ती रुंद करून व नीट बांधून काढून मोटारीचा घाटरस्ता तयार करण्यास अंदाजें खर्च काय येईल याचें एक एस्टिमेट कोंडाणा म्युनिसिपालिटीचे उपयोगासाठीं तयार करून देण्याबद्दल मुंबई सरकारचे पब्लिक वर्क्स खात्याकडे एक अर्ज पाठविण्यांत यावा.

**ठराव ३**—किल्ल्यासभोंवार अर्ध्या डोंगरावर वसलेल्या तीनही मेटांवर पाण्याची फार हाकाटी आहे. सबब 'भोक पाडीन तेथें पाणी काढीन' अशा छाती-

ठीक प्रतिज्ञेवर ज्या एका नामांकित पानाड्यांची मुंबई सरकारनें नेमणूक केली आहे त्यास भूगर्भनीरनिरीक्षणार्थ इकडे रवाना करण्यासाठीं मुंबई सरकारच्या शेतकी खात्याकडे एक अर्ज पाठविण्यांत यावा.

प्रोफेसर लखोटे यांचेकडून:—

**ठराव १**—नरवीर तानाजी मालुसरे यांची किल्ल्यावरील समाधी इंग्रजी अमदानींत अगदीं उघडी पडली आहे; तिचें पाऊसवाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठीं समाधीवर एक लहानशी टुमदार छत्री बांधण्याची कोंडाणा म्युनिसिपालिटीनें प्रथम तजवीज करावी.

**ठराव २**—नरवीर तानाजी मालुसरे घोरपड लावून काळोखांतून ज्या कड्यावरून चढून आले त्यावर पुढें मराठ्यांनीं बांधून ठेविलेली मजबूत तटबंदी अगदीं मोडकळीस येऊन त्यांत दोन ठिकाणीं मोठीं भगदाडें पडलीं आहेत. तरी मुंबई सरकारच्या ज्या पुराणवस्तुसंरक्षक खात्यानें किल्ल्याचे तोंडावर 'रक्षण केलेली इमारत' म्हणून भली मोठी पाटी उभारली आहे त्या अंधळ्या खात्यास सदर तटाची डागडुजी करण्यास म्युनिसिपालिटीनें वेळींच अर्ज पाठवून कर्तव्योन्मुख करावें.

**ठराव ३**—जुन्या दप्तरी कागदपत्रांतून कोंडाणा किल्याचा 'शिवगड' असा नामनिर्देश आढळतो. त्या अर्थीं त्याचा 'सिंहगड' हा अपभ्रंश अद्भुतरम्य कथानकें खरडणाऱ्या कोणातरी कादंबरीकारानें प्रचारांत आणला असावा. म्हणून कोंडाणा म्युनिसिपालिटीनें 'शिवगड' हेंच मूळ नांव ग्राह्य ठरवून आपल्या रेकॉर्डचें द्वारें त्याचें पुनरुज्जीवन करावें.

मि. कादरभाई सुलेमानभाई यांचेकडून:—

**ठराव १**—किल्लेदार वीररत्न उदयभानू या मुसलमान झालेल्या बलाढ्य रजपूत सरदाराची नक्की कबर कोणती याचा बारकाईनें शोध करण्यासाठीं प्रो. लखोटे यांचे नेतृत्वाखालीं एक सब कमिटी नेमण्यांत यावी.

**ठराव २**—बालेकिल्ल्याचे दोन बाजूस दोन पुरातन पीर आहेत. त्यांचा जीर्णोद्धार करून त्यांवर मशिदी बांधण्याची म्युनिसिपालिटीनें तावडतोब तजवीज करावी.

**ठराव ३**—पुणे दरवाज्यावरील खानकज्यावर समशेरबहादर शाहिस्तेखानाचा मोठा संगमरवरी पुतळा पुण्याकडे तोंड करून उभा करण्याच्या युक्तायुक्ततेसंबंधीं वाटाघाट करण्यास मोंगलाईतून एक डेप्युटेशन किल्ल्यावर लवकरच येणार आहे तेव्हां त्याविषयीं आपला विचार म्युनिसिपालिटीनें विचारपूर्वक आगाऊ मुक्रर करावा.

श्री. भय्यासाहेब सेक्रेटरी यांचेकडून:—

**ठराव १**—देवटाक्यावर एक पवनचक्की उभारून टाक्याचें पाणी बालेकिल्ल्यावर हौद बांधून प्रथम त्यांत आणून सोडण्यास व पुढें तेथून नळ घालून प्रत्येक बंगल्यांत घरपोंहोचतें करण्यास अदमासें काय खर्च येईल याचें एस्टिमेट तज्ज्ञ इंजिनियराकडून तयार करवून घेऊन व तेवढें कर्ज काढूनहि कोंडाणा म्युनिसिपापिटीनें ही योजना पुढील पांच वर्षांत पूर्ण करावी.

**ठराव २**—किल्ल्यावरील ऐतिहासिक स्थळें पहावयास येणाऱ्या प्रवासी मंडळींच्या टोळया वाटेल तेथें झाडयास व पिसाबास बसून येथील शुद्ध वातावरण वेळोवेळीं दूषित करतात. आरोग्यदृष्ट्या हा गलिच्छ प्रघात तसाच पुढें चालू देणें अनिष्ट आहे. सबब कोंडाणा म्युनिसिपालिटीनें एक सार्वजनिक धर्मशाळा स्थापन करून तिला जोडून कांहीं पायखाने व मुताऱ्या बांधून टाकण्याची शक्य तितक्या लवकर व्यवस्था करावी. आणि किल्ल्यावरील रहिवाश्यांस उपसर्ग पोहोंचेल असें गैरवर्तन करणाऱ्या इसमांस जबर दंडाची शिक्षा ठेवावी.

**ठराव ३**—किल्ल्यावर ज्या ज्या जिनसांची गरज लागते असे सर्व जिन्नस जेथें विकत मिळतील असा एक 'को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स' म्युनिसिपालिटीनें स्वतःचे देखरेखीखालीं किल्ल्यावर सुरू करावा; आणि शेअरहोल्डर्सना सवलतीचे दरानें निर्भेळ माल पुरविण्याची व्यवस्था करावी. म्युनिसिपालिटीच्या स्टँडिंग कमिटीचे सभासद हे या 'स्टोअर्स'चे त्या त्या सालापुरते डायरेक्टर्स समजण्यांत यावेत.

हे सर्व महत्त्वाचे ठराव झाले. याशिवाय किरकोळ बरेच ठराव पुढील महिन्याचे अजेन्डावर टाकण्यासाठीं तूर्त रेकॉर्ड-बुकावर नोंदवून ठेविले होते.

दरम्यान मेटानिहाय खाजगी सभा भरून मेटकऱ्यांनीं आपआपले प्रतिनिधी निश्चित केले होते; व आश्चर्याची गोष्ट अशी की, डॉ. वेंकटसुबय्या यांनीं प्रथम सुचविलेले तीनहि इसम म्युनिसिपालिटीवर बहुमतानें निवडून आले. तिसऱ्या बैठकीपुढें स्वतः अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे ठराव यावयाचे होते. ठरल्यावेळीं बाले किल्ल्यावर सर्व कौन्सिलर्स शनिवारीं सायंकाळीं गोळा झाले. 'न करत्याचा वार शनिवार' अशी एक जुनी म्हण प्रचारांत आहे. परंतु तिला न जुमानतां आम्ही आपल्या बैठकी नेमानें दर शनिवारीच भरवीत असूं. या खेपेस स्वतः सिस्टर व्हॅनिटीच हजर नव्हत्या. कदाचित् आपण गैरहजर राहिल्यानेंच आपले ठराव त्यावर विशेषसें वाग्युद्ध न माजतां पसार होतील असा त्यांचा समज असावा. आणखी पंधरा मिनिटें त्यांची वाट पाहून त्यांचे अभावी म्युनिसिपालिटीचे उपाध्यक्ष खा. ब. लिलांववाला स्थानापन्न झाले व त्यांनीं सभेच्या कामास सुरवात केली. ते म्हणाले:—"आपण सर्वांनीं अॅजेन्डावरील माझे स्वतः-चे तीन ठराव वाचलेच असतील (येथें त्यानीं आपले तीन ठराव मोठ्यानें वाचून दाखविले) चालू सालच्या आपल्या बजेटमध्यें जादा खर्चास सवड नसल्यामुळें मी किल्ल्यावर राहणाऱ्या श्रीमंत-गरिबांच्या सर्वांच्या सामान्य तक्रारी आपल्या ठरावांत ग्रथित करून त्यांची दाद परस्पर सरकाराकडून लावून घ्यावी म्हणून तीन दिशांनीं तीन वेगवेगळे अर्ज पाठविण्याविषयीं सूचना केल्या आहेत. अशा रीतीनें खर्चाच्या बाबी परस्पर भागल्या गेल्या तर तें आपल्या गरीब म्युनिसिपालि-टीस श्रेयस्करच आहे. म्हणून कंठाळी ठरावाप्रमाणें मी माझे तीनहि ठरावांवर एकदमच सभेचें मत मागतों. ज्यांना माझे ठराव मान्य असतील त्यांनीं हात वर करावे. ( मतें मोजून पाहतां एकमतानें खानबहादुरांचे सर्व ठराव मंजूर झाले ). आतां आपण आपल्या म्युनिसिपालिटीच्या अध्यक्ष सिस्टर व्हॅनिटी यांचे तीन ठराव एकामागून एक विचारासाठीं घेऊं या. बाईच्या पहिल्या ठरा-वावर कोणास बोलावयाचें आहे काय ?" खानबहादुरांनीं अशी पृच्छा करतांच प्रो. लखोटे उभे राहिले व ह्मणाले:—"आपण आपल्या म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षस्थानीं बाईची एकमतानें योजना केली ती दोन दृष्टीनीं. एक तर त्या सन्मान्य व सुशिक्षित विदुषी आहेत ह्मणून व दुसरें असें कीं, 'उडदामाजी

काळें गोरें काय निवडावें निवडणारें' अशी स्थिति त्यावेळीं किल्ल्यावर नव्हती. ह्मणून गोऱ्या मडमेस अध्यक्षस्थान देणें भाग पडलें. परंतु त्या जर आपणांस लाभलेल्या सत्तेचा गैरवाजवी फायदा घेऊं पाहतील तर आपण वेळींच सावध झालें पाहिजे. मेटकरी कोळी लोक मागासलेले असले तरी ते जातीनें हिंदूच आहेत ( येथें तीनही मेटकरी सभासदांनीं आपआपलीं मुंडाशीं सोडून शेंड्या चापसुन पाहिल्या ). त्यांच्या मुलामुलींचें प्राथमिक शिक्षण एका परधर्मी मिशनरी सोसायटीकडे सोपविण्यापेक्षां सध्यां आहे ती स्थिति काय वाईट आहे? स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः '—ही धोक्याची सूचना देण्यासाठीं ह्मणून मी मुद्दाम उभा राहिलों आहें. या मेटकरी बांधवांना माझा असा स्पष्ट सवाल आहे कीं तुमचीं पोरेंबाळें 'यस फयस' करावयास लागून साहेबांचे घरीं बूट पुसावयास राहिलेली तुह्मांस चालतील काय? मी ह्मणतो कीं त्यापेक्षां त्यांना झुंजारबुरुजावरून खालीं कां लोटून देत नाहीं? शंभर वर्षांपूर्वी या किल्ल्यावर आमचें मराठ्यांचें राज्य होतें. तेव्हांचें शिक्षण ह्मणजे ढाल तलवार, भाला–बरची, दांडपट्टा इ० लष्करी बाण्याचें खरें तेजस्वी शिक्षण होतें. तें मर्दांचें शिक्षण कोणीकडे आणि सध्यांचें हें भागुबाईचें शिक्षण कोणीकडे! तानाजी मालुसरे, येसाजी कंक नेताजी पालकर, बाजी फसलकर, धनाजी जाधव, संताची घोरपडे यांना 'येस् फयास् 'करतां येत होतें काय? पण त्यांनीं कधीं आपल्या मुलुखांत फिरग्यांची डाळ शिजूं दिली नाहीं.' प्रो. लखोटे यांच्या या जोरदार भाषणाचा मेटकरी सभासदांवर असा कांहीं विलक्षण परिणाम झाला कीं, चिमाजी नाईकानें देवटाक्याचें पाणी भरण्याचा आपला हंडा उपडा घालून त्यावर डफाची सांथ धरली व बाकी दोघांनीं 'आला जासूद रायगडावरून। शूर शिवाजि रायाकडून।' पासून सुरुवात करून सिंहगडचा सबंध पोवाडा 'जी जी जी जी' करून घोळून घोळून गाऊन दाखविला.

या गोंधळांत व्हॅनिटीबाईचा पहिला ठराव सपशेल नापास झाला हे सांगावयास नकोच. नंतर दुसऱ्या ठरावावर चर्चा सुरू झाली. बाईचा दुसरा ठराव क्षयरोग्यांच्या आरोग्यभुवनासंबंधीचा होता. त्यावर भाषण करतांना मी म्हणालो:– " या ठरावांतील हेतु फार स्तुत्य आहे. सिंहगड किल्ल्यावरील हवा-

पाणी क्षयरोग्यांस अत्यंत गुणकारी व हितावह आहे ही गोष्ट पुण्या मुंबईतील मोठमोठ्या डॉक्टरांसहि मान्य आहे. परंतु त्यांचेसाठीं जे आरोग्यभुवन बाई बांधू इच्छितात त्या प्रीत्यर्थ फंड जमविण्याची सर्व जबाबदारी त्या म्युनिसिपालिटीच्या सभासदांवर टाकू पहात आहेत याचा आपणांस विचार केला पाहिजे. निदान मी तरी या जबाबदारीचें घोंगडें गळयांत घेऊं इच्छित नाहीं. ( येथें मेटकरी सभासदांनीं आपआपल्या खांद्यावरील घोंगड्या जमिनीवर पसरून त्यावर बैठक मारली ). आपणांस माहीतच असेल कीं सध्यां कोणत्याही बऱ्यावाइट कारणासाठीं फंड गोळा करणें मुष्किलीचें होऊन बसलें आहे. कारण 'प्रामाण्यबुद्धिः फंडेषु' या लक्षणावरून ओळखला जाणारा '**फंड संरक्षक**' पक्ष आणि 'फंडोन्मूलनदृष्टवीर्यमहिमा' असा ज्यांच्या चिकित्सक लेखणीचा प्रताप असा दुसरा '**फंड संरोधक**' पक्ष असे हे दोन तुल्यबल पक्ष सध्यां आपल्या या दुर्दैवी महाराष्ट्रांत प्रबळ होऊन बसले आहेत. आणि त्यांच्या वादविवादरूपी समुद्रमंथनांतून 'फंडेष्वनर्था बहुली भवंति' हे त्रिकालाबाधित सत्य सामान्य जनतेच्या अंतःकरणावर पूर्णपणें ठसलें आहे. बरें येथील मेटकरी कोळी लोकांची सांपत्तिक स्थिति लक्षांत घेतां 'फंड' शब्द उच्चारतांक्षणींच त्यांच्या अंगावर कांटा उभा राहील अशी माझी बालंबाल खात्री आहे. जर्मन महायुद्धा चे काळांतील वॉरलोनच्या जुलमाची त्याची आठवण अद्याप बुजाली नाहीं. आपल्या झोपड्यांतील भांडीकुंडीही विकून कांहींना त्यावेळीं वॉरलोनचे कर्जरोखे विकत घ्यावे लागले इतकी ज्याची दैन्यावस्था त्यांचेपासून फंडाची अपेक्षा कसली ठेवतां ? शिवाय या फंडानें आपण एका परकी मिशनरी संस्थेचे खिसे भरणार हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे, यापेक्षां बाईंनीं शिशुसंगोपनाचा, आरोग्य-सप्ताहाचा अगर दारूबंदीचा ठराव कां आणला नाहीं ? मी नुकतेंच कोठेंतरी वाचलेलें आठवतें की, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांपैकीं बहुतेक संस्थानांनीं आपले हद्दींत मादक पदार्थांचे आयातीस कायद्याचे सक्तीनें मज्जाव केला आहे. बाई अमेरिकन आहेत. तेव्हां त्यांनीं या आपल्या छोट्या साम्राज्यांत मद्यपानप्रतिबंधाची चळवळ जरूर हातीं घ्यावयास पाहिजे होती. शिवाय तसा ठराव पास केल्यानें इतर मोठमोठ्या म्युनिसिपालिट्यांनाहि

एक अनुकरणीय उदाहरण घालून दिल्यासारखें होईल. अशा कांही हितावह गोष्टींत मन घालण्याऐवजीं बाईंना ही फंड जमविण्याची अवदसा कोठून आठवली ? फंडमूलक पापें आमच्या म्युनिसिपल हद्दींत नकोत ह्मणूनच ना आपण सर्वांनीं बजेटांतील शिल्लक एका घावानें छाटून टाकली ? तर मग हा ठराव पास केल्यानें आपलें वर्तन धरसोडीचें ठरणार नाहीं काय ? या सर्व गोष्टींचा विचार करून मतें द्या असें मी आपणांस बजावतों."

माझें भाषण संपल्याबरोबर खानबहादुरांनीं, सभेचें मत विचारलें. माझे बाजूनें कादरभाई व सर्व मेटकरी सभासदांनीं हात वर उचलल्यामुळें व्हॅनिटी बाईंचा दुसरा ठरावहि बहुमतानें नापास झाला. आज बाईंचा बहुधा घात-वार असावा. कारण त्यांचा तिसरा ठराव बोलूनचालून वादग्रस्त स्वरूपाचा असल्यामुळें तो पास होण्याची फारशी आशा नव्हती. बाईंचा दुसरा ठराव वास्तविक पाहतां कांहीं वाईट नव्हता पण बजेट सेशनचे वेळीं बाईंचे हातून नकळत माझे बाबतींत जो प्रमाद घडला त्याचा वचपा त्यांचे गैरहजेरींत त्यांच्या दुसऱ्या ठरावाची चांगली हजेरी घेऊन मीं यथास्थित उगवून घेतला. खानबहा-दुराचा एकंदर रोख तर आज उघड उघड बाईचे विरुद्ध दिसत होता. तसें अस-ण्याचं कारण बहुदां म्युनिसिपालिटीचें अध्यक्षपद बाईंना मिळालें या गोष्टी बद्दल पहिल्या दिवसापासूनच अंतर्यामीं त्यांना वैषम्य वाटत असावें असें दिसलें.

तिसऱ्या ठरावावर खानबहादुरांनीं स्वतःच भाषण केलें. ठराव वाचून दाखवून ते म्हणाले:— "हे रेव्हरन्ड् फादर केकर कोण व कसे काय गृहस्थ आहेत याची मला तरी बिलकुल माहिती नाहीं. बाईंचे कदाचित् ते धर्मगुरू असतील, पण आपल्या म्युनिसिपालिटीचा व त्यांचा अर्थाअर्थी काय संबंध ? आपण वेगवेगळ्या पक्षांचे व धर्मांचे सभासद म्युनिसिपाटीवर आहोंत. फादर केकर या व्यक्तीचे विरुद्ध मला कांहीं एक बोलावयाचे नाहीं. परंतु बाईंचे पाहुणे म्हणून यंदा हे एक ख्रिस्ती धर्माचार्य किल्ल्यावर येत आहेत तर पुढें केव्हांतरी आमच्या भय्या-साहेबांकडे एखादे कुर्तकोटी येऊन उतरतील. मलाहि आमच्या अग्यारीवरील दस्तुर साहेबांना पुढें मागें बोलावतां येईल. सुलतानपूरच्या सुभानशहा दर्ग्याचे मौलवी तर नुकतेच कादरभाईंचा पाहुणचार घेऊन गेले. मानपत्रें तरी आम्ही कोणाको-

णास द्यावयाची? तेव्हां मीं म्हणतों कीं आपण केव्हांहि कोणालाहि मान-पत्र ह्मणून द्यावयाचें नाहीं असा एक कायमचा परिपाठ आपल्या म्युनिसिपा-लिटीच्या कारभाराचे नियत्रणासाठीं पाडून ठेऊं ह्मणजे भांडणाचें मूळच उपटून टाकल्यासारखें होईल. अभिनंदनपर ठराव पास करून अगर मानपत्रें देऊन स्वागत समारंभ साजरे करणें हीं कामें गांवांतील खाजगी संस्थानांच शोभतात. अशा गोष्टींत पडल्यानें म्युनिसिपालिटीची इभ्रत उलटी कमी होते असें माझें प्रामाणिक मत आहे.'' रे० फादर क्रेकर यांना सामोरे जाण्यासंबंधीं कोणासच मनापासुन हुरुप वाटत नव्हता. तेव्हां पडत्या फळाची आज्ञा मानून सिस्टर व्हॅनिटी यांच्या तिसऱ्या ठरावाची पहिल्या दोन ठरावांप्रमाणेच सर्वांनीं वाट लावली; व आमच्या म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षांचे तीनही ठराव या वैठकींत नापास झाले! या निकालामुळें मत्सरग्रस्त खानबहादुरांच्या चेहऱ्या-वर किंचित समाधानाची छटा दिसूं लागली कारण त्यांचे स्वतःचे सर्व ठराव याच बैठकीचे प्रारंभीं एकमतानें पास झाले होते. ॲजेन्डावरील या पुढील प्रो लखोटे व मि. कादराभाई यांचे प्रत्येकीं तीन तीन ठराव एकमेकांविरुद्ध मुद्दाम चु-रशीनें आणलेले व बखेडा माजवणारे आहेत असें वाटल्यावरून खानबहादुरांनीं त्यांचा विचार पुढील बैठकीवर ढकलून सूर्यास्त झाल्यामुळें सभेचें काम संपविलें.

मे महिना अर्धा अधिक संपला होता. या नंतर पुढें दोन–चार दिवसांनीं बरेच मेटकरी किल्ल्यावर येऊन त्यांनीं वर्दी दिली कीं, धायरी–शिवापूरपासुन कल्याण–वांगणीपर्यंतचे टापूंत एका खवळलेल्या भल्या दांडग्या वाघिणीनें मोठा धुमाकूळ उडवून दिला आहे! याचें कारण त्यांनीं असें सांगितलें कीं, एका धाडसी सर्कसवाल्यानें पाळत ठेऊन तिचीं दोन पोरें पळवून नेल्यामुळें तूतं भेटेल त्याच्यावर ती आपला सूड उगवून घेत आहे. कालच तिनें मोरदरींतील गवळीवाड्याचा फन्ना उडवला! ही बातमी ऐकून सर्वांची पाचांवर धारण बसली. खानबहादुर धावऱ्या धावऱ्या मजकडे आले व स्टॅन्डिंग कमिटीची जादा बैठक ताबड-तोब बोलवावयास त्यांनीं फर्मावले. त्याप्रमाणे सिस्टर व्हॅनिटी यांचे बंगल्यावर वर्दी देऊन तेथेंच स्वतः खानबहादुर व डॉ. वेंकटसुब्बय्या यांना बोलावून घेतले

व सुमारें तास अर्धा तास या खळबळ उडवून देणाऱ्या बातमीची चर्चा करून अखेर वाघिणीचा बंदोबस्त करण्याचे कामगिरीवर स्टॅन्डिंग कमिटीनें एकमतानें डॉ. वेंकटसुब्ब्या याची नेमणूक केली. त्यांनींहि ही कामगिरी आपल्या शिकारीवाण्यास साजेल अशा आत्मविश्वासानें पत्करिली व त्याच दिवशीं सायंकाळीं आपला रान वेढणाऱ्या मेटकरी तरुणांचा तांडा गोळा करून स्वारीनें थेट बोधल्याचे माथ्यावर जाऊन तळ दिला. तेथून रात्रदिवस सिंहावलोकन करण्यांत त्यांनीं एक आठवडा घालवला पण वाघिणीचा पत्ता लागला नाहीं. ती कोठें दडी देऊन लपून बसली होती. याचा कोणासच थांग लागेना. अखेर मोरदरींतील राघु भिलारे याचे शेतांत तिचीं पावलें उमटलेली त्यानें पाहिलीं. या शेतकऱ्याचे दोन बैल व एक गाय येवढ्या जनावरांचा वाघिणीनें संहार केल्यामुळें बिचाऱ्याची शेती ठार बुडाली होती. त्यामुळें तोहि जिवावर उदार झाला होता. आपल्या झोंपडींतून एक तीक्ष्ण भाला आणून उमटलेल्या पावलांवरून माग काढीत काढीत तो निघाला. अखेर त्याला जवळच्याच एका कड्याचे कपारीत झोपी गेलेली वाघीण आढळली. तो मुकाट्यानें परत फिरला व आपल्या गोठ्यांत सांठवलेल्या गवताचे गंजींतून एक एक भली मोठी पेंडी उचलून नेऊन त्या गुहेच्या तोंडावर रचण्यास त्यानें सुरुवात केली. हें काम त्याला अगदीं चोर पावलानें करावें लागले. अशा रीतीनें गुहेचे तोंड बहुतेक बंद केल्यावर त्यानें त्या गवतास चोहोंबाजूंनीं आग लावून दिली व आपला भाला सरसावून तो जवळच दबा धरून बसला. पेटलेल्या गवताच्या धगीनें व धुरानें गुदमरून वाघीण जागी झाली व डुरकावण्या फोडीत आगीच्या डोंबाळ्यावरून उडी मारून तडफडत बाहेर आली. या प्रयत्नांत तिचें आंग बरेंच भाजलें व धूर डोळ्यांत गेल्यामुळें क्षणभर तिला सभोंवारचें कांहीं एक दिसेना. आपली वेळ बरोबर साधून राघूनें तिजवर झडप घातली व पोटांत भाला भोसकून वाघिणीस तात्काळ यमसदनास पाठविलें ! राघूच्या शौर्याची बातमी हां हां म्हणतां सर्वत्र पसरली व आसपासच्या खेड्यापाड्यांतील भेदरून गेलेला शेतकरी वर्ग राघूस दुवा देऊं लागला. ' एका भालाइताचा दिव्य पराक्रम ' या सदराखालीं ही बातमी पुण्याच्या साप्ताहिक भाल्यांतहि यथाकाल छापून प्रसिद्ध झाली.

डॉ. वेंकटसुब्य्या हात हालवीत वोधल्यावरून किल्ल्यावर परत फिरले. राघूच्या पराक्रमाचें कौतुक करण्याऐवजीं त्यानें निष्कारण आपले हातची शिकार घालविली याबद्दल डॉक्टर साहेब मनांतून फार खट्टू झालेले दिसले. दरम्यान रेव्हरंड फादर केकर किल्यावर आले होते व त्यांचें तैनातींत सिस्टर व्हॅनिटीबाई गढून गेल्या होत्या. महाराष्ट्रीय इतिहाससंशोधकांच्या एका परिषदेचें अध्यक्षस्थान मंडित करण्यासाठीं प्रो. लखोटे हे मुंबईस गेले होते. व्यापार-निमित्त बरेच वर्षांपूर्वी आफ्रिकेंत जाऊन राहिलेले खानबहादुरांचे एक चुलते नुकतेच तिकडे मयत झाल्याची बातमी आल्यावरून दुःखप्रदर्शनार्थ या शनिवारची म्युनिसिपालिटीची बैठक तहकूब ठेवण्यांत आली होती. परंतु मेटकरी सभासदांना त्याची वर्दी नसल्यामुळें ते त्या दिवशीं चौकशीसाठीं मजकडे आले. त्यांनीं प्रथम राघु भिलाऱ्याच्या धाडसी पराक्रमाचें वर्णन करून भिलारवाडीच्या पाटलानें आपला एक वैल त्यास कसा नजर केला, दुधाण-वाडीच्या गवळी लोकांनीं दोन गाई त्यास कशा बक्षीस पाठविल्या व अवसर-वाडीच्या लोकांनीं आपल्या गांवच्या उरुसानिमित्त राघूस मुद्दाम आमंत्रण पाठवून शेंकडों शेतकऱ्यांसमक्ष त्यास मंदील बांधून व चांदीचें सलकडें घालून त्याचा कसा गौरव केला याची इत्थंभूत हकिकत सांगितली. मेटकरी सभासद पुढें म्हणाले:—

" राघु भिलाऱ्याचे बाबतींत आम्हीं भेटकरी लोकांनीं अद्याप आपलें कर्तव्य न बजावल्यामुळें आपणाकडे येण्यापूर्वी सर्वांनीं एकत्र जमून आम्हीं असें ठरविलें आहे कीं, कोंडाणा म्युनिसिपालिटीचे हद्दींतील समस्त रहिवाश्यांतर्फे म्युनिसिपालिटीनें राघूस किल्ल्यावर वोलावून आणून त्याचा योग्य प्रकारें सत्कार करावा. तीनहि मेटावरील लोकांचे वतीनें ही गोष्ट करण्याचा अधिकार कायदेशीररीत्या फक्त कोंडाणा म्युनिसि-पालिटीसच आहे. तरी आपण हा आमचा ठराव आपल्या विषय-पत्रिकेवर लिहून घ्यावा व शक्य तर त्यासाठीं म्युनिसिपालिटीची जादा बैठक बोलवावी. आपणांकडे येतां येतां वाटेंत आम्ही कादरभाईचे कानांवर ही गोष्ट घातली तेव्हां त्यानांही ती पसंत पडली. आतां आपल्या सहानुभूतीवर

आमची सर्व मदार आहे तरी आपण यासंबंधीं आपलें मत काय आहे ते स्पष्ट-पणें आम्हांस सांगावें. ” मी ह्मणालो:—

“ स्वतःचा जीव धोक्यांत घालून जो मनुष्य एखादी लोककल्याणाची कामगिरी बजावतो त्याबद्दल कोणास अभिमान वाटणार नाहीं ? लोकमान्यता ही वरकरणीं दिसते तितकी सवंग नाहीं:—

न संशयमनारुह्य नरो भद्राणि पश्यति ।

संशयं पुनरारुह्य यदि जीवति पश्यति ॥

ह्मणून माझा आपल्या ठरावास पूर्ण पाठिंबा आहे. इतकेंच नव्हे तर या कामीं माझे हातून होईल तेवढी खटपट मी जरूर करीन ” हे आश्वासनपर शब्द कानीं पडतांच माझे मनःपूर्वक आभार मानून भेटकरी लोक मोठ्या आनंदानें परत फिरले व मी त्यांचा ठराव योग्य शब्दांत लिहून काढून त्याच्या नकला सर्व सभासदांकडे पाठवून दिल्या. दुसरे दिवशीं मी स्वतः सिस्टर व्हॅनिटी, खान-बहादुर लिलांववाला व डॉ. वेंकट सुब्बय्या यांचीं तिघांची त्यांचे बंगल्यावर जाऊन मुलाखत घेतली. परंतु राघु भिलाऱ्याचा कोंडाणा म्युनिसिपालिटीनें जाहीर सत्कार करावा या कल्पनेस तिघेहीं वेगवेगळ्या कारणामुळें मनातून प्रतिकूल दिसले. म्युनिसिपालिटीच्या अध्यक्ष व्हॅनिटीबाई या त्यांचा स्वतः चा रे० फादर बेकर यांना मानपत्र देण्यासंबंधीचा ठराव नापास झाल्यामुळें रुष्ट झाल्या होत्या. खानबहादुरांना एका अशिक्षित कुणब्याचा जाहीर सत्कार करण्याची कल्पना जरा कशीशीच वाटली. शिवाय म्युनिसिपालिटीनें असल्या भानगडीत पडूं नये असें आपलें प्रामाणिक मत असल्याबद्दलचा स्पष्ट खुलासा गेल्या बैठकींत त्यांनीं केलाच होता. मजजवळ बोलतांना ते म्हणाले:— “ मागासलेल्यांची उन्नति या गोड नांवाखालीं उगाच अशिक्षितांना डोक्यावर बसवून घेऊन सध्यां आपण सर्वजण नाचत सुटलों आहों. मी माझे उच्च शिक्षण संपवून अर्धे अधिक आयुष्य समाजसेवेंत खर्चीं घातल्यानंतरच मला सरकारनें ‘ खानबहादूर ’ हा किताब दिला. त्यावेळीं तुमचीं म्युनिसि-पालिटी काय झोपली होती ? नुसत्या एका शब्दानें कोणीं माझें कोरडें

अभिनंदन केलें असेल तर शपथ ! हें मी तुमच्याजवळ म्हणून खाजगी रीत्या बोलतों आहें बरें का ? नाहीं तर उगाच निष्कारण बभ्रा कराल. " डॉ. वेंकट सुबय्यांनीं 'राघु भिलाऱ्यानें त्यांत विशेष असें काय केलें ?' असा उलट सवाल मला टाकला. ते पुढें म्हणाले:—" राघु भिलारे हा केवळ निमित्तमात्र झाला. कोणाचे तरी हातून अखेर ती वाघीण मारली गेलीच असती. वाघाची शिकार ही पुष्कळशी चान्सवर अवलंबून आहे. मी स्वतः बोधल्याचे माथ्यावरून एक आठवडाभर अहोरात्र जागरूकतेनें पाळत ठेविलीच होती. राघु भिलाऱ्यानें उतावळेपणा केला नसता तर वाघीण माझे बंदुकीलाच बळी पडली असती. मीं आजपर्यंत काय थोडी थोडकी शिकार केली आहे ? पण त्याचा कधीं निष्कारण गाजावाजा केला नाहीं. माझी खात्री आहे कीं, राघु भिलाऱ्याला स्वतःला आपण कांहीं अलौकिक गोष्ट केली असें खास वाटत नसावें. त्याचें स्वतःचें मत या बाबतींत काय आहे याची तुम्हापैकीं एकानें तरी त्याची समक्ष गांठ घेऊन विचारपूस केली आहे काय ? नसल्यास म्युनिसिपालिटीतर्फे एक शिष्टमंडळ चौकशीसाठीं खाजगी रीत्या प्रथम त्याजकडे रवाना केल पाहिजे. या कामीं घाई करण्यांत हंशील नाहीं. कारण कदाचित तो होऊनच कबूल करील कीं मला गरिबाला एवढा जाहीर सत्कार पाहिजे कशाला ? म्हणून म्हणतों कीं जरा दमादमानें घ्या. अविवेकीपणा हा नेहमीं पश्चात्तापास कारणीभूत होत असतो. राग मानूं नका, पण मी आपणांस स्पष्ट बजावतों कीं,—

" Fools rush in where Angels fear to tread "

किल्ल्यावरील शिष्ट शिष्ट लोकांपैकीं प्रत्येकाचे तोंडचीं अशीं हीं तऱ्हेवाईक मुक्ताफळें ऐकून खिन्न अंतःकरणानें मी माझे बंगल्याकडे परत फिरलो.

कोंडाण्यावर त्या दिवशीं धुकें अगदीं दाट जमा झालें होतें. मे महिना संपून नुकताच जून सुरू झाला होता. आणखी दोन–चार दिवसांत मृग नक्षत्र लागून बरसातीस प्रारंभ होईल असा रंग दिसूं लागला होता. मला आशा वाटत होती कीं, प्रो. लखोटे लवकर परत आल्यास ते, कादरभाई, मी स्वतः व तिघे

मेटकरी सभासद मिळून बहुमताचे जोरावर स्टॅन्डिंग् कमिटीच्या विरोधास हाणून पाडणें शक्य होईल. मात्र या कामीं कांहींतरी बेकायदेशीर लपंडावी युक्त्याप्रयुक्त्या करून स्टॅन्डिग–कमिटी आमचा विश्वासघात करील ही कल्पनाहि माझे मनास शिवली नाहीं. परंतु सखेदाश्चर्याची गोष्ट ही कीं, मला सुगावा लागूं न देतां बुधवारीं सकाळीं सिस्टर व्हॅनिटी यांचें बंगल्यावर स्टॅन्डिग कमिटीची एक गुप्त बैठक होऊन राघु भिलाऱ्यासंबंधींच्या ठरावाचे बाबतींत—

'आशां कालवतीं कुर्यात्। कालं विघ्नेन योजयेत्।'

या कुटिल नीतीचा अवलंब करण्याचें ठरलें; आणि म्युनिसिपालिटीचें सर्व कामकाज पुढील सीझनपर्यंत म्हणजे एक वर्षभर तहकूब ठेवण्याचा हुकूम फर्मावून अध्यक्ष, उपाध्यक्ष, व डॉ. वेंकटसुबय्या यांनीं आपआपल्या बंगल्यांना कुलुपें ठोकून त्याच दिवशीं सायंकाळीं पुण्या—मुंबईचा रस्ता सुधारला. त्यामुळें मागें राहिलेल्या इतर बंगलेवाल्यांनाहि पाठोपाठ किल्ला खालीं करणें भाग पडलें. कारण किल्ल्यावर एकदां का पावसाची झड सुरू झाली कीं आठ आठ दिवस बंगल्यांतील सामान हालविणेंहि शक्य नसतें. अशा रीतीनें कोंडाणा म्युसिपलिटीचा सर्व कारभार लेखणीच्या एका फटकाऱ्यानें संपुष्टांत आला ! मध्यंतरीं संबंध एक वर्ष लोटल्यानंतर त्या बिचाऱ्या राघुभिलाऱ्याची पुनः विचारपूस करतो कोण? हाच तर स्टॅन्डिग् कमिटीचा मोठा कावा होता; आणि काळोखांतून गुपचीप येऊन एखाद्या बेसावध इसमाचे पाठीवर वार करावा तशा तऱ्हेच्या नामर्दपणानें तिनें तो साधून घेतला. देशांतील कर्तबगार कार्यकर्त्यांचे अगणित उपकार सोयीसोयीनें विसरून जाऊन त्यांची कृतज्ञबुद्धीनें फेड करण्याचें टाळणें यांतच अलीकडे मोठी मुत्सद्देगिरी मानण्यांत येऊं लागली आहे. असो;

अहवालाचे प्रारंभींच्या श्लोकार्धांत वर्णन केलेल्या त्या अति उंच शैलाचे माथ्यावर—

तिथें स्थापुनी म्यूनिसीपालिटीला।
सुखें काल जाया बहू वाद केला॥ १ ॥

कारण त्या रुक्ष व निर्जन किल्ल्यावर करमणुकीचीं साधनें फारशीं नसल्यामुळें वेळ घालविण्यास दरसाल कांहीं तरी नवी युक्ती शोधून काढावी लागते याबद्दल तेथील मूठभर हंगामी रहिवाश्यांचें एकमत आहे.

शेवटीं कोंडाणा म्युनिसिपालिटीचे कारभारासंबंधीचा बोधप्रद व मनोरंजक असा हा प्रथम वार्षिक गद्यपद्यात्मक वृत्तांत वाचकवर्ग गोड करून घेतील अशी आशा बाळगून अहवाल पुरा करतों.

---

## ही कोण ?

——:०:——

मी गेलो सहजीं प्रभातसमयापूर्वीं किनाऱ्यावरी
शुक्राची नभिं तारका लुकलुके पूर्वेकडे हांसरी।
पुष्पांची परडी तिथें गवसली मी येत भानावर
तेलंगी बहुधा कुणी विसरला ही काय वाळूवर !॥

\+ \+ \+

स्नानांतीं कठड्यास टेकुनि व्रता ध्यानस्थ जी पाळनीं।
बाला एक समाधि-पूजन करी, मी थक्क झालों मनीं ! ॥

(मुंबई, १९२६.)

---

# टिळकांचा एक स्वभाव–दोष.

———:०:———

( विविध–वृत्त ता. २४–७–२७ वरून )

लें०—श्री० श्रीधर बळवंत टिळक.

एक नामांकित वृत्तपत्रकार या दृष्टीनें लोकमान्य टिळकांच्या भाषाप्रभुत्वाचा विचार केल्यास प्रतिपक्षांस निरुत्तर करणाऱ्या मुद्देसूद विचारसरणीच्या जोडीला त्यांच्या भाषेंत एक प्रकारचा निष्ठुर जोरकसपणा आढळून येतो. वादग्रस्त प्रश्नावरील—मग तो राजकीय असो, सामाजिक असो वा शिक्षण-विषयक असो—केसरीच्या प्रत्येक लेखानें टिळकांनीं एक एक नवा शत्रु निर्माण केला असें कोणी प्रतिपादन केल्यास त्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. कारण त्यांचा वाक्प्रहार असा कांहीं तडाखून असे कीं, तो ज्यांच्यावर एकदां कोसळला त्यांना त्यांना त्याचा स्वप्नांतही विसर पडणें शक्य झालें नाहीं. स्वतःच्या लेखन सामर्थ्यावर टिळकांचा जबरदस्त विश्वास असे. साधी, सुबोध वाक्यरचना, अत्यंत परिणामकारक भाषाशैली, तर्कशुद्ध मांडणी, निस्पृह सडेतोडपणा, निर्भीड व झणझणीत टीका इत्यादि वैशिष्ट्याच्या जोरावर टिळकांच्या नेतृत्वाखालीं केसरीस अग्रेसरत्व प्राप्त झालें. खरमरीत टीका द्वेषमूलक अगर मत्सरग्रस्त असण्याचा संभव फार. परंतु टिळकांच्या बाबतींत स्वतः टीकाकाराचें अंतःकरण शुद्ध असल्यामुळें त्यांच्या हेतूविषयीं संशय घेण्यास प्रतिपक्षास जागाच नसे. टिळकांच्या लेखणींतील प्रखर तेजापुढें इतरेजनांची भाडोत्री कारकुनी फिक्की पडावी यांत नवल काय ? आपल्याजवळील स्वकष्टार्जित दागदागिने स्वतःच्या पत्नीच्या अंगाखांद्यावर घालून तिच्या सौंदर्यांत भर घालण्यासाठीं जसा संसारी इसम झटतो तद्वत् आपल्या डोक्यांतील प्रतिभावान् नव्या नव्या कल्पना प्रथम आपल्या वर्तमानपत्रद्वारें लोकांपुढें मांडणें हे संपादकाचें आद्य कर्तव्य होय असा केसरी–

मराठ्याच्या संपादकवर्गास टिळकांचा उपदेश असे. अनेक गहन विषयांच्या अगदीं अलीकडील शोधापर्यंतचें सर्व ज्ञान टिळकांनीं स्वतःच्या डोक्यांत सांठविलेलें पाहून पुष्कळांस आश्चर्य वाटे. परंतु नेपोलियन बोनापार्टप्रमाणें टिळकही असें म्हणत असत कीं, "माझ्या डोक्यांत अनेक कप्पे आहेत. जेव्हां ज्या विषयावर बोलण्याचा प्रसंग येईल तेव्हां त्या वेळेपुरता तेवढा कप्पा उघडला कीं, त्या संबंधीची सर्व माहिती मला तयार मिळते." ही कांहीं केवळ ईश्वरी देणगी नव्हे, तर विद्यार्जनाच्या बाबतींत जन्मभर एकाग्र चित्तानें निदिध्यासानें व मनोनिग्रहानें केलेल्या अविश्रांत तपश्चर्येचें हें फळ होय. म्हणून:—

"The heights by great men reached and kept,
Were not attained by sudden flight;
But they, while their companions sleht,
Were toiling upward in the night."

ही कव्युक्ति, इतर थोर पुरुषांप्रमाणें टिळकांच्या बाबतींतही अगदीं यथार्थतेनें लागू पडते असे मानण्यास प्रत्यवाय नाहीं.

लोकमान्य टिळक हे धैर्य धडाडी, आत्मविश्वास, करारीपणा इत्यादि सद्गुणांनीं जसे मंडित होते, तसेच त्यांच्या स्वभावांत एककल्लीपणा आग्रहीपणा तापटपणा इत्यादि कांहीं ठळक दोषही पण होते. त्यांच्या चरित्राचें सूक्ष्म निरीक्षण करणारांस सकृद्दर्शनीं परस्परांशीं विसंगत असे गुणदोष त्यांच्या स्वभावांत एकवटलेले आढळून येतात. चरित्रनायकाच्या स्वभावाचें बिनचूक वर्णन चरित्रकारानें रेखाटलें आहे अशी उदाहरणें चरित्रवाङ्मयांत विरळा. कावीळ झालेल्याला सभोंवारचें सारें जग जसें पिवळें दिसतें तद्वत् चरित्रकाराच्या स्वतःच्या दृष्टिकोनाप्रमाणें त्याला चरित्रनायकाचीं कृत्यें बरींवाईट दिसतात. ही उणीव आत्मवृत्तांत राहूं शकत नाहीं. कारण स्वतःच्या स्वभावचे गुणदोष, दृष्टि अंतर्मुख केल्याबरोबर, स्वतःस जितके स्वच्छपणें दिसुन येतात, तसे ते इतरांस उमगणें शक्य नाहीं या दृष्टीनें एखाद्या थोर व्यक्तीनें लिहिलेलें

स्वतःचें 'आत्मवृत्त' हे दुसऱ्यानें लिहिलेल्या त्याच्या चरित्रापेक्षां हजार पटीनें विश्वसनीय अतएव श्रेष्ठ ठरेल. टिळकांनीं स्वतःचे आत्मवृत्त लिहिलेलें नसलें तरी एके ठिकाणीं त्यांच्या स्वभावाचें अत्यंत मार्मिक व यथातथ्य वर्णन त्यांच्या स्वतःच्या लेखणींतून उतरलेले सांपडतें. हा प्रसंग म्हटला म्हणजे त्यानीं १८९० सालच्या अखेरीस 'डकन एज्युकेशन सोसायटी' कडे पाठविलेला स्वतःच्या लाईफ मेंबरशिपचा राजीनामा होय. किंबहुना हा राजीनामा म्हणजे त्यांच्या पहिल्या १०।१२ वर्षांतील शिक्षणविषयक व इतर सार्वजनिक कामगिरीचें आत्मवृत्तच होय. या राजीनाम्याचा शेवटचा भाग अत्यंत हृदयस्पर्शी असा वठला आहे. कारण त्यांत टिळकांनीं आपले अंतःकरण अगदीं खुलें करून दाखविलें आहे. हें स्वभावचित्र रेखाटतांना टिळकांच्या आंतड्यांस पीळ पडून त्यांची चित्तवृत्ति क्षणभर 'कण्ठस्तंभितबाष्पवृत्तिकलुष' कशी झाली असेल याची यथार्थ कल्पना येण्यासांठीं त्यांतील जरूर तेवढ्या उताऱ्याचें भाषांतर त्यांच्या स्वभावचित्राची एक बाजू म्हणून खालीं देत आहे:—

"तथापि जेवढे म्हणून चांगले व निर्दोष त्या सर्वांचा मक्ता मी माझ्याकडे घेऊं पाहातों अशी मात्र आपली गैरसमजूत होऊं देऊं नका. माझ्या सहकारी मित्रमंडळींना माझ्यावर रागावण्यास प्रसंगविशेषीं माझे जे कित्येक दोष कारणीभूत झाले त्याबद्दल मला स्वतःला तीव्र जाणीव आहे. **माझ्यामध्यें जो मुख्य दोष मला दिसतो तो म्हणजे कडक व झोंबणाऱ्या भाषेंत स्वतःचे विचार व्यक्त करण्याची माझी तऱ्हा होय.** मला वाटतें, वादाच्या सुरवातीला मी कधींच संतापत नाहीं; परंतु जात्या मी उत्कट विकारप्रधान वृत्तीचा मनुष्य असल्यामुळें-वादाच्या ओघांत मजकडून कठोर व बोंचणारीं उत्तरें चुकुन बाहेर निघून जातात व माझी टीका प्रतिपक्षास 'त्राहि भगवन' करून सोडते. मर्मभेदक भाषा ही पुष्कळ अंशीं अनर्थास कारणीभूत होते यांत संशय नाहीं. परंतु मी आपणांस या पूर्वी अनेक वेळां जें सांगितलें तेंच आतांही आस्थापूर्वक कळवितों कीं, मीं जी कठोर भाषा वापरली ती केवळ आपल्या संस्थेच्या हितासंबंधीं माझ्या अंतर्यामीं उसळून येणाऱ्या विकारांच्या उत्कटतेमुळेंच मला वापरावी लागली.

मी माझें आत्मनिरीक्षण यथामति जेवढें करूं शकलों त्यावरून मला वाटतें कीं, संस्थेच्या हिताव्यतिरिक्त अन्य हेतूनें प्रेरित होऊन मीं तशी भाषा वापरली असा तुमच्यापैकीं एकाचाही गैरसमज होण्यास मीं जागा ठेविलेली नाहीं. संस्थेच्या उत्कर्षाविषयीं अंतर्यामीं वाटणाऱ्या उत्कंठेमुळें मूलभूत तत्त्वा-पासून ढळण्याकडे कोणाची यत्किंचितही प्रवृत्ति होऊं नये म्हणून मला फाजील जागरूकता राखणें भाग झालं. मी ही गोष्ट प्रांजलपणें कबूल करतो कीं, क्षुल्लक कारणावरून सर्वस्वी अनुचित अशी कडक भाषा माझ्याकडून एखादे वेळीं निघून गेलो असेल; नाहीं असें नाहीं. परंतु या सर्वांच्या मुळाशीं माझी एकच ठाम समजूत कायम आहे. ती अशी कीं, माझ्या मतें आपल्या संस्थेसारख्या संस्थेच्या अभ्युदयासाठीं स्वार्थत्यागाची व स्वार्थनिरपेक्ष अशा निरभिमान वृत्तीची अत्यंत जरूरी आहे. येवढ्या एकाच कसोटीवरून जग आपली पारख करील; व अखेर त्यावरच आपला मोक्ष मोक्ष अवलंबून राहील. या समजुतीमुळें साह-जिकच या असिधाराव्रताशीं विसंगत अशी जी जी सूचना मला वाटली तिचा मीं धिःकार केला. आपण सुरू केलेल्या संस्थेच्या कल्याणाविषयीं व चिर-स्थायित्वाविषयीं काळजी वाटूं लागल्यामुळें पुढील दोन मार्गांपैकीं कोणता तरी एक स्वीकारण्याखेरीज मला आतां गत्यंतर नाहीं. माझी खात्री आहे कीं, माझ्या सान्निध्यामुळें यापुढें आपणांमध्यें संगनमत कधींच न राहतां उलट बेबनाव मात्र वाढत जाईल. अशा परिस्थितीत आपल्या शाळेला व कॉलेजाला चिरस्थायित्व प्राप्त होण्याची आशा नाहीं. परंतु उलट मीच सोडून गेलों तर मूळ तत्त्वांना हरताळ फांसला जाईल हें मला उघड दिसत असलें तरी देखील संस्थेंतील बेबनाव कमी होऊन त्या जागीं पुष्कळ सलोखा वाढेल. हे दोन पर्याय डोळ्यांसमोर ठेऊन विचार करतां ही संस्था सुरू करणाऱ्या मंडळींना येऊन मिळण्याच्या वेळची माझी सदिच्छा व तिला लवकर चिरस्थायित्व प्राप्त झालेलें डोळ्यांनीं पाहावें याबद्दल अहर्निश वाटणारी हुरहुर या दोन्ही गोष्टी मला असें सुचवितात कीं, व्यक्तिशः मला स्वतःला ती गोष्ट कितीही अप्रिय असली तरी देखील आपल्या सर्वांच्या परवानगीनें मी ही संस्था सोडून जाणें हेंच श्रेयस्कर होय. हा निर्णय निश्चित करण्यापूर्वीं मला माझ्या मनोविकारांशीं

बराच वेळ झुंजावें लागलें आहे. किंबहुना मला माझ्या आयुष्याचें ध्येय आज वर्ज्य करावें लागत आहे; परंतु त्यापासून स्वतःची ताटातूट करून घेतल्यानेंच माझ्या हातून त्याची सेवा उत्कृष्ट प्रकारें पार पडेल एवढा एकच विचार मला आतां समाधान मानण्यास आधारभूत आहे. मीं तुमच्याबरोबर असतां संस्थेच्या हिताप्रीत्यर्थ काम करण्यांत कधींही कुंचराई केलेली नाहीं; आणि म्हणूनच आतां यापुढें जास्त दिवस तुमच्यामध्यें राहून मी संस्थेचें अस्तित्व धोक्यांत घालूं इच्छित नाहीं. तुमच्या सान्निध्यांत राहून आजपर्यंत जशी मीं संस्थेची सेवा केली तशीच पुढेंही तुमच्यापासून विभक्त राहून मला अधिक चांगल्या रीतीनें बजावतां येईल. संस्थेचीं मूळ तत्त्व बिनतक्रार पाळण्यासंबंधींचा लेखी हमी लिहून देण्याच्या बाबतींत तुमचें एकमत होईल अशी आशा करण्यास किंचित् जरी जागा असती तरी मी या घटकेला स्वखुषीने हा निर्वाणीचा मार्ग पतकरला नसता. पूर्वीं अनेक प्रसंगीं ही तडजोड घडवून आणण्याची मी खटपट केली, परंतु त्यांत मला यश आलें नाहीं. त्यामुळें तशा प्रकारची तडजोड अशक्य आहे हेंच अनुमान आज मला काढणें प्राप्त झालें आहे. ”

ज्या शिक्षणसंस्थेच्या संगोपनाच्या कामीं टिळकांच्या आयुष्यांतील ऐन उमेदीचीं पहिलीं बारा वर्षे खर्चीं पडलीं त्या ‘ डेक्कन् एज्युकेशन् सोसायटी ’ स तडकाफडकीं रामराम ठोकण्याच्या बाबतींत १८९० सालीं जो अविवेकीपणा घडला त्याबद्दल टिळकांना पुढें जन्मभर पश्चात्ताप वाटत असावा. कारण नामदार गोखले व सर फेरोजशहा मेथा यांच्या मृत्यूनंतर कीडवाल्या नेमस्तांशीं समेटाची वाटाघाट करून टिळकांनीं राष्ट्रीय सभेंत आपला जो चंचुप्रवेश करून घेतला त्याविषयीं बोलतांना ते असें म्हणत असत कीं, “ सुरतेच्या बखेड्यानंतर सवतासुभा निर्माण करून कॉंग्रेसवर कायमचा बहिष्कार आम्हांस टाकतां आला असता. परंतु डेक्कन् एज्युकेशन् सोसायटी हातची दवडण्याच्या बाबतींत माझ्या हातून जी चूक झाली तिची पुनरावृत्ति न होऊं देण्याची मी या प्रसंगीं खबरदारी घेतली. कॉंग्रेसमध्यें पुनः प्रवेश करण्यास राष्ट्रीय पक्षांतील कांहीं पुढारी नाखूष होते; परंतु त्यांच्या नादीं न लागतां तात्पुरता जनापवाद पतकरूनही मी स्वतः समेटास तयार झालों. कारण राष्ट्रीय सभेच्या पाठीमागें जी

पूर्वं पुण्याई आहे तिचा फायदा त्या संस्थेत राहिल्यानें जसा घेतां येईल तसा तो बाहेर राहून मिळणार नाहीं." असो;

तात्पर्य काय कीं, सामान्य मनुष्याप्रमाणें असामान्य व्यक्तीही कमी अधिक प्रमाणांत चुकीस पात्र असतात. फरक येवढाच कीं, एकदा झालेली चुकी व त्यापासून होणारें नुकसान याची पहिल्याच खेपेस बरोबर कल्पना आल्यामुळें ते ती आपल्या आयुष्यात सहसा पुन्हां होऊं देत नाहींत.

---

## * शुक संवाद.

(मालिनी—वृत्त)

वसत शुक सुखानें पंजरीं पाळिलेला
कधि न दिसत स्वप्नीं व्यक्ति-स्वातंत्र्य ज्याला।
शुक अवचित भेटे अन्य त्याला जयाचा
निबिड-विपिनि होता स्वैर-संचार साचा ॥ १ ॥

मुदित वनविहारी देखुनी त्यांस होई
'रुचिर वनि मजा जी, ती सख्या येथ नाहीं'।
समजुनि बहु सांगे; हा करी कानगोष्ट
'वनशिल मजसंग पंजरीं धष्टपुष्ट' ॥ २ ॥

'धडपडत रहावें पंजरीं धिक्-जिणें हें!
नियमित अवकाश स्वैरवृत्तीस राहे'।
'वितत नभि,' वदे हा होउनी फार कष्टी,
'अहह! मज दिसेना एकही वासयष्टी.' ॥ ३ ॥

---

* परिशिष्ट 'क' पहा.

# हिंदूंच्या धर्मक्रांतीचा उषःकाल.

———:०:———

( लेखांक १ )

( लेखकः—श्री. श्रीधर बळवंत टिळक, पुणें. )

( विविधवृत्त वर्ष ३, अंक ४८ ता ३०–१०–२७ )

**महारासि सिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ॥**

**तया प्रायश्चित्त कांहीं । देह-त्याग करितां नाहीं ॥**

**— तुकाराम.**

सध्यांचें युग हें लोकशाहीचें युग आहे, उत्क्रांतीचें युग आहे. एकंदर हिंदुसमाज हा संक्रमणावस्थेंत आहे. भगवंतानीं निर्माण केलेली श्रमविभागरूप चातुर्वर्ण्यव्यवस्था ' गुणकर्मविभागशः ' चालू राहाती तर ती निरुपयोगी अतएव त्याज्य ठरून त्याविरुद्ध बंड पुकारण्याची पाळी कनिष्ठ किंवा निकृष्ट वर्गावर आज आली नसती. परंतु देशाच्या दुर्दैवानें चातुर्वर्ण्य जन्मसिद्ध स्वरूपांत वज्र-लेप होऊन बसल्यामुळें त्यापासून अनर्थ ओढवला आहे. पुरातन काळीं वर्णा-श्रमधर्मानें इष्ट कामगिरी बजाविली असेल, नाहीं अस नाहीं; परंतु टेनिसन् कवीनें म्हटल्याप्रमाणें,

"The old order changeth,
Yielding place to new
And God fulfils Himself in many ways,
Lest one good custom
should corrupt the world."

या दृष्टीनें विचार केल्यास आतां चातुर्वर्ण्यास जितक्या लवकर मूठमाती मिळेल तितकी बरी. शिक्षणांत मागसलेल्या व दारिद्र्यपंकांत रुतलेल्या अशा

बहिष्कृतवर्गासहि आतां आपल्या जन्मसिद्ध हक्कांची जाणीव झाल्यामुळें तो समान दर्जा प्रतिपादन करूं लागला आहे. उत्तर हिंदुस्थानांतून खालीं उतरलेली शुद्धि-संघटनाच्या चळवळीची लाट सर्व देशभर पसरून तिला योग्य वळण मिळाल्यास धर्मक्रांतीचा उषःकाल अगदीं समीप आला असें मानण्यास हरकत नाहीं. शिक्षणांत मागासलेल्या ब्राह्मणेतर व अस्पृश्य वर्गानें एवढी गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, त्यांचा भाग्योदय त्यांच्याच हातीं आहे. वरिष्ठ वर्गावर भिस्त न ठेवतां स्वावलंबनाच्या जोरावर त्यांनीं स्वतःच्या उन्नतीचा मार्ग चोखाळला पाहिजे. कारण रामदास स्वामींनीं म्हटलेंच आहे कीं:—

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला । जो स्वयेंचि कष्टत गेला । तोचि भला ॥ १ ॥

भिक्षुकवर्ग हा आपखुषीनें चातुर्वर्ण्यसमाजव्यवस्थेच्या डोलाऱ्याखालीं सुरुंग लावण्यास कदापिही तयार होणार नाहीं. तें काम ब्राह्मणेतर चळवळीचें आहे व त्यांनीं तें मोठ्या शिताफीनें व धिटाईनें पार पाडलें पाहिजे. वास्तविक पाहातां परमेश्वराच्या दृष्टीनें सर्वांचा दर्जा सारखाच आहे. सर्व भूतमात्रांच्या ठायीं समदृष्टीनें पाहणारा, त्यांची काळजी वाहणारा व त्यांना सन्मार्गाच्या वळणावर आणून सोडण्यासाठीं झटणारा असा परमेश्वर आहे. भगवद्गीतेंत भगवंतांनीं तसा कबुलीजबाबही दिलेला आहे:—

**समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः । ( ९, २९. )**

तात्पर्य, अस्पृश्यतेस हिंदुधर्मांत बिलकुल थारा नाहीं. इतकेंच नव्हे तर सांप्रदायिक स्वरूपाच्या संकुचित मनोवृत्तीचा त्याग करून व 'राम खरा कीं रहिम खरा' हा आग्रही हेका सोडून देऊन परमेश्वराचें निर्गुण निराकार असें शुद्ध स्वरूप सर्वांनीं ओळखावें यासाठीं सर्व तत्त्वज्ञानाचा निष्कर्ष किंवा श्रीमद्भगवद्गीतेचें सार म्हणून भगवंतांनीं सरतेशेवटीं असें सांगितलें आहे कीं:—

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।**
**अहं त्वा सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥**

( अ. १८, ६६. )

मिश्रविवाहेच्छु वधूवरांना विवाहाची सरकारी कचेरींत नोंद करते वेळीं ‘ आम्ही कोणत्याही धर्माचे नाहीं ’ असें लिहून द्यावें लागतें म्हणून विषाद वाटतो. परंतु वास्तविक तसें वाटण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. कारण वरील भगवद्वचनानुरूप तसें लिहून देऊनही ते हिंदूच राहातात. भगवंताचे चरणीं त्यांची निष्ठा कायम असली व संकटकाळीं त्यास अनन्यभावें शरण जाण्याची त्यांची मनःपूर्वक तयारी असली म्हणजे झालें.

हिंदु धर्मास सध्याची हीन-दीन स्थिति कशामुळें आली या प्रश्नावर विचार करूं लागल्यास आपणांस असें आढळून येईल कीं, तुकोबापासुन जोतिबापर्यंत अनेक धर्मसुधारक होऊन गेले. तथापि त्यांपैकीं एकालाही ‘ हिंदु कोणाला म्हणावें ? ’ या प्रश्नाचें समर्पक उत्तर देतां आलें नाहीं. आद्य हिंदु–मिशनरी प. वा. गजानन भास्कर वैद्य यांच्यासारख्या सत्पुरुषांनीं आपल्या पवित्र वाणीनें हिंदुधर्मासः—

> जो पाहिला व्यासमुनीश्वरानें ।
> संरक्षिला वत्सल आर्यभूनें ॥
> ज्याचें ऋषी जाणति पूर्ण मर्म ।
> देवा जगीं वाढवि हिन्दुधर्म ॥ १ ॥

असा आशिर्वाद दिला खरा, परन्तु त्यांना देखील ‘ हिंदु ’ शब्दाची सुबोध व बिनचूक व्याख्या निश्चितपणें सांगतां येईना. ‘ जो आपणास हिंदु म्हणेल तो हिंदु ’ ही व्याख्या शास्त्रीयदृष्ट्या बरोबर नाहींच नाहीं, परंतु अंतःकरणासही ती पटण्यासारखी नाहीं. आर्यसंस्कृतीचा योग्य अभिमान व एकराष्ट्रीयत्वाची भावना यांचा बेमालुम मिलाफ ‘ हिंदु ’ शब्दाच्या व्याख्येंत नजरेस आला पाहिजे. या अफाट वसुंधरेच्या पाठीवर कोठेंही कोणत्याही परधर्मीय लोकांच्या सान्निध्यांत ‘ मी हिंदु आहें ’ असें छातीठोक जाहीर करण्यांत ज्याला यत्किंचित् सुद्धां कमीपणा अगर शरम वाटणार नाहीं, उलट भूषणच वाटेल, अशा इसमास हिंदु मानण्यास हरकत कोणती ?

प्रस्तुतचें हिंदुधर्माचें स्वरूप अगदीं नेभळे व विस्कळित झालें असल्या-मुळें सद्य:स्थितीस अनुसरून असे योग्य फेरबदल घडवून आणून त्यास पुनः सुसंघटित स्वरूप देणें हें सध्यांच्या तरुण पिढीचें कर्तव्य आहे. सामान्यतः हिंदुस्थानांतील बहुजनसमाज अशिक्षित अतएव श्रद्धाळू व धर्मभोळा आहे. त्याच्या मनोरचनेंत रूढीच्या जड श्रृंखला तोडून टाकण्याइतका नैतिक कणखरपणा अद्याप आलेला नाहीं. सारासार विचारशक्तीच्या जोरावर प्रचलित धार्मिक चालीरीतींपैकीं ग्राह्य भाग कोणता व त्याज्य कोणता याचा ऊहापोह करण्याचें सामर्थ्य आज फक्त आधुनिक सुशिक्षित वर्गांतच आहे. तथापि त्यांतही सांप्रदायिक वेष्टणांत स्वतःस गुरफटून घेऊन बुद्धिपुर:सर बालविवाहाची तळी उचलून धरणारे हरीचे लाल अद्याप सांपडतातच ! अनुल्लंघनीय मानल्या जाणाऱ्या रूढीच्या वर्चस्वामुळें आमच्या धार्मिक सुधारणेस अपरिमित विलंब होत आहे. ज्या ज्या सुधारणांची समाजास आवश्यकता आहे किंबहुना उत्कंठा लागून राहिलेली आहे त्या सर्व तात्काळ झाल्याच पाहिजेत. ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्य अस्पृश्य असे अनेक तट पडून जर्जर झालेल्या हिंदुधर्मांत नवचैतन्य उत्पन्न करावयाचें असेल तर उच्च-नीच भावांस रजा देऊन समान हक्काच्या पायावर अभिनव हिंदु धर्माची उभारणी केली पाहिजे. ही गोष्ट तरुण पिढीनें धर्म-क्रांतीची चळवळ हातीं घेतल्याखेरीज घडून येणें शक्य नाहीं. सुदैवानें सरकार परकी व परधर्मीय असल्यामुळें धार्मिक सुधारणेच्या बाबतींत उदासीन व तटस्थ आहे. कारण, 'तुमच्या धर्मकारणांत आम्ही ढवळाढवळ करणार नाहीं' असें अभिवचन राणीच्या जाहीरनाम्यांत इंग्रज सरकार एके काळीं देऊन चुकलें आहे. नाहींतर एकीकडून भिक्षुकशाहीचा तर दुसरीकडून नोकरशाहीचा विरोध अशा दुहेरी कात्रींत सांपडून धर्मक्रांतीच्या पुरस्कर्त्यांची दामटी वळावयाची ! धार्मिक सुधारणेस राजसत्तेच्या संमतीची, सहानुभूतीची व पाठबळाची ज्या देशांत आवश्यकता असते तेथें धार्मिक सुधारणेचें पाऊल किती मुष्किलीनें व दिरंगाईनें पुढें पडतें याची साक्ष शेकडों हुतात्म्यांच्या रक्तानें माखलेला प्रत्यक्ष इंग्लंडांतील धर्मक्रांतीचा इतिहास देईल. पूर्वीं स्वतंत्र देशांतून पुराणमताभिमानी धर्माचार्यांच्यामागें राजसत्तेचा मोठा पाठिंबा असे. अशा देशांतून धर्मसुधारणेची चळवळ

ज्यांनीं प्रथम हातीं घेतली त्यांचें काम सोपें नव्हतें. 'राजा कालस्य कारणम्' म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. सुधारणावादी प्रामाणिक लोकांना बदमाष, पाखांडी किंवा मायावी ठरवून त्यांना यंत्रांत घालून ताणणें, जिवंत जाळणें किंवा अंगावर शहारे येतील अशा कल्पनातीत युक्त्यांनीं हालहाल करून जिवें मारणें इत्यादि भयंकर प्रकार निरंकुश राजसत्तेला सहज लीलेनें करून दाखवितां येतात. युरोपखंडांतील धर्मक्रांतीचा इतिहास चाळतांना व विशेषतः 'स्पॅनिश इन्क्विझिशन्' नामक न्यायकोर्टानें शेकडों लोकांचा जो अनन्वित छळ केला त्याची हृदयद्रावक करुण कहाणी वाचतांना वाचकांच्या डोळ्यांतील अश्रूंनीं प्रत्येक पान भिजून जातें. आज पेशवाई असती तर याच इतिहासाची पुनरावृत्ति आपल्या महाराष्ट्रांतही दृष्टोत्पत्तीस आली असती. म्हणून माझ्या मतें परधर्मीय नोकरशाहीचें ताटस्थ्य सनातन वैदिक धर्मांत क्रांति घडवून आणण्यास आज आपणांस फार फायदेशीर आहे. स्वराज्यांत धार्मिक बाबतींत ढवळाढवळ करण्याची राजसत्तेला जी मुभा सांपडते त्या योगानें धार्मिक सुधारणेच्या मार्गांत केवढे प्रचंड अडथळे आडवे येतात त्याची वाचकांस यथार्थतेनें कल्पना यावी एतदर्थ इंग्लंडांतील १४ व्या शतकापासून १९ व्या शतकापर्यंतच्या धर्मक्रांतीच्या इतिहासाचें (Reformation Movement) विहंगमावलोकन करण्याचा यापुढील लेखांकांत लेखकाचा विचार आहे.

(विविध—वृत्त वर्ष ३ अंक ४५)

## लेखांक २ रा.

इंग्लंडांतील धार्मिक सुधारणेच्या आद्यप्रवर्तकाचें नांव जॉन वायक्लिफ् (इ. स. १३१० ते १३८४) असें होतें. दुसऱ्या रिचर्ड राजाच्या कारकीर्दींत त्यानें 'लोलर्ड' नांवाचा नवीन पंथ प्रस्थापित करून धार्मिक सुधारणेच्या ओनामास सुरवात केली. त्या वेळीं इंग्लंडचा धर्म 'रोमन—कॅथॉलिक' असून ख्रिस्ती धर्मासंबंधीं सर्व सत्ता रोम येथील ख्रिस्ती जगाचे धर्माचार्य पोप यांच्या एकट्याच्या हातीं केंद्रीभूत झालेली होती. सर्व युरोपखंडांत त्यांच्या शब्दांस धर्माज्ञेइतका मान होता. प्रत्येक ख्रिस्ती राष्ट्राच्या पदरीं पोपचा एक 'लीगेट'

किंवा वकील असे व तेथील धर्मनिर्णयाचे सर्व अधिकार त्यास दिलेले असत. त्यामुळें सर्वत्र पोपचा विलक्षण दरारा असे. या प्रचंड सत्तेविरुद्ध ब्र काढण्यास इंग्लंडांत प्रथमतः जॉन वायक्लिफ् यानें सुरवात केली म्हणूनच इतिहासकारांकडून ‘ पहिला प्रॉटेस्टन्ट् ’ अशी त्यास संज्ञा मिळाली. दुसरें असें कीं, या काळीं चर्चेस् किंवा प्रार्थनामंदिरांतून बायबल् नामक धर्मग्रंथाचें पठण लॅटिन् अगर ग्रीक हस्तलिखित प्रतीवरून होत असे. इकडील संस्कृतप्रमाणेंच इंग्लंडांतील सामान्य जनसमूहास लॅटिन् भाषा अवगत नसल्याकारणानें बायबल्चें पठण अत्यंत दुर्बोध व अर्थविरहित होत असे. ही गोष्ट वायक्लिफ् यास पसंत वाटेना. त्यानें स्वतः बायबलचें इंग्रजी भाषेंत भाषांतर करून, छापण्याची कला त्यावेळीं उपलब्ध नसल्यामुळें, स्वतःच्या शिष्यमंडळाकडून या भाषांतराच्या अनेक हस्तलिखित प्रती करून घेऊन देशभर पसरविल्या. वायक्लिफ्नें जे ग्रंथ लिहिले त्यांत धर्माचार्यांनीं ऐहिक बाबतींत निष्कारण ढवळाढवळ करूं नये, राजसत्ता ही पोपच्या शासनक्षेत्राबाहेरील वरिष्ठ दर्जाची अशी सर्वव्यापी, स्वतंत्र व श्रेष्ठ सत्ता मानावी, उपाध्याय किंवा भिक्षुक-वर्गानें सदैव निरिच्छ, निस्पृह व निष्कांचन वृत्तीनेंच कालक्रमणा करावी, इत्यादि बहुजनसमाजात खळबळ उडवून देणारीं तत्त्वें प्रतिपादन केलीं. तसेंच ‘ ट्रॅन्सब्स्टॅन्शिएशन् ’ ( Transubstantiation ) म्हणजे यूखिस्ट्च्या विधीच्या वेळीं मद्य व खाद्य यांचें अनुक्रमें येशूच्या रक्तमांसांत रूपांतर होते अशी जी धर्मभोळ्या लोकांची भावना त्यावरील आपला अविश्वास वायक्लिफ्नें प्रथम जगजाहीर केला. जॉन् वायक्लिफ् हा इ. स. १३८४ मध्यें ख्रिस्तवासी झाला. त्याच्या हयातींत त्याच्या केसासही धक्का पोहोंचला नाहीं; कारण त्याला मोठमोठ्या प्रबळ सरदारांचा आश्रय व पाठिंबा होता. परंतु पुढें लॅंकेस्टर घराणें गादीवर आल्यानंतर वायक्लिफ्च्या पंथाचें म्हणजे ‘ लोलर्ड ’ मताभिमानी लोकांचें निर्मूलन करण्यासाठीं इंग्लंडांत अत्यंत कडक कायदे निर्माण होऊं लागले. तथापि त्यांस न जुमानतां वायक्लिफ्च्या शिष्यांनीं धर्मसुधारणेच्या प्रसाराचें काम देशभर अविश्रांतपणें चालू ठेविल्यामुळें वायक्लिफ्चीं मतें सर्वत्र फैलावत गेलीं. चवथ्या व पांचव्या हेन्रीनें त्यांच्याविरुद्ध शस्त्र उपसून त्यांच्या कित्येक पुढाऱ्यांना पकडून आणवून जिवंत जाळलें, व सर्वत्र मॅजिस्ट्रेट पाठवून

' लोलर्ड ' लोकांची कत्तल करण्याचे हुकूम फर्माविले. याचें कारण ' लोलर्ड ' पंथाचें मुख्य धर्मतत्त्व असें होतें कीं, " देवाच्या घरीं उच्च–नीच भाव मुळींच नाहीं. मनुष्य गरीब असो वा श्रीमंत असो, श्रेष्ठ असो वा कनिष्ठ असो, जगांतील सर्व मनुष्यप्राणी देवास सारखेच प्रिय आहेत. " हें तत्त्व तत्कालीन राजे लोकांस पदोपदीं नडूं लागल्यामुळें त्यांना ' लोलर्ड ' पंथाच्या धर्मोपदेशकांवर शस्त्र उपसणें भाग पडलें. पुढें सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं ट्यूडर घराण्यापैकीं ८ वा हेनरी इंग्लंडवर राज्य करीत असतां जर्मनीमध्यें मार्टिन् ल्यूथर (इ. स. १४८३ ते १५४६ ) नें ' रेफर्मेशन् ' च्या म्हणजे धर्मक्रांतीच्या चळवळीचा मोठ्या धडाडीनें पुरस्कार केला. रोमन–कॅथोलिक् ख्रिस्ती लोकांचा धर्माध्यक्ष ' पोप ' हा त्या काळीं ऐहिक सुखाच्या मोहांत सांपडून पापकर्मे करणाऱ्या व प्रायश्चित्तांच्या यातायातींतून मुक्त होऊं इच्छिणाऱ्या लोकांना माफीचीं सर्टिफिकिटें विकून बरेसचे पैसे कमावीत असे ! मार्टिन ल्यूथरला ही गोष्ट सर्वस्वी नापसंत असल्यामुळें त्यानें धार्मिक सुधारणेच्या आवश्यकतेसंबंधीं लोकजागृतीची चळवळ हातीं घेतली. कर्मधर्मसंयोगानें इकडे इंग्लंडांत त्याच वेळीं आठव्या हेन्रीस आपल्या पहिल्या राणीशीं काडी मोडण्याची बुद्धि होऊन त्या कृत्यास पुष्कळ खटपट करूनही पोपची संमति मिळवितां न आल्यामुळें स्वतःच्या हातींच धर्माचार्यांचे सर्व अधिकार घेणें त्यास भाग झालें. यामुळें क्रुद्ध होऊन पोपनें इंग्लंडच्या राजास धर्मबहिष्कृत केलें. याचा अखेर परिणाम असा झाला कीं, युरोपखंडांत उपस्थित झालेल्या नवमतवादाच्या लाटेचा धक्का इंग्लंडच्या किनाऱ्यावर येऊन जोरानें थडकला. या नव्या पंथास " प्रॉटेस्टंट् " म्हणजे भिक्षुकशाहीच्या वर्चस्वास प्रतिरोध करणारा पक्ष असें नांव पडलें. कारण यांच्या चळवळीचा सर्व रोख पोप व त्यानें नेमिलेले इतर लहान मोठे धर्माचार्य यांची सत्ता कमी करण्याकडे होता. ख्रिस्ती धर्मांतील सात संस्कारांच्या वेळीं जे कांहीं हास्यास्पद विधि रूढ झाले होते त्यांवरही या पंथाचा कटाक्ष होता. उदाहरणार्थ—यूखाइस्ट्च्या प्रसंगीं मानण्यांत येणाऱ्या ' ट्रॅन्सब्स्टॅन्शिएशन ' च्या खोट्या कल्पनेवरील जनतेचा अंधविश्वास, प्रार्थनामंदिरांतून विशिष्ट प्रार्थनेच्या प्रसंगीं सुरू होणारें गाणें–बजावणें,

बायबलांतील वचनें मूर्तिपूजेस प्रतिकूल असतांही प्रार्थनामंदिराच्या गाभाऱ्यांतून भक्तिभावानें प्रतिष्ठित केलेल्या देव–देवतांच्या मूर्ति व त्यांची अहर्निश होणारी पूजाअर्चा, इत्यादि अनेक धार्मिक चालीरीती 'प्रॉटेस्टंट्' पंथानुयायी लोकांस बिलकुल मान्य नव्हत्या. तसेंच मठवासी स्त्री-पुरुषांनीं व धर्मोपदेशकांनीं अविवाहित राहाणें, पारलौकिक कल्याणाप्रीत्यर्थ म्हणजे आत्म्यास मुक्ति मिळावी म्हणून मरणापूर्वी गर्दीगर्दीनें स्वतःच्या आयुष्यांतील पापपुण्याचा जो भेटेल त्या धर्मोपदेशकापुढें पाढा वाचणें वगैरे वादग्रस्त प्रश्नाच्या बाबतींतही रोमन्–कॅथॉलिक् व प्रोटेस्टन्ट् या दोन पंथांच्या अनुयायांमध्यें तीव्र मतभेद होता. आठव्या हेन्रीची कारकीर्द दोन्ही पंथांच्या लोकांस सारखीच जाचक झाली. कारण तो स्वतः चैनी, लंपट व बेपर्वाईनें वागणारा असुन धर्मसुधारणेच्या मिषानें स्वतःच्या राज्यांतील सर्व लहान-मोठे मठ जमीनदोस्त करून त्यांतील मालमत्तेचा विनियोग त्यानें निःशंकपणें स्वतःच्या विषयोपभोगाकडे व ऐषआरामाकडे केला.

यानंतरचा इंग्लंडांतील धार्मिक सुधारणेचा इतिहास फारच कारुण्यमय व हृदयविदारक आहे. कारण आठव्या हेन्रीनंतर इंग्लंडच्या तक्तावर आलटून पालटून जुन्या व नव्या मताभिमानी स्त्रीपुरुषांची योजना होत गेल्यामुळें समाजांत एक प्रकारची अराजकता उत्पन्न होऊन धार्मिक बेबंदशाही माजली व अखेर सुमारें एक शतकानंतर त्याचें पर्यवसान पहिल्या चार्ल्स राजास सुळावर चढवून देशांत लोकसत्ताक राज्यपद्धति प्रस्थापित करण्यांत झालें. इ. स. १५५० पासून १६५० पर्यंतच्या इंग्लंडांतील धर्मसुधारणेच्या प्रगतीचें आतां आपण सूक्ष्म निरीक्षण करूं या. आठव्या हेन्रीचा मुलगा सुधारणावादी निघाला. परंतु तो अल्पवयांतच मरण पावल्यामुळें त्याची सावत्र बहीण मेरी ही गादीवर आली. तिनें सुधारणावादी नव्या पंथाच्या लोकावर असा कांहीं घोर सूड उगविला कीं, इतिहासकारांनीं तिचें नांव "रुधिरप्रिय मेरी" असें अजरामर करून ठेविलें आहे. तिच्या कारकीर्दींत धार्मिक सुधारणेच्या पवित्र कार्याप्रीत्यर्थ हूपर, क्रॅन्मर, रिडले, लॅटिमर प्रभृति कमींत कमी तीनशें लोकांनीं आपले प्राण मोठ्या आनंदानें खर्ची घातले. 'जिवंत जाळलें तरी बेहेत्तर,

पण मी आपलें मत कदापिही सोडणार नाहीं ' अशा प्रकारची नैतिक प्रखरता शेकडों हुतात्म्यांनीं प्रकट केली. मेरीच्या पश्चात् इंग्लंडच्या गादीवर इतिहासप्रसिद्ध इलिझाबेद राणी विराजमान झाली, व मेरीचे कारकीर्दीतील आसुरी जुलमानें त्रस्त झालेल्या प्रजेस कांहीं काळ सुखाचे दिवस आले. प्रजेच्या मतास योग्य मान देऊन व त्यांचा कल सांभाळून धार्मिक बाबतींत अत्यंत उदार धोरण स्वीकारण्याचें तिनें ठरविलें. हें तिचे मुत्सद्देगिरीचें व दूरदर्शी धोरणच अखेर अत्यंत यशस्वी होऊन राष्ट्राच्या अष्टपैलू प्रगतीस कारणीभूत झालें. मेरीच्या कारकीर्दींत तिच्या असहिष्णुतेस न जुमानतां सुधारणावादी लोकांनीं शेकडों प्राणाहुति देऊन जो अपूर्व स्वार्थत्याग करून दाखविला, त्यामुळें धार्मिक सुधारणेच्या कल्पनेस दुप्पट जोराची उसळी येऊन लोक अधिकाधिक प्रागतिक व विचारवंत बनूं लागले. संस्कारविधींतील अनवश्यक व निरर्थक थोतांडांना तिलांजलि देऊन ख्रिस्तीधर्म शुद्ध, पवित्रतर व निर्मळ करण्याकडे एकंदर समाजाची झपाट्यानें प्रवृत्ति होऊं लागली. याचा परिणाम असा झाला कीं, ' प्यूरिटन ' ऊर्फ पवित्राचरणवादी लोकांचा एक तृतीय पंथ इंग्लंमध्यें उदयाचलावर आला.

या पंथाच्या लोकांना बाप्तिस्म्याच्या संस्कारविधींतील मुलाचे डोकयावर पवित्र जलानें काढण्यांत येणारी क्रॉसची खूण, विवाहविधीच्या प्रसंगीं प्रणय-मुद्रिकेची आवश्यकता, प्रार्थनेच्या समयीं धर्मोपदेशकास घालावा लागणारा पांढरा झगा, इत्यादि चालीरीति नापसंत होत्या. त्यांचें मत असें होतें कीं, या व अशाच तऱ्हेच्या इतर औपचारिक तऱ्हेवाईकपणामुळें शुद्ध व निर्व्याज प्रार्थनेस निष्कारण प्रत्यवाय येतो. इलिझाबेद राणीच्या कारकिर्दीचे अखेरीस म्हणजे सतराव्या शतकाच्या प्रारंभीं या 'पवित्राचरणवादी' मताचा इंग्लंडवर इतका पगडा बसला कीं, स्टुअर्ट घराणें गादीवर येतांक्षणींच या पंथास एकदम सरकारची संमति मिळते कीं काय अशी इतरांस धास्ती वाटूं लागली. तथापि पहिला जेम्स राजा गादीवर येतांक्षणींच ही धास्ती फोल ठरली कारण ' प्रॉटेस्टंट ' पंथास उचलून धरून ' प्यूरिटन ' पंथाच्या लोकांचा छळ करण्यास त्यानें सुरवात केली. इंग्लंडमध्यें त्यांचे हाल कुत्राही खाईना अशी जेव्हां स्थिति आली तेव्हां त्यांनीं

मतांतर करण्यापेक्षां देशत्याग करण्याचें ठरविलें; व इ. स. १६२० मध्यें " मे-फ्लॉवर ' नांवाच्या गलबतावर सामानसुमान व बायकामुलें चढवून इंग्लंडच्या किनाऱ्यास अखेरचा रामराम ठोकला. उत्तर अमेरिकेंत जाऊन तेथें त्यांनीं आपली एक स्वतंत्र वसाहत स्थापन केली व भावी संयुक्त-संस्थानांचा पाया घातला. पहिल्या जेम्सनंतर त्याचा मुलगा पहिला चार्ल्स हा गादीवर आला, व ' बापसे बेटा सवाई ' या न्यायानें त्यानें एकदम अस्मानी सुलतानी गाजवावयास सुरवात केली. त्याची ठाम समजूत अशी होती कीं, इंग्लंड देशावर " हम करे सो कायदा ' या न्यायानें राज्य करण्याचा ईश्वरानें आपणास ताम्रपटच दिला आहे. या अरेरावी मताच्या पायीं अखेर राज्याबरोबरच त्याला स्वतःच्या प्राणांसही मुकावें लागलें. चार्लस् राजाला फांशी दिल्यानंतर इंग्लंडांत क्रॉमवेलच्या नेतृत्वाखालीं प्रजासत्ताक राज्यपद्धतीस अर्थात् लोकशाहीस सुरवात झाली. ऑलिव्हर क्रॉमवेल व त्याचा सेक्रेटरी सुप्रसिद्ध मिल्टन् कवि हे दोघेही " प्यूरिटन् ' पंथाचे कट्टे अनुयायी होते. त्यामुळें या १०–१२ वर्षांतच कायती सदर पंथाच्या प्रसारास देशांत सरकारीरीत्या पूर्ण मोकळीक मिळाली. क्रॉमवेलच्या मृत्यूनंतर इंग्लंडांत एकमुखी अनियंत्रित राजसत्ता पुनः सुरू होऊन दुसरा चार्लस् राजा गादीवर आला. त्यानें ' क्लॅरेन्डन कोड ' या नांवानें प्रसिद्धीस पावलेले चार कायदे अंमलांत आणून देशांत ' प्रॉटेस्टंट ' पंथाची सत्ता प्रस्थापित केली व ' प्यूरिटन ' म्हणजे पवित्राचरणवादी लोकांना मोकळ्या मैदानावर जमून त्यांच्या विशिष्ट पद्धतीप्रमाणें प्रार्थना करण्याचीही सक्त मनाई केली. अशा रीतीनें मध्यंतरीं लोकशाहींत अल्पकाळ सरकारसंमत झालेल्या ' प्युरिटन् ' पंथास पुनः एकवार प्रतिकूळ दिवस आले. सरकारीरीत्या उघड संमति देऊन राजानें वरकरणी जरी आपण ' प्रॉटेस्टंट् ' पंथाचे आहोंत असें जगास भासविण्याचा यत्न केला तथापि मनापासून त्याचा ओढा पुराणमतवादी लोकांकडेच अधिक होता. त्याचा भाऊ जेम्स् हा तर उघडपणे ' रोमन-कॅथॉलिक् ' पंथाच्या प्रार्थनामंदिरांतून प्रार्थनेस जात असे. दोघांच्याही मनांतून पुराणमतवादी पंथाच्या लोकांना उजळ माथ्यानें देशांत वावरतां यावें अशी राज्य-पद्धति सुरू करण्याचें फार होतें. परंतु पार्लमेंट सभेनें वेळींच ' टेस्ट्-ॲक्ट् ' नांवाचा एक

कडक कायदा पास करून ' प्रॉटेस्टंट् ' पंथाव्यतिरिक्त इतर सर्व पंथाच्या लोकांस सरकारी नोकरीचा राजीनामा देण्यास भाग पाडले. या कायद्यान्वयें राजाचा भाऊ जेम्स् यासही आरमारावरील आपली हुद्याची जागा सोडून द्यावी लागली. हा कायदा व त्या पूर्वीचें ' क्लॅरेन्डन् कोड ' असे सर्व जुलमी कायदे पुढें १५० वर्षांनीं म्हणजे इ. स. १८२८ मध्यें चवथ्या जॉर्जच्या कारकीर्दीत रद्द झाले. दुसऱ्या चार्लसनंतर त्याचा भाऊ दुसरा जेम्स गादीवर आला. स्टुअर्ट घराण्यांतील बहुतेक सर्व राजे पुराणमताभिमानी अर्थात् धर्म-सुधारणेच्या बाबतींत असहिष्णु निघाले. विशेषतः दुसरा जेम्स् हा तर उघड उघड स्वतःस कट्टा रोमन कॅथॉलिक् म्हणवून घेण्यांत भूषण मानीत असे. त्यानें आपल्या तीन वर्षांच्या कारकिर्दीत इंग्लंडचा धर्म पुनः जुनापुराणा करून सोडण्याचा खटाटोप आरंभला. या धोरणानुसार ' डिक्लरेशन् ऑफ इंडल्जन्स् ' या गोड नांवाखालीं एक उदार जाहीरनामा काढून तद्द्वारें लोकांना कोणत्याही पंथाच्या प्रार्थनामंदिरांत जाऊन प्रार्थना करण्यास त्यानें मोकळीक ठेविली; इतकेंच नव्हे तर त्याबरोबरच सरकारी नोकरांच्या बाबतींत त्यांच्या धर्मपंथाबद्दल इतःपर बिलकुल विचारपूस केली जाणार नाहीं असेंहि त्यांस जाहीर आश्वासन देऊन टाकलें. या जाहीरनाम्याचा अंतःस्थ हेतु मागील राजाच्या कारकीर्दीत पार्लमेन्ट् सभेनें पसार केलेला ' टेस्ट ॲक्ट् ' निरुपयोगी ठरवून पुराणमतवादी पंथाच्या मार्गांतील सर्व अडचणी एकदम दूर करण्याचा होता. तथापि इतक्या वर्षांच्या झगड्यानें देशांतील बहुजनसमाज पक्का ' प्रॉटेस्टंट् ' मतानुयायी बनल्याकारणानें त्यांनीं या जाहीरनाम्यास दाद दिली नाहीं; व अखेर सात धर्मोपदेशकांवर जाहीरनाम्याविरुद्ध खोटी तक्रार केल्याच्या आरोपावरून जेम्सनें सुरू केलेल्या खटल्याच्या अनुकूल निकालाचा फायदा घेऊन प्रजेनें राजाविरुद्ध देशांत बंड उभारलें. राजा भेदरून जाऊन फ्रान्समध्यें पळून गेला, त्याची पर्वा न करतां लोकांनीं त्याच्या जांवयास बोलावून आणलें व लोकमताचा योग्य मान राखण्याची त्याजपासून लेखी हमी घेऊन त्यास सपत्नीक इंग्लंडच्या गादीवर बसविलें. या राजानें ' टॉलरेशन् ॲक्ट् ' ( इ. स. १६८९ ) या नांवाचा एक कायदा पास करून पवित्राचरणवादी पंथाच्या लोकांस वेगळीं

प्रार्थना मंदिरें बांधून प्रार्थना करण्यास परवानगी दिली. ही परवानगी अर्थातच पुराणमतवादी पंथास लागू नव्हती; कारण त्यांचे वर्तन, धोरण व प्रोत्साहन पदच्युत राजघराण्यास अनुकूल व सत्ताधीश राजास प्रतिकूल होतें.

यानंतर सध्यांचें हॅनोव्हेरियन घराणें गादीवर आलें. त्यांतील पहिल्या व दुसऱ्या जॉर्जच्या कारकीर्दींत अनुक्रमें इ० स० १७१५ व १७४५ त पळपुट्या स्टुअर्ट घराण्यांतील वंशजास परत बोलावून आणून इंग्लंडांत पुन: रोमन् कॅथॉलिक धर्मसत्ता प्रस्थापित करण्याचे दोन अत्यंत निकराचे परंतु अयशस्वी प्रयत्न झाले. ते वेळींच हाणून पाडले गेल्यामुळें धार्मिक सुधारणेचें पाऊल आणखी थोडें पुढें पडून पवित्राचरणवादी पंथांतून 'क्वेकर्स,' 'मेथॉडिस्ट्' इत्यादि भिन्न भिन्न सांप्रदाय निर्माण झाले हॅनोव्हेरियन् राजांच्या कारकीर्दींत 'प्रॉटेस्टंट्' हा पंथ मात्र कायमचा राजमान्य किंवा सरकार—संमत ठरला. आद्याप देशांत पुराणमतवादी लोकां वरील पार्लमेन्ट सभेचे सभासद होण्याची किंवा सरकारी नोकरी करण्याची बंदी पूर्ववत कायम होती. अखेर तिसऱ्या जार्जच्या कारकीर्दीत म्हणजे १९ व्या शतकाच्या प्रारंभीं हा निर्बंध काढून टाकून कॅथॉलिक् पंथाच्या लोकांना त्यापासुन मुक्त करण्याचा पहिला प्रयत्न विल्यम पिट्नें करून पाहिला. परतु त्या कामीं स्वतः राजाच प्रतिकूल असल्यामुळें सतत १७ वर्षे उपभोगिलेल्या प्रधानपदास मात्र बिचाऱ्यास मुकावें लागलें. पुढें कांहीं वर्षे लोटल्यावर आयर्लंडचा प्रख्यात पुढारी डॅनियल ओकोनेल हा आपल्या इतर देशबांधवांप्रमाणें रोमन कॅथॉलिक पंथाचा असल्यामुळें आयर्लंडतर्फे रीतसर निवडून आला असतांही त्याला पार्लमेन्ट सभेंत बसण्यास हरकत घेण्यांत आली. या अपमानाचा परिणाम असा झाला कीं, खुद्द आयर्लंड देशांत बंडाळी होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्याबरोबर चवथ्या जॉर्जच्या कारकीर्दीच्या अखेरीस "रोमन्—कॅथोलिक इमॅन्सिपेशन् ॲक्ट" नांवाचा कायदा मोठ्या मिनतवारीनें पास करून घेण्यांत आला; व तेव्हांपासून पुराणमतवादी पंथाच्या लोकांवरील सर्व निर्बंध एकदम काढून घेण्यांत येऊन त्यांना इंग्लंडांतील बहुसंख्याक प्रॉटेस्टंट पंथीय लोकांच्या बरोबरीनें नागरिकत्वाचे सर्व हक्क देण्यांत आले. अशा

रीतीनें इ. स. १८२९ पासून इंग्लंडांत सर्व धर्मपंथाच्या लोकांचा सामाजिक दर्जा समसमान झाला व तो गेलीं शंभर वर्षें तसाच अबाधितपणें कायम टिकला आहे. असो;

आज आपल्या हिंदुसमाजांतील तरुण पिढीपुढें प्रश्न असा आहे कीं, ज्या इंग्रज लोकांना त्यांच्या स्वतःच्या देशांत धर्मक्रांति घडवून आणण्यासपुरीं पांचशें वर्षें लागलीं त्यांच्याच अनुभविक नेतृत्त्वाखाली या विसाव्या शतकांत आपणांस आपली धर्मक्रांति यापेक्षां झटपट पार पाडणें शक्य आहे काय ? या प्रश्नाचा विचार पुढील लेखांकांत करूं.

( विविध-वृत्त-वर्ष ३; अंक ४६ )

## लेखांक ३ रा

एका सुप्रसिद्ध कादंबरीकारानें मजूरवर्ग विरुद्ध भांडवलशाही यांच्यामधील आर्थिक विषमतेचें वर्णन करतांना 'सी-सॉ' च्या खेळाची उपमा घेतलेली आहे. एका वाटोळ्या पिंपावर आडवी फळी टाकून मुलें हा खेळ खेळतात त्या वेळीं त्यांना आळीपाळीनें खालीवर, वर-खाली असे हेलकावे खावे लागतात. परंतु खेळ चालू असतां मध्येंच जर कोणी प्रश्न केला कीं, 'अ' ची बाजू खालीं कां ? तर त्याचें उत्तर येवढेंच कीं, 'ब' ची बाजू वर आहे म्हणून ! सध्यां आपल्याकडे चालू असलेल्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर किंवा स्पृश्य-अस्पृश्य यांच्यामधील लढ्यासही बऱ्याच अंशीं हीच उपमा लागू पडते. मागासलेल्या निकृष्ट वर्गाचें पारडें खालीं कां ? तर पुढारलेल्या पांढरपेशा वर्गाचें पारडें शिक्षण व संस्कृतीच्या बाबतींत वर आहे म्हणून ! हेंच जर या प्रश्नाचें सरळ उत्तर मानलं तर आपणांस चातुर्वर्ण्य-समाज-रचनेच्या प्रस्तुत रोटीबंद बेटीबंद स्वरूपाविरुद्ध निश्चयपूर्वक ओरड सुरू ठेऊन पूर्ण समता प्रस्थापित करण्या-साठीं या सामाजिक तराजूचीं दोन्हीं पारडीं समतोल होईपर्यंत चळवळ केली पाहिजे हें उघड आहे. तशी चळवळ देशांत सध्यां सुरू असून तिचें यथार्थ स्वरूप वाचकाच्या चटकन् लक्षात यावें म्हणूनच या लेखमालेस "हिंदूंच्या धर्मक्रांतीचा उषःकाल" हा मथळा दिला आहे. वास्तविक पाहातां आपल्या

हिंदुधर्माचें लक्षण फार व्यापक स्वरूपाचें आहे. महाभारतांत एके ठिकाणीं असें स्पष्ट वचन आढळतें कीं, सर्व भूतमात्रांना जो कनवाळू सखा म्हणजे जो अह- र्निश काया, वाचा, मनेंकरून सर्वांचें कल्याण चिंतितो, व त्याप्रीत्यर्थ झटतो त्यालाच ' धर्म ' म्हणजे काय याचें मर्म कळलें. तात्पर्य, सदा सर्वकाळ निर- पेक्षतेनें, निरलसपणें समाजसेवा करीत राहणें हेंच खरें धर्माचरण होय. हें धर्माचें रहस्य तरुण पिढीनें नेहमीं ध्यानांत ठेवावें.

' सत्य, न्याय आणि समता ' या त्रयींवर मुख्यतः नवमतवादाची सर्व मदार आहे. आधुनिक सुशिक्षित वर्ग तर नीतिशास्त्र तेवढेंच खरें धर्मशास्त्र मानतो. ' धर्म ' हा केवळ आध्यात्मिक किंवा पारमार्थिक कल्याणासाठीं म्हणजे आत्म्यास मोक्ष मिळविण्याचा एक उपाय आहे असें जरी जुन्या लोकांच्या कल्पनेप्रमाणें मानलें, तरी समाजाच्या भौतिक उन्नतीच्या आड तो केव्हांही न येईल अशी खबरदारी घेणें आवश्यक आहे. नीति आणि सदा- चार यांविषयीं शंभर वर्षांपूर्वी ज्या कल्पना रूढ होत्या त्या आज अस्तित्वांत नाहींत. पाश्चात्य संस्कृतीचा फैलाव जारीनें होत असून कला व शास्त्रदृष्ट्या जगांतील मानव जातीची प्रगति आश्चर्यकारक वेगानें चालू आहे. उद्बोधक वाङ्मयाच्या प्रसारामुळें तरुण पिढीमध्यें विचारक्रांतीचा विकास दृष्टोत्पत्तीस येत असून तर्कशुद्ध व बुद्धिग्राह्य तेवढेंच सत्य, बाकी सर्व मिथ्या असें मानण्या- कडे दिवसेंदिवस त्यांची प्रवृत्ति दिसून येत चालली आहे. अवनीतलावर सर्वत्र सौख्य व शांतता चिरकाल नांदावी याप्रीत्यर्थ सुधारलेल्या राष्ट्रसंघाची जी खट- पट चालू आहे त्यांत धर्मभेद आडवे येऊन विघाड होऊं नये व ऐहिक व्यवहार निरंतर सुरळीत चालावे, म्हणून अखिल मानवजातीला एक-धर्मीय बनविण्याचें उच्च ध्येय डोळ्यापुढें ठेविण्याची कल्पना अनेक विद्वान् महात्म्यांनीं व तत्त्व- वेत्त्यांनीं जगापुढें मांडलेली आहे. सर्व जगाचा एक धर्म जेव्हां केव्हां व्हाव- याचा असेल तेव्हां तो होवो, तूर्त आपणांकडे प्रश्न येवढाच आहे कीं, आपल्या हिंदुधर्मांत कोणते फेरफार केले असतां त्यांतील अंतःस्थ कलहास रजा मिळेल. पैकीं पहिली गोष्ट म्हणजे जातिभेद व वर्णभेद आतां नष्ट होऊन त्या जागीं समता व भ्रातृभाव नांदूं लागला पाहिजे. स्पृश्य समाजानें अस्पृश्य समाजावर टाकलेल्या

-कडच्या बहिष्कारामुळें झालेली त्यांची शोचनीय व असहाय स्थिति पाहून वर्डस्वर्थ कवीच्या —

"Have I not reason to lament
What man has made of man?"

या उद्वेगजनक ओळींची आठवण कोणास होणार नाहीं? असो.

हिंदु-धर्म हा अद्याप बऱ्याच अंशीं 'कॅथोलिक' किंवा पुराणमताभिमानी असून त्यास यापुढें क्रमशः 'प्रॉटेस्टंट' व नंतर 'प्यूरिटन्' बनावयाचें आहे. गेल्या शंभर वर्षांमध्यें हिंदुधर्मांत इष्ट सुधारणा घडवून आणण्याची अनेक थोर पुरुषांनीं खटपट केली खरी, परंतु त्यांच्या त्यांच्या विशिष्ट मताचे नवे अल्पसंख्याच सांप्रदाय बनून पूर्वीच्या धर्मपंथांत भर पडली इतकेंच. आपणांस हे अनेक पंथ किंवा सांप्रदाय मोडावयाचे आहेत, वाढवावयाचे नाहींत. ब्राह्मोसमाज, आर्यसमाज, प्रार्थनासमाज, सत्यसमाज, थिऑसफी वगैरे पंथभेद मोडून हिंदुधर्माला सर्वसंमत असे असें स्वरूप एखादी धर्मक्रांति घडवून आणून आपणांस देतां आलें तर तें पाहिजे आहे. नवमतवादी लोकांनीं या दिशेने उद्योगास लागलें पाहिजे. नुसत्या हिंदुधर्मपरिषदा भरवून व त्यांत ठराव पास करून हें कार्य व्हावयाचें नाहीं हें ओळखून कीं काय डॉ. कुर्तकोटी यांनीं एक नवीन स्मृतिग्रंथ तयार करण्याचें योजिलें असल्याचें समजतें 'तरुण सेवासंघ', 'समाज-समता संघ', 'हिंदुविचारमंडळ' वगैरे चळवळींच्या मुळाशीं बदललेल्या परिस्थित्यनुरूप हिंदुसमाजांत योग्य दिशेनें विचारक्रांति घडवून त्यास सुसंघटित स्वरूप देणें हाच हेतु दिसून येतो. या बाबतींत तरुण पिढीनें जी खबरदारी घ्यावयास पाहिजे ती येवढीच कीं, मतें वेगळीं व आचरण वेगळें असें केव्हांही होऊं देतां कामा नये.

हिंदूंच्या धर्मकृत्यांतील बरीचशीं नित्यनैमित्तिक व्रतवैकल्यें इतकीं हास्यास्पद व अनवश्यक आहेत कीं, धर्मांतून त्यांची आतां शक्य तितक्या लवकर हकालपट्टी झालेली बरी. संस्कारविधींतील सव्यापसव्याची तीच कथा! याखेरीज जे प्रश्न धर्मसुधारणेच्छु लोकांच्या डोळ्यापुढें उभे राहातात ते म्हटले म्हणजे:—

( १ ) वेद, श्रुति-स्मृति, पुराणें वगैरे धर्मग्रंथ आतां प्रमाण मानावयाचे काय ?

( २ ) सोळा संस्कारांपैकीं यापुढें किती शिल्लक ठेवावयाचे ?

( ३ ) तेहतीस कोटी देवता मानण्याची जरूरी आहे काय ?

( ४ ) दशावतारांपैकीं खरे विश्वसनीय अवतार कोणते ?

( ५ ) धर्मक्षेत्रांतील देवालयांची व्यवस्था व सद्यःस्थिति समाधानकारक आहे काय ?

( ६ ) अस्पृश्य वर्गावरील देवालयप्रवेशाची बंदी केव्हां उठणार ?

( ७ ) जुन्या सार्वजनिक देवालयांची मालकी हिंदुसमाजाकडे आहे कीं पुजारीं, बडवे यांच्याकडे आहे ?

( ८ ) धर्माच्या नांवाखालीं अनाठायीं होणाऱ्या दानधर्मास उपयुक्ततावादाची लगाम लावणें शक्य आहे काय ?

( ९ ) वर्णव्यवस्था पुनः ' गुणकर्मविभागशः ' कशी सुरू होईल ?

( १० ) धर्मशास्त्राचीं बंधनें आमच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीच्या आड येत आहेत काय ?

( ११ ) 'वेदान्त' निवृत्ती मार्गास उत्तेजन देत आहे कीं प्रवृत्ति मार्गास देत आहे ?

( १२ ) ' हिंदू-लॉ'मध्यें परिस्थित्यनुरूप इष्ट ते फेरबदल व्हावयास नको काय?

( १३ ) गणगोत्रासह जातिभेद मोडून रोटीबेटीव्यवहारास पूर्ण मोकळीक ठेवणें.

( १४ ) विधवाविवाह, संकरविवाहादि सामाजिक सुधारणा शास्त्रसंमत मानणें.

( १५ ) शास्त्राध्ययनाची व उपाध्यायगिरीची सर्व हिंदूंस सररहा परवानगी देणें.

( १६ ) स्त्रियांची परवशता व अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट करणें. वगैरे, वगैरे.

''धर्म' या शब्दाचा अर्थ इतका व्यापक आहे कीं, त्यांत कथापुराण, तत्त्वज्ञान व संस्कारविधि या तिहींचाही अंतर्भाव होतो. हिंदु लोकांच्या भगवद्गीता, उपनिषदें वगैरे धर्मग्रंथांतून मांडलेलें सामान्य तत्त्वज्ञानच फक्त मान्य असून तदितर रामायण, महाभारतादि पौराणिक ग्रंथांतील आख्यानांवर ज्याचा विश्वास नाहीं अशा इसमास हिंदु मानावयाचें किंवा कसें हाही एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. प्राचीन काळीं मंत्रद्रष्ट्या ऋषींनीं लिहून ठेविलेल्या मनुस्मृति, पंचदशी, मिताक्षरा, श्रुति–संहितादि ग्रंथांतील वचनें वज्रलेप समजून अक्षरशः त्याबरहुकूम आचरण ठेवणाऱ्या एखाद्या आहिताग्नीकडे पाहून अर्वाचीन शास्त्रीय जग हंसणार नाहीं काय ? प्राचीन धर्मग्रंथ हे ब्राह्मण पंडितांनीं ब्राह्मणेतरांकडे कायमचा कनिष्ठ दर्जा देऊन चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत स्वतःचें वर्चस्व कायम राखण्यासाठीं मुद्दाम लिहिलेले आहेत अशी समजूत झाल्यापासून अखिल हिंदुसमाजातर्फे अस्पृश्यांसह सर्ववर्णीय पुढाऱ्यांची एक निःपक्षपाती कमिटी बसवून सत्य, न्याय व समतेच्या सर्वमान्य तत्त्वांवर हिंदूसाठी हिंदुधर्मशास्त्राचा 'नवा करार' (New Testament) तयार करावा अशी आकांक्षा ब्राह्मणेतर चळवळींतून प्रादुर्भूत झालेली दृष्टोत्पत्तीस येते. हिंदुधर्माला जगाच्या शास्त्रीय प्रगतीशीं अनुरूप असें प्रागतिक धोरण राखतां न आल्यामुळेंच आमचा समाज दिवसेंदिवस मागसला ही गोष्ट निर्विवाद आहे. आपल्या धर्माचे हें अचल किंवा निष्क्रिय स्वरूप पालटावयाचें असेल तर धर्मक्रांतीखेरीज दुसरा उपाय नाहीं. आमच्या शंकराचार्योंचीं सर्व अक्कलहुशारी एकमेकांविरुद्ध कोर्टांतून भांडणें भांडण्याकडे खर्च होऊं लागल्यापासून त्यांना धर्माचें हें असमाधानकारक स्वरूप दिसेनासें झालें आहे. स्वतःची पाद्यपूजा व बरदास्त नीट झाली नाहीं कीं, 'कलियुगांत वर्णसंकर सुरू झाल्यापासुन धर्म बुडाला' अशी ओरड सुरू करावयाची यांत काय हंशील ? मुसोलिनीच्या किंवा केमालपाशाच्या हिंमतीचा एखादा विद्वान् व कर्तबगार संन्याशी या शंकराचार्योंच्या निर्जीव पीठावर आरूढ होऊन धर्मक्रांतीची चळवळ हातीं घेईल तर तो आसेतुहिमाचल हिंदुसमाजांत विलक्षण चैतन्य उत्पन्न करूं शकेल यांत शंका नाहीं. मात्र उच्च-नीच भेदभावांना रजा देऊन प्रथम सामाजिक समता प्रस्थापित केल्याखेरीज हिंदुसंघटण—खरें

दिलसफाईचे व दिलजमाईचें संघटण—होणें अशक्य आहे. रोटीबंद, बेटीबंद सामाजिक विषमता कायम राखून शुद्धिसंघटण चालू ठेवणें म्हणजे बद्धकोष्ठ किंवा अग्निमांद्य झालेल्या रोग्यास दोन वेळ बासुंदीपुरीचे जेवण घालून त्याचा रोग बरा करूं पाहाण्याइतकेंच खुळेपणाचें आहे.

आमच्या सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या बाबतींत वादग्रस्त प्रश्नांवरील निर्णय व प्रारंभयत्नांची दिशा आमची आम्ही ठरवूं, त्यांत परकी व परधर्मीय सरकारास कोणत्याही सबबीवर ढवळाढवळ करूं देऊं नये असें लो. टिळकांचे म्हणणें होतें व तें त्यांच्या स्वाभिमानी बाणेदारपणास साजेल असेंच होतें. ज्यावेळीं सर्व राजकीय सत्ता इंग्रज नोकरशाहीच्या मुठींत केन्द्रीभूत झालेली होती व सरकार दरबारीं लोकमतास बिलकुल मान नव्हता तत्कालिन परिस्थितींत टिळकांनीं जें धोरण स्वीकारलें त्या व्यतिरिक्त अन्य धोरण स्वीकारणें धोक्याचें होतें. त्यानंतर राजकीय सुधारणांचे बरेवाईट दोन हप्ते पदरांत पडल्यामुळें वरिष्ठ कायदे कौन्सिलांत सध्यां बिनसरकारी सभासदांचे बहुमत आहे; परंतु १९ व्या शतकांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं जे मिशनरी लोक हिंदुस्थानांत आले व सरकारीरीत्या त्यांना ज्या सवलती व अप्रत्यक्षपणें उत्तेजन मिळत गेलें तें पाहून टिळकांसारख्या पुढाऱ्यांचा सरकारच्या सद्धेतूवरील विश्वास उडणें अगदीं स्वाभाविक होतें. इंग्रज सरकार हें खरोखरी हिंदुसमाजाचें हितचिंतक असतें तर त्यानें आमच्या सामाजिक व धार्मिक दोषांचा फायदा मिशनरी लोकांस कदापिही मिळूं दिला नसता. हिंदुसमाजांतील अस्पृश्य वर्गाची असहाय्य स्थिति मिशनरी लोकांच्या छिद्रान्वेषी दृष्टीला सर्वांच्या अगोदर दिसली व त्यांनीं महारा-मांगांचीं अनाथ पोरेंबाळें जवळ करून त्यांना भराभर ख्रिस्ती धर्मांत ओढलें. मिशनरी लोकांच्या या जळवा हिंदुधर्मांतील रक्तशोषण बिनबोभाटपणें करीत असतां त्यांचें सजातीय सरकार तिकडे जाणून बुजून कानाडोळा करीत राहिलें. या डोळे मिटून दूध पिणाऱ्या बोक्याच्या पाठींत बडगा घालण्याचें श्रेय जर कोणास द्यावयाचें असेल तर तें ज्या थोर विभूतींनीं जनापवादाची पर्वा न करितां अस्पृश्योद्धाराचें व पतितपरावर्तनाचें कार्य प्रथम शिरावर घेतलें त्यांसच दिलें पाहिजे. महाराष्ट्रांत हें कार्य प्रारंभीं महात्मा जोतीबा फुले, श्री शाहू छत्रपति महाराज, प. वा. गजानन

भास्कर वैद्य, कर्मवीर अण्णासाहेब शिंदे इत्यादि सुप्रसिद्ध व्यक्तींनीं केलें व पुढें महात्मा गांधी व स्वामी श्रद्धानंदासारख्यांनीं त्यास हातभार लावल्याबरोबर हिंदुस्थानभर त्याचा फैलाव झाला. अस्पृश्य किंवा बहिष्कृत वर्गाची संख्या आज सात कोटी आहे. स्पृश्यांनी अस्पृश्यांना समतेनें व बंधुभावानें वागविण्याचें नाकारल्यास ख्रिस्ती अगर इस्लामी धर्म स्वीकारण्याखेरीज त्यांना गत्यंतर नाहीं कारण ज्या धर्मांत पदोपदीं त्याचा अपमान व उपहास होतो त्यांत त्यांनीं तरी काय म्हणून राहावें बरें ? अस्पृश्यता ही केवळ मानीव आहे; ती आतां गेलीच पाहिजे. तिचा नायनाट होण्यांतच समाजाच हित व देशाचें कल्याण आहे. कारल्याच्या कडूपणाप्रमाणें ती वज्रलेप मानणें चुकीचें आहे. ‘ तुपांत तळल, साखरेंत घोळल तरी कडू तें कडूच ’ अशी एक म्हण कारल्यास अनुलक्षून प्रचारांत आहे. तद्वत् ‘ अस्पृश्य इसम कितीही विद्वान् झाला व स्वच्छतेनें राहाण्यास शिकला तरी अस्पृश्य तो अस्पृश्यच ’ असे भ्रामक तत्त्वज्ञान कांहीं मतलबी लोक बहुजनसमाजांत दृढमूल करूं पाहात आहेत. परंतु ही विचारसरणी आत्मघातकीपणाची आहे. अशानें सात कोट लोकांना नाइलाजास्तव हिंदुधर्मास पारखें व्हावें लागेल. हें सांगणें स्पृश्यांसाठीं झालें. उलट अस्पृश्यांनींही पण ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, हिंदुधर्मावर रागावून जाऊन धर्मत्याग करण्यांत त्यांचा फायदा नाहीं. कारण भगवद्गीतेंत असें स्पष्ट वचन आहे कीं:—

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ( ३, ३५ )**

म्हणून अस्पृश्यांनीं स्वावलंबनाची कांस धरून सत्याग्रहाच्या जोरावर आपल्या न्याय्य हक्काबाबत समाजाकडून राजीखुषीची कबुली मिळविण्याची पराकाष्ठा करावी. या लढ्यांत त्यांना यश खात्रीनें येणार. कारण ‘ यतो धर्मः ततो जयः । ’ हें निश्चित समजावें. देशांत हल्लीं चालू असलेल्या शुद्धि-संघटण, अस्पृश्यतानिवारण, इत्यादि चळवळी या कांहीं विशिष्ट तक्रारींची दाद लावून घेण्यापुरत्याच निर्माण झालेल्या असंबद्ध किंवा पृथक् पृथक् चळवळी नसून ही सामाजिक अस्वस्थतेची प्रास्ताविक लाट हिंदूंच्या आगामि धर्मक्रांतीच्या उषःकालाची सूचक मानली पाहिजे. या धर्मक्रांतीच्या भट्टींतून तावूनसुलाखून निघालेला अभिनव हिंदुधर्म ब्राह्मण—ब्राह्मणेतर, स्पृश्य—अस्पृश्य वगैरे सर्वांना सारखाच सुखकर व वंदनीय होवो अशी त्या, सर्व भूतमात्राच्या ठायीं समदृष्टीन पाहाणाऱ्या, दयाघन परमेश्वराची अनन्यभावें प्रार्थना करून ही लेखमाला तूर्त येथेंच संपवितों.

( महाराष्ट्र–नागपूर जानेवारी १९१७. )

# " स्वराज्याष्टक. "

———:o:———

[ लो. टिळकांची मे व जून १९१६ मध्यें बेळगांव व नगर मुक्कामीं स्वराज्यावर जी स्फूर्तिदायक व्याख्यानें झाली व ज्यासंबंधीं पुढें मुंबई हायकोर्टानें त्यांना दोषमुक्त ठरविलें त्या तीन सुप्रसिद्ध व्याख्यानांतील मुख्य मुद्दे सारांशरूपानें या स्वराज्याष्टकांत ग्रथित करण्यांत आले आहे. ]

## [ वृत्त—वसंत तिलका ]

झाला प्रसार बहु इंग्लिश वाङ्मयाचा
होई सुशिक्षित प्रजा, परिणाम त्याचा ।
मागे स्वराज्य न भितां; सदसद्विचारें
आम्हां अपात्र ह्मणण्या धजतां कसे रे ? ॥ १ ॥

झाले प्रबुद्ध जन वर्षशतांति त्यातें
नालायकांत गणणें रुचते तुम्हातें ।
येणें अयोग्य ठरणार तुह्मीच सारे
आह्मां अपात्र ह्मणण्या धजतां कसे रे ? ॥ २ ॥

तोलोनिया निज वखारित माल जेव्हां
व्यापार व्यापृत असां सुरतेस तेव्हां ।

शास्त्रें सशस्त्र आह्मि, हे विसरूं नका रे
आह्मां अपात्र ह्मणण्या धजतां कसे रे ? ॥ ३ ॥

विख्यात वैभव, कुठें शरसज्य चाप
ऐश्वर्य अद्भुत, कुठें प्रखर प्रताप ।
प्रत्यक्ष पूर्वि अजि ते स्मृतिबोध्य सारें
आह्मां अपात्र ह्मणण्या धजतां कसे रे ? ॥ ४ ॥

राष्ट्रांत सिंह आणि शंकर नायरादी
हिंदी धुरंधर पहा मिळतां सुसंधी ।
कार्योपयुक्त ठरले निज कारभारें
आह्मां अपात्र ह्मणण्या धजतां कसे रे ? ॥ ५ ॥

ह्मैसूर पौरजन हें व्यवहार दक्ष
तैसे बडोद्करही, प्रगतीचें साक्ष ।
धिःकार ! त्या ठरवि जो असमर्थ आह्मां
कैसे अपात्र दिसतो नसतांहि तुह्मां ? ॥ ६ ॥

'नेटीव मंदमति,' व्यर्थ कशास बोंब !
आक्षेप सत्य जरि हा, तरि कां विलंब ? ।
द्या हो इथें सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा
होईल सारि तुमची विफला अपेक्षा ॥ ७ ॥

सेना कृतांत गमली समरांगणांत
व्हिक्टोरिया पदक मान मिळे रणांत ।
रायें समक्ष दिधले बहु धन्यवाद !
पात्रत्वयुक्त अम्हिं, निर्णय निर्विवाद ॥ ८ ॥

'स्वराज्य वादी.'

---

( ज्ञा. प्र. पुरवणी ता. १५-१२-१९२३ वरून )

## दारिद्र्याच्या भरीस दुर्दैव !

——:०:——

( श्री. ब. टिळक, पुणें )

जात होती बालिका एक छोटी
सांगलीची सुबकशी करीं लोटी ।
येइ मागोनी 'सायक्लिस्ट' वेगें
धक्का लावोनी दूध सांडियेलें ॥ १ ॥

बालिका बिचकुन बावरे बिचारी
निमिषमात्रीं स्वप्नवत् गोष्ट झाली ।
लोटि लोटांगण घेत ये गटारीं
पायगाडीवर स्वार हो फरारी ॥ २ ॥

चार चौघे भोंवतीं जमा झाले
कोणि कोणां निंदोनि निघुनि गेले ।

रिक्तपात्रें परतली मुकाट्यानें
खिन्न वदनानें मंद पावलानें ॥ ३ ॥

भाकरीचे चतकोर ऊन ऊन
चुलीमागें झांकून बजावून ।
माय जाई परगृहीं कामधामा
पोर कैशी विसरेल देहधर्मा ॥ ४ ॥

दिले आईनें फक्त दोन आणे
दूध निरसें अच्छेर गवळणीनें ।
भूक लागुनि डोळ्यांत प्राण आले
अशा वेळीं दुर्दैव आड आलें ॥ ४ ॥

ह्मणे, ' गेलें दूध तें तरी जावो
जसें दैवें योजिलें तसें होवो ।
आज खाऊं कोरडी कुस्करून
गार पाण्याचे घोट वटाळून ' ॥ ६ ॥

घरीं येउनि देखिलें नवल काय ?
मांजरीनें साधली वेळ हाय ! ।
कंठ दाटुनि ये ग्लानि ये कपोलीं
गोरगारिबांचा कोण जगीं वाली ? ॥ ७ ॥

( लो० टिळकांच्या स्मृति-दिनानिमित्त )

## असहकार-युगास अनुलक्षून—

* * *

जो काळा, कपटी, किमान सुकृती तो शुभ्र खादी वरी
जो कांक्षी बहुमान, लौकिक जनीं तो देशभक्ती धरी ।
भ्रांती ज्यास दुपारची चरत तो गोरक्षणाच्या मिषें
जो स्वार्थी, धनलुब्ध तो जमवुनी फंडास कापी खिसे ॥ १ ॥

ना धंदा, नच रोजगार म्हणुनी संस्था, सभा स्थापिल्या
स्वार्थत्याग, स्वदेशप्रीति वरती निर्वाह चाले भला ।
ज्यांचें ज्ञान अगाधसें प्रकटले राष्ट्रीय-अध्यापक
गांवोगांव परान्नपुष्ट पडले खादी-स्वयंसेवक ॥ २ ॥

कोणी वीर, महर्षि वा जनसखा कोणी तपस्वी झटे
देशा उद्धरण्या समस्त सजले भोळे तसे भामटे ।
मुत्सद्दीपण औषधास न उरे व्हावी कशी उन्नति
वर्षामागुनि वर्ष जाय परि कां ही पालटेना स्थिति ? ॥३॥

कंटाळून निराश जीव विटला या सर्व गोष्टींप्रति ।
कार्याऽकार्यविवंचनेंत स्मरतो त्वत्कर्मयोगी *कृति ॥

—०—

* लो० टिळककृत सुप्रसिद्ध "श्रीमद्भगवद्गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र" ग्रंथ.

( मासिक मनोरंजन वर्ष ३१, अंक ३ रा; मार्च १९२६)

# चातुर्वर्ण्य !

कवि—श्री० श्रीधर बळवंत टिळक, पुणें.

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः । ( गीता ४; १३. )

——:०:——

'ब्राह्मण' आह्मीं, अह्मांस भूषण विद्यार्जन विद्यादान
कधीं न सोडूं व्रत हें खडतर, पोटा देईल दयाघन ।
धर्मपरायण, विषयपराङ्मुख, सत्वशील, शुद्धाचरणी
हंसेल कोणी हंसो बापुडा, तेजस्वी, निस्पृह वाणी ॥ १ ॥

'क्षत्रिय' आह्मी, अह्मांस भूषण समरांगणिं यात्रें मरण
स्वराज्य-शेखर शिवरायांच्या कीर्तीचें ताजें स्मरण ।
मर्द मराठे स्वातंत्र्यास्तव सर्वस्वाचा होम करूं
हंसेल कोणी हंसो बापुडा, परवशतेची चीड धरूं ॥ २ ॥

'वैश्य' वृत्तिचे उद्योगप्रिय समाजसेवक घटक अह्मी
आर्थिक दृष्ट्या अपरिहार्य जणुं जीवनकलहाचे कामीं ।
देशाची भरभराट होण्या व्यापाराची वाढ करूं
हंसेल कोणी हंसो बापुडा, धर्मादायीं खर्च करूं ॥ ३ ॥

'शूद्र' मानिले शास्त्रज्ञांनीं आत्मोन्नतिची कांस धरूं
निढळाच्या घामावर पैसा मिळवुनि आह्मी पोट भरूं ।

नांगरटीचीं, धक्काबुक्कीचीं कष्टप्रद सगळीं कामें
हंसेल कोणी हंसो बापुडा, पत्करिलीं आह्मी नेमें ॥ ४ ॥

* * * *

लोकशाहिची लाट उसळली समाज सगळा खडबडला
व्यवहारांतिल उच्च-नीच हा भेदभाव विलया गेला ॥

---

चौपाटी वरील

# लोकमान्यांच्या समाधी पुढें.

( गतकालांतील स्मृतिछटा )

१९०५

चौपाटीवरि बोगदे शिशुपणीं वाळूमधें कोरतां
लाटा सौम्य सभोंवती थडकती क्रीडेमध्यें रम्यता ।
घोडे खेचिति नित्य ट्राम परि त्यां ती होतसे घातुक
वाची इंदुप्रकाश दैनिक जुने माता करी कौतुक ॥ १ ॥

१९१७

गेला सुंदर काल बालपणिंचा येतो कशाचा अतां
कॉलेजांतिल शिक्षणार्थ फिरुनी मुंबापुरी पातलो ।

यां वाळूवरि एकटा भटकतां चित्तासि उद्विग्नता
सिंधो ! तूंहि गभीर, त्या तुजसवें तादात्म्यता पावलों ॥ २ ॥

१९२०

गर्दी कोण तुफान ही उसळली, कां मीच वेडा असें ?
ज्वाळा नश्वर देह भस्म करण्या उत्तुंग फोफावल्या ।
पर्जन्या विनवोनि साश्रुनयना देवांगना भागल्या
पिंडाशीं धुमसे, क्रियाहि न सुचे,* कार्ष्यास ग्रासी पिसें ॥ ३ ॥

१९२७

कण्ठस्तंभित गद्गदस्वर उभा राहें समाधीपुढें ।
दादा, ओळख द्याल काय ? परि हें सौभाग्य कैचें घडे ! ॥

---

* उत्तरक्रियेसाठीं सोनापुरातून चौपाटीवर बोलाविलेला ब्राह्मण.

# परिशिष्ट अ.

( This contribution to the 'Fergusson College Magazine', ten years back, was much appreciated by Mrs. Annie Besant, who published the following congratulatory note in the issue of her '*New India*' dated 21st January 1919. )

## ON THE LINE.

*A welcome Addition*:—

To those who have voiced the need for a common programme of reform in all fields of life, especially in that of social and political reform, a welcome addition has been recently made. Lok. Tilak's son, Mr. Shridhar Balwant Tilak, is studying in the Fergusson College, Poona, and he has written an article on "The inter-relation of Political and Social Reform". Mr. S B. Tilak insists on the necessity for carrying out social reform side by side with political reform, and warns workers for India that those who come in the way of social reform are creating so many obstacles in the progress of the country. He also believes that the type of courage is the same, whether it is seen in the social reformer, when he courts social ostracism and obloquy, or in the political reformer when he becomes prey to bureaucratic persecution.

We welcome this new recruit to the cause of Indian progress, and trust he will shine forth in the Motherland's service as brilliantly as his illustrious father has done.

---

# परिशिष्ट ब.

[ " लोकमान्य टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका "—खंड १ ला.

लोकमान्यांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. ब. टिळक यांनीं लिहून दिलेल्या आठवणींपैकीं आठवण ५ वी. ( पृ. १५६–५७ ) पुढील प्रमाणें आहे:—

( ५ ) १८८० सालापर्यंत पुण्या–मुंबईच्या सरकारी कॉलेजांतुन संस्कृत विषयाच्या प्रोफेसराचे जागीं कोणा तरी बड्या जर्मन स्कॉलरची नेमणूक व्हावयाची असा प्रघात चालू होता. १८८१ सालीं येथील डेक्कन कॉलेजचा संस्कृतचा युरोपियन प्रोफेसर ( हा बहुधा डॉ० किलहॉर्न असावा ) रिटायर होऊन विलायतेस परत जावयास निघाला. त्या समयीं त्याला निरोप देण्यासाठीं पुण्या–मुंबईतील शिक्षण–संस्थांचे प्रतिनिधि व इतर पुष्कळ सद्गृहस्थ बंदरावर हजर होते. साहेबमजकुरांना हारतुरे घातल्यावर ते विलायतचे बोटीवर चढले व आगबोट बंदरापासुन सुटूं लागली. इतक्यांत प्रोफेसरमजकुरांनां आपलें संस्कृतचें अगाध ज्ञान प्रकट करण्याची लहर आली व ते डेकवरून बंदरावर जमलेल्या मंडळींकडे हातवारे करून " शिवाऽस्ते पन्थानः सन्तु " म्हणून ओरडूं लागले. त्याबरोबर बंदरावर जमलेल्या शास्त्री–पंडितांना हंसूं आंवरता आंवरतां पुरेवाट झाली. कारण " शिवाऽस्ते पन्थानः सन्तु " या वाक्याचा अर्थ " तुमचा प्रवास सुखकर होवो. " असा असल्यामुळें त्या वेळीं प्रोफेसरसाहेबांचे तोंडीं तें वाक्य अगदींच अस्थानीं व अप्रयोजक होतें. बंदरावर निरोप द्यावयासाठीं जमलेल्या मंडळींपैकीं एखाद्यानें डॉक्टरसाहेबांना उद्देशून हें वाक्य

उच्चारलें असतें तर तें युक्त झालें असतें. वास्तविक पाहतां डॉक्टरसाहेबांचे मनांतून " अनुगृहीतोऽस्मि । स्वस्ति भवद्भ्यः । " यासारखें कांहींतरी म्हणावयाचें होतें; पण झाला प्रकार याच्या अगदीं उलट ! असो. यानंतर डॉ. जाकोबीसाहेबांची डेक्कन कॉलेजवर संस्कृत प्रोफेसराचे जागीं नेमणूक व्हावयाचें घाटत होतें. पण रानडे, तेलंगप्रभृति वजनदार मंडळींच्या खटपटीनें त्या रिकाम्या जागेवर अखेर डॉ. भांडारकरांनीं नेमणूक झाली; आणि तेव्हांपासून संस्कृत विषय शिकविण्यासाठीं विलायतेहून युरोपियन प्रोफेसर बोलावण्याचा प्रघात बंद पडला. ही गोष्ट मुंबई इलाख्याचे तत्कालीन गव्हर्नर सर जेम्स फर्ग्यूसन यांचे कारकीर्दीतील होय.

---

# परिशिष्ट क.

दहा बारा वर्षांपूर्वींची गोष्ट. एके दिवशीं सकाळीं परमपूज्य लोकमान्यांनीं मला हांक मारून बोलाविलें व टपालांतून आलेल्या ताज्या ' मॉडर्न-रिव्ह्यू "चे अंकांतून सुप्रसिद्ध कविसम्राट् बाबू रवीन्द्रनाथ टागोर यांची त्यांत छापून आलेली Two Parrots ही कविता वाचून दाखवून त्याचें मराठी कवितेंत रूपांतर करून मला आणून दाखव म्हणून आज्ञा केली. त्यापूर्वीं मी कधींच कविता केली नसल्यामुळें तो अंक घेऊन मी माझे खोलीत आलों पण मला कांहीं सुचेना. अखेर कै. परशुरामतात्या गोडबोल्यांचे ' वृत्तदर्पण ' ताबडतोब बाजारांतून विकत आणलें व सकाळचे दोन तास ' कविता कशी करावयाची ' याचा सदर पुस्तकावरून बारकाईनें अभ्यास केला.

वृत्तदर्पणांतील:—

वृत्तसंज्ञा आद्यपादीं । द्वितीयांत गणक्रम ॥
अक्षरें तिसऱ्या पादीं । उदाहरण शेवटीं ॥

या अनुरोधानें सर्व वृत्तांचे सांचे व खुब्या माझे ताबडतोब ध्यानांत आल्या व मालिनी-वृत्ताचा सांचा घेऊन मी सबंध दिवस खटपट करून मूळ

इंग्रजी कविता अखेर बारा चरणांत बसविली. ठरल्या प्रमाणें सायंकाळीं लोकमान्यांना ती नेऊन दाखविली. तेव्हा त्यांनीं सदर कविता मी कशी केली हें विचारल. ' वृत्तदर्पणा ' चा अभ्यास करून व त्यांतील एक वृत्त पसंत करून त्यांत महत्प्रयासानें कविता बसविल्याचें मीहीं प्रांजलपणें कबूल केलें. त्यावर त्यांनीं कै. वामन शिवराम आपटे यांचा 'संस्कृत-इंग्लिश' कोश आणावयास सांगून त्याला शेवटीं ' Sanskrit Prosody ' हें जें पहिलें परिशिष्ट जोडलेलें आहे तें प्रिन्सिपॉल आपटयांना सवड नसल्यामुळें त्यांचे विनंतीवरून आपण स्वतः तयार करून दिल्याचें सांगितलें. इतक्यांत केसरी-मराठ्याचे संपादक वर्गापैकीं श्री न. चिं. केळकर हे कांहीं कामानिमित्त तेथें आले असतां त्यानांहि माझी कविता वाचून पहावयास त्यांनीं सांगितलें. त्याप्रमाणें तात्यासाहेबांना मी आपली कविता दाखविली. ती वाचून पाहून 'बरी आहे' असें उद्गार काढून कामाचे गर्दीमुळें ते दुसरीकडे निघून गेले. याच प्रसंगीं कोणतें वृत्त कोणत्या रसास अनुकूल व कोणतें वृत्त कोणत्या रसास प्रतिकूल या विषयीं सामान्य माहिती लोकमान्यांनी मला समजावून दिली; व अलीकडे शाळांतून हा विषय नीटसा शिकवीत नसल्यामुळें त्यासंबंधीं अगदींच अज्ञान राहू नये म्हणून तुला कविता करून आणावयास सांगितली हें खरें कारण शेवटीं सांगितलें. लोकमान्यांची एखादा नवीन विषय शिकविण्याची ही पद्धत

' तव प्रसादस्य पुरस्तु संपदः '।

या कोटींतील होती यांत संशय नाहीं. असो; रवीन्द्रनाथ टागोर यांची मूळ इंग्रजी कविता पुढील प्रमाणें आहे:—

### TWO PARROTS.

The tame bird was in a cage, the free bird was in the forest.

They met when the time came, it was a decree of fate.

The free bird cries "Oh my love, let us fly to wood."

The cage bird whispers, "Come hither, let us both live in the cage."

Says the free bird, "Among bars, where is there room to spread one's wings?"

'Alas' cries the cage bird, 'I should not know where to sit perched in the sky.'

REFBK-0003563

३५६३

# लोकमान्य टिळकांचे ग्रंथ.

| | |
|---|---|
| आर्टिक होम इन् दि वेदाज (इंग्रजी) | किं. रु. ५ |
| वेदिक क्रॉनॉलजी व वेदांग ज्योतिष (इंग्रजी) | ,, रु. ३ |
| ओरायन (इंग्रजी) | ,, रु. २ |

## गीतारहस्य.

| | |
|---|---|
| मराठी सचित्र लायब्ररी इडिशन ॲन्टिक डेमी साइज | किं. रु. ५ |
| ,, ,, दोन भागांत कापडी क्राऊन साइज | ,, रु. ४ |
| ,, ,, ,, ,, कागदी ,, ,, | ,, रु. ३ |
| हिंदी ,, कापडी बांधणी डेमी साइज | ,, रु. ४ |
| ,, ,, दोन भागांत कापडी क्राऊन ,, | ,, रु. ४ |
| गुजराथी ,, कापडी बांधणी डेमी साइज | ,, रु. ४ |
| बंगाली ,, डेमी साइज | ,, रु. ४ |

## श्रीमद्भगवद्गीता.

| | |
|---|---|
| मराठी सार्थसटिक सचित्र लायब्ररी इडिशन ॲन्टिक डायरी साइज | किं. १२ आणे |
| ,, ,, ,, बायबल बाइंडिंग डायरी साइज | ,, १२ आणे |
| ,, ,, ,, कापडी डायरी साइज | ,, १० आणे |
| ,, ,, ,, ,, स्पेशल बाइंडिंग | ,, १२ आणे |
| ,, ,, ,, कागदी डायरी साइज | ,, ८ आणे |
| हिंदी ,, ,, कापडी ,, ,, | ,, १२ आणे |
| गुजराथी ,, ,, कागदी ,, ,, | ,, ८ आणे |

पुस्तकें मिळण्याचा पत्ता:—

**टिळक ब्रदर्स,** गायकवाडवाडा नारायण पेठ **पुणें.**


COVER PRINTED AT SHREE LAXMI-NARAYAN PRESS, 364 THAKURDWAR BOMBAY NO. 2